
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

# द्रौपदीची थाळी

## गिरिजाबाई केळकर

REFBK-0010312

गिरिजाबाई केळकर



आत्मवृत्त

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला,
टिळक रोड, पुणें २.

प्रसिद्धि दिनांक
१ जानेवारी १९५९

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

मुद्रक :
न. वा. लिमये,
महाराष्ट्र मुद्रणालय,
टिळक रोड, पुणें २.

ती. बापूमामा साठे

[ डॉ. वि. ल. साठे,
रिटायर्ड सिव्हिल सर्जन ]

यांस —

— द्रौपदीताई

# लेखिकेचें निवेदन

माझ्यासारखीच्या आत्मचरित्रांत वैशिष्टय तें काय असणार? पण बरेच जणांचा माझ्या मागें आग्रह होता. त्यांतले त्यांत माझा पुतण्या **यशवंत नरसिंह केळकर उर्फ** चि. **अण्णा** याच्या वरचेवर होणाऱ्या आग्रहामुळें मी हें लिहायला घेतलें. मला माहीत आहे कीं हें चुरचुरीत नाहीं; पण चुरचुरित पणाला नेहमी कटुतेची फोडणी असते. आपल्यावर आलेल्या प्रसंगांत पुष्कळ मित्र, वा नातलग यांच्याशीं खटकलेलें असतें व कालानें त्याच्यावर खपल्या धरलेल्या असतात; त्या पुन्हा स्मृतीच्या चाकूनें काढायची मला जरूर वाटली नाहीं. तसेंच ज्या पुण्यश्लोक व्यक्तीच्या सहवासांत मी ५३ वर्षे काढलीं तिच्या सहवासांतल्या आठवणी लिहितांना पूर्वस्मृतीनें मन इतकें भरून येई कीं लेखणी थांबून पुढील सर्व विचार नाहींसे होत व लिहिणें बंद पडे. ह्या कारणानें कांहीं प्रसंग अगर कांहीं निकट परिचितांची नांवें सुद्धां राहिलीं असतील याची मला जाणीव आहे. पण ह्याबद्दल ही मंडळी मला क्षमाच करतील.

आतां प्रकाशकाबद्दल काय लिहिणार ? तो तर माझा मुलगाच आहे. तेव्हां आस्थेवाईकपणानें हें छापलें म्हणणें म्हणजे आईवडिलांबद्दल त्याला असणाऱ्या आदराची थट्टा करणें होय.

प्रस्तावना लेखकाचे आभार मानायची रूढि आहे. मी पुस्तक लिहिल्यानंतर त्याला चार शब्द लिहिण्यासाठीं केळकर कुटुंबाचे परम स्नेही लो. बापूजी अणे यांचेच नांव माझ्या डोळ्यापुढें आलें. मी त्यांना आपुलकीच्या भावनेनें विनंति केली व ती त्यांनीं ताबडतोब मान्य केली तेव्हां त्याबद्दल त्यांचे आभार न मानतां कृतज्ञताच प्रगट करतें.

शेवटीं ज्यांच्या सहवासामुळेंच माझें चरित्र झालें त्या पूज्य व्यक्तीला प्रणाम करून पुरे करतें.

# प्रस्तावना

श्रीमती गिरिजाबाई केळकर ह्या 'द्रौपदीची थाळी' या ग्रंथाच्या लेखिका. हें पुस्तक त्यांचें आत्मचरित्र आहे. वाचकांना हें नांव वाचून कांहींसा विस्मय वाटेल व तें काय म्हणून ठेवलें हें जाणण्याचीहि जिज्ञासा पुस्तक हातांत घेतल्याबरोबर त्यांच्यांत उत्पन्न होणें संभवनीय आहे. लेखिकेनें वाचकांस ग्रंथाचे प्रारंभीं आपल्या जन्माची थोडीशी हकिकत सांगून "श्रीमंताचें पहिलें नातवंड म्हणून सोपस्कारांत बारसें होऊन माझें नांव **द्रौपदी** त्या काळांत व या प्रांतांत नवें असें ठेवण्यांत आलें" ही माहिती दिली आहे. बर्व्यांची द्रौपदी विवाहानंतर गिरिजा केळकरीण झाली. पुढें ही गिरिजाच आपल्या विद्वत्तेमुळें, ग्रंथकर्तृत्वामुळें, समाजसेवेमुळें आणि आदर्श गृहिणीधर्माचरणामुळें सर्व महाराष्ट्रांत 'गिरिजाबाई' या नांवानें सुप्रसिद्ध झाली. तो सर्व वृत्तान्त या पुस्तकांत लेखिकेनें फार सुलभ पण सरस भाषेंत लिहिलेला आहे.

तसेंच, आपल्या जीवनाच्या "लग्नानंतरच्या ५३ वर्षांच्या प्रवासां"त म्हणजे आपल्या वैवाहिक जीवनाच्या काळांत गिरिजाबाईंच्या अंतश्चक्षूसमोर कोणतें उच्च ध्येय होतें, कोणता दैदिप्यमान आदर्श होता, कोणत्या श्रेष्ठ भावनांनीं त्यांचें जीवन भारून गेलें होतें याचेंहि मोठें मनोरम दर्शन आत्मचरित्रास 'द्रौपदीची थाळी' हें नांव घेऊनच त्यांनीं करून दिलें आहे असें माझ्याप्रमाणेंच हा ग्रंथ वाचल्यानंतर रसिक व सहृदय वाचकांस वाटेल असा मला विश्वास वाटतो.

वनवासास जाण्यापूर्वी पांडव हे इंद्रप्रस्थ राजधानींत राहून आपलें राज्य चालवीत होते आणि कौरव हे हस्तिनापुर या राजधानींत राहून कुरु देशावर राज्य करीत होते. त्या काळांतच पांडवांनीं दिग्विजय केला आणि राजसूय यज्ञ केला त्यांनीं जो अतिथींचा सत्कार केला तो अभूतपूर्व होता; औदार्य व आतिथ्य यांची पराकाष्ठा युधिष्ठिरानें या यज्ञसमारंभांत केली होती. पांडवांच्या औदार्य, आतिथ्यादि गुणांचा दुंदुभि सर्व विश्वभर निनादित होता. जो याचक येईल त्यास इच्छाभोजन देऊन व त्याची इच्छा पूर्ण

करून पाठविणारा राजा असा धर्माचा लौकिक होता. त्यानंतर त्याच्यावर वनवासाची व अज्ञातवासाची आपत्ति आली; त्याहि काळांत द्वैतारण्यांत राहत असतांनाच त्याच्याकडून गृहस्थाधर्माचें परिपालन हें पूर्ववतच चालू होतें. त्याचा आधार 'द्रौपदीची थाळी' हा होता. युधिष्ठिराच्या आश्रमांत एकापासून एक कोटीपर्यंत जरी अतिथि आले तरी त्या सर्वांचा सत्कार, पूजा, भोजन व आतिथ्य द्रौपदी भगवंतानें तिला दिलेल्या स्थालीची प्रार्थना करून करीत असे. भगवंताची कृपाच त्या स्थालीच्या रूपानें पांडवांच्या आश्रमांत नित्य वसत होती. त्यामुळें आतिथ्यधर्माचें परिपालन करतांना त्यांना कशाचीहि उणीव पडत नसे व न्यून राहत नसे. गृहस्थाश्रमाचें वर्णन मनूनें खालील श्लोकांत फार समर्पक केलें आहे :

**'यथा मातरमाश्रित्य वर्तन्ते सर्व जन्तव ।**
**वर्तन्ते गृहिणस्तद्वत् आश्रित्येतर आश्रमा : ॥'**

सर्व प्राणी आपल्या मातेचा आश्रय करूनच जगतात; त्याचप्रमाणें ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या तिन्ही आश्रमांतील लोक एका गृहस्थाश्रमाच्या आश्रयावरच आपला योगक्षेम करतात व आश्रमधर्म परिपालन करतात. हें गृहस्थाश्रमाचें उच्च स्थान सुगृहिणीच्या दक्षतेवर आणि धर्मपरायणतेवर अवलंबून असतें. प्रत्येक आर्य गृहिणीच्या पुढें द्रौपदीच्या थालीचाच उच्च आदर्श असावा लागतो तरच त्या गृहस्थाश्रमाची सार्थकता होऊं शकतें. श्रीमती गिरिजाबाईंनीं आपल्या सौभाग्याचा काळ हा दिव्य आदर्श पुढें ठेवून व्यतीत केला आणि त्यांच्या जीवनाचा व्यय प्राय: आदरातिथ्यधर्माचे प्रतिपालनांत जाण्याचें भाग्य द्रौपदीप्रमाणेंच त्यांना लाभलें व त्यामुळें त्यांचे ठिकाणीं जी मनास शांति व समाधान आहे त्याचें निदर्शक अशा आपल्या जीवनवृत्तान्तास 'द्रौपदीची थाळी' या त्या नांवानें संबोधतात यांतच आहे.

या ग्रंथांत ग्रंथकर्तीनें आपलें सर्व आतांपर्यंतचें आयुष्य आपले पति, सासुसासरे, आजाआजी, मुलेंबाळें, जावानणंदा, लेकीसुना, आप्त इष्ट, स्नेहीसोबती, मैत्रिणी-सहकारिणी, सासरचे-माहेरचे, जवळचे-दूरचे नातलग व संबंधी इत्यादिकांच्या गोड सहवासांत कसें आनंदानें गेलें हें मोठ्या आंतल्या जिव्हाळ्यानें वर्णन करून लिहिलें आहे. त्यांत लहानमोठीं स्वभावचित्रें त्यांनीं काढलेलीं आहेत. फार काय, त्यांनीं स्वत:चे वडील, आपली सासू, पति, त्यांची जाऊ म्हणजे ताई–तात्यासाहेब केळकरांची पत्नी–

व स्वतःचीं मुलें आणि सुना व लेकी आणि स्वतःच्या व सर्वांच्या स्वभाव विशेषांचा उल्लेख मोठ्या मार्मिक रीतीनें केलेला आहे. आईचें आपल्या सर्व अपत्यांवर कोणाच्याहि गुणदोषांकडे न पाहतां कसें निर्व्याज, नितान्त प्रेम असतें हें त्यांनीं 'पुढील पिढी' या भागांत आपल्या मुलांबाळांसंबंधीं व मुलीबाळींसंबंधानें लिहिलें आहे तें वाचलें म्हणजे सहज लक्षांत येतें. आपण सदा आनंदांत राहून आपल्या परिवारांतील सर्वांना आनंदित ठेवायची कला गिरिजाबाईंना साधली होती तें हें पुस्तक वाचलें म्हणजे कळून येते. सर्व घराच्या राहणीची, व्यवस्थेची आणि वागणुकीची ठेवणच अशी कीं बाहेरून येऊन घरांत शिरतांच श्रमांचा परिहार व्हावा, दगदगीचा विसर व्हावा आणि मन प्रसन्न व्हावें. हें सिद्ध होण्यासाठीं त्या किती दक्षता घेत व प्रायः सुशिक्षित स्त्रियांकडून उपेक्षिल्या जाणाऱ्या उंबरे पूजण्यापासून तों स्वयंपाक तयार करून वाढण्यापर्यंतच्या सर्व लहानमोठ्या गोष्टीकडे त्या किती दक्षतेनें व बारकाईनें पाहत हें पाहिलें म्हणजे त्यांच्याविषयींचा आदर दुणावतो. व 'गृहिणी गृहमुच्यते' याच्या खऱ्या अर्थाचा उमग होऊं लागतो. सर्वांत आश्चर्य वाटण्यासारखी आणखी एक गोष्ट या चरित्रांत दृष्टीस पडते व तिचा मला उल्लेख करणें अवश्य वाटतें.

गेलीं पंचवीस तीस वर्षे तरी गिरिजाबाई या महाराष्ट्रांतील एक नामांकित लेखिका व स्त्रीसमाजाच्या हितार्थ झटणाऱ्या थोर समाजसेविका म्हणून सर्वांच्या परिचित आहेत. या ग्रंथांत त्यांनीं केलेल्या ग्रंथलेखनाचें व समाजसेवेचे नुसते ओझरते उल्लेख आलेले आहेत. पण त्यांत कुठेहि त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाच्या व समाजसेवेच्या थोरवीच्या अहंकाराचा उग्र दर्प तर नाहींच पण साधा वासदेखील वाचकांस येत नाहीं. पुष्कळांस समाजकार्य करण्याची स्पृहणीय हौस असते. पण त्याबरोबरच तें केल्याची प्रौढी मिरविण्याची व जे करीत नाहींत त्यांची टिंगल करण्याचीहि प्रवृत्ति असते. हा ग्रंथ वाचतांना याबाबतींत गिरिजाबाईंच्या ठिकाणीं दिसून येणाऱ्या या किंवा दुसऱ्या दुष्प्रवृत्तींचा पूर्ण अभाव हा त्यांच्या अभिजात शालीनतेचा व सदभिरुचीचा निःसंशय द्योतक आहे.

लहानपण श्रीमंतींत व वैभवांत गेलें. पतीच्या सान्निध्यांतील काळांतहि श्रीमंतीचा व ऐश्वर्याचा उपभोग घेतला. पण ह्या बाह्य वैभवाच्या उपभोगांत त्या दंग झाल्या नाहींत. आपल्या आनंदांत दुसऱ्यांना वांटेकरी

करावें अशा भावनेनें समाजासंबंधीं, संस्कृतीसंबंधानें व देशासंबंधीं आपल्या कर्तव्याची जाणीव कायम ठेवून त्यांनीं गृहस्थाश्रमांतील पत्नीचें कर्तव्य पार पाडलें.

या शेवटच्या काळांत, आपल्या सर्वस्वाचा वियोग झाल्यानंतरच्या कठीण दिवसांत आपल्या मुलांबाळांच्या आनंदांत स्वत:स सामील करून त्यांचें जीवन सुखमय व मोदमय कसें करतात याचें सुंदर चित्र त्यांनीं शेवटल्या परिच्छेदांत रेखाटलें आहे. 'आपलीं मुलेंबाळेंच नव्हे तर आपले जवळचे, दूरचे मित्र व मैत्रिणी आपणांवर प्रेम करतात व आपल्या उपयोगी पडण्यास सदा तत्पर असतात. समाधानी व आनंदी वातावरण हें ज्या वास्तूचें वैशिष्टय आहे तेथें मी कमासह बसलेली आहे' असें लिहतांना लेखिकेच्या मनांत आपण एकटेच असल्याचा विचार उफाळून वर येतो. मी एकटी कशी ? असा प्रश्न त्यांच्या मनांत आप्तेष्टांच्या प्रेमांच्या स्मृति लिहीत असतांहि येतो. त्याचें उत्तर त्यांनींच दिलेलें आहे. त्यांतच गिरिजा-बाईंच्या स्पृहणीय गृहिणीधर्माच्या यशाचें रहस्य सांठविलेलें आहे. त्या उत्तर देतात, ' हें सारें मला समजतें–पण त्रेपन वर्षें ज्या देवाच्या सहवासांत गेलीं तो देव्हारा आज सुना पडला आहे. म्हणून आनंदांतसुद्धां उदासीनता येते.' हिंदु पतिव्रतेच्या हृदयाचें हें आविष्करण आहे.

त्यांच्या द्रौपदीच्या थाळीला या श्रेष्ठ पातिव्रत्यधर्मामुळेंच एक प्रकारच्या पावित्र्याचें वैशिष्टय आलें आहे. अशा आदर्शाची प्रस्तुत काळीं व सुशिक्षित महिलांच्या प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यकता आहे याचा विचार केला असतां हें आत्मचरित्र आपल्या उदासीन मन:स्थितींत लिहून त्यांनीं जन्मभर चालविलेल्या समाजसेवाव्रताची व पातिव्रत्यधर्माची सांगताच केली आहे असें मला वाटतें.

**मा. श्री. अणे**

# बालपण : १

आपण लांब फिरायला गेलों म्हणजे बरेंच चालल्यानंतर मार्गे वळून बघतों. मोठ्या प्रवासाहून घरीं आल्यानंतर, रस्त्यांतल्या गोष्टी घरीं येऊन सांगण्यांत मजा वाटते. त्याचप्रमाणें मी आतां दीर्घ प्रवास करून येऊन येथें आमच्या वास्तूंत 'मनोहर भुवनांत' बसलें आहे. व बसल्या बसल्या मागें वळून पहातें आहे व त्या प्रवासांत ज्या ज्या घटना घडल्या त्या मुलांना सांगाव्या म्हणून कागदावर खरडते आहे. लहानपणीं मुलांना भोंवतीं बसवून मी गोष्टी सांगत असें. आतां तीं मोठीं झालीं. त्यांना ह्या गोष्टींत कदाचित् गोडी वाटणार नाहीं, पण त्यांच्या माहितींत नसणाऱ्या कांहीं गोष्टी कळल्या तर त्यांना कदाचित् गंमतहि वाटेल.

मुंबईस हल्लीं जी आंग्र्याची वाडी आहे त्याच वाडींत ७५ वर्षांपूर्वी एक बंगली होती. तेथें विनायक नारायण भागवत म्हणून सौराष्ट्रांतील भूजच्या राजाचे पेन्शनर दिवाण रहात असत. तेथें एक मुलगी जन्माला आली. त्या वेळेस ज्योतिषानें सांगितलें कीं, ही दहा पांच मिनिटें आधीं जन्मती तर राणीच झाली असती. म्हणजे त्यावेळीं एखाद्या संस्थानिकाकडे पडली असती. पण त्याचा अर्थ एवढाच कीं, तिला वैभव भोगायला मिळेल. तें मिळालेंच. नाहीं कां ?

आजोळीं भागवतांकडे माझा जन्म १८८६ सालीं झाला. घरांतलें पहिलें नातवंड मी. भागवतांना सहा मुलं; चार मुलगे, दोन मुली. त्यांत माझी आई एका मामानंतरची. बाकीची लहान होती. अर्थात् घरांत मूल झाल्याचा आनंद होता. माझ्या जन्माच्या आधीं माझे थोरले मामा कोंकणांत जाऊन आले होते. तेथें ते एक नांव ऐकून आले व रोज म्हणायचे, वयो ताईला——माझ्या आईला——मुलगी झाली कीं, हेंच नांव ठेवीन. म्हणजे आजी म्हणे, 'चांगला पहिला मुलगा होऊं दे. कांहीं तरी

...१..:

करावें अशा भावनेनें समाजासंबंधीं, संस्कृतीसंबंधानें व. देशासंबंधीं आपल्या कर्तव्याची जाणीव कायम ठेवून त्यांनीं गृहस्थाश्रमांतील पत्नीचें कर्तव्य पार पाडलें.

या शेवटच्या काळांत, आपल्या सर्वस्वाचा वियोग झाल्यानंतरच्या कठीण दिवसांत आपल्या मुलांबाळांच्या आनंदांत स्वतःस सामील करून त्यांचें जीवन सुखमय व मोदमय कसें करतात याचें सुंदर चित्र त्यांनीं शेवटल्या परिच्छेदांत रेखाटलें आहे. 'आपलीं मुलेंबाळेंच नव्हे . तर आपले जवळचे, दूरचे मित्र व मैत्रिणी आपणांवर प्रेम करतात व आपल्या उपयोगी पडण्यास सदा तत्पर असतात. समाधानी व आनंदी वातावरण हें ज्या वास्तूचें वैशिष्टच आहे तेथें मी कमासह वसलेली आहे' असें लिहतांना लेखिकेच्या मनांत आपण एकटेच असल्याचा विचार उफाळून वर येतो. मी एकटी कशी ? असा प्रश्न त्यांच्या मनांत आप्तेष्टांच्या प्रेमांच्या स्मृति लिहीत असतांहि येतो. त्याचें उत्तर त्यांनींच दिलेलें आहे. त्यांतच गिरिजा-बाईंच्या स्पृहणीय गृहिणीधर्माच्या यशाचें रहस्य सांठविलेलें आहे. त्या उत्तर देतात, ' हें सारें मला समजतें—पण त्रेपन वर्षे ज्या देवाच्या सहवासांत गेलीं तो देव्हारा आज सुना पडला आहे. म्हणून आनंदांतसुद्धां उदासीनता येते.' हिंदु पतिव्रतेच्या हृदयाचें हें आविष्करण आहे.

त्यांच्या द्रौपदीच्या थाळीला या श्रेष्ठ पातिव्रत्यधर्मामुळेंच एक प्रकारच्या पावित्र्याचें वैशिष्टच आलें आहे. अशा आदर्शाची प्रस्तुत काळीं व सुशिक्षित महिलांच्या प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यकता आहे याचा विचार केला असतां हें आत्मचरित्र आपल्या उदासीन मनःस्थितींत लिहून त्यांनीं जन्मभर चालविलेल्या समाजसेवाव्रताची व पातिव्रत्यधर्माची सांगताच केली आहे असें मला वाटतें.

**मा. श्री. अणे**

१०३१२ २३३८० ८०० ३९१९

## बालपण : १

आपण लांब फिरायला गेलों म्हणजे बरेंच चालल्यानंतर मागें वळून वघतों. मोठ्या प्रवासाहून घरीं आल्यानंतर, रस्त्यांतल्या गोष्टी घरीं येऊन सांगण्यांत मजा वाटते. त्याचप्रमाणें मी आतां दीर्घ प्रवास करून येऊन येथें आमच्या वास्तूंत 'मनोहर भुवनांत' बसलें आहे. व बसल्या बसल्या मागें वळून पहातें आहे व त्या प्रवासांत ज्या ज्या घटना घडल्या त्या मुलांना सांगाव्या म्हणून कागदावर खरडते आहे. लहानपणीं मुलांना भोंवतीं बसवून मी गोष्टी सांगत असें. आतां तीं मोठीं झालीं. त्यांना ह्या गोष्टींत कदाचित् गोडी वाटणार नाहीं, पण त्यांच्या माहितींत नसणाऱ्या कांहीं गोष्टी कळल्या तर त्यांना कदाचित् गंमतहि वाटेल.

मुंबईस हल्लीं जी आंग्र्याची वाडी आहे त्याच वाडींत ७५ वर्षांपूर्वी एक बंगली होती. तेथें विनायक नारायण भागवत म्हणून सौराष्ट्रांतील भूजच्या राजाचे पेन्शनर दिवाण रहात असत. तेथें एक मुलगी जन्माला आली. त्या वेळेस ज्योतिषानें सांगितलें कीं, ही दहा पांच मिनिटें आधीं जन्मती तर राणीच झाली असती. म्हणजे त्यावेळीं एखाद्या संस्थानिकाकडे पडली असती. पण त्याचा अर्थ एवढाच कीं, तिला वैभव भोगायला मिळेल. तें मिळालेंच. नाहीं कां ?

आजोळीं भागवतांकडे माझा जन्म १८८६ सालीं झाला. घरांतलें पहिलें नातवंड मी. भागवतांना सहा मुलं; चार मुलगे, दोन मुली. त्यांत माझी आई एका मामानंतरची. बाकीची लहान होती. अर्थात् घरांत मूल झाल्याचा आनंद होता. माझ्या जन्माच्या आधीं माझे थोरले मामा कोंकणांत जाऊन आले होते. तेथें ते एक नांव ऐकून आले व रोज म्हणायचे, वयो ताईला--माझ्या आईला--मुलगी झाली कीं, हेंच नांव ठेवीन. म्हणजे आजी म्हणे, 'चांगला पहिला मुलगा होऊं दे. कांहीं तरी

...२...

काय बोलतोस ?' पुढें मामा महाबळेश्वरला गेला. पण त्याची बत्तिशी वठली. माझा जन्म झाला. तशी आजोबांनीं तार करून त्याला कळवलें व त्यानें उलट 'द्रौपदी' हें नांव कळवलें. श्रीमंतांच्या घरचें पहिलें नातवंड ह्या दृष्टीनें कांहीं कमी पडूं न देतां सोपस्कारांत बारसें होऊन माझें नांव **द्रौपदी**, त्या काळांत व ह्या प्रांतांत नवें असें ठेवलें गेलें.

माझ्या आजोबांचा स्वभाव शिस्तप्रिय, कडक, उद्योगी व प्रामाणिक होता. त्यांच्या प्रामाणिकपणाची एक गोष्ट आई सांगे कीं कच्छ–भूजला असतांना पहिले राव वारले व नंतरचे लहान होते. अर्थात् दिवाणांच्या हातांत बरीच सत्ता होती. तर एकदां राजाचे कांहीं भाऊबंद भेटायला आले व नजराणा म्हणून सरपोस झांकलेलें चांदीचें ताट त्यांच्यापुढें ठेवून त्यांनीं आपल्या कामाच्या गोष्टी केल्या व मग "म्हणाले, दिवाणजी, नजराणा उघडून बघा. असें देणारें कुणी भेटणार नाहीं." तेव्हां आजोबांनीं एक टोंक उचलून पुन्हा खालीं टाकलें. त्यांत रत्नें होतीं. मग ते म्हणाले, पण मी सांगतो कीं, "माझ्यासारखा नजराणा नको म्हणणाराहि कोणी भेटणार नाहीं !"

माझी आई तिच्या आई वडिलांची फार लाडकी होती. तिची मी पहिली मुलगी अर्थात् लाडकीच. मी इतर लहान मुलांप्रमाणें कोणाचेहि लालजोडे बाहेर दिसले कीं घालून घरांत यायची, मग बायका घरांत ते आणले म्हणून ओरडायच्या, तेव्हां आजोबांनीं लाल मखमलीचे हरणाच्या कातड्याचे तळ घालवून बूट शिवून आणले, व म्हणाले, " आतां तिला रागावूं नका. हे सोवळे बूट आहेत." माझ्या आजीला गोरी मुलगी व पुष्कळ केस आवडत. ते दोन्ही माझ्यांत होतें म्हणून मी तिला फार आवडायची. लहानपणीं मला पिवळा रंग फार आवडे म्हणून तिनं मला पिवळा जरीचा परकर शिवला होता. घरांत एकच मामी, मावशी व मामा लहानच, त्यामुळें खूप कौतुक. तसेंच भागवत काठेवाडांत असतांना कृष्णाजीपंत नूलकर व माधवराव जोगळेकर हे तिकडेच होते. तेव्हां आपली वस्ती तिकडे क्वचित् असे म्हणून ह्या तिन्ही घरांचा खूप घरोबा होता. तो महाराष्ट्रांत परत आल्यावरहि टिकला. भागवत मुंबईस राहिले. नूलकर पुण्यास राहिले. व

जोगळेकर बेळगांवला गेले. पण येणीं जाणीं होती त्यामुळें त्यांचे मुलगे ते मामा व मुली त्या मावशी असेच संबंध राहिले.

आई माझ्या पाठीवरच्या बहिणीच्या वेळेस बाळंतीण होती म्हणून तिच्याकडे जायला बंदी तेव्हां मी सकाळीं उठून दारांत पाय पसरून बसायची व हातवारे करीत म्हणायची, 'आई नाहीं, बाई नाहीं, कांहीं नाहीं!' एक दिवस थोरला मामा आला व माझ्या शेजारीं बसून तसेंच म्हणायला लागला. सगळीं हंसलीं. मग आई चिपळूणला कोंकणांत गेली. तेथें भागवतांचें घर आहे. त्यांत त्या वेळेस आईचे एक मामा साठे रहात होते. त्या मामींना मूलबाळ नव्हतें. त्यांनीं मला घेण्याचा प्रयत्न करावा. खाऊ द्यावा. रात्रीं माझ्याजवळ निजशीलना विचारावें. मी हो म्हणावें. निजतांना आईच्या आत्याबाईच्या जवळ निजावें. रात्रीं मामींनीं हळूच येऊन माझ्याजवळ निजावें. पण मी जागी झालें कीं, हात चाचपून पहावयाची व बांगड्या लागल्या कीं ही आजी नको म्हणून ओरडायची.

आईच्याबरोबर वरचेवर आजोळीं यायला मिळे. तेथल्या वातावरणांत आनंदी आनंद वाटे. आई तिच्या मैत्रिणींकडे जाई येई. खेळायला खूप मुलें असत. माझ्या आठवणींत भागवत फरेंच पुलाखालीं गोकुळदास देवजीच्या वाडींत रहात असत. तसेंच तेथें जवळच राजारामपंत भागवत व बाळाजी आबाजी भागवत रहात असत. त्यांच्या मुलींकडे जाणें येणें, समुद्रावर जाणें ह्या गमती चालत. खरंच आजोळ म्हणजे लहानपणीं एक स्वर्गीय धाम वाटतं. त्याची माधुरी वेगळीच असते.

माझा जन्म जरी भागवतांकडे झाला तरी मी बर्व्यांची मुलगी. माझे पणजोबा कृष्णाजी सखाराम बर्वे हे वसईचे किल्लेदार होते. ते पेशव्यांचे मामा. बर्व्यांची मुलगी पेशव्यांना दिलेली होती. पेशव्यांनीं जेव्हां राज्याचे उदक इंग्रजांच्या हातावर सोडलें तेव्हां इंग्रजांनीं बर्व्यांना पेन्शन देऊन काशीस रहावयास सांगितलें. कारण इकडे हे लोक फितुरी करतील अशी इंग्रजांना भीति वाटे. पण इंग्रजांनीं त्यांच्याजवळ एक कागद देऊन सांगितलें कीं, "पुढें कालांतरानें तुमच्या मुलांनीं हा कागद दाखवावा म्हणजे त्यांना सरकारी नोकऱ्या मिळतील." माझे पणजोबा आपल्याबरोबर थोरल्या

काय बोलतोस ?' पुढें मामा महाबळेश्वरला गेला. पण त्याची बत्तिशी वठली. माझा जन्म झाला. तशी आजोबांनीं तार करून त्याला कळवलें व त्यानें उलट 'द्रौपदी' हें नांव कळवलें. श्रीमंतांच्या घरचें पहिलें नातवंड ह्या दृष्टीनें कांहीं कमी पडू न देतां सोपस्कारांत बारसें होऊन माझें नांव **द्रौपदी**, त्या काळांत व ह्या प्रांतांत नवें असें ठेवलें गेलें.

माझ्या आजोबांचा स्वभाव शिस्तप्रिय, कडक, उद्योगी व प्रामाणिक होता. त्यांच्या प्रामाणिकपणाची एक गोष्ट आई सांगे कीं कच्छ–भूजला असतांना पहिले राव वारले व नंतरचे लहान होते. अर्थात् दिवाणांच्या हातांत बरीच सत्ता होती. तर एकदां राजाचे कांहीं भाऊबंद भेटायला आले व नजराणा म्हणून सरपोस झांकलेलें चांदीचें ताट त्यांच्यापुढें ठेवून त्यांनीं आपल्या कामाच्या गोष्टी केल्या व मग "म्हणाले, दिवाणजी, नजराणा उघडून बघा. असें देणारें कुणी भेटणार नाहीं." तेव्हां आजोबांनीं एक टोंक उचलून पुन्हा खालीं टाकलें. त्यांत रत्नें होतीं. मग ते म्हणाले, पण मी सांगतो कीं, "माझ्यासारखा नजराणा नको म्हणणाराहि कोणी भेटणार नाहीं !"

माझी आई तिच्या आई वडिलांची फार लाडकी होती. तिची मी पहिली मुलगी अर्थात् लाडकीच. मी इतर लहान मुलांप्रमाणें कोणाचेहि लालजोडे बाहेर दिसले कीं घालून घरांत यायची, मग बायका घरांत ते आणले म्हणून ओरडायच्या, तेव्हां आजोबांनीं लाल मखमलीचे हरणाच्या कातड्याचे तळ घालवून बूट शिवून आणले, व म्हणाले, "आतां तिला रागावूं नका. हे सोवळे बूट आहेत." माझ्या आजीला गोरी मुलगी व पुष्कळ केस आवडत. ते दोन्ही माझ्यांत होतें म्हणून मी तिला फार आवडायची. लहानपणीं मला पिवळा रंग फार आवडे म्हणून तिनं मला पिवळा जरीचा परकर शिवला होता. घरांत एकच मामी, मावशी व मामा लहानच, त्यामुळें खूप कौतुक. तसेंच भागवत काठेवाडांत असतांना कृष्णाजीपंत नूलकर व माधवराव जोगळेकर हे तिकडेच होते. तेव्हां आपली वस्ती तिकडे क्वचित् असे म्हणून ह्या तिन्ही घरांचा खूप घरोबा होता. तो महाराष्ट्रांत परत आल्यावरहि टिकला. भागवत मुंबईस राहिले. नूलकर पुण्यास राहिले. व

जोगळेकर बेळगांवला गेले. पण येणीं जाणीं होती त्यामुळें त्यांचे मुलगे ते मामा व मुली त्या मावशी असेच संबंध राहिले.

आई माझ्या पाठीवरच्या बहिणीच्या वेळेस बाळंतीण होती म्हणून तिच्याकडे जायला बंदी तेव्हां मी सकाळीं उठून दारांत पाय पसरून बसायची व हातवारे करीत म्हणायची, 'आई नाहीं, बाई नाहीं, कांहीं नाहीं!' एक दिवस थोरला मामा आला व माझ्या शेजारीं बसून तसेंच म्हणायला लागला. सगळीं हंसलीं. मग आई चिपळूणला कोंकणांत गेली. तेथें भागवतांचें घर आहे. त्यांत त्या वेळेस आईचे एक मामा साठे रहात होते. त्या मामींना मूलबाळ नव्हतें. त्यांनीं मला घेण्याचा प्रयत्न करावा. खाऊ द्यावा. रात्रीं माझ्याजवळ निजशीलना विचारावें. मी हो म्हणावें. निजतांना आईच्या आत्याबाईच्या जवळ निजावें. रात्रीं मामींनीं हळूच येऊन माझ्याजवळ निजावें. पण मी जागी झालें कीं, हात चाचपून पहावयाची व बांगड्या लागल्या कीं ही आजी नको म्हणून ओरडायची.

आईच्याबरोबर वरचेवर आजोळीं यायला मिळे. तेथल्या वातावरणांत आनंदी आनंद वाटे. आई तिच्या मैत्रिणींकडे जाई येई. खेळायला खूप मुलें असत. माझ्या आठवणींत भागवत फरेंच पुलाखालीं गोकुळदास देवजीच्या वाडींत रहात असत. तसेंच तेथें जवळच राजारामपंत भागवत व बाळाजी आबाजी भागवत रहात असत. त्यांच्या मुलींकडे जाणें येणें, समुद्रावर जाणें ह्या गमती चालत. खरंच आजोळ म्हणजे लहानपणीं एक स्वर्गीय धाम वाटतं. त्याची माधुरी वेगळीच असते.

माझा जन्म जरी भागवतांकडे झाला तरी मी बर्व्यांची मुलगी. माझे पणजोबा कृष्णाजी सखाराम बर्वे हे वसईचे किल्लेदार होते. ते पेशव्यांचे मामा. बर्व्यांची मुलगी पेशव्यांना दिलेली होती. पेशव्यांनीं जेव्हां राज्याचें उदक इंग्रजांच्या हातावर सोडलें तेव्हां इंग्रजांनीं बर्व्यांना पेन्शन देऊन काशीस रहावयास सांगितलें. कारण इकडे हे लोक फितुरी करतील अशी इंग्रजांना भीति वाटे. पण इंग्रजांनीं त्यांच्याजवळ एक कागद देऊन सांगितलें कीं, "पुढें कालांतरानें तुमच्या मुलांनीं हा कागद दाखवावा म्हणजे त्यांना सरकारी नोकऱ्या मिळतील." माझे पणजोबा आपल्याबरोबर थोरल्या

मुलाला म्हणजे माझे आजोबा सखाराम ह्यांना तत्पूर्वी घेऊन काशीस गेले व तेथें गंगेकांठीं बारा वर्षें गायिची पुरश्चरण करून त्यांनीं जलसमाधि घेतली त्यांनीं मुलाला सांगितलें कीं " माझें क्रियाकर्मांतर करून तूं परत जा व इंग्रजांनीं दिलेला कागद दाखवून ते नोकरी देतील ती इमानानें कर."

माझ्या पणजोबांची उत्तरक्रिया करून माझे आजोबा परत आले व त्यांनीं तो कागद इंग्रजांना दाखवला व त्यांना तेथेंच म्हणजे चिंचणी तारापुरासच मिठागरावरचे अधिकारी म्हणून नोकरी मिळाली. त्यांचे एक भाऊ होते, त्यांनाहि इंग्रज सरकार मुन्सफीची २०० रु. ची नोकरी देत होते. पण सभोंवतालच्या फालतुक लोकांनीं शिकवलें कीं, " तुम्ही किल्लेदाराचे चिरंजीव असली काय नोकरी करावी." म्हणून त्यांनीं ती नाकारली. हे आजोबा पुढें आंधळे झाले. माझें लग्न झाल्यावरहि ते होते. आई म्हणे, आमची आजी कोंकणांतल्या सरदार कान्हेऱ्यांची मुलगी. तेथून पालखी निघायची ती तारापूरच्या मजघरांत यायची. माझ्या आठवणींत पुढल्या पडवींत पालखी अबदागीर टांगलेले होते. ती दिसण्यांत सुंदर, उंचनीच व निकोप होती. ८० वर्षांची होऊन ती गेली. बर्वे मंडळी प्रकृतीनें चांगली पण भयंकर करारी. माझ्या आजोबांनीं कसल्यातरी भांडणावरून तारापूरचें पाणी पिणार नाहीं असें म्हटलें होतें. ते तारापुरास घरीं आलें तर पिण्याच्या पाण्याची घागर ब्राह्मण चिंचणीहून आणीत असे. त्यांना नऊ मुलं झालीं. पांच मुलगे व चार मुली. दोघी बालविधवा झाल्या. एकीला मूल नव्हतं. व एकीला मुलं झालीं त्यांतलीं एक दोन जगलीं. थोरले चुलते आनंद सखाराम बर्वे हें पूर्वी इंदूरला होते. पुढें सर टी माधवराव जेव्हां बडोद्यास आले तेव्हां ते तेथें सर सुभे म्हणून आले व अखेरपर्यंत तेथेंच होते. त्यांनीं तारापुरास व विशेषत: तारापुराजवळ बोर्डी येथें शेतीवाडी बंगला वगैरे मोठी इस्टेट केली. तारापुरासहि त्यांचा बंगला आमच्या जुन्या घरांच्या जोडीला आहे. त्यांच्या दोन मुलांपैकीं एक डॉक्टर होता. एक बोर्डीची शेती संभाळी. आतां दोघांची मुलं आहेत. आनंदरावांना मुली चार. त्यांत एकीचा मुलगा आहे. दुसरी ग्वाल्हेरच्या गोखल्यांकडे दिली होती. तिचे

तीन मुलगे व दोन मुली आहेत. हे गोखले ग्वाल्हेरला डॉक्टर होते. दुसरे चुलते शामराव सखाराम बर्वे. हे बडोद्यास इंजिनियर होते. ते मग नोकरी सोडून तारापुरास शेतीभाती करून होते. त्यांनीं तेथेंच बंगला बांधला आहे. हल्लीं त्यांचे चिरंजीव तेथें वडिलांसारखीच मान्यता मिळवून शेती-भाती संभाळून असतात. त्यांना मुलगा व नातवंड आहे. तिसरे चुलते श्रीधर सखाराम बर्वे, हे ग्वाल्हेरला डॉक्टर असून अखेरपर्यंत तेथेंच होते. ह्यांची मुलाची मुलं व मुलीची मुलं आहेत. चवथे माझे वडील श्रीनिवास सखाराम बर्वे. आमच्या आईला पुष्कळ मुलं झाली पण पहिली मी व शेवटला दिनकर एवढींच हयात आहेत, त्यालाहि मुलं बाळं आहेत. पांचवा चुलता लग्न होऊन एक मुलगा होऊन वारला. पुढें त्याचा मुलगाहि गेला. हे दोघे भाऊ लहान असतांना आजोबा गेले. तेव्हां वडीलकीच्या नात्यानें माझ्या थोरल्या चुलत्यांनीं दोघांचं सर्व कांहीं केलं. नव्या भावजयांनासुद्धां ते सुनांसारखे वागवीत. माझी आई व धाकटी चुलती त्यांच्याकडे बडोद्यास राहिल्या होत्या. त्या त्यांचे फार गुण गायच्या. दिसण्यांत सर्व भाऊ गोरे, उंच अन् रुबाबदार होते. माझे वडील सावळे होते. नानासाहेब (आनंद-राव) मनाचे थोर, उदार व विद्याव्यासंगी होते. त्यांनीं बोर्डीस शेतीवाडी करून बंगला बांधला. पण बंगला पहायला आले तेव्हां बंगल्यांत जातांना दरवाज्यांत पागोट्याला वरचा भाग लागून तें पडले त्याबरोबर ताबडतोब बंगला अपशकुनी म्हणून विकून टाकला. ते लेखक होते. 'ठगाची जबानी,' 'हॅम्लेट' नाटकाचें मराठी भाषांतर हीं त्यांचीं पुस्तकें. माझ्या वडिलांनीं शिक्षण पुरतं करावं अशी त्यांची इच्छा होती, पण लहानपणापासून वडील नाहींत म्हणून बोलायचं नाहीं, ह्याखालीं त्यांना कोणाचा धाक उरला नाहीं. अर्थात् वळण नाहीं. म्हणून स्वभाव स्वच्छंदी बनला. त्यांनीं प्रथम बडोद्यास रिसाल्यांत नोकरी धरली. पण कोठेंही फार दिवस न टिकणें हा स्वभाव असल्यामुळें ती त्यांनीं सोडली. मग ते काठेवाडांत गेले. मी लहान असतांना आई मला घेऊन वरचेवर तारापुरास सासूबाईंकडे जायची, राहायची. लग्न झाल्यावरहि तिचें सासर माहेर कांहींवेळा तारापुरास—तर केव्हां बडोद्यास होई; आजी माझें खूप कौतुक करी. मग लिंबडीला गेल्या-

वर येणं–जाणं कमी झालं. वर्षानं आई माहेरीं आली कीं आठ दिवस तारापुरास जाई.

वडील काठेवाडांत, लिंबडी, धोराजी, धांगध्रा व राजकोट असे हिंडले. पण लिंबडी व राजकोटमध्यें माझ्या आयुष्यांतील बाळपणांतला सुखाचा काळ गेला आहे. ह्या दिवसांत मला दुःखाचा वारासुद्धां लागला नाहीं. उत्तम खाणं, सुंदर कपडे, नोकर चाकर व गाडी घोडा असे. लिंबडीस मी नऊ वर्षांची होते. मला गुजराथी शाळेंत घातलें होते. केव्हां केव्हां मी बाईंच्या मांडीवर बसून लिहावयाची. केव्हां केव्हां पडद्याच्या शिग्रामांतून आईबरोबर राजवाड्यांत जायचें. पूर्वीं तिकडे आपली वस्ती फार थोडी होती. तेव्हां उघडं डोकं म्हणून लोक नांव ठेवीत. म्हणून आई मला पारशी फॅशनची अरुंद पट्टीची झिगानें भरलेली टोपी घाली–आतां पारशांतहि टोपी राहिली नाहीं. वाड्यांत राण्या खूप कौतुक करीत. लिंबडी हें काठेवाडांतील लहानसें संस्थान होतें. रेल्वे होती. संस्थान असल्यामुळें गांव लहान. तेव्हां गांवाबाहेर शंकराचें देऊळ, क्रिकेट क्लब वगैरे गोष्टी होत्या. गांवांत राजाबद्दल अभिमान असायचा, नवरात्रांतले गरबे तेव्हां गांवांत व्हायचे, तसे राजवाड्याच्या चौकांतहि व्हायचे. ते बघायला महाराज, राणीसाहेब, सर्व असायचीं. दसऱ्याची स्वारी अपूर्व असे. लोकांना राजा बघावयाला काय आनंद वाटे. स्वारीच्या आधीं चार आठ दिवस, मग चार आठ दिवस महाराजांच्या नी स्वारीच्या गोष्टीचा विषय पुरे. लहानशा संस्थानांत जी गंमत त्या काळांत असे ती तिथेंहि होती. माझ्या पाठीवर भावंडं जगलीं नाहींत. मी एकटीच. अर्थात् आला गेला नोकर-चाकर, मास्तर, सर्वच माझे खूप लाड करायचे. त्यावेळच्या त्या आठवणीनें सुद्धां आनंद वाटतो. ती दिवाळी, ते फटाके, तीं पोलीस लाईन मधलीं मुलं बेन, बेन करीत गोळा व्हायचीं. तेव्हां आम्ही सर्वच निष्पाप जीव होतों. ती शिपायांची परेड, ते घोडेस्वार, ती पाडव्याची सलामी, किती आनंद-दायक वातावरण होतें तें ! आम्ही लिंबडीला गेलों तेव्हां धाकटी काकू व तिचा मुलगाहीं आलीं होतीं. तो महाराष्ट्रांत व खेडेगांवांत वाढला असल्यानें देवांचे उत्सव कथा पुराण वगैरेच्या पुष्कळ गोष्टी त्याला ठाऊक होत्या.

तो त्या सांगायच्या व देव सगळीकडे आहे म्हणून आपण एका खांबाची पूजा करावयाचा. मी सुद्धां मग त्यांच्या संगतीनें आईकडून देव मागून घेऊन पूजा करूं लागलें. दिवाळींत माझें स्नान झालें कीं, देवांना ऊन पाण्यानें स्नान घालून फटाके बघायला नेऊन बसवायचें. मग सगळ्या मुलांना फटाके द्यावे, व मग सगळ्यांनीं एकदम वाजवावे अशी ती दिवाळी. राजवाड्यांत राण्यांनीं बोलवायचें आणि मग त्यांनीं खूप फटाके द्यायचे. ते घेऊन घरीं यायचे. शाळेंत मात्र खूप मैत्रिणी. एरवीं कोठे जायची परवानगी नसे. मास्तर मास्तरणी सगळी खूप प्रेम करावयाची. सकाळची शाळा असली कीं घरीं आलं कीं खूप भूक लागायची. आंगधुणं व्हायचं असे. मग पूजा करून जेवायचें. तेव्हां रडायला यायचें. पण आमच्या येथें नागर नांवाचा एक गुजराथी ब्राह्मण होता. त्यानें युक्ति काढली. तो म्हणाला, "बेन तुम्ही हव्या तर आंग धुवून पुजा करा. पण एक खरा भक्त होता तो आधीं जेवी, मग आंग धुवी म्हणजे जेवलेलं जातं. मग स्वस्थ मनानें चांगली पूजा होतें. आतां केलीत तर घाईत देवाकडे लक्ष रहात नाहीं. बवा बोवा !" मला त्याचें म्हणणें पटलें. मग रडें थांबलें.

माझ्या वडिलांना तशी विशेष कशाची हौस नसे. मला बाग करायची मोठी हौस. पडवीखालची अंगणांतली थोडी जागा पळचा उलथनी वगैरे हत्यारांच्या साह्यानें उकरायची. मग त्यांत मेथी, धने, मुळ्याचे बुडखे लावून बाग बनवायची. मग तें बीं जरा जरा दिसूं लागलें कीं, कौलाच्या तुकड्यांनीं आंत बाहुलीला फिरायला रस्तें करायचें, नी जरा मोठं होतं न होतं तोंच गुराढोरांनीं खाल्लें म्हणजे रडायचें. पुन्हां आईच्या डोक्याशीं वेळ जात नाहींची कटकट आहेच. एकदां तिनें शिवलीलामृताचा अकरावा अध्याय काढून दिला व 'वाच' म्हणाली. 'म्हणजे वेळ जाईल!' थोड्या ओव्या वाचल्या कीं कंटाळा येई पण अगदीं वेळ जाईनासा झाला कीं तो अध्याय वाचायचा. ती शिवायला शिकवी. कशीदा शिकवी. विणायला शिकवी. केव्हां केव्हां शिग्रामांतून गांवाबाहेर देवाला बागेंत जावें. एकंदरींत तें आयुष्य सुखांत गेलें. तेथें गुजराथी पांचवीची परीक्षा दिली.

तेथून मधें कांहीं दिवस धांगद्रचाला होतें तेव्हां माझी एक लहान बहीण गेली. तेव्हां आईचे मामा लक्ष्मणराव साठे बिलख्याला दिवाण होते. तेथें त्यांनीं आईला नेली. आईबरोबर मी होतेंच. तेथें बापू मामा जरा मोठा, जगु मामा माझ्या बरोबरीचा, व दत्तुमामा लहान. हे तिचे माझे संवगडी झाले. तेथें असतांना आईबरोबर गिरनार, वेरावळ करून आले तें सर्व थोडं थोडं आठवतं. मग वडिलांची बदली होऊन धोराजीला गेलों. तेथें रेल्वे यार्डमधेंच आमचा बंगला होता.जवळ स्टेशन व रेल्वे नोकरांची घरं. बंगला थोडा लांब. मनुष्य सोबतीला कोणी नाहीं. अन् भोवतीं खूप झाडं. दोन वेळां गाडी दिसे व सकाळीं गवळी दिसे. दुपारापर्यंत मोलकरीण सोबतीला असे. एकटं निजायचं,बसायचं, वाचलेलंच पुन्हां वाचायचं. तेथें गांवांत अभ्यंकर म्हणून गृहस्थ होते. ते लहान असतांना आजोबांनीं त्यांना आणून नोकरीला लावले होते. पुढें ते आपल्या हुशारीनें वाढले. ते आईला बहीण मानीत. त्यांच्याकडे केव्हां केव्हां जात असूं. पुढें धोराजीहून आम्ही राजकोटला आलों व माझी एकांतवासाची कैद संपली.

# किशोरावस्था : २

येथें आल्यापासून लग्न होईपर्यंतचे दिवस सुखांत गेले. येथें प्रथम वडील रेल्वेंतच पोलिस इन्स्पेक्टर होते. तेव्हां आम्ही रहात होतों तेथून बार्टन फीमेल ट्रेनिंग कॉलेज अगदीं जवळ होतं. तेथें प्रॅक्टीसिंग स्कूलमध्यें मला सहावींत बसवलं. सहावी संपली. पुढं काय ? तेव्हां मुलींच्या इंग्रजी शाळा नव्हत्या. मुलांच्या शाळेंत घालण्याचं धाडस लोकांना नव्हतं. एकदां वडिलांची लेडी सुपरिन्टेन्डेन्टची गांठ पडली तेव्हां ती त्यांना म्हणाली, ट्रेनिंगमध्यें पाठवा. पुन्हां सहावीसातवीं होईल पण वेळ जाईल. मग मी पुन्हा शाळेंत जाऊं लागलें.

राजकोटला आल्यावर आईचे मामा, लक्ष्मणराव साठे येथेंच रहात असत. ते माझे आजोबा. त्यांचेकडे जाऊन आजी व मावशीकडून खूप कौतुक करून घ्यावें. बापूमामा, जगूमामा, दत्तुमामा खेळायला असत. ते आमचेकडे आले कीं बिझिक खेळावं. नूलकरांची मुलगी ताईमावशी जवळ. म्हणून वरचेवर जाणें येणें असे. बॅरिस्टर पंडित घनःशामपंत, पंडित शुक्ल बॅरिस्टर वकील हीं सर्व भोंवताली पण सीतारामपंत खूप प्रेम करत. ताई मावशीकडे दिसलें कीं गाडीतून न्यायचे आणून सोडायचें. ताई मावशी ही मावशी नाहीं असं कधीं वाटलंच नाहीं. एकदां शाळेंत कांहीं बोलणें निघालें तेव्हां बाम डॉक्टरांची काशीताई मला म्हणाली, 'अग, त्या म्हणायच्या मावशी असतील ! तुम्ही कोंकणस्थ, त्या कऱ्हाडे, त्या कशा खऱ्या मावशी असतील ? तुमची एखादी मावशी कऱ्हाड्याकडे दिली आहे. का ?" मी म्हटलं, " तें मला ठाऊक नाहीं. पण ही मावशी खरी मावशी आहे." तिला असं म्हटलं खरं पण पोटांत डांचत होतं. घरीं येऊन आईला म्हटलें, " आई, ही मावशी खरी ना ?" आई रागावून म्हणाली, " शाळेंत जाऊन

नाहीं त्या गोष्टी बोलायला शिकलीस. तुझी शाळाच बंद केली पाहिजे. खरं खोटं काय असतं ग ? " अर्थात तिच्या पुढून पळालें. पण मन स्वस्थ राहीना. मग चोरून ताई मावशीकडे गेलें. म्हटलं, " मावशी एक विचारूं कां ? तूं खरी मावशी आहेस कीं नाहीं ?" ती म्हणाली, " का ग, आजच हा प्रश्न कां आला ?" " अग काशीताई असं असं म्हणाली तर खरं सांग. " ती म्हणाली, " मी नी तुझी आई लहानपणच्या मैत्रिणी. म्हणजे खऱ्या बहिणीसारख्याच आहों !' "' म्हणजे तूं खरी नाहींस तर ?" असें म्हणून मी तिला घट्ट मिठी मारून रडायला लागलें. तिनें जवळ घेतलं व तीही रडायला लागली. दोघी खूप रडलों. मग मी घरीं आलें. मग मावशी व आई भेटल्या तेव्हां मावशीनें हें आईला सांगितलें. आई म्हणाली, " आतांच्या पोरीच चावट ! "

माझ्या दोन्ही कडच्या आज्या जिवंत होत्या. त्या माझें लग्न करावें म्हणून पाठीस लागल्या होत्या. त्यांना वडिलहि "हो बघतो आहे" म्हणत. व इतर कोणी विचारलें कीं, तिला विलायतेला पाठवणार आहे म्हणून सांगत. मग लोक गप्प बसत. कोणी म्हणालेंच कीं इंग्रजी येत नाहीं कांहीं नाहीं मग तें तरी शिकवा, म्हणजे म्हणत "बोटीवर बसवलें कीं येईल आपोआप ! " मला आपण होऊन दोन चांगल्या स्थळांची मागणी आली होती. एकजण सरदार घराण्यांतले असल्यामुळें परीक्षा झाल्याबरोबर एकदम मामलेदार झाले होते. दुसरे राजकुमार कॉलेजांत दक्षिणेकडचे एक महाराष्ट्रीय कुमार शिकत होते. त्यांचे दिवाणजी कांहीं कामानिमित्त आले होते. साडी नेसलेली रोज शाळेंत जाणारी ही महाराष्ट्रीय मुलगी कोण (कारण वाट राजकुमार कॉलेजवरूनच होती) म्हणून तपास करतां त्यांना नांव कळलें व त्यांनीं वडिलांना विचारलेंहि होतें. पण "मला कोंडवाड्यांत पोर टाकायची नाहीं" म्हणून त्यांनीं सांगितलें. त्यांच्या स्वभावांतल्या कांहीं कांहीं गोष्टी ठरलेल्या होत्या. स्वत: कोठेंहि बाहेर जायचें नाहीं. आईला-सुद्धां येथें असली कीं कोठे जाणें येणें नसे. माहेरीं असतांना जाईल तेवढीच. जेवायला कोठें जायचें नाहीं. मत्रिणींकडेहि जायचें नाहीं. शाळेंत जाऊं लागल्यावर माझा मात्र वेळ मजेंत जाऊं लागला. केव्हां तरी आईबरोबर

मुंबईस जायचें. आतां मोठी झाल्यामुळें मुंबईस जायचा आनंद निराळा होता. लिंबडीहून आजोबा वारले तेव्हां गेलों होतो. तेव्हांची गोष्ट वेगळी होती. अज्ञानाचीहि गंमत असते. तेथें पोंचल्यावर मामेभाऊ बहीण यांचे-बरोबर आम्ही एकत्र बसलों. खूप वाईट वाटलं. पण घरांत खूप माणसं जमलेलीं; त्यांतच रमलों. आजी वर असे. तिकडे फिरकायचीसुद्धां परवा-नगी नव्हती. अर्थात् आलेली माणसें वर जात. घरांत हा नित्यक्रम तर आम्ही मुलं खूप आनंदांत खेळत होतो कां तर खूपजणं जमलों होतों. आजोबांची आठवण यायची. मामाच्या लग्नांतल्या मोत्याचे सगळे अलं-कार घातलेल्या ताई डोळ्यापुढें दिसायच्या. पण बाल स्वभावाप्रमाणें खेळांत पुन्हां रंगत असूं.

मग एक दिवस आईनें ताईच्या खोलींत नेलं; कांहीं बोलायचं नाहीं असें शिकवून. पण ताईचें तें बदललेलं रूप पाहून कांहीं सुचेना. एकदम त्यांच्याजवळ देखील जाववेना. पण मग चार पांच दिवस होते तेव्हां जाऊन बोलत बसायची. मग निघालें नमस्कार केला. "पोरी, बाप कधीं लग्न करतो कोण जाणे. तुझ्या हुंड्याची सोय केली आहे. चांगलं स्थळ मिळू दे. सुखी हो.! " एवढंच म्हणाल्या. खरंच, वडिलांच्या आशीर्वादांत केवढें सामर्थ्य असतें. मी सज्जन माणसांच्या पदरीं पडून आयुष्यभर सुखी झालें. पण पुन्हा कांहीं आजी दिसली नाहीं. सहा महिन्यांनीं ती गेली. आम्ही गेलों पण भेट झाली नाहीं. पुढें मामांच्या राजवटींत धाकट्या मामाच्या लग्नाला गेलो. तेव्हां मी साड्या नसू लागलें होतें. त्याच्यानंतर आईच्यावरोबर अशी मी गेलेच नाहीं.

माझा वेळ मजेंत जात होता. शाळेंत मैत्रिणी. घरीं आई सुटींत विणणें भरणें करायला बसवी. तिच्या बाळंत विड्यावर मोजाचे जोड विणून द्यायचें, झबलीं विणायची हें कधीं संपत नसे. कारण बायका म्हणायच्या, "बयोताई, तुमच्या येथला मोजाचा जोड अजून जपून ठेवला आहे हो !" तसेंच एका एका बहिणीला पाळीपाळीनें कशिद्याची चोळी पाठवायची. तिनें चोळी बेतायची व "चार फुलं काढून दे" म्हणायचं. मला राग येई. "हें ग काय, सदा कसली फुलं!' ती म्हणे, "अग, येतं त्याचा दुसऱ्याला

24360
परिग्रहण

उपयोग होऊं दे कीं, तिला कोण कशिद्याची चोळी देणार?" असें चाले. पण शाळेंत ह्याच भांडवलाचा मला उपयोग होई. कारण त्यावेळेस कॉलेजांत असणाऱ्या बायका मोठ्या वयाच्या असत. विणकाम वगैरे केलेलं नसे. तें वर्गांत चुकायच्या. मग माझ्याकडे यायच्या. मग मी त्यांचे टांके बरोबर करून दे, उचलून दे वगैरे करावयाची व बदली त्यांचें पुस्तक वाचायला न्यायची. कारण लायब्ररींतून ठराविक वेळेस पुस्तक मिळे. ह्या बायका कधींच पुस्तकं वाचीत नसत. तीं मीच वाची. आमच्या शेजारीं एक प्रभु कुटुंब होतं. त्या आजीबाईंना सुटींत पोथी वाचून दाखवायची. असं करून मी हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप ह्या पोथ्या वाचल्या होत्या. माझ्या आईलाहि थोडा वाचनाचा नाद होता. तिला मराठी येईच; इंग्रजीहि थोडं समजे; गुजराथी कच्छी ह्या भाषाहि येत असत. ती स्वयंपाकांत सुगरण होती. ईश्वरभक्त फार पण पसाऱ्याचा देवधर्म नाहीं आणि चाललाहि नसता. कारण वडील नास्तिक. पण ती उद्योगी, गरीब व प्रेमळ होती. सगळ्यांना ती आवडायची. तिच्या शिक्षणाखालीं मी वाढत होतें व आनंदांत माझें आयुष्य चाललें होतें. वाचायला खूप होतें. शाळा होत्या, मैत्रिणी होत्या; मग सुखाला आणि आनंदाला काय कमी ?

मला पंधरावें वर्ष चालू होतें पण माझ्या मनांत लग्नाचे विचार डोकावलेच नाहींत. कदाचित समाजांत फारशी वावरत नसे म्हणूनहि असेल. शाळेतल्या, कॉलेजच्या मुली म्हणजे मोठ्या बायकाच म्हणायच्या. त्या माझ्याशीं कामापुरत्या गोड बोलत पण त्यांच्या गप्पाटप्पांत मी नसे. माझ्या खेळायच्या मैत्रिणी प्रॅक्टिसिंग स्कूलमधल्या माझ्याहून लहान पोरी व शाळेपुरती मैत्री पण तें वातावरण वाचन, विणणं, भरणं ह्यांतच मी गुंग होतें. पण माझ्या आईला चैन पडत नसे. कारण लोक तिला म्हणत, "अहो मुलगी मोठी झाली. थोरा मोठ्याची कुलीन घराण्यांतली मुलगी एवढी मोठी होणं बरं नाहीं." ती एकदां लहानपणींच माझें लग्न करावयास निघाली होती. माझ्या पाठीवर मुलं जगेनात. दोन मुली एक मुलगा गेलीं व एक भाऊ लहान होता. आमच्या येथें लिंबडीला एक चक्री महाराज म्हणून येत असे. तो ज्योतिषी होता. तेव्हां मी दहा वर्षांची होतें. व

गांवांत एक सोळा वर्षांचा मुलगा, आई बापांचा एकुलता एक होता. तें स्थळ तिला पटलं होतं. म्हणून तिनें चक्री महाराजांना विचारलं, "हिचे गण वगैरे बघा हो. म्हणजे लग्नाच्या दृष्टीनें चौकशी करतां येईल." मी जवळच बसलेली होतें. त्यांनीं म्हटलें, "तुझा हात पाहूं!" मग ते आईला म्हणाले, "हिला प्रथमवर मिळणार नाहीं आणि एक दिवस अवचित जुळेल!"

तेव्हां आई म्हणाली, "मला तिचें लग्न लवकर करायचें आहे."

त्यावर तो म्हणाला, "कशाला घाई करतां? ती गेली कीं लक्ष्मी जाईल!"

आईनें चमकून विचारलें, "काय?"

तशी मग त्यानें बोलणें फिरवलें. तो म्हणाला, "कुमारिका म्हणजे लक्ष्मी ना? (गुजराथी लोक कुमारिकेला लक्ष्मी म्हणतात.) मग कुमारिका लौकर कशाला काढायची असें मी म्हटलें. राहूं दे २–४ वर्षे."

पण ते बोल खरे झाले. माझ्या लग्नाच्या पंधराव्या दिवशींच माझ्या वडिलांनीं नोकरीचा राजीनामा दिला.

माझी शाळा, माझ्या मैत्रिणी, माझें वाचन, सभोंवारच्या माणसांचें कौतुक, प्रेम, आईचा प्रेमळ सहवास व शिकवण ह्यांत मी स्वर्गीय सुख कीं काय म्हणतात तें अनुभवीत होतें. तोंच योगायोग म्हणतात तो जमून आला. तेथें राजकुमार कॉलेजांत मोडक म्हणून एक मास्तर होते. त्यांचे मित्र केळकर बंधु सौराष्ट्र पहायला तेथें आले. त्यांतले धाकटे बंधु खानदेशांत साक्रीला ॲक्टिंग मामलेदार होते. ते लग्नाचे होते. मोडकांच्या डोक्यांत माझा विचार आला. पण मांजराच्या गळ्यांत घांट कोणी बांधावयाची. त्यांनीं आमच्या आजोबांजवळ (आईचें मामा लक्ष्मणराव साठे) गोष्ट काढली व ते सकाळीं आमच्या वडिलांना चिठ्ठी पाठवून पाहुण्यांसह भेटायला आले. गांवांत कोणीही महाराष्ट्रीय आले की एकमेकांकडे न्यायची वहिवाट होती. त्यांनीं मला सहज हांक मारली व "शाळेला सुट्टी का आहे? काय शिकतेस? विषय कोणचे?" असे स्वाभाविक चार प्रश्न विचारलें. मग त्यांनीं साठ्यांना मुलगी पसंत असल्याचें सांगितलें.

कल्पना नसतांना साठे मामा बारा वाजतां आले व त्यांचें वडिलांशीं खूप बोलणें झालें. "माझी एकुलती एक मुलगी मी तिजवराला देणार नाहीं." असें वडील म्हणाले.

पण साठे म्हणाले, 'आजपर्यंत आलेलीं चांगलीं चांगलीं स्थळें तुम्ही घालविलींत आतां ती मोठी झाली. श्रीमंतांच्या घरांत लहान बिंदी पट्टयांची सून हवी असते बरं. एकादा गरीबाचा हुशार प्रथमवर मिळेल. पण तुम्ही मुलीला जहागिरदारी थाटांत वाढवून ठेवली आहेत. तेव्हां केर वारे, दिवावत्ती, विहिरीचें पाणी काढणें ह्यांतलें ती काय करूं शकेल? हे मामलेदार आहेत. तेव्हां निदान हीं कामं तरी तिला पडणार नाहींत. ते तिजवर असले तरी वयानें लहान आहेत. (ह्यांचें पहिलें लग्न १५ व्या वर्षी आजीला सुनमुख पहायचें म्हणून झालें होतें. ही मंडळी मिरजेस रहात होती. तेथील त्यांचे शेजारीं पटवर्धन ह्यांची ती मुलगी.. त्या लवकरच गेल्या. पटवर्धन मंडळी अजून माझ्याशीं चांगलीं वागतात. वयाच्या एकवीस–बाविसाव्या वर्षीं दुसरें लग्न झालें. त्या सहा वर्षांनीं गेल्या. त्यांची एक मुलगी त्या गेल्या तेव्हां दोन वर्षांची होती.) आत्तांच सर्व्हिसला सुरुवात आहे तरी मला वाटतें येथें मुलगी द्यावी." असें त्यांचें बोलणें होऊन वाटाघाटी सुरू झाल्या व दोन तासानंतर एकदम माझ्या कानावर लग्न ठरल्याची बातमी आली. मी चकित झालें. सकाळ उजाडली तेव्हां मी रोजच्यासारखी शाळेच्या स्वप्नांत होतें ती मी दुपारीं शाळा कायम सुटल्याची बातमी ऐकली. चार वाजतां थोरले भाऊजी वचनसुपारी घेऊनच परत गेले. लग्न ठरलें तेव्हां मी पंधरा वर्षांची होते व नंतर लगेच सोळावें लागलें.

लग्न ठरल्यावर सगळ्यांचीं कल्पना कीं मला खूप आनंद वाटेल. कारण प्रत्येक बाई लग्नाच्या आधीं मला विचारी, "काय ग, बाप लग्न करणार आहे कीं नाहीं?" दुसरी म्हणे, "वाटलं तरी ती काय करील बिचारी?" मला मात्र नवल वाटे; ह्या बायका असें कां बोलतात? मी कां रानांत आहे का दुःखांत आहे. आईला सोडून जायची घाई कां? कारण लग्न होईपर्यंत एक दिवस देखील मी आईला सोडून राहिले नव्हतें. माझी

शाळा, पुस्तकं मैत्रिणी सुटणार, आई सोडावी लागणार म्हणून मला तर वाईट वाटत होते. लग्न ठरलं असं कळल्यावर बायका भेटायला यायच्या. त्या म्हणायच्या "चांगली वाग बरं, नाहींतर बुकं घेऊन वाचीत बसशील. जुनीं माणसं आहेत म्हणे. बोलून घेऊं नको." जातांना म्हणायच्या, "एवढी एकुलती एक मुलगी बिजवराला दिली." बव्र्यांच्याकडचं पहिलंच कार्य म्हणून उत्साह उमाप होता. माझ्या आजोळचीं म्हणजे भागवतांकडची मामा मामी आल्या होत्या. माझें लग्न गांवांत साठे आजोबांकडे झालें. त्यामुळें ती मंडळी, आजी, आजोबा, मावशी, मामा सर्व होतेच.गांवांत महाराष्ट्रीय वस्ती वेताची. म्हणून ती सर्व मंडळी आली होतीच. पुण्याहून मामंजी सासूबाईही आल्या होत्या. पण त्या फक्त दोन साडचा घेऊन आल्या. त्या म्हणायच्या, "आम्हांला का उत्साह आहे ? ती मरावी अन् आम्ही पुन्हा हें करावं ? पण करायचें काय ?" अशा बोलण्यानें व कपडेलत्ते सुद्धां नाहींत हें पाहून येथली मंडळी नाखूष झाली. मग काय सगळ्याच बडबडायच्या. त्या सगळ्याचा परिणाम माझ्या बालमनावर होईच.

◆◆◆◆

# लग्नानंतर : ३

लग्न झालें. आम्ही पुण्यास जावयास निघालों. त्यावेळेस माझ्या वडिलांना फार वाईट वाटलें. आईलाही वाटलें; कारण एक दिवसही दूर न झालेली मी एकदम खानदेशांत जाणार ही कल्पनाच फार अवघड होती. साठे मंडळीकडेच लग्न झाल्यामुळें त्या सर्वांनाहि फार वाईट वाटलें. माझे मामा मामी मागें राहिली आणि मी निघालें. निघतांना आई पोंचवायला आली होती. तिला सासुबाई म्हणाल्या, "तिच्या कांहीं आवडीं निवडी असल्या तर सांगून ठेवा." तेव्हां आई म्हणाली, "तिला शिळी खीर म्हणजे दुपारची रात्रीं आवडते." तर सासुबाई होत्या तोंपर्यन्त त्या खीर केली कीं, थोडी काढून ठेवायच्या. मी म्हणे ' तें लहानपणचं नाहीं का ? आतां त्याचें काय ?" तर त्या म्हणत ' "पण त्यांत कष्ट आहेत का ?" असो त्या दिवशीं माझ्या बरोबरच दोघे साठे मामा निघाले. जगूमामा अहमदाबादेस कॉलेजांत जायचा होता व बापूमामा मुंबईस. गाडींत बसल्यावर जगूमामा माझ्यासमोर बसला व कांहीं तरी गोष्टी काढून त्यानें बोलणें सुरू करून माझे रडणें थांबवलें.

मग आम्ही बडोद्यास ह्यांचे लेले म्हणून एक स्नेही होते त्यांच्याकडे एक दिवस उतरलों. तेथें सासुबाईनीं आंग धुवून आपलें लुगडें पिळून वाळत घातलें, तशी मीहि तसेंच केलें. पण लुगडं कोरं व मला धुण्याची संवय नाही त्यामुळें तें दांडीवरून टपकायला लागलें. तेव्हां लेल्यांनीं बायकोला हांक मारून सांगितलें कीं, ' तें तू काढून पिळून पुन्हा वाळत घाल. त्यांना सासुबाईच्या देखत मात्र सांगू नको. त्यांना सवय नाहीं ' ( ते एकदां राजकोटला आले होते तेथें त्यांनीं आमची राहणी पाहिली होती.) मग दुपारीं त्या मला म्हणाल्या, ' आतां घरीं जाल तेव्हां लुगडं दोनदां पिळत जा. '

मग रात्रीं निघून सकाळीं दादरला आलों. तेथें बापूमामा आईच्या आत्याबाईंना पाठराखीण म्हणून घेऊन आला व मला दक्षिणी जोडा व आरसा आईनं सांगितल्याप्रमाणें त्यानें आणून दिला. तेथून पुण्यास आलों.

पुण्यास तात्या, ताई, त्यांची दोन लहान मुलं व सासूबाईची एक मामेबहीण मावशी म्हणून, अशीं माणसें होतीं. अगदीं जुन्या तऱ्हेचें तें घर पाहून मला कसंसंच वाटलं. पण माणसं जुनी, राहणी जुनी, हें वर्णन मोडकांच्या तोंडून ऐकलंच होतं व तेव्हांपासून जमलेल्या नातलग सर्व स्त्रिया मला पढवीतच होत्या कीं, 'पाहून पाहून वाग, सुधारकाची मुलगी म्हणवून घेऊं नकोस.' तेव्हां जुनेपणाची कल्पना होतीच. तेव्हां ही मंडळी राहूरकरांच्या वाड्यांत रहात होती. तें घर खालीं जुन्या पद्धतीचें पण वर माड्या चांगल्या होत्या. तेथें दोन वाड्यांमिळून एक विहीर होती. नळ नव्हतेच. तेथेंच दोन्हीकडची माणसें पाणी भरावयाची. मी रहाट पाहिलाच नव्हता. तर पाणी कोठून काढतां येणार ? पण आपल्यांतल्या पाठराखणीचा उपयोग कसा होतो तो कळला. प्रथम सकाळीं उठल्यावर सासूबाई म्हणाल्या, 'अग, आमच्या येथें अंबाडा चालत नाहीं, वेणी घालायची हो ! तेव्हां आत्याबाईंनीं माझा खोपा घातला. यावेळीं आमच्या घरांत चहा नव्हता. फक्त तात्या घेत. पण आत्याबाई पक्क्या चहातल्या होत्या. पण जुन्या बायका संयमी व करारी. त्या तेथें चहाशिवाय राहिल्या. त्यांनीं मला हळूंच सुचवावें, "पाणी उपसून घे, विहिरीवर ये, मी गार पाणी देतें तें आणून आंग धू." मग लुगडं घेऊन विहिरीवर बोलवायचें, आपण पाणी काढून देऊन मला लुगडं धुवायला शिकवायचें. मग आपण तेंच चांगलं धुवून आणायचें. चंद्रा (आतां कमलाबाई देशपांडे) व सहा महिन्यांचा बापू तेव्हांच माझा दोस्त झाला. पण माझ्यांत बराच सुधारकीपणा होता. माझे जोडे बाहेर पाहून "कोण जोडे विसरलं" म्हणून मामंजी म्हणाले. ते माझे असें कळल्यावर ते म्हणाले, 'एक राण्यांनीं जोडे घालायचे, नाहींतर बाहेरच्या बायकांनीं. कुलीन स्त्रियांनीं कसले जोडे घालायचे ?" मी हळूंच ते उचलले व कागदांत गुंडाळून ट्रंकेच्या तळांत टाकले. एकदां गारठा वाटला म्हणून मी हळूच जाकीट घातलें. (आपल्या इकडे बायकांना

जाकिटें तेव्हां ठाऊक नव्हतीं. पण कोठेवाडांत तेव्हां काचोळ्या होत्या म्हणून थंडींत व केव्हां एरवीं राण्या जाकिटें घालीत. त्यांना सोन्याच्या गुंड्या असत. ) इतक्यांत थोरले भावजी आले. मी नमस्कार करूं लागलें. तेव्हां मावस सासूबाई रागावल्या म्हणाल्या, "पुरुषासारखीं वासकुटं घालून पुरुषापुढें जातेस!" वास्तविक त्यावेळेस आमचें पदर आंगभर असत. कामाला पदर बांधला तरच कदाचित् अंगांत काय तें कळावयाचें.

पाठाखणीचा उपयोग आणखीहि कळला. जेवणांत खूप खोड्या होत्या. आत्याबाईनीं हळूंच रागावून खूण करून पहिलें सगळें खायला लावायचे. बाई वाढायला लागल्या कीं आपण तेथें उभें राहावें, ओंवळ्याचें वाढावें, एरवीं दारांआड उभें राहावें वगैरे त्यांनीं शिकवावें. कारण माझ्या माहेरीं आम्ही तीनच माणसें; अर्थात् मला ह्या गोष्टींचे प्रात्यक्षिक शिक्षण नव्हतें. मी नुसती भित्री, गरीब व आज्ञाधारक होतें. बारीक सारीक कितीतरी गोष्टी पूर्वींच्या काळीं नडत असत. मला टॉवेलाला हात पुसायची संवय होती. फडकं असलं तरी तें पांढरं शुभ्र हवं असे. अशा अनेक गोष्टी असत. त्या आतेबाईनीं दुरुस्त करावयाच्या. जेवणें झालीं कीं 'उष्टी उचल' अशी खूण करावयाच्या. मला वाटे आपलें जेवण झालें म्हणजे सगळीं उष्टी एकदम काढावीं. कारण हाताला शेणाची घाण येईल ही भीति. पण आतेबाईंनीं खूण केली कीं मी ऐके. पुढें थोरले मामा आले होते ते आतेबाईंना घेऊन गेले. माझे थोरले भाऊजी मला पाहून आल्यावर गमतीनें घरांत म्हणाले असतील कीं, ही मुलगी खूप शिकलेली अशी आहे. तें घरांत सर्वांनीं ध्यानांत ठेवलं होतं. त्यामुळें सगळ्या बायका माझ्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहात. मला तें माहीत नव्हतें. पाटपाणी झालें कीं मावशी म्हणायच्या अग तात्याला "पानें वाढलीं म्हणून सांग." त्यांच्याशी मी कशी बोलेन. पण त्यांना नाहीं कसं म्हणायचं. मग मी काय करी कीं चंद्राला बरोबर घ्यायचें व जिन्याच्या वरच्या पायरीवर पढवून सोडायचें व आपण खालीं जायचें. परत येतांना ती भाऊजींबरोबर येई. पुढें आठ दहा दिवसांनीं साताराची मंडळी आली. तेव्हां रोजच्याप्रमाणें मावशी म्हणाल्या. मी चंद्राला घेऊन गेलें. ती जिन्यांतच म्हणाली, "तूं जा मी एकटी जाईन." म्हणून मी परत आले.

तर आंत एकजण म्हणाली, "ती कशी सांगेल" तेव्हां ह्या म्हणाल्या "रोज हांक मारतेच कीं; ती शिकलेली आहे. तिला पुरुषांशीं बोलावयाचें काय वाटणार?" तेव्हां मला माझी चूक कळली कीं, पहिल्यांदाच म्हणायला हवं होतं, "मी कशी हांक मारूं?" पण माझ्यांत व्यवहारी अज्ञान पुष्कळ असल्यामुळें अशा चुका वरचेवर होत.

मी पुण्यास आल्यावर कोणी कोणी बायका मला कांहीं प्रश्न विचारीत ते वर्तमानपत्रांतले ऐकलेले वगैरे असत. तेव्हां मला कळलें कीं मला कांहीं शिक्षण नाहीं. महाराष्ट्राबद्दल मी फार अज्ञानी आहे. एकदां गंमत अशी झाली कीं धाकट्या जाऊबाईंना—त्यांना सगळीं ताई म्हणत—जरा ताप आला म्हणून त्या वर जाऊन निजल्या. मी येथें आल्यापासून त्यांच्या मागें मागें असावयाची. तेव्हां त्या अजून खालीं कां आल्या नाहींत म्हणून बघायला ३–४ वाजतां अशी वर गेलें. तर तेथें पुढल्या माडींत भाऊजी नव्हते. त्याचें टेबल, पुस्तकांचें शेल्फ, भिंतीवर केसरीच्या फाइली. हें पाहून मला इतका आनंद झाला कीं कोलंबसाला अमेरिका पाहून झाला नसेल. मी रमलें, भुललें अन् पेपर घेऊन वाचायला लागलें. बाईंकरितां आले हें विसरलें. व मग मी तेथून निघेपर्यंत रात्रंदिवस वेळ झाला कीं वाचायची. असं करून केसरीच्या जुन्या फाइली बऱ्याचशा वाचल्या. कांहीं पुस्तकं वाचलीं. मी काठेवाडांत असल्यामुळें माझं मराठी वाचन फार थोडं झालं होतं. तें येथें सुरू केलें तें अगदीं आजपर्यंत चालू आहे. मग पुढें माहेरी गेलें. तेथें आईजवळ मोडी शिकलें. इंग्रजी परभाषा, ती कोणी तरी शिकवायला हवी. ती शिकायची राहिली. पण वाचनाची इतकी गोडी लागली कीं वाचन, वाचन, नि वाचन; त्यामुळें मराठी भाषा उत्तम आत्मसात झाली.

आम्ही पुण्यास आल्यावर मामंजी सासूबाईच्यासह स्वत: साक्रीला गेले. आतेबाई १०–१२ दिवस होत्या. मग त्या गेल्या. नंतर १०–१२ दिवसांनीं साठे बापूमामा येऊन मला घेऊन गेला.

ही माझी पहिलीं खेप आनंदाची झाली. ताई भावजी वगैरेंनीं मला फार चांगली वागवली. मलाहि त्यांच्याबद्दल आपलेपणा व मुलांबद्दल प्रेम वाटू

लागलें. मी तेथून मुंबईस चार दिवस मामांच्याकडे राहून राजकोटला गेलें. माझ्या शाळेंत गेलें. एकदां पूर्ववत् शाळेंत पळत पळत जाऊन ह्या मैत्रिणीला भेट, त्या मैत्रिणीला भेट, बाईंना भेट, मास्तरांना भेट असं केलं. सगळयांनीं लग्न झाल्याबद्दल कौतुक केलं. मग शाळेचा शेवटला निरोप घेऊन घरीं आलें. कारण माझें लग्न झाल्यावर माझ्या वडिलांनीं नोकरी सोडली होती. तेथून आम्ही बडोद्यास आलों. ती पुन्हां कांहीं काठेवाडांत गेलें नाहीं. बडोद्यास २–३ महिने होतें. तेथें प्रथम आईजवळ मोडी शिकलें. तेथें आमच्या शेजारीं वडिलांचे मित्र घोरटे म्हणून रहात होते. त्यांच्या बायकोला मी काकू म्हणायची. त्या मला ताईबाई म्हणत. त्यांची माझी छान मैत्री जमली. तेथें २–३ पोथ्या वाचल्या. वैशाखस्नान, तुळशीला पाणी, रांगोळया असा कार्यक्रम चाले. गांवांत शारंगपाणी जज्ज होते. त्यांची मुलगी माझी मामी. माझ्या आधींच तिचें लग्न झालें होतें. तिच्या मंगळागौरी, महालक्ष्मी झाल्या. त्यांत पूजेला म्हणून तिच्या आई मला बोलवीत माई शारंगपाणी मुत्सद्दी पण स्वभावानें चांगल्या, बोलून गोड होत्या. गेलें म्हणजे १–२ दिवस ठेवून घेत. तें दहा माणसांचें घर होतें. दोन सुना. तेव्हां तेथें मला सुनांना कसं वागवतात तें कळलं. आणि सुनांनीं कसं वागावं याचंहि शिक्षण मिळालं. कारण माझ्या घरांत सासुरवाशिण पहायला मिळाली नसल्यामुळें मला तें व्यवहारी ज्ञान नव्हतें. म्हणून त्या दोन तीन वेळच्या, दोन दोन, तीन तीन दिवसांच्या राहण्याचा उपयोग झाला. बडोद्याच्या दोन तीन महिन्यांच्या मुक्कामांत महाराष्ट्रीय रीतीभाती कळल्या. कारण तेथें शाळा, अभ्यास, पुस्तकं, विणणं, भरणं कांहीं नव्हतं. तीन महिने माझं निरीक्षण चाललं होतं. गांवांत माधवराव जोगळेकरांची मुलगी यमू मावशी होती तिचीहि गांठ पडे.

बडोद्यास मी ठरवलं कीं आतां आपण ‘ महाराष्ट्रीय ’ होऊनच सासरीं जायचें. कोणाकडून नांव ठेऊन घेऊं नये, ही महत्वाकांक्षा होती. त्या दृष्टीनें शहाणी होऊन मी माझ्या घरीं निघालें, ती पुन्हा कांहीं साऱ्या आयुष्यांत अशी माहेरीं म्हणून राहिलें नाहीं. कधीं एक दिवस, क्वचित् दोन दिवस गेलें असेन ! असो.

# लग्नानंतर

बडोद्याहून सुरत व तेथून चिंचपाडा स्टेशनवर उतरून खानदेशी टांग्यानें मी साक्रीला गेलें. मी साक्रीला आलें तेव्हां मामंजी, सासूबाई, जोडीला चुलत सासुबाई सगुणाकाकी व त्यांची मुलं दत्तूकाका व काशीताई आणि आमची माई अशीं तीन मुलं होती. माझा वेळ बरा जाई. येथें मी 'बाईसाहेब' झालें. तेव्हां नव्या बाईसाहेब शिकलेल्या ह्या नात्यानें पुष्कळ बायका कांहीं तरी निमित्त काढून मला पाहून जात. दत्तुकाका तेव्हां लहान तर मामंजी म्हणाले, 'अरे, त्या वहिनीजवळ शिकायला बसत जा.' मग मी त्यांची मास्तर झालें. 'श्री ग' ची सुरुवात मांडीवर बसून झाली. त्याची अशी गंमत झाली कीं, त्यांना श्री गिरवतां येईना म्हणून मांडीवर घेऊन त्यांचा हात धरून मी गिरवायला लागलें. मग तेंच त्यांना बरें वाटे. घरांत ब्राह्मण होता तो शिष्ट होता. सगळ्यांच्या तोंडून ऐकून त्याला कळलें होतें कीं, मी शिकलेली आहे व घरांतलं कांहीं येत नाहीं. ही जाहिरात होण्याचें कारण माझ्या आजोबांची व आईची चूक. आजोबांनीं प्रेमामुळें ह्यांना म्हटलें कीं, 'ती शिकलेली आहे, पण चूल व घर काम तिला मुळींच माहीत नाहीं. बाकी मामलेदारांकडे ब्राह्मण असतोच तेव्हां तितकें अडायचें नाहीं!' आई प्रथम पोचवायला आली, तेव्हां म्हणाली, 'ती एकुलती एक म्हणून कामाची व स्वयंपाकाची तिला माहिती नाहीं. तेव्हां संभाळून घ्या.' ह्याचा अर्थ सर्वांनीं असा केला कीं मला साधा स्वयपाकहि येत नाहीं. त्यामुळें ब्राह्मण मला म्हणाला, 'बाईसाहेब, आज आजींनीं केशरी भात करायला सांगितला आहे; तरी तो कसा करावयाचा तें दाखवा.' मी म्हटलें, 'तुम्ही नेहमींचे करणारे तुम्ही करा.'

'नाहीं बोवा, मीं बडोद्यास दांडेकर साहेबांकडे होतों तर पद्धत अशी कीं बाईसाहेबांनीं तिथें उभें राहून दाखवावें व आम्ही करावें.'

मी ओळखलं कीं ही परीक्षा आहे. मला कांहीं येत नव्हतं हें खरं, पण देवानें थोडी बुद्धि दिली होती हें तितकच खरं. मी आईला तिच्या मैत्रिणींशीं बोलतांना भाताबद्दल ऐकलं होतं मीं म्हटलं, 'बरं सांगते. कसला करणार? बैठा कां पाकाचा तें ठरवा नि मला बोलवा.'

माझ्या तोंडून भाताचे प्रकार ऐकल्यावर त्यानें मला बोलावलें नाहीं. एकदां आमच्या येथें दासनवमी झाली नि बरेंच श्रीखंड उरलें. तेव्हां जेवल्यावर सासूबाई म्हणाल्या, 'श्रीखंड जास्त झालं' स्वत: म्हणाले, 'वड्या करा.' त्या ब्राह्मणाला म्हणाल्या, 'मला येत नाहींत; तुला येत असल्यास तूं कर.'

तो म्हणाला, 'करूं कीं; बाईसाहेब दाखवतील.'

त्यानें श्रीखंड काढून मला हांक मारली. एरवींसुद्धां सर्वांनाच चट्‌दिशीं श्रीखंडाच्या वड्या जमत नाहींत. मग मी तर काय लहान. पण देव सत्त्वाला उभा असतो.

मी म्हटलं, ' पातेल्यांत इतकी साखर घालून पाक करायला ठेवा. पाक पक्का झाला कीं श्रीखंड ओतून ढवळा !' नंतर अदमासानें उतरायला सांगितलें. शिवाय तो ब्राह्मणहि पक्वान्नें केलेला हुशार होता. अर्थात् त्यानें पाक कच्चा पक्का पाहिलाच असेल. खालीं उतरून थोडा वेळ घाटून वड्या ओतल्या व योग असा कीं त्या उत्तम झाल्या. आतां मात्र केव्हां केव्हां बिघडतात.

मामलेदारांनीं नवी बायको केली आहे, ती खूप शिकलेली आहे ही जाहिरात आधींच झाली होती. पण मी आलें ती जुनी होऊनच. केसांची वेणी, पायांत कांहीं नाहीं, हातांत चार बांगड्या हा माझा वेष होता. गांवांतील परिचित मंडळी एक एकदां ह्या ना त्या निमित्तानें येऊन पाहून गेली. कोणी कोणी डोळ्याला पदर लावून पाणी काढलं; ' चांगली होती बिचारी, संसार सोडून गेली, पुरुषाचें काय पुन्हा घर उभं राहत" वगैरे वगैरे म्हणायचें, डोळ्याला पदर लावायचा असें चाले. लग्न झाल्यापासून मी अबोल झालें होतें. कोठें कमी जास्त शब्द गेला तर भानगड नको. समोर दिसेल तें काम करायचें. काका, वन्सं, माई, ह्यांच्याबरोबर थोडा वेळ जाई. मग सगळीं निजली कीं वाचावयाचें. 'केसरी' ह्या अक्षरापासून अमक्या ठिकाणी छापलें इथपर्यंत वाचायचें. खेड्यांत दुसरें वाचायला काय मिळणार? येथें आल्यावर मी बाईसाहेब झालेंच होतें. त्यामुळें वृत्तीनेंहि पोक्त झालें. तो जुना काळ होता. मामलेदारांना भरपूरच मान होता. कार-

कुनांच्या वगैरे बायका बोलावणें वगैरे यायच्या त्या प्रथम नमस्कार करीत व मग सासूबाईंना म्हणत, 'बाईसाहेबांना हळदी कुंकवाला यायला सांगा ना.'

त्या म्हणत, 'तुम्हीं सांगा, ती तुमच्यापेक्षां लहान आहे.'

म्हणजे त्या म्हणत; 'पण मान मोठा आहे ना, गादीला पाय कसा लावायचा ?'

चार महिने राहून मी वडोद्यास गेलें व तेथून थोरल्या मामांकडे तारापुरास गेले. त्यांनीं आपला कारकून सासरीं पोचवायला दिला. त्यानें मला लहान खेळवली होती. मी त्यालाहि मामा म्हणे. तो म्हणायचा मी नाहीं येत पोचवायला धुळयास जांवई येतील नि तूं जाशील टांग्यांतून निघून. मी एकटा धुळ्यांत. मी म्हणायची, 'नाहीं, रे मामा, तूं चल. टांगा घेऊन शिपाई येईल.' तो म्हणे, 'शक्य नाहीं. पैज !'

'पैज तर पैज; पण तूं येशीलना ?'

'येईन.' असं करत तो आला. आम्ही धुळयाच्या स्टेशनावर आलों. मामांचें पत्र साक्रीला 'आम्ही आमक्या दिवशीं येतो.' असें गेलें होतें. तेव्हां थोरल्या भाऊजींची बदली धुळें हायस्कूलमध्यें झाली होती, तें मला ठाऊक नव्हतें. स्वत: त्यांना कळवलें व ते स्टेशनावर आले. मी पुण्यास आल्यावर ते जरी आठ दिवस होते तरी वर कोण पाहतो. चोरून पाहयचं हें व्यवहारी कसब माझ्याजवळ नव्हतें. म्हणून मी त्यांना ओळखलें नाहीं. ते माझ्या डब्याशीं हमाल घेऊन आले.. 'तूं उतर, सामान हमाल काढील' ते म्हणाले. मी उतरलें. ट्रंक हमालानें काढली. आमचा मामा पुढें झाला तो तोंडावर उपरण्याचा सोगा धरून हंसत हंसत मनांत म्हणत, 'कशी झाली एका माणसाची ! आलेच कीं नाहीं न्यायला !' मी विचार करत होतें हे कोण ? ह्यांनीं तुम्हीच का केळकर न विचारतां एकदम 'चल' म्हटलें. हमालानें सामान नेलें. बाहेर पाहतें तों भाड्याचा टांगा. 'चला, बसा' म्हणाले. मग माझ्या गोंधळलेल्या चेहेऱ्याकडे पाहून मामाचें हंसें गेलें. टांग्यांत बसतांना तो म्हणाला, 'हाच टांगा साक्रीस जातो का ?'

भावजी म्हणाले, 'नाहीं. हा भाड्याचा आहे. मी केळकरांचा वडील भाऊ. ती आधीं माझ्याकडे राहील. मग साक्रीला जाईल.'

तेव्हां माझ्या जिवांत जीव आला. टांगा दाराशीं उभा राहिल्यावर बाई पुढें आल्या. मग काय आनंद विचारावा. आमचा फजीत पावलेला मामा दोन दिवस राहून परत गेला. मी पंधरा दिवसांनीं साक्रीचा टांगा येऊन तिकडे गेलें. पुढें बाई, विठ्ठल, मावशीसुद्धां तेथें आल्या. थोड्या दिवसांनीं मी पोटदुखीनें आजारी पडलें म्हणून मुंबईस गेले व तेथें महिनाभर राहून तात्यासाहेबांबरोबर धुळ्यास आलें. कारण त्या वेळेस आमची बदली धुळ्यास झाली होती व नाना, आम्ही, मामंजी, सासूबाई अशी सर्व दीड वर्ष एकत्र होतों. त्यांत दोन वेळां पुण्याच्या ताईसुद्धां तीन तीन महिने राहून गेल्या. कारण पुण्यास प्लेग झाला कीं, त्या येथें येत. त्यांत एका वर्षी मोती नाल्यावर झोपड्या घातल्या होत्या. अशा तऱ्हेनें तिघी जावा एकत्र अशा आम्ही तेव्हां राहिलों. ते सगळे दिवस आनंदांत गेले. आम्ही सगळीं धुळ्याला जमलों तेव्हां मी ह्या घरांत नवीनच होतें. आणि शिकलेली हा किताब होता. त्याच्या फार गमती व्हायच्या. मला लहानपणीं रांगोळ्या काढण्याचा फार नाद होता त्या काळांत कांहीं ठराविक रांगोळ्या, गोपुरें ह्याशिवाय फारशा वेगळ्या रांगोळ्या मुंबई सोडली तर आपल्या इकडे बायका काढीत नसत. मी घरांत, देवाजवळ, तुळशीजवळ, अन् लवकर सडा पडला तर लोक ये-जा करावयाच्या आधीं दारापुढें रांगोळी काढीत असे. साक्रीस तर पाण्याला जाणाऱ्या बायका उभ्या राहून, आज कोणची नवी रांगोळी म्हणून उत्सुकतेनें पहात असत. तशीच धुळ्यास रांगोळी काढायची तेव्हां मामंजी म्हणायचे, 'अरे, हिला सगळें पुरुषी शिक्षण आहे पण स्वयंपाक येत नाहीं.' एकदां मी पाटपाणी केलें नी मुलांनीं खेळत खेळत पानं उलटी, वरची खालीं अशीं केलीं पुरुष पानावर आले नी मीठ वाढतांना त्यांनीं तीं सुलट केलीं तेव्हां मामंजी म्हणाले, 'अरे, उलटी पानं कोणी मांडलीं ? पाटपाणी कोणी केलं ?' मी केलं हें कळल्यावर म्हणाले, 'हं मग बरोबर. डोकं वाचनांत गेलं असेल. हातांत आलं तशीं मांडल.' अशा गमती होऊन गृहकृत्य येत नाहीं असं सिद्ध होत असे. पण कधींच कोणी समजून घेत नसे. आणि मामंजी सासूबाईंना प्रश्न पडे 'ह्यांचं पुढें कसं होणार ?' ह्याचा अर्थ मी घरांत-स्वयं-

पाक घरांत- जात नव्हतें असा नव्हे.कोठें वरण भाजी शिजत लाव,वाढायला घे, भात खालीं उतर, कणीक भिजव, पुऱ्या लाट अशीं कामं माझ्या वांट्याला येत. बहुधा वाढायचें व पूजेचें करावयाचें हीं कामें मी करी. कारण मी सर्वांत लहान होतें.

धुळ्यास असतांनाच मी थोरल्या मामांकडे गेलें होतें. तेथें मनोरंजनची बक्षिसाची जाहिरात वाचून मी माझा पहिला लेख लिहिला. त्याला मला बक्षीस मिळालें. तेंव्हांच मी चंद्रकांत ह्या वेन्दांतपर ग्रंथाचें भाषांतर करावयास सुरुवात केली. व ' जवळ ' म्हटलं कीं आपण त्या ग्रंथकाराची परवानगी विचारा. तर मला सांगितलें, ' तो माझा प्रांत नाहीं. तूं नानांना सांग. ' मग एक दिवस ते किल्ल्या विसरल्यामुळें पानाशीं पुन्हा आले, तेव्हां मी सांगितलें व भाषांतराचे कागद कोनाड्यांत होते तिकडे बोट केलं. चार दिवसांनीं कागद परत देऊन, ते म्हणाले, ' आणखी लिही. मग बघूं. ' तेव्हां पुन्हां शंभर पानांचें भाषांतर केलें. पुन्हां ' पुढें पाहूं ' म्हणाले व ती गोष्ट तितकीच राहिली. पुढें दोन वर्षांनीं शहाद्यास असतांना माझ्या डोक्यांत विचार आला कीं, आपणच कां विचारूं नये ? त्याप्रमाणें गुजराथींत पत्र लिहून मी विचारलें तर त्यांचें उत्तर आलें, ' चंद्रकांताच्या मराठी भाषांतराची परवानगी पंधरा दिवसांपूर्वीच दिली गेली. एका भगिनीला ही परवानगी देण्यांत मला फार आनंद वाटला असता ! '

धुळ्याच्या त्यां एकत्र दिवसांची आठवण झाली कीं अजूनहि भूतकाळच्या आनंदांत मन रमतें. तिघी जावांचें एकत्र बसणें, बोलणें, गप्पा, सासुबाई, मावशी, चिमाताई अशा मोठ्या तीन बायका आणि आमची मुलं अशी सगळ्यांची गडबड, सारखी गंमत असायची. देवधर्म. वाती, स्नानें ह्यांत दिवस केव्हांच जायचे. तेथून मग आमची बदली शहाद्यास झाली.

# थोड्या स्वतंत्रतेनंतर : ४

थोरल्या बाई पुण्यास गेल्या होत्या, त्या आल्या नाहींत. कारण दरवर्षी त्या दिवसांत धुळयास प्लेग होत असे म्हणून त्या तेथेंच राहिल्या. पण दैव-घटना निराळीच होती त्या प्रसूत होऊन मुलगा झाला नी थोरले भावजी नवज्वरानें त्याच्या तेराव्या दिवशींच गेले. आम्हाला तारा आल्या. धाकटे भाऊजी आदले दिवशीं येऊन पोचले पण ह्यांचा मुक्काम लांब होता म्हणून परत येऊन धुळयास जायला वेळ लागला. आम्ही दुसरे दिवशीं पोचलों. अर्थात् सगळं आटोपलं होतं. तेथला पसारा आवरून सासूबाई, मामंजी, भाऊजी, सर्व पुण्यास गेलीं. आम्ही शहाद्यास परत आलों. तेथें थोडे दिवसांनीं आते सासूबाई मी एकटी म्हणून नातू घेऊन आल्या. लगेच महिन्या दीड महिन्यांनीं थोरल्या जाऊबाई, त्यांची आई व दोन मुलं आलीं. कारण पुण्यास प्लेग झाल्यामुळें तिथलीं सर्वजण झोपडींत गेलीं. घरांत स्वयंपाकाला ब्राह्मण असे. वरचें आतेसासूबाई बघत म्हणून मी रिकामीच असे. बाई आल्यापासून त्यांच्या भोंवती असे. त्यांना दुःखाचा विसर पडावा, बरं वाटावं म्हणून मुलं घे, मुलांचं कर, त्यांना वाचून दाखव व गप्पा गोष्टी कर असं करी. त्यांच्या आई चिमाताई पण आमच्यांत असत. कांहीं तरी काढून हंसावं असं चाललं होतं. विठ्ठलाला ह्यांचाच लळा होता. तो आल्यापासून त्यांच्यांत रंगला. ऑफीसांत बसायचें, कचेरींत आणायला जायचें वगैरेंत तो रमलेला असे. असं होतां होतां दिवाळी आली. आमच्या घरीं दिवाळी नव्हतीच. तात्या गोखले आला होता. तो नि आतेबाई दिवाळी झाल्यावर गेल्या नी जाऊबाई एकाएकीं वारल्या. मला कळेनाच कारण मी मृत्यु पाहिलाच नव्हता. डॉक्टर घेऊन चार दोन स्नेही मंडळी जी आली होती त्यांनीं तें ओळखल्याबरोबर, मी

जी त्यांच्याजवळ चिकटून वाट बघत बसलें होतें कीं, आतां डोळे उघडतील, मग उघडतील ती मला 'धाकटा मुलगा रडतो आहे बघा बरं' म्हणून हांक मारून बाहेर काढलं. त्यांच्या आईला एकानें बाहेर काढलें व दाराला बाहेरून कडी घातली. तेव्हां मला समजलं. मला काय त्रास झाला, काय, काय झालं तें सांगतां येत नाहीं, लिहितांहि येत नाहीं. चिमाताई वेड्या-सारख्या एका कोपऱ्यांत पडून होत्या. धाकटा मुलगा तान्हा,–मला मूल झालं नव्हतं–पण त्या उठेतचना. अर्थात् त्याला घेणं, दूध पाजणं सर्व माझ्यावर आलं. मला मूल झालं नव्हतं. मी अनभ्यस्त पण मीच त्याला संभाळी. त्याला आई नाहीं या विचारानें मला दुःख होई. सारखे तेच विचार माझें मन व्यापून टाकीत. माझं जीवन–सर्वस्व तोच झाला. वाटे एकटा राहून कांहीं झालं तर? बाई ठेवली व तिनें वेळच्या वेळीं नाहीं पाजलें तर ? तेवढ्यांत सासूबाई आल्या पण त्या म्हणाल्या, 'तूं संभाळतेस तर तूंच संभाळ. मला आतां प्रपंचाचा वीट आला आहे.' विठ्ठल मोठा होता. त्याचं तोंड धुणं, आंघोळ, दूध पिणं केलें कीं झालें. तो शिपायांत खेळे, ह्यांच्याकडे जाई. माई त्याच्या बरोबरीची होती ती सासूबाई आल्यावर त्यांच्या मागें मागें असे.

मग माझ्या बाळंतपणाचा प्रश्न आला. भाऊची प्रकृति तोळामासा. (त्याला कांहींच नांव नव्हतें. मी त्याचें नांव भाऊ ठेवलें. तोंपर्यंत त्याला सगळीं मुलगा म्हणत.) म्हणून मी माहेरीं जाण्याचें नाकारलं. ठेवून जावें तर त्याला माझा व मला त्याचा इतका लळा लागला होता कीं तें शक्य नव्हतं. न्यावा तर मला वाटे कमी जास्त झाल्यास, माझ्या माहेरचीं माणसं त्याची काय काळजी घेणार असें लोकांना वाटेल. शहादें खेडें, नर्सची वगैरे सोय नाहीं. म्हणून मला पुण्यास पाठवायचें ठरलें. त्याप्रमाणें मी तेथें गेलें. रस्त्यांत दोन दिवस जळगांवास खांबेट्यांकडे लग्नाला राहिलें. त्यांच्या मुलीचें–कृष्णाबाईचें लग्न आपट्यांच्या मुलाशीं झालें होतें. पुढें ती बिचारी भाजून मेली.

माझें पहिलें बाळंतपण गोळ्यांच्या वाड्यांत झालें. त्यावेळेस मी चार महिने पुण्यास होतें. भाऊला मी संभाळी. शिवाय बाई ठेवली होती. मी जून

तीनला प्रसूत होऊन मुलगी झाली. ती अगदीं रडवी नव्हती. दहा दिवसांत मूल आहे हें कळलं नाहीं. म्हणून बारशाच्या दिवशीं नांव काय ठेवायचं असें विचारलें तेव्हां तात्या म्हणाले, 'ही मुलगी झाल्यापासून घर शांत आहे. तेव्हां शांता म्हणा.' तेव्हां वाईनीं शांताबाई नांव ठेवलं. तेवढ्यांत मोलकरीण सोडून गेली. पण मग ताईनींच भाऊला संभाळला. आणि माझं बाळंतपणहि चांगलं केलं. आपण लहान असतो, अज्ञान असतो. म्हणून माहेरीं जाण्याची प्रथा आहे. पण बाईनीं–ताईनीं–बहिणीसारखं माझं बाळंतपण केलं.

शांताबाई व भाऊला घेऊन मी बाळंतीण उठून शहाद्याला आलें. घरांत लहान मूल आलें म्हणून माई, विठ्ठल आनंदलीं, मात्र मामंजींची फार निराशा झाली. ते मुलाची वाट पहात होते. ह्यांना मुलगा होऊन तो पहावा अशी त्यांची इच्छा होती. ते तिला शांताराम म्हणत. पुढें श्रावणी आली. माणसं बोलावल्याप्रमाणं जमली आणि भाऊचं जास्त झालं. मी त्याला मांडीवर घेऊन बसलें होतें. माझ्या डोळ्याचें पाणी खळेना.वाटे कीं आई नाहीं म्हणून पोर जगत नाहीं. माझ्या हातून त्याचें नीट झालें नाहीं. इतक्यांत स्वतः आले, त्याच्याजवळ बसलें व मनांत काय आलें कुणास ठाऊक मला म्हणाले हें पहा, विश्वेश्वराला सांगा, 'जर त्याला बरें वाटलें तर पायावर घालायला आण.' पुढें एका गांवठी वैद्याच्या औषधानें तो सुधारला. त्यावेळेस तेव्हां तेथें शेजारच्या घरांत वासुदेवराव पटवर्धन–फर्ग्यूसनचे प्रोफेसर रहात असत. त्यांच्या बायकोची व भावजयीची म्हणजे डॉ. भागीरथीबाई पटवर्धन यांची माझी खूप मैत्री झाली. त्यामुळें बाळंतपणांतला रिकामा वेळ छान गेला.

शांता ही चार महिन्यांची झाली. मग काशीयात्रेच्या गोष्टी सुरू झाल्या. प्रथम आम्ही दोघांनीं विश्वेश्वराला जाऊन यायचें ठरलें होतें तर सासूबाई म्हणाल्या, 'तुम्ही दोन नोकर नेणारच दोन मुलांत, तर मी येतें. मीच एक मूल संभाळीन. मग मामंजी म्हणाले, 'तिला दुसऱ्यांदा काशीयात्रा मग मला कां नको.' मग सगळींच जायचें ठरलें. भाऊजी, ताई, त्यांची मुलं, मावशी, चिमाताई ब्राम्हण, मुलांची बाई, अशीं सगळीं निघालों. भाऊ-

करितां बाई ठेवली. पण तो तिच्याजवळ कधींच जात नसे. तिच्याजवळ शांताच असे. कारण तिला कळत नव्हतें. हा माझ्या कडेवर. आमचें जायचें ठरलें, तेव्हां समवयस्क मैत्रिणी यायच्या त्या म्हणायच्या, ' आतां काय बाई, तुम्ही वेणीदान करालच! मी लहान अवघी वीस वर्षांची होतें. मी म्हटलें, ' छे मला नाहीं आवडत तें; मी नाहीं करणार !'

त्या म्हणाल्या, 'मग इतक्या लांब जाऊन गंगास्नानाशिवाय येणार ?'

मी म्हटलें, ' गंगास्नान तर करणारच !'

त्या म्हणाल्या ' पंडे करूं देणार नाहींत. वेणीदान केलें नाहीं तर पंडे नदीला स्पर्श करूं देणार नाहींत !'

तेव्हां तरुण वय मनांत येईल तें जीभ चट उच्चारी. तिच्यावर तावा नसतो.

मी म्हटलं, 'गंगा काय त्यांच्या बापाची आहे ? स्नान तर करणारच पण पटत नाहीं म्हणून वेणीदान मात्र नाहीं करणार !.'

आमच्या आमच्यांतलीं हीं बोलणीं चाललीं होतीं. तें कोठें मामंजींना ऐकलें. गंगापुत्रांचा बाप काढणारी ही सून पक्की नास्तिक असं त्यांच्या मनानं घेतलं. आमचं जायचं ठरलं. पुण्याची माणसं जळगांवला येऊन मिळायचीं ठरलीं. आम्ही सगळीं खांबटयांकडे जमलों. ताईंचे ते भाऊ. तेथून दुसरे दिवशीं पुढें गेलों. रस्त्यांत गोंदवलेकर–महाराज हरद्याला आहेत असं कळलं. ते स्वतःचे व मामंजी–सासूबाईंचे गुरु. तेथें आम्ही उतरून रामाच्या देवळांत गेलों. आम्हांला पाहिल्याबरोबर ते सामोरे आले. तेथेंच सर्वांनीं नमस्कार केला. त्यांनीं गृहस्थाश्रमी माणसापेक्षांहि जास्त अगत्यानें स्वागत व विचारपूस केली.

'काय चिंतोपंत, म्हातारपणीं नाना जाऊन तुम्हां दोघांना दुःखांत टाकलं ना ? ' असे चार सांतवनाचे शब्द बोलले. माझ्याकडे पाहून ' हें ह्यांचे नवे कुटुंब ना ?' असें विचारलें व सगळीं देवळांत गेलों वरच्या गॅलरींत पडदे बांधून आम्हांला बसायला व मामंजींना पूजेला जागा केली होती. सगळ्यांचीं प्रातःकृत्यें आटोपलीं व माडीवर मामंजी पूजेला बसले. तेथें महाराज गेले व त्यांच्याशीं बोलत बसले. तेव्हां म्हणाले, ' सगळें ठीक आहे

ना ?' तशी मामंजी म्हणाले, 'आहे खरं, पण ही नवी सून नास्तिक आहे.'
तेव्हां महाराज म्हणाले, ' बोलवा तिला. '

मला बोलावलें गेलें पण मला सारखी भीति वाटत होती. कारण सगळीं आदरानें ' महाराज, महाराज ' म्हणायची. तेव्हां वाटलं एवढा थोर मनुष्य आपल्याला काय विचारणार आहे ? आपण काय उत्तर द्यावें. मी नमस्कार करून उभी राहिलें.

त्यांनीं विचारलें, ' तूं देव मानतेस का ? ' मी ' हो ' म्हटलें ' तुझा त्याच्यावर विश्वास आहे कां ? ' मी म्हटलें ' लहानपणापासून मी देवाचें करते.' पण हे प्रश्न विचारतांना ते सारखे माझ्याकडे बघत होते. त्यामुळें मला खूप भीति वाटत होती. ते बोलायचे थांबल्याबरोबर मी हळूंच तेथून पळालें. पण परत येतांना माझ्या कानांवर शब्द पडले. ' दादा, ती नास्तिक नाहीं. ती मोठी ईश्वरभक्तिपरायण निघेल व तुमच्या घराचें नांव काढील.' मला हंसूं आलें. मी यत्किंचित् स्त्री ! नांव तें काय काढणार ? पण मामंजी खूष झाले. केव्हांही त्यांच्या दृष्टीनें मी चुकलें कीं म्हणायचे, ' काय करावं महाराज तर निराळें म्हणतात. रामाला ठाऊक !' मग एकदां मी केलेलें चंद्रकांताच्या भाषांतराचे कागद त्यांना वाचायला दिले. मग त्यांचें मत पालटलें. पुढें मला स्वयंपाक करतां येतो असें त्यांना कळलें. मग आम्ही हरद्याहून जबलपुरास गेलों. तेथें कांहीं कारणानें माझ्याशिवाय सर्वजण नर्मदेचा धबधबा पहायला गेले तो पाहण्याचा माझा योग अजूनहि आला नाहीं. पुढें तेथें माझा मुलगा होता तेव्हांहि मी गेलें होते, पण तो तेव्हांहि पहायचा राहिला. तेथून आम्ही अयोध्या प्रयाग करून काशीस आलों. तेथें भाऊला विश्वेश्वराच्या पायावर घालून स्वतः वचनपूर्ती केली. पण तेथेंच त्यांना ताप आला. त्यामुळें तेथून आम्ही परत फिरून थेट पुण्यास आलों. उरलेली रजा पुण्यास काढून आम्ही दोघं, भाऊ शांतासह शहाद्यास आलों. शहाद्याला मावंदं केलं तेव्हां लोकांनीं मोठे मोठे अहेर करावयाचा घाट घातला होता. पण स्वतः सांगितलें कीं मी अहेर घेऊं शकत नाहीं. तरी तुम्हांला जें द्यायचें असेल तें मी एकत्र करून एखाद्या संस्थेला

देईन. तेव्हां लोकांचा आंकडा एकदम कमी झाला. आली रक्कम हिंगण्याला पाठवली.

शहाद्याहून आमची बदली कळवणला झाली. अगदीं प्रथमच मी एकटीनें सामान आवरलें. सामान बैलगाडीनें आलें व आम्ही दोन मुलं व एक नोकर घेऊन आगगाडीनें लासलगांवला उतरलों. तेथून टांग्यानें चांदवडला अहिल्याबाईच्या वाड्यांत रात्रीं मुक्काम केला.सकाळीं तेथल्या मामलेदारांकडे चहा घेऊन निघालों. रस्ते वाईट तेव्हां पाळण्यांत दोन्ही मुलें निजवलीं व तो भिल्लांनीं डोलीसारखा उचलला व बरोबर शिपाई दिला. डोली पायवाटेनें आली.आम्ही टांग्यानें गेलों.कळवण खेडेगांवच,पण मामलेदारांकरितां म्हणून एक लहानसें माडीचें घर एका माणसानें बांधलेलें होतें.कारकुनांकरितां पोलिस लाइनीसारखी चाळ होती. तेथें आठ महिने काढले. तेथेंच माई पुण्याहून आली ती लग्न होईपर्यन्त मला सोडून पुन: पुण्यास गेली नाहीं. कळवणला बाई चांगली मिळाली. एक ज्यू डॉक्टर होते. त्यांची बायको, मुली ह्यांची संगत चांगली मिळाली. शिपाई पण छान होते. तेथें मी लोकरीचा मोठा गालीचा विणला. मशीन घेऊन हाताचें शिवण बंद केलें. आणि पुन्हा लेखनाला सुरुवात केली. लेख ह्यांना न विचारतां स्वत:च्या जबाबदारीवर ज्ञानप्रकाशला पाठवले. त्यांना ते पटले व पुढचे पाठवा असें उत्तर आलें. त्यावेळेस मी बरेच निनांवी लेख लिहिले. माझी कादंबरी धुळ्याच्या ' खानदेश वैभवांत ' येऊं लागली.

मला वाचनाची गोडी लहानपणापासूनच होती. ट्रेनिंग कॉलेजच्या मुलींना वाचनालयांतलें पुस्तक महिन्याला एक तरी घ्यायलाच लावीत. त्यांना तें वाचायला मुळींच वेळ नसे. त्यांचें विणकाम दुरुस्त करून देण्याच्या मोबदल्यांत मी त्यांचें पुस्तक वाचायला मागे व एका दिवसांत परत द्यायच्या बोलीवर प्रत्येकीचें पुस्तक वाची. मोठपणींसुद्धां मराठी शिकायचें मनानें ठरल्यावर मराठी वाचायला सुरुवात केली. एकदां अशी गंमत झाली कीं, धुळ्यास असतांना सगळं आटपून मीं वाचायला बसलें ती मला घड्याळाची शुद्ध उरली नाहीं. रात्रीं थोरले भाऊजी नाटकाहून आले, ' दार उघड ' म्हणाले. मी उघडलें. ते म्हणाले, ' अजून जागी आहेस का ? ' 'हो' म्हटलें

तेव्हां म्हणाले, 'आतां निजा !' ते वर गेले. मी दिवा कमी करून निजले. मग दुसरे दिवशीं जेवतांना म्हणाले, 'ही किती जागते ! काल मी नाटकाहून आलों तरी वाचीत होती !' कळवणला असतांना माझ्या मनांत स्त्रियांकरितां एक मासिक काढायचा विचार आला होता.. मी तसें तात्या साहेबांना विचारलें होतें. पुण्यास प्लेग झाल्यामुळें सगळीं कळवणला आलीं; त्यांत दादा, आई, मुलं येतांना सप्तशृंगीला जाऊन आलीं. मी, ताई व तात्या मागून गेलों. परत उतरतांना तात्या वणीकडून उतरले. आम्ही आभोण्याहून उतरून कळवणला आलों. लगेच आमची बदली मालेगांवास झाली. सर्व तेथें गेलों. तेथें महिना दीड महिना राहून पुण्यास सर्व मंडळी गेलीं. कारण मामंजींना रामेश्वरला जायचें होतें. ती मंडळी जायची ठरल्यापासून मला रडायला यायला लागलें. कळवण सोडतांना बाई व सासूबाई होत्या. त्यांनी तेथें सर्व सामान आवरले व येथें त्यांनींच लावलें. मला एकटं ठेवून जातांना सासूबाईंनाहि खूप वाईट वाटलें. आमच्या घराची व शेजारच्या घराची भित एक होती. तेथें पाटसकर मुन्सफ रहात होते. तेथें सासूबाई गेल्या व त्यांना, मुलगी लहान आहे, एकटी राहिलेली नाहीं वगैरे सांगून आल्या. कारण कळवणलासुद्धां रात्रंदिवस रहाणारी ब्राह्मणाची बाई होतीच. ही मंडळी गेली. मला सारखें वाईट वाटे. स्वत: कचेरीत जायला निघाले तशी मला रडायला यायला लागलें. त्यांनी सांगितलं कीं शेजारीं कुणाला बोलावणें पाठवा, ओळखी करा. असें म्हणतात तोंच शिपायानें शेजारच्या बाईसाहेब आल्या आहेत म्हणून सांगितलें. मी घाईघाईनें खालीं आलें. डोळे रडलेले होतेच. माझें रडकें तोंड पाहून त्यांना वाटलें स्वत: कांही तरी मला बोलले. तोंपर्यंत स्वत: कचेरींत गेले होते. त्या म्हणाल्या, 'अहो, असें रडूं नये.' पुरुष बोलायचेच !'

मी म्हटलं, 'मला कुणी बोललं नाहीं. सगळीं गेलीं म्हणून वाईट वाटतं.' पण सासू, जाऊ गेल्याबद्दल इतकं वाईट वाटतं हेंच कोणाला पटेना.

मालेगांवला पाटसकर कुटुंबाशीं जो आमचा स्नेह जडला तो पुन्हां पाटसकर जळगांवास आमच्या शेजारींच राहायला आल्यानें आणखी वृद्धिंगत

झाला आणि तो दिवसमाशीं वाढतच गेला. आतां हरिभाऊ म्हणजे आम्हांला मुलासारखा वाटतो. सूनबाईसुद्धां मोठी सुशील आहे. मालेगांवास आमचें ड वर्ष चांगलें गेलें. तेथें माझी आणि काशीबाई कानिटकर यांची गांठ पडली. कॅम्पांत त्यांचा बंगला होता. तेथें त्यांची सून व मुलगा असे. तेथें त्या येत. अशाच एकदां त्या आल्या असतांना मी मुद्दाम दोनदां त्यांच्याकडे गेलें. मनांत हेतु हा कीं ह्या मोठ्या विदुषी आहेत; आपल्याला कांहीं शिकतां आलें तर पहावें. पण मी गेलें कीं त्या सुनेला बोलावून माझ्याशीं बोलायला बसवून निघून जात. मग मी त्यांना घरीं बोलावून मुद्दाम चार बायका बोलावल्या. माझ्या मनांत पुष्कळ दिवस बायका बोलवाव्या असें होतें. तें ह्या निमित्तानें केलें. पण एकंदरींत त्यांचे माझ्याशीं जमलें नाहीं. मी त्यांच्याहून वयानें व ज्ञानानें लहान असल्यामुळेंहि असेल. मी शुक्रवारचें हळदीकुंकू करून बायका बोलवीत असे. कोणाला शिवायला शिकव, वाचायला शिकव, वर्तमानपत्रांतील वा मासिकांतील गमती वाचून दाखव, असें करी. कारण त्यावेळेस बायका वर्तमानपत्र वाचीत नसत. आमचें, पाटसकरांचें व जोशी वकीलांचें या तिन्ही घरांना जोडणारीं धाबीं होतीं व मध्यें वरोंडी होती. आम्ही एक एक वीट काढून सरळ वाट केली व आम्ही एकमेकांकडे वरूनच जा ये करीत असूं. विशेषतः पाटसकरांच्या काकू आणि मी. आमच्या गप्पा, पोहे खाणं, एकमेकीला कांहीं दाखवणं, विचारणं, सर्व वरून चालायचें. बराच वेळ बसायला म्हणून जायचें असलें तरच खालून सडकेवरून जायचें. नाहींतर चटणी, लोणचं, भाजी ह्याची देवाण घेवाण आमच्या नि पाटसकरांच्या घराच्या धाब्यावरूनच होई.

आम्ही तेथें असतांनाच आमचा भाचा तात्या गोखले—पुढें कराची एंजिनिअरिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल—ह्यांचें लग्न तेथेंच ठरलें. मुलगी तेथेंच पाहिली. अर्थात् आम्ही दोघं जाऊन. पुण्यास तें लग्न झालें. ती मुलगी —इंदिरा— पहिली सून म्हणून आमच्या घरीं आली. स्वतःचें तात्यावर आत्यंतिक प्रेम, अतिशय कौतुक. ती मुलगी मनमाडहून यायची तर स्वतः मनमाडला आणायला गेले. लहान आहे, गडी कारकून नको म्हणून. तेथें ती सून म्हणून आमच्याजवळ होती. ती वयानें त्या काळाप्रमाणें लहानच होती. तिची

भातुकली वगैरे कौतुक येथेंच झालें. माई, भाऊ, शांताबाई, ह्यांना वहिनी अति प्रिय वाटे. ती मुलगी पण फारच चांगली आहे. पुन्हां आम्ही पुण्यास तात्यासाहेबांचा वडील मुलगा बापू–काशीनाथ–ह्याच्या मुंजीला गेलो. परत येतांना सासूबाईंना चला म्हटलें तर त्या म्हणाल्या, 'जरा मुंजीची गडबड आटोपून येतें!' आम्ही परत यायला निघालों. तेव्हां मामंजी शांताला म्हणाले, 'शांताराम, आतां आत्माराम घेऊनच ये.' येतांना काकी व लाडूवन्सं बरोबर होत्या.

मुंजीहून आम्ही आलों आणि लगेच वैशाखांत मामंजी गेले. अर्थात् सर्वांनाच फार वाईट वाटलें. ह्यांना सारखें बालपण आठवे. त्यांनीं कसें कुटुंबाचें पोषण केलें. पगार थोडा पण कोकणांत जातांना, आई, चुलत्या या सर्वांना लुगडीं न्यायचीं. त्या सर्व दादा यायचा आहे म्हणून वाट पाहात असत. असें तें कुटुंबप्रेम. त्यांतच सासूबाईंच्या आग्रहामुळें कर्ज करून कां होईना, पण मुलांच्या विद्या केल्या. तेदेखील मामलेदार होते. पण पगार स्टेटमधले. स्वत: मामलेदार झाले म्हणून गादी चालवली असें त्यांना वाटे. सात्विक व देवधर्मशील. नोकरी सोडली व संसारांतलं मन काढलं आणि तेव्हांपासून पैशाला शिवले नाहींत. गोंदवलेकर महाराजांवर फार श्रद्धा असें पितृछत्र नाहींसें झालें, तर कुणाला वाईट वाटणार नाहीं?

पुढें श्रावणांत मला मुलगा झाला. बाई भावजी येऊन थाटांत बारसें झालें. पुढें सासूबाई आल्या व तो मुलगा पांच महिन्यांचा होऊन गेला. स्वत: मला कांहींच ज्ञान नाहीं. डॉक्टरनें निमोनिया म्हटलें. तेव्हां मला वाटलें आपल्याला कांहींतरी ज्ञान हवें. त्यामुळें मनाला विलक्षण मन:स्ताप व्हायला लागला. म्हणून भाऊ शांता सासूबाईजवळ ठेवून आम्ही दिल्ली आग्र्याला गेलों.बरोबर तेथल्याच गुप्ते वकीलांची मुलगी व जांवई होते. पुढें भाऊजीहि आम्हाला येऊन मिळाले. ही आमची ट्रिप चांगली झाली. परत आलों तों भाऊ खूप सुधारला होता. गोटचा झाला होता. शांताबाईसुद्धां बालूं बोलूं लागली होती. ती स्वभावानें गरीब होती. चांदीच्या झाऱ्यांना बोथ्या लावून दोघांना दोन झाऱ्या तेव्हांपासून केल्या होत्या. ती आधीं उठून जर दूध प्यायला बसली आणि हा मग उठला तर तिच्या हातांतलीं

झारी काढून घेऊन मांडी घालून प्यायला सुरुवात करायची. मग ती 'भाऊ, भाऊ' म्हणून रडे. आपण येऊन दुसरी झारी तिला द्यावी. 'ती माझी' म्हणून ओढून घेऊन थेंबभर दूध उरलेली पहिली तिला द्यायचा. मुलं लहान असताना सकाळीं दूध पिऊन फिरायला जात. फिरून येऊन आंघोळी झाल्या की मग जे पातळ भात ऊर्फ आटवल खायला घालीत असे. तेव्हां दोघांची झबलीं काढत असे, सांडतात म्हणून. जेवणं झालीं कीं भाऊनें पळत पळत जाऊन दोन्हीं झबलीं उचलून बघायचीं व जें स्वच्छ असेल तें आपण घालायचें.

मी पुण्यास प्रथम आलें तेव्हां तात्या मला वहिनी म्हणायचे. त्यामुळें तेथें मुलें व इतर सगळीं मला वहिनी म्हणत. तेव्हां दत्तूकाका घरांत असल्यानें माई वहिनीच म्हणे. त्यामुळें खरें म्हणजे माझें नांव वहिनीच पडायचें पण भाऊनें तें बदललें. घरांत जी मोलकरीण होती तिला शिपाई एखाद वेळेस 'बाई हें कर' वगैरे म्हणत. मला हांक वगैरे मारतांना बाईसाहेब म्हणत. पण पाठीमागें केव्हां बाई म्हणत असतील. मुलांशीं खेळणारा एक म्हातारा शिपाई होता. तो म्हणायचा, 'खंडेराव महाराज, फार दंगा केलात् तर बाई आल्या म्हणजे रागवतील'. म्हणजे ह्यानें ओरडावं, 'बाई नाहीं म्हणायचें आई म्हण.' पण तो पुन्हां केव्हां बाई म्हणाला कीं, हा त्याला मारायला जायचा व म्हणायचा, 'ती भांडी घाशीत नाहीं. ती बाई नाहीं.' मग इतर त्याला म्हणाले, 'अरे, म्हण ना आई, फुकट मार कां खातोस ? आई तर आई.' आणि तेव्हांपासून नोकर व मग कारकून सगळ्यांची मी आईसाहेब झालें. अर्थात् पुढें पुण्याच्या घरांत वहिनी व येथें आई झालें. नंतर पुण्याच्या घरीं बापूचें लग्न होऊन मुलांना वहिनी आली. तेव्हां मुलं म्हणाली, 'आतां हिला काय म्हणायचें ?' तेव्हां तात्या म्हणाले 'ती 'ए वहिनी' आहे. तुमच्या भावजयीला तुम्ही 'अहो वहिनी' म्हणा.'

येथें मी 'आनंद' मासिकांत गोष्टी लिहायला लागलें. ज्ञानप्रकाशमध्यें लेखन सुरूच होतें. 'खानदेशवैभवांत' कादंबरी लिहीत होतेंच. विणकाम, भरतकामाचें वेड होतेंच. मी घरांत कधीं वारभरसुद्धां गरम कपडा विकत घेतला नाहीं. पाटसकर काकू, जोशीकाकू ह्यांच्या आमच्या गप्पा चालत.

पोफळे, राजाबहादूर यांच्याकडे ओळखी तेव्हांच झाल्या व त्या अजून कायम आहेत.

आम्ही मालेगांवला असतांना फर्ग्यूसन कॉलेजचे प्रो. पानसे वर्गणी आले होते. ते आमच्याकडेच उतरले होते. त्यांनीं वलबांत कोठें चव केलीं कीं, ह्या गावांत स्त्रीशिक्षण वगैरे कसें काय आहे ? तेव्हां त्यांना कोणी सांगितलें कीं, तुम्ही उतरलां आहांत त्याच घरच्या बाई शिकलेल्या आहेत असें ऐकतो. बाकी कांहीं नाहीं. तेव्हां जेवतांना त्यांनीं स्वतःला विचारलें कीं, 'ह्या किती शिकलेल्या आहेत ?' तेव्हां सांगितलं कीं मूळच्या गुजराथी शिकलेल्या आहेत. आतां मराठी चांगलं येतं. मी वाढायला गेलें, तेव्हां ते मला म्हणाले, 'तुम्ही ज्ञानप्रकाश वाचता कां ? त्यांत हल्लीं कुठल्या एका लेखिकेचे टोपण नांवानें चांगले लेख येतात. आमच्या मुली त्यांची कात्रणें काढून ठेवतात.' तेव्हां स्वतः माझ्याकडे बघितलें. पण मी न बघतांच वाढून परत आलें. पण त्यांचें लक्ष ह्यांच्याकडे गेले. ते म्हणाले, 'कां हो, कांहीं पाणी मुरतं आहे कां ? का नुसता भासच ?' तेव्हां ती लेखिका मीच असें ह्यांनीं सांगितलें. त्याना फार कौतुक वाटलें. मग ते म्हणाले, 'पुण्यास आमच्या आमच्यांत ही लेखिका कोण म्हणून चर्चा चालते. एकदां 'आनंदा'च्या संपादकांनीं ह्या लेखांतला मुलींना उपयुक्त तेवढाच भाग 'आनंदा'त घेऊन. 'ज्ञानप्रकाशांत' एका स्त्री लेखिकेचे सुदर लेख येतात पण त्यांचे नांव माहीत नाहीं असें लिहिलें होतें. तेव्हां मग मी त्यांना गोष्टी पाठवूं लागलें. मुलींना चड्डया घालण्याची सुरुवात प्रथम शांताबाईला चड्डया शिवून मी केली. प्रथम प्रथम सगळी खूप हंसलीं पण आतां ती प्रथा घरोघर झाली आहे. विणकाम, भरतकाम जें घरोघर झालें असेल तें तसेंच न करतां नवं करायचं ह्या अट्टाहासांत बराच वेळ जाई. तेथें असतांना गायकवाडांचें जन्मगांव कळवण येथें त्यांचा वाडा पाहिला. मालेगांवचे पेरू खूप गोड असतात. मालेगांवास मोमिन लोकांची वस्ती मोठी आहे. त्यांचा मुख्य धंदा लुगडीं विणण्याचा. अजूनहि तो धंदा तेथें चालतो. तेथून आमची बदली नंदुरबारला झाली. मालेगांवची अडीच वर्षे मुलाच्या

मृत्यूशिवाय बाकी सुखांत गेली. तेथून निघायच्या वेळेस एक गंमत झाली. तें यशवंतराव म्हणून एक पाटील होता. त्याला अशी संवय होती कांहीं सार्वजनिक सरकारी काम असलं कीं मामलेदारांनीं त्याला बोलावून मोठेपणा देऊन तें काम करवायचें. पण ह्यांच्या स्वभावांत तें नव्हतें जें काम ज्याला देण्याजोगं असेल तें त्याच्याकडून करवीत. मला ही भानगड कांहींच ठाऊक नव्हती. मला बाजारांतून कांहीं वस्तू आणायची होती. ती आणायला मी शिपायाला सांगितली. तो म्हणाला, ‘ भाऊंना बोलावतो.’ मी म्हटलं, ‘ अरे एवढ्याशा वस्तूला भाऊ काय करायचें ? उधार आणायची नाहीं कांहीं नाहीं. ‘पैसे घेऊन जा आणि दुकानदाराला माग. ’ मग शिपाई पुन्हा मला विचारीत नसत; मुकाट्यानें बाजार होई ह्याचा त्याला राग आला होता. मग आमची बदली झाली. त्याच संधीला केसरींत ‘ चतकोर भाकरीची गुलामगिरी ’ अशा हेडिंगाखालीं लेख आला होता. आम्ही निघायच्या आदले दिवशीं कांहीं सरकारी कामासाठीं कारकून ५–६ मैल जायचा होता त्याला बैलगाडी देण्याविषयीं पाटलाला सांगितलें. त्यानें त्याला गाडी दिली नाहीं. सकाळीं तो कारकून तेथें पोचायला हवा होता. तो सकाळीं सांगत आला कीं गाडी नाहीं. ह्यांनीं पाटलाला बोलावलें व गाडी कां दिली नाहीं म्हणून विचारलें व त्याचा जाब मागितला. ‘कारकून भाडें देत नाहीं म्हणाला कां ?’ असें विचारलें. त्याची गंमत अशी कीं आम्ही ते दिवशीं जाणार तेव्हां आदले दिवशीं संध्याकाळीं चार्ज सोडूं ही त्याची कल्पना पण दुसरे दिवशीं चार्ज देऊन आम्ही टांग्यांत बसलों. त्यावेळेस त्यानें ज्ञानप्रकाशांत ‘ चतकोर भाकरीची गुलामगिरी’ म्हणून लेख लिहिला, ‘ केळकर मामलेदारांना नंदुरबारला जायला फुकट बैलगाड्या पाहिजे होत्या.मी लोकांच्या गाड्या कशा काय फुकट देणार ? तेव्हां ते रागावले म्हणून मी नोकरीचा राजिनामा दिला.’ खरें म्हणजे त्याला प्रांतानें डिसमिस केलं होतं.

आम्ही मालेगांवाहून धुळं, तेथून नरडाणा करून नंदुरबारला गेलों. आमची बदली झाल्यामुळें पाटसकर काकू, जोशीणबाई, गुप्ते वगैरे मंडळींना फार वाईट वाटलें. मालेगांवला आलों तेव्हां सामान आवरायला

सासूबाई होत्या त्यामुळें मला कांहीं करावं लागलं नव्हतं. पण यावेळ सर्व माझ्यावरच पडलं.

नंदुरबारला आलों. मामलेदारांचें म्हणून जें घर होतें, तें छो होतें. सडकेला होतें. तेथें उतरलों. दुसरे दिवशीं सकाळीं सामानाच्या गाड्या आल्या त्यांतलें सामान काढतांना मी खालीं उभी होतें, वर कोणचें न्यायचे खालीं कोणचें न्यायचे हें दाखवायला. तेवढ्यांत शांताबाई वर निजली होती. तिच्या हातांतल्या सोन्याच्या बिंदल्या कोणी काढून घेतल्या. नवं घर, नवीं माणसं पण माई, विठ्ठल, भाऊ, शांता रमली, खेळूं लागली. माई, विठ्ठलचे नांव शाळेंत घातलें. भाऊ फार खोडकर झाला होता. पण त्याच्या खोडीगणिक त्याला प्रत्येकानें थप्पड दिली तर कसें होणार ? म्हणून मी सगळ्यांना सांगितलं होतं (सासूबाईंना नव्हे) कीं माझ्याशिवाय कोणी त्याला बोलायचं नाहीं. विठ्ठल लहानच; तो भाऊ कांहीं तरी बोलला कीं चिडे व त्याला थप्पड देई. त्याचें पाटी बुक उचलीं म्हणजे एखाद वेळेस भाऊबरोबर मी त्यालाहि रागावून म्हणे, 'तूं मोठा आहेस. त्याच्या वाटेला जाऊं नकोस.' पण सासूबाईंना केव्हां तरी वाटे कीं हिचें भाऊवर प्रेम पण विठ्ठलावर नाहीं. त्या मामंजींच्या वर्षश्राद्धाला पुण्यास गेल्या तेव्हां स्वत: व विठ्ठल त्यांच्याबरोबर होतीं. येतांना त्याला तेथेंच ठेवला. मला फार वाईट वाटलें. कारण बाई गेल्यापासून पांच वर्षं त्याचं मी केलं होतं. तेवढा सहवास असतो ना ? ह्यांनासुद्धां वाईट वाटलें. ह्यांना त्याचा लळा फार होता व त्याला ह्यांची भक्ति फार. ते आंघोळीला बसले म्हणजे त्यांचा पंचा, खडावा घेऊन हा उभा राहायचा. ती मूर्ति अजून डोळ्यापुढें दिसते.पण ह्यांचे एक तत्त्व होतें कीं, तात्याच्या-पुढें बोलायचें नाहीं म्हणून तात्या जेव्हां म्हणाले, 'विठ्ठल येथेंच राहूं दे, अण्णाबरोबर तो शाळेंत जाईल जोडीनें दोघांचे शिक्षण होईल.' तेव्हां हे कांहींच बोलले नाहींत. पण परत आल्यावर त्यांना फार वाईट वाटलें. पण आईलाहि दुखवायची नव्हती. असो.

नंदुरबारच्या आमच्या घरासमोर घरमालक अभ्यंकर यांचें घर होतें. मध्यें फक्त खेडेगांवांतली लहानशी सडक. त्यांचे चुलते बापूसाहेब मुलांना

बोलावीत. मग सकाळीं फिरून आलं कीं आंघोळी करून नवे सदरे चड्या घालून भाऊ तिकडे जायचा. शांताबाईला न्यायची कां नाहीं हें त्याच्या मर्जीवर अवलंबून असे. मग जेथें बापूसाहेब पूजा करीत असत तेथें स्वारी मांडी घालून बसून नैवेद्याचें दूध पिऊन यायची. तो गेला नाहीं तर त्यांना चैन पडत नसे. मात्र तो लोकांच्या घरीं खोडया करीत नसे. कृष्णराव अभ्यंकरांची बायको माझ्याहून लहानच होती. त्यांच्या माडीवर एक तलाठयाचं बिऱ्हाड होतं.त्याची बायको आमच्याच वयाची. आमचें मग चांगलेंच जमलें. दोन्ही शेजारच्या बायकाहि येत जात असे मोठे मजेत दिवस जात होते.माझें लिहिणें वाचणें थोडें थोडें चालू होतें. तोंच आमच्या आत्याबाई आमचेकडे आल्या. समवयस्क मैत्रीण मिळाली.माझ्या रांगोळ्यांचा नाद ह्यावेळेस पुन्हा उद्‌भवला.मला लहानपणापासून तो नाद होता.येथें मागें चांगलें मोठें आंगण होतें. तें मी नोकरांकडून सारवून स्वच्छ करून घेतलें मी दिवाळींत तेथें मोठे मोठे गालीचे काढायची. खेडेगांव व मागल्या कंपाउंडांतलें आंगण. मग रांगोळ्या पहायला कोण येत होतें ? पण वेड! आतां हंसायला येतं कीं त्यांत मी कितीवेळ व श्रम खर्च करीत होतें. तसेंच झाडं लावायचीं. एकेक वेडं असतात. हेंच खरं. तेथें असतांना मनोरंजन'चा दिवाळी अंक निघाला. त्यांत माझा लेख आला होता तो नांवानें आला होता. लोकांना तो आवडला ताई व मुलं तेथें असतांना आलीं होतीं. आठ दिवस राहून गेलीं. उमरावतीची माई जोशी, तिची आई व भाऊ हीं आलीं होतीं. तिची माझी ओळख पुण्यास झाली. पुण्यास तात्या व त्यांचे एक स्नेही एकत्र राहात. अर्थात् दोघांची पाहुणी यायची तशी ही पण तिच्या नणंदेकडे आली होती. ती उन्हाळ्याची बरेच दिवस होती अर्थात् ताईची त्यांची खूप घसट झाली. पुढें मी शांताच्या वेळेस बाळंतपणाला तेथें होतें. तेव्हां उन्हाळा म्हणून ही मंडळी तेथें बिऱ्हाड करून राहिलीं होतीं. तें घर जवळ होतें.तेव्हां वरचेवर ती ताईकडे यायची.अर्थात् मी रिकामी म्हणून माझ्याशीं मग गप्पा व्हायच्या. असं करितां करितां स्नेह पुढें वाढत गेला. मुलं मोठीं झालीं होतीं. शांता मुलाचाच पोषाख करी. कोट, पाटलोण डोक्याला पटके. एकदां तेथें एक मुनसफ होते ते तिला म्हणाले,'तुझें नांव सांग.'त्यांना

वाटलें आतां फसेल. ती म्हणाली, 'शांताराम !' तेव्हां खूप हंशा झाला आतां अक्षरं काढणं, संध्याकाळीं थोडी उजळणी असं दोघांचं सुरू झालं येथें मला एक मुलगा झाला. रूपानें फारच सुंदर होता बापूनें तात्यांना पत्रांत लिहिले होतें कीं, वहिनीचा मुलगा मदनासारखा दिसतो. तो अर्थात् सर्वांचा आवडता होता. नोकर चाकर शेजारी पाजारी खूप प्रेम करीत. त्यावेळेस टिळक तुरुंगांत गेल्यावर मागून केसरी व ज्ञानप्रकाशनें जे लेख लिहिले होते त्याबद्दल दोन्ही पत्रांवर केस झाली होती. त्यांतील एक तात्यासाहेबांवर होती. पुढें त्याच सुमारास आमचा पगार वाढला लोकांनीं पेढे खाल्ले आम्ही पगार घेतला. मग सरकारच्या लक्षांत आलं कां आम्ही केळकरांचे भाऊ, तेव्हां 'पगार चुकून दिला गेला तरी परत भरावा' असा हुकूम आला तेव्हां तिथें बोमनजी कलेक्टर होता तो मद्रासला असतांना केसरींत त्याच्यावर कांहीं टीका आली होती. तेव्हां आम्ही केळकरांचे भाऊ हें कळल्यापासून तो ह्यांचा फार द्वेष करी, जर कां ह्यांच्या कामांत किंवा व्यवहारांत त्याला यत्किंचितहि फट दिसती तर त्यानें तेव्हांच ह्यांना कामावरून काढलं असतं.तेथेंसुद्धां बायका गोळा करावयाचा नाद मला होताच.

आम्ही नंदुरबारला असतांना आमची सूनबाई इंदिराबाई गोखले हिच्या मगळागौरी, महालक्ष्मी वगैरे थाट झाला. खूप बायका यायच्या. जागरणांची गंमत असायची. ती तेथें बरेंच वेळा सासर म्हणून असे तात्याहि सुटींत येई. पुढें तात्या एंजिनिअरिंगची परीक्षा पास होऊन फर्स्टक्लास फर्स्ट आला सर्वांनाच आनंद झाला. पण स्वतःचा आनंद विचारूंच नका. तेथून तात्या नोकरीवर एकदम असिस्टंट एंजिनियर म्हणून बेळगांवास गेला.

एकदां प्रो. पानसे आमच्या येथें पाहुणं म्हणून दुपारच्या गाडीनें आले. त्यांची आंघोळ वगैरे व्यवस्था नोकरांनीं केली ब्राह्मण बरोबर फिरतीवर गेला होता मी पान वाढून ठेवलें. तर मला काय वाटलं एकटे जेवण्यापेक्षां जरा बोलायला कोणी असलं म्हणजे बरं ! मी भाऊ शांताला म्हटलं, 'बाहेर पाट घेऊन बसा अन् पाहुण्यांशीं बोला.' भाऊ म्हणाला, 'काय बोलूं !' ' तुम्ही आगगाडीनें आलांत ना? कोणच्या गांवाहून आलांत असं विचारा'

असं मी म्हटलं. दोघं बाहेर गेलीं. त्यांनीं कौतुकानें,'या बसा म्हटलें.' भाऊ म्हणतो, ' पाहुणे तुम्ही कोठून आलांत ? किती राहणार ? ' मला वाटलें ेठून पाठवलीं यांना ! त्यांना वाटेल कीं किती राहणार ही चौकशी करायला पाठवली कीं काय ? पण त्या काळांत आम्ही बायकांनीं ' घरांत आहेत नाहींत ' ह्याशिवाय जास्त बोलायची चाल नव्हती. आणि नवी चाल पाडणं धोक्याचं होतं एकदा आमच्याकडे ह्यांचे एक स्नेही पाहुणें आले होते स्वत: मला कचेरीत जातांना म्हणाले, 'मला यायला संध्याकाळ होईल तरी त्यांना तीन वाजतां चहा द्या !' मी तीन वाजतां चहा करून ब्राह्मणाला नेऊन द्यायला सांगितला. पण बाहेर मुसलमान गृहस्थ बसले होते, व हे गृहस्थ देवपूजा करणारे होते. तेव्हां बाहेर दिलेला कसा चालेल असें वाटून त्यानें त्यांना आंत बोलावलें. ते एका माणसाला घेऊन आंत आले मी स्वयंपाकघरांत उभी राहिले. ब्राह्मणानें दोघांच्यापुढें पेले ठेवले तेव्हां ते म्हणाले, 'वहिनी, जेवण केव्हांहि घालावें. पण चहा अप्पासाहेब नसतांना कोणालाहि विचारूं नये !' मी त्यांना म्हटलें, ' सांगून गेले होते म्हणून केला !' पण मला राग आला व तेव्हांपासून कोणाशीच बोलायचें नाहीं असें मीं ठरवलें.

नंदुरबारहून बदली शिंदखेड्यास झाली. अभ्यंकरवहिनी, कुसाबाई, गंगूबाई, ह्या त्रिकुटाला फार फार वाईट वाटलें. आम्ही दोन वर्षं अतिशय मजेंत काढलीं होतीं. दिवसांतून दोनदां तरी एकत्र होतच असूं. शेजारीं एक गुजराथी तलाठी होते. त्यांची दुसरी बायको होती तीहि एक मैत्रीण होती. सर्वांना सोडून येतांना मला व त्यांनाहि रडायला आलें. भाऊ शांताबरोबर बाळचं सगळ्यांनीं कौतुक केलं पण टांग्यांत बसतांना त्याला उलटी झाली. पण वाटलं लोकांच्या पातेल्यांत दूध तापवलं होतं, कळकलं असेल. आम्ही स्टेशनावर आलों. आगगाडीत तो भाऊ शांताला दिलेला बर्फ मागायला लागला पण सोसायचा नाहीं म्हणून आतेबाईंनीं दिला नाहीं. दोन तासांनीं शिंदखेड्यास आलों. गांवांत टांगा उभा करून सामलेदारांचें घर बघितलें (ते दीड महिन्यांनी जागा सोडून जाणार होते.) व मग आमच्या जागेंत आलों. पण बाळचें रडें थांबेना. रातोरात पाळणा बांधला. डॉक्टर

आणले. जुलाब झाला तर तो दांताचा असेल असं म्हणाले. सगळा दिवस गेला. पाणी पाहिलें कीं मागें पण थोडंसंच दिलं. त्या काळांत तान्ह्या मुलांना पाणी लागतें हें शास्त्र जन्माला आलें नव्हतें. संत्र्याची फो चोखली गांवांत काय मिळणार ? स्वत: म्हणाले, सुरतेहून आणवू हां! पण रात्रीं दहा वाजतां आम्हाला सोडून तो गेला. त्यांनाहि दु:ख झालें. वन्सं, इंदिरा सर्वांनाच वाईट वाटलें. माझें तर विचारूंच नका. लोकांनाहि वाईट वाटलें. दुसरें दिवशीं मामलेदारीणबाई समाचाराला आल्या त्या म्हणाल्या, ‘ काल पाहिला होता हो, किती सुरेख मुलगा होता. त्याला सारखं दूध व पाणी पाजायला हवं होतं. जरी उन्हाळ्याचे दिवस नसले तरी त्याला हें ऊन बाधलें! ’ तेव्हां माझें डोळें उघडले. भयंकर पश्चात्ताप झाला. मुलांच्या दुखण्याबाण्याचें ज्ञान होण्या-पूर्वी आई होणं गुन्हा आहे असें वाटलें व मी माझा होमिओपाथीचा अभ्यास वाढवायला आरंभ केला.

आतां वेळ जाईना. सारख्या बाळाच्या आठवणी यायच्या. तेव्हां माझें सर्व लेख गोळा करावयाचा उद्योग केला व ते सर्व लिहून काढले व स्वत: जवळ म्हटलें, ‘हे एकत्र पुस्तकरूपानें छापूं या.’ त्यांनीं तें कबूल केलें. त्याच्या चित्राची कल्पना मी दिली. मग ह्यांनीं रजा घेतली व वन्सं, इंदिरा व दोन मुलांसह आम्ही नाशिक, नगर करून पुण्यास गेलों. तेथें अण्णा विठ्ठलच्या मुंजी झाल्या व मग साताऱ्यास चंद्राच्या लग्नाला गेलों. तेव्हां देशस्थाकडे मुलगी दिली म्हणून केवढा ओरडा ! तेथेंच मथुराबाई जोशी यांची गांठ पडली. तात्यासाहेब कोल्हटकरांना पाहिलें. मग परत पुण्यास आलों तेथें बाकी रजा संपवून परत शिंदखेडयास आलों. परत येतांना इंदिरा माहेरीं राहिली. व तेथूनच ती बेळगांवास तात्याकडे गेली माई, भाऊ, शांता, आतेबाईसह आम्ही आलों. थोडेच दिवसांत ‘गृहिणीभूषण’ छापून आलें. साहजिकच मला आनंद झाला. कारण मी लहानपणीं सगळ्यांना विचारी, पुस्तकावर बाईचें नांव कां नसतें ? म्हणजे म्हणत, बायका पुस्तक लिहीत नाहींत ? पुढें प्रश्न तयार; कां लिहीत नाहींत ? येत नाहीं म्हणून ! कां येत नाही ? तेव्हां रागावून उत्तर देणारें म्हणे,

'तूं लिही हो' मला मनांत वाटे, खरंच, आपण मोठें झाल्यावर पुस्तक लिहून बाईचें नांव घालू. हें लहानपणचें बोलणें मला आठवलें. पुस्तक बाहेर पडल्यावर कांहीं ठिकाणीं पुरुषांच्या क्लबांतून चर्चा झाली कीं, एक तरुण मुलगी हें पुस्तक लिहिणें शक्य नाहीं तात्यासाहेब अगर स्वत: यांनीं लिहून दिलें असेल. पण एका ओळखीच्या गृहस्थाचें मात्र मला पत्र आलें, 'लहानपणापासून पाहिलेल्या एका मुलीनें इतक्या पोक्त विचारांचे हें लिखाण केलेलें वाचून अत्यंत आनंद झाला. लोक जरी कांहीं बोलले तरी मला ठाऊक आहे कीं, रावसाहेबांना लिहिण्याचा नाद नाहीं!' अशा तऱ्हेनें अनुकूल प्रतिकूल टीकेंत बुक सेलरकडे न जातांच पहिली आवृत्ति सहा महिन्यांत खपली. येथें असतांना मी **'स्त्रियानु स्वर्ग'** या गुजराथी पुस्तकाचें भाषांतर करावयाचा विचार करून त्याच्या कर्त्याला परवानगी मागितली व त्यांनीं मोठ्या उदार मनानें ती दिली. भाऊ शांताबाईचें शिक्षण जरा हाताशीं घेतलें. पण लवकरच आमची बदली भुसावळेस झाली. तेथें जी मामलेदारांची म्हणून ठराविक जागा होती तेथें आधींच्या मामलेदारांचें कुटुंब राहात होतें. म्हणून केळकर फौजदार राहात होते त्या घराच्या, अर्ध्या भागांत आम्हाला जागा मिळाली. तीन महिने तेथें आनंदांत गेले केळकर फौजदार पुढें पोलिस खात्यांत खूप वर चढले पण आमचा जुना स्नेह कायम राहिला. मग आम्ही आमच्या घरांत गेलों.

तेथें २ जानेवारी १९११ सालीं वसंत ऊर्फ बाबाचा जन्म झाला. आधींचें दोन मुलगे गेले होते. म्हणून त्याचें बारसें केलें नाहीं. घरांतच नांव ठेऊन घेतलें. तो जरा बसायला व एखादा शब्द बोलावयाला लागला तेव्हां बाहेर शिपायांच्याजवळ दरवाज्यांत सडकेची गंमत पहात बसांयचा व पुरुष बाई कोणीही येवो 'बाबा आला' म्हणायचा म्हणजे कोणी तरी आलें असें कळे. म्हणजे साहजिकच मी अगर आतेबाई कोण आलें तें पाहयला पुढें जायचें. मग एखाद वेळेस बायका आंत आल्या कीं म्हणत 'आज बाबावाला बाहेर नाहीं म्हणून आम्ही आलेल्या तुम्हाला कळलं नाहीं.' असं म्हणतां म्हणतां त्याचें नांव बाबाच पडलें. तो

दोन महिन्यांचा असतांना आम्ही पुण्यास माईच्या लग्नाकरितां गेलों. तिचें लग्न रिसालदार बापट ह्यांचे भाचे भिकाजीपंत फाटक यांच्याशीं झालें. ते नागपूरला शेतकी कॉलेजांत लेक्चरर होतें. लग्न झाल्यावर उन्हाळा म्हणून बाबाला घेऊन आम्ही लोणावळचास राहिलों. तेथें आमच्या ओळींतच काशिनाथपंत मित्र राहात होते. तेथें त्यांची प्रत्यक्ष ओळख झाली. तेथें असतांना रमाबाईसाहेब रानडयांकडे बरेंच वेळां जाणें येणें झालें. तेथें मीं 'स्त्रियांच्या स्वर्गाचें' बरेचसें भाषांतर केलें.

परत भुसावळेला आलों. तेथें बडोद्याचें सावकार फडके यांची मोठी चाळ आहे. ती आमच्या घराजवळ होती. तेथें त्यांची भावजय माई फडके ह्या दोन मुलं नाना आणि बाबू घेऊन शिक्षणाकरितां राहात होत्या. त्यांची माझी ओळख झाली व त्याचें रूपांतर इतकें दृढ प्रेमांत झाले कीं, स्नेह जाऊन त्याला नात्याचें स्वरूप आलें. स्वतःच्या आधीं चार महिने माई गेल्या तेव्हां स्वतः कळवळून म्हणाले, 'तुझी एक वहीण गेली नाहीं कां ?' तें नातें इतकें दृढमूल होतें कीं अजून त्यांची मुलं, सुना मला माईची वहीण मानतात. मुंबईस गेलें कीं डॉ. बाबुराव फडके ह्यांना भेटलें नाहीं तर चैन पडत नाहीं. माझ्या मुंबईस राहणाऱ्या मुलांना दुखणें बाणें वगैरे आल्यास बाबुराव म्हणजे एक मोठा आधार वाटतो त्यांची पत्नी मनुताई सुद्धा तशी प्रेमळ आहे. नाना फडके व यमुताईसुद्धां आत्यंतिक आस्थेनें व प्रेमानें वागतात. असो. माईंची ओळख वाढत गेली. विणकाम, भरत-काम, गप्पा ह्यांत वेळ मजेंत जाऊं लागला. 'स्त्रियांचा स्वर्ग' छापायला गेलें होतें. त्याला वासुदेवरावजी आपटे 'आनंदाचे' संपादक ह्यांनीं प्रस्तावना लिहिली होती. त्याकाळीं दिल्लीदरबारचा जो सार्वत्रिक समारंभ झाला तो तेथेंहि झाला. त्यावेळेस आम्ही तेथें एक लहान फॅन्सी फेअर केलें. त्यांत पुष्कळ बायकांनीं भाग घेतला. विशेष करून माझी मैत्रीण हिराबाई अरदेसर ह्या पारशी भगिनीच्या मदतीमुळें पारशी महिलांनीं सुंदर सुंदर वस्तु ठेवल्या होत्या. माई व आमच्या आत्याबाई यांनीं खूप विणलें होतें. त्याचें जें लहानसें उत्पन्न आलें तें आम्ही दुष्काळी कामावर मदत म्हणून पाठविलें. तेथें असतांना

बायका एकत्र जमवायसाठीं शुक्रवार सुरू केले. दर शुक्रवारीं एकेकीच्या घरीं जमायचें. माईंच्याबरोबर मग त्यांच्या जावा ताई, काकू ह्यांचीही दाट मैत्री झाली.'गृहिणी भूषणा'ची पहिली आवृत्ति संपली.आतां ह्यांनाही वाटायला लागलें कीं मी बरें लिहिते. त्यांनीं 'स्त्रियांचा स्वर्ग' तर छापायला दिलाच पण 'गृहिणी भूषण'ची दुसरी दोन हजारांची आवृत्ति काढायला दिली आमच्या एका स्नेह्यानें हें पुस्तक बुककमेटीकडे पाठवलें व अर्ज लिहून सहीला माझ्याकडे आला. तेथें तें मंजूर झालें.

एकदां तात्यासाहेब कोल्हटकर भुसावळेस आले. त्यांची आमची ओळख पुण्यास झालेली होतीच. ते दुपारीं आमच्या घरीं आले: गप्पा गोष्टी करून परत गेले. दुसरें दिवशीं माई आल्या. त्या म्हणाल्या, ' काल माझे भाऊ आले होते म्हणून मी आलें नाहीं ! ' मी म्हटलें, ' माझ्याकडे कोल्हटकर आले होते म्हणून मी आलें नाहीं.' त्या म्हणाल्या 'अहो, तेच माझे भाऊ!' तेव्हां कळलें कीं ह्या कोल्हटकरांची बहीण. तसेंच एकदां उमरावतीची माई आली ती म्हणाली, ' मला फडक्यांकडे जायचें आहे. त्या आमच्या जाऊबाईंची बहीण.' तेव्हां कळलें कीं अनुताई, पंडितराव जोशांची बायको ही माईंचीच बहीण.

येथें असतांना अकोल्याला साहित्यसंमेलन ठरलें. तेथें माईंचे भाऊ व बहीण होती. त्या म्हणाल्या, ' ताई, संमेलन जवळ आहे. माझ्या बहिणीचें घर उतरायला आहे. येता कां ? ' वासुदेवराव आपट्यांचं पत्र आलं. ' संमेलन जवळ आहे. जरूर या. पण बोलायची तयारी करून या. आजपर्यंत लेखक म्हणून माहीत आहांत, आतां बोलायला लागा. ' वन्सं होत्या. त्यांच्यावर मुलं सोडून मी गेलें. जायच्या आदल्या दिवशीं देवासचे कुंटे आले होते. ते रात्रीं राहून सकाळीं गेले. आम्ही दुपारीं निघालों. स्वत: फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट व समरी पॉवर असलेले असें असल्यामुळें आमची बदली नेहमीं जिल्ह्यापासून दूर असणाऱ्या तालुक्यांना असे. अर्थात् मला कधींच सभा पहायला मिळाली नव्हती. वर्तमानपत्रांतून त्या वाचलेल्या असत. त्यावेळेस जिल्ह्यालासुद्धां सभा व्याख्यानें फारशीं होत नव्हतीं. तीं खेड्यांत तालुक्यांना कोठून पोंचणार ?

अकोल्यास गेल्यावर सभेला गेलों. तेथें गेल्यावर आपटे माझ्याकडे आले व म्हणाले, 'आतां उद्यां तुम्ही बोलणार ना ? तयारी ठेवा.' मी विचारांत पडलें. घरीं आल्यावर माई म्हणाल्या. 'बोला हो '! मी दोन चार चतकोर खरडले पण सभेच्या तेथें जाऊन बघते तर ही गर्दी. उंच व्यासपीठावर अध्यक्ष वगैरे. उजव्या हाताला बायका, मागें स्वयंसेवक, तरी मला वाटें, बसलें आहे तेथेंच उठून बोलायचें. बायका आहेतच. इतक्यांत आपटे येऊन म्हणाले, 'आलां आहांत ना ? आतां तुमचं नांव येईल. मग वर येऊन बोला .' 'बापरे !' मी घाबरलें. म्हटलं, 'वर जाऊन बोलणं मला होणार नाहीं. मला कोणीतरी बरोबर द्या. मी आपली घरीं जाते !' माई जाऊं देईनात. इतक्यांत अध्यक्षांनीं माझें नांव घेतलें. स्वयंसेवकांनीं वाट केली. बायकांनीं ढकललें. मी स्टेजपर्यंत गेलें, वर चढवेना. हात टेकून चढलें. तों लोकांनीं टाळ्यांचा गजर केला. मी वाचलें होते कीं, लोक टाळ्या वाजवून वक्त्याला खालीं बसवतात. मला वाटलें आपण परत जावें. पण इतक्यांत सर मोरोपंत जोशी उठले व म्हणाले, 'थांबा त्या नव्या आहेत. त्यांना घाबरवूं नका. भाषण होऊं दे. मग वाजवा टाळ्या.' कागद काढले. पण उलट्या प्रकाशामुळें दिसेना. मग टेबल घट्ट धरलें. व जें मनांत आलं तें पांच मिनिटं बोलले. लोकांनीं पुन्हा अफाट टाळ्या वाजवून कौतुक केलें. बायकांत आल्यावर बायकांनीं केलेंच केलें. माईंना काय आनंद झाला. मग दुपारीं डॉ. कोल्हटकरांकडे जेवायला गेलों. तेथें ज्यांनीं त्यांनीं माईंना विचारलें, 'नेहमीं बोलतात का ह्या ?' त्या म्हणाल्या, 'नाही हें पहिलेंच होतें.' सगळीं म्हणालीं, 'मग तर छानच झालें.' सर मोरोपंत येऊन भेटून गेले. आपट्यांना खूप आनंद झाला. ते म्हणाले, 'ह्याचा अर्थ तयारी होती, फक्त वाट पाहिजे होती.' असो मग आम्ही भुसावळेला आलों. घरीं आल्यावर स्वत: म्हणाले, 'काय सभा जिंकली ?' मी म्हटलं, 'मी काय सभा जिंकणार. तेथें जिंकायचें होतें काय ? छान झाली का विचारा !' तेव्हां म्हणाले, 'मला येथे बातमी लागली तुम्ही सभा जिंकली.' मग त्यांनीं गंमत सांगितली. आम्ही यायच्या आदल्या दिवशीं कुंटे आले व रात्रीं राहून सकाळीं गेले. तेव्हां स्वत:

सहज विचारलें, ‘ सभा कशी काय झाली ?’ ते म्हणाले, थांबा सांगतो... त्यांनीं त्यांच्या हिंदी नोकराला हांक मारून सांगितलें कीं, साहेबांना सभा कशी झाली तें सांग.तो म्हणाला,‘बहुत बडी.आदमी बहुत थे.बाईयाँ बहुत थी। बडे बडे आदमी बोलकर बैठे। फिर एक देवी आयी और सबकू जित गई’ स्वतः म्हणाले कीं,मला अर्थ कळेना.मग त्यांनीं सांगितलें,‘छान झाली.त्यांत गिरिजाबाईचें भाषण थोडक्यांत पण सुंदर झालं ’ मी बोलेन अशी ह्यांची कल्पनाच नव्हती. पुढें आम्ही मुंबईला गेलों. तेव्हां मी ठाणें वगैरे ठिकाणीं नातलगांकडे गेलें. तर तेथें मला माझ्या माहेरच्या नातलगांनीं बोलून बोलून घेतलें. ‘हें तूं काय आरंभलें आहेस ? ते गरीब सज्जन म्हणून बोलत नाहींत. लिहिते म्हणतां म्हणतां बुकं छापूं लागलीस. आतां लेक्चरं देऊं लागलीस. त्यांना काय वाटत असेल ? त्यांच्या पोझीशनचा विचार कर.’ वगैरे वगैरे. मी पुढें त्यांच्याकडे जाणें सोडून दिलें.

भुसावळला असतांना माई जोशी येऊन गेली. मी एकदां नंदुरबारहून व मग भुसावळहून तिच्याकडे जाऊन दोन दोन दिवस राहून आले होते. तेव्हाच जोशी.मंडळींची माझी ओळख झाली होती. मग तेथें आम्ही भाऊची मुंज खूप थाटांत केली. कारण ह्या मुंजींत वैशिष्टय होतें. देवानें दिलेलें यश होतें. पुण्याची सगळीं मंडळी तर आलीच होती. पण कमलाबाई देशपांडे तिचे यजमान म्हणजे आमचे नवे जांवई बावुराव देशपांडे ही मंडळीहि आलीं होतीं. शिवाय आम्ही जेवढी गांवं हिंडलों, जेवढचा गावांना भाऊ ठाऊक होता तीं सर्व मंडळी बोलावलीं होतीं. मुंज झोकांत झाली. पुढें बघतां बघतां माईचा दिवाळसण आला. तोहि थाटांत झाला. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें माईकडे अहेर घेऊन मी, वन्स, मुलं, बरोबर खांवेटे वहिनी व कारकून अशीं नागपुरास गेलों. स्टेशनावर आमच्या मावस सासूबाईचें यजमान आले होते. त्यांना तेथें कांहीं नमस्कार करावयाचा नाहीं. घरीं आल्यावर सासूबाईना केला. त्यांनीं मोठचा कौतुकानं यजमानांना सांगितलें, ‘सूनबाईनें नमस्कार केला ! ’ तेव्हां ते म्हणाले, ‘ कसला इंग्रजी कां ?’ त्या भाबडेपणानें म्हणाल्या,‘म्हणजे काय वांकून केलान्.’ तेथें दोन दिवस राहून

भुसावळेस आलों, पुढें तेथें प्लेग झाला तेव्हां आमचें बोदवडला जायचें ठरलें. तेवढ्यांत स्वत: एक दिवस जळगांवास गेले.

खांबेट्यांचें ताईच्याकडून नातें, स्वत: स्नेही, व आमचें त्यांचें संघटन हळूहळू वाढत होतें. नंदुरबार, शहादे शिंदखेडें इकडे जातांना जळगांव जंक्शन पुण्या-मुंबईहून आलं म्हणजे अमळनेर गाडीला वेळ असतो. तेव्हां गांवांत जाऊन चहा पाणी करून यायचें. पुढें भुसावळेस आल्यावर संबंध जास्त वाढले. दिवाळींत दादा यायचें. कांहीं असलं म्हणजे आम्ही वहिनींना बोल-वायचं मग त्या चार दिवस राहात. स्वत: जळगांवहून आले तें सांगत आले कीं दादा वहिनी धुळयास गेलीं आहेत. एक निनांवी तार आली कीं त्यांची मुलगी कृष्णाबाई भाजली आहे. तें ऐकल्यावर माझ्या मनांत आलें, 'ह्या वेळेस त्यांच्या जवळ कोण? सुखाचे बहिणभाऊ चैनीपुरते. पण आतां त्यांना मदतीची जरूर आहे!' मी ह्यांना म्हटलें. 'मी जातें!' पण बोद-वडला घर मांडलें नव्हतें. आतेबाई एकट्या कोठें राहणार! मग आतेबाई, दोन्ही मुलं, ब्राह्मण घेऊन गेले. स्टेशनवरच नानासाहेब लिमये भेटले. खांबेट्यांनाच बूड टेकायला मुश्किलीनें जागा मिळालेली तेथें हीं चार माणसें कुठें राहणार? ते म्हणाले, 'वहिनी उगीच आलांत. आतां चट्दिशीं जाऊन या व परत चला.' प्रथम मला जरासं चमत्कारिक वाटलं, पण मग हें असं कां म्हणतात तें लक्षांत आलं मी वरं म्हणून गांवांत गेलें. त्यांच्या अडचणीची मला कल्पना होतीच. मी आधींच टोकेकर जोशी तेथें प्रांत होते त्यांना पत्र लिहून ठेवलें होते. ते ज्या गल्लींत रहात होते तेथें उतरून मग मी खांबेट्यांकडे गेले. कृष्णाबाईला सासूनें जाळून विहिरींत टाकली व मग, स्वप्न पडलं, असं सांगून बाहेर काढून आणली. तिला मग ह्यांनीं आपल्या बिऱ्हाडांत आणली होती. मला पाहून दादा वहिनींना रडायलाच आले. तेथें माणसांची जरूर होतीच. कपडे बदलणें, घाण काढणें, वगैरे कामें असत. कारण ती असहाय होती. पुष्कळशी बेशुद्ध असे, पण जेव्हां शुद्धीवर येई तेव्हां कसं भाजलं वगैरे तळमळून तळमळून शिव्याशाप देत सांगे तो देखावा पाहून मला वाटे झुरळ मारायला सुद्धां आम्ही बायका भितो, त्याच आम्हां बायकांपैकी एक बाई इतके क्रूर कृत्य

करायला कशी तयार झाली ? दोन दिवसांनीं स्वत: आले तेव्हां तर दादा ह्यांना मिठी मारून ओक्साबोक्शीं रडले. चवथे दिवशीं ती गेलीच. वहिनी काय बिचाऱ्या वेडयाच झाल्या. मग तिचें सगळें मलाच करावें लागलें. मग संध्याकाळीं निघणार तर दादा म्हणाले, 'परवां एकदम जाऊं!' जोशीणबाईचा व माझा तसा स्नेह नव्हता. ओळख होती पण त्यांनीं फार चांगलं वागवलं. जरासुद्धां संकोच झाला नाहीं. मग भुसावळेस परत येऊन बोदवडला गेलों व तेथून हवा चांगली झाल्यावर भुसावळेस परत आलों.

एका रविवारीं स्वत: कलेक्टरसाहेबांना भेटायला जळगांवास आले तेव्हां सिम्कॉक्स कलेक्टर होते. ते म्हणाले, 'चल, माझ्याबरोबर गांवांत राऊंडला, फिरत फिरत बोलू.' मग त्यांनीं कमेटी बागेसमोरची शेतं दाखवली आणि म्हणाले,' हीं सर्व जमीन विकत घ्यायची आहे. कारण जळगांव आतां जिल्हा झाला. तेव्हां स्टेशनाच्या रस्त्याला चांगली घरं नि सडक असें हवें म्हणून तीं शेतं काढून जे कोणी पुढें बाग करून बंगला बांधतील अशांना जागा देईन.' तेव्हा स्वत: म्हणाले, 'मग मला देतां कां ? मी बांधीन बंगला.' तो म्हणाला, 'तुझी सर्व्हिस अजून पुष्कळ आहे. आतां घर बांधून काय करणार ?' स्वत: सांगितलं, 'मी बसेल तेवढें पेन्शन घेणार आहे कारण सरकार मला प्रमोशन देत नाहीं. सरकारी राजकारण लोकांना कळत नाहीं. तेव्हां लोकांना वाटतं कीं ह्यांचे काम वाईट कीं हे पैसे खातात ? कारण काय तर खालचे लोक वर चालले.' तो हंसला व त्यानें १००×१०० चे दोन प्लॉट पाडून एक आम्हाला व दुसरा सावदेकर देशमुखांना दिला व लगेच ह्यांना जळगांवास एक महिना डेप्युटी कलेक्टरची बदली जागा मिळाली. जमीन हातांत पडली. आमचे एक स्नेही घर बांधून देतों म्हणाले. त्यावेळेस बाबाला घेऊन उन्हाळा फार म्हणून मी पुण्यास गेलें होतें. माझ्या मागें त्यावेळेस येथें चीफ ऑफिसर असणारे चांदोरकर ह्यांचें थोडेसे स्नेही होते. त्यांनीं थोडी भीड घातली कीं तुमच्यांतली थोडी जागा मला द्या. माझी बायको अपंग आहे. तरी माझ्या मुलांवर बाईसाहेबांचे लक्ष राहील. ह्यांना भीड पडली व ह्यांनीं जागा दिली. मात्र तोंडीं करार असा कीं

त्यांना घर नको असेल तेव्हां प्रथम आम्हाला विचारून मग त्यांनीं विकावें. पण बोल्या पाळल्या तर मित्र कसले ? त्यांनीं घर पुढें परस्पर विकलें. तसेंच घर बांधतांना खिडक्या ठेवल्या. बोली अशी होती कीं आमच्या बाजूस खिडक्या व मोऱ्या ठेवायच्या नाहींत. त्या ठेवल्या गेल्या. त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, 'खालच्या खोल्यांच्या खिडक्या बंद करतो. व मी जातांना वरच्याहि बंद करीन.' खालीं खिडक्यांना फळ्या मारल्या तेव्हां मी ह्यांना म्हटलें, 'तुम्ही विटा घाला.' हे म्हणाले, 'अग सभ्य माणसावर एवढासुद्धा कां विश्वास ठेवूं नये ?' शेवटीं सर्वच गेलें. असो.

आम्ही भुसावळेस होतों, घराचं काम सुरू झालं होतं. दादांचं संघटन वाढलं होतं. त्यांनीं माझ्यावर सख्या बहिणीप्रमाणें प्रेम केलें तें शेवटपर्यंत. त्यांच्या प्रेमाला मोल नसे. माझ्या कोणत्याहि चांगल्या कृतीचें कौतुक करायला ते तयार असत. भुसावळेस असतांनाच एक दिवस डॉक्टर सांगत आले कीं 'तुमच्या बाजूलाच प्लेगची केस झाली आहे. तेव्हां ह्यांना प्रथम हलवा.' कारण माझे दिवस भरत आले होते. मग ताबडतोब मनुष्य जळगांवास आठवल्यांकडे पाठवला. बैलगाडीभरून सामान पाठवलें व दुसरे दिवशा आम्ही आलों आणि दलालांच्या घरांत राहिलों.तेथून नवें घर जवळ होतें तें संध्याकाळीं पाहिलें. फक्त पाया भरून झाला होता. चवथें दिवशीं मी प्रसूत झालें ती आमच्या हिशोबानें आठ दिवस आधींच. पण त्याला एक कारण घडलें. तात्यासाहेबांचे जांवई कमलाबाई देशपांडे यांचे यजमान बाबुराव प्लेगानें अकस्मात निवर्तले. आमच्या कुटुंबावर फार मोठा घाला पडला. साहजिकच त्यामुळें मानसिक त्रास फार झाला. मी २० मार्चला फाल्गुन शुद्ध चतुर्दशीला रात्रीं प्रसूत होऊन मुलगा झाला. त्याचें नांव मनोहर. बारसे करावयाचेंच नव्हतें नुसता पाळण्यांत घातला व स्वत: डेप्युटी कलेक्टर म्हणून नाशकास गेले. त्या घरांत आमचा सव्वा महिना मजेंत गेला. दलालांच्या कृष्णाताई व दोन बिऱ्हाडकरणी अगदीं जुन्या वळणाच्या बायका. पण मोठ्या प्रेमळ व गोड होत्या. मनोहरला सव्वा महिना झाल्यावर आम्ही भुसावळेस जाऊन सामान आवरून नाशकास गेलों.

◆◆◆◆

90392
ग्रा. क्र.

# प्रांत झाल्यानंतर : ५

नाशकास असतांना ह्यांचा मुक्काम देवळालीच्या बंगल्यांत होता. म्हणून मीहि गेलें होतें. ह्यांचे स्नेही रावजी उपासनीहि आले होते. रात्रीं जेवतांना साहित्याच्या गप्पा मारायचा त्यांना खूप नाद होता. बोलतां बोलतां ते म्हणाले, 'बाकी कांहीं लिहिलं नाहीं तरी मी एक नाटक लिहीन.'

मी म्हटलें, ' मी सुद्धां लिहीन. '

ते म्हणाले, ' बरं, आधीं कोण लिहितें तें पाहूं. '

आम्ही रात्रीं निजलों. पण पहाटे जागीं झालें तों माझ्या डोक्यांत नाटकाचे विचार घोळूं लागले. चहाच्या वेळेपर्यंत साधारण आराखडा ठरला. गाडी ह्या स्टेशनावरून सोडून अमक्या ठिकाणीं थांबवायची एवढें ठरविलें. ब्राह्मणानें चहा झाल्याचें सांगितलें. तेव्हां घाईघाईनें चूळ भरून आलें. स्वत: म्हणाले, ' आज इतका उशीर कसा झाला तुम्हाला उठायला ! ' कारण माझें लवकर उठणें जाहीर होतें. मी म्हटलें, ' जागी होतें पण नाटक बसवत होतें. तें बसवून झाल्यावर उठलें. ' भाऊजी म्हणाले, ' मग काय जमलें का ? ' मी म्हटलें, ' म्हणजे काय ! जमलंच पाहिजे.' ते म्हणाले, ' बराय तुम्ही आधीं नाटक लिहिलेंत तर आम्ही तुम्हाला बक्षीस देऊं.' स्वत: जरासे रागावले व म्हणाले, ' कसलेल्या लेखकांना सुद्धां किती वेळ लागतो आणि तुम्ही इतक्यांत बसवलंत देखील ?'

मी म्हटलें, 'ते मोठे असतात. त्यांना सुंदर लिहायचं असतं. माझं काय लुटूपुटूची भातुकली.' मग स्वत: गेले. उपासनी म्हणाले, ' बरं वहिनी तुमचा प्लॉट सांगा.' मी तो सांगितला तेव्हां म्हणाले, ' परवां बालकरामाला ताड् कीं फाड् उत्तर देणाऱ्या कुसुमबद्दल पेपरमध्यें आलं होतं ना ? हयांनीं जास्तच येईल. पण हरकत नाहीं. तुम्ही लिहायला लागा.' दुसरे दिवशीं ते धुळयास गेले व जातांना, ' तुमचें नाटक, लिहून झालें

कीं वाचायला येतों,' असें सांगून गेलें. आम्ही नाशकास आलों. मला बाळंतपणाची सुटी होती. घरांत नोकरांवर बघायला सासुबाई, वन्सं होत्या. मी नाटक लिहायला बसलें. एकसारखं लिहून मी तें आठ दिवसांत पुरें केलें. तेव्हां तात्यासाहेब कोल्हटकरांना ह्यांनीं, पुण्याहून जातांना नाशकास उतरा असं लिहिलं होतं. ते आलें तेव्हां त्यांना मी तें दिलें.लहान वय आणि उत्सुकता. शिवाय घर सगळें बरच होतें. हळूच दोनदां डोकावले. ते म्हणाले, मी पुरतं वाचतो मग सांगेन. पण त्यांच्या चेहेऱ्यावरून मला त्यांना पटलं आहे असं वाटेनां. मग मीं रात्रीं जेवणं झाल्यावर म्हटलं, ' माझं अक्षर आपल्याला लागत नसेल तर मीच वाचून दाखवूं कां ?'

मग मी दोन दिवस थोडं थोडं वाचून दाखवलं. सासूबाईंना कांहीं तरी वाचते आहे असें वाटल्यामुळें त्या दाराआड येऊन उभ्या राहिल्या व ऐकून खूष झाल्या. मग तात्यासाहेब म्हणाले, ' ताईचें म्हणणें बरोबर ठरलें. त्यांनीं वाचून दाखवल्यावर मी रंगलों.' दुसरें दिवशीं ते गेले. ते जळगांवास उतरले. 'महाराष्ट्र' कंपनींतून फुटून 'भारत'कंपनी काढलेले टिपणीस तेथें होते.त्यांनीं कोल्हटकरांना बोलावलें होतें.टिपणीसांनीं त्यांच्याजवळ एक नवें नाटक मागितलें. तेव्हां ते म्हणाले, ' मी लिहून देई तों वेळ लागेल. पण एका बाईनें लिहिलेलें एक नाटक तयार आहे. कल्पना नवी आहे. स्त्री लेखिकेचें नाटक आहे. पहिली स्त्री नाटककार पुढें आणल्याचें श्रेय घ्या. बघा! ' त्यांचे विचार करत कांहीं दिवस कदाचित् गेले असते. पण योगायोगानें आम्ही प्रांत म्हणून जळगांवला बदलून आलों आणि आमचं घर तयार होत आलं होतं. त्यांतच राहिलों.

टिपणीस भेटले. त्यांनीं नाटक घेतलं,छान बसवलं. खानदेशांतील माझ्या नांवाचा फायदा त्यांना मिळाला. सगळे सरकारी अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, ह्यांनीं पूर्ण भरलेल्या थिएटरांत 'पुरुषांचे बंड' रंगभूमीवर आलें. दुसऱ्या खेळाला आमचे उपासनी भाऊजी धुळ्यांतील पुढारी मंडळी घेऊन आले व त्यांनीं मला पहिली स्त्री नाटककार म्हणून सुवर्णपदक दिलं. आमच्या सासूबाई, वन्सं ह्यांना खूप आनंद झाला. स्वतः नुसतं हसले. पुष्कळांनीं हें नाटक 'बायकांच्या बंडाला' जबाब आहे म्हणून ठरवलें

होतें. पण नाटक अर्ध लिहून होईपर्यंत 'बायकांच्या बंडाचें' मला स्मरणच नव्हतें. नवें घर, नवी बढती, नवी नाटककार म्हणून कीर्ति अशी सगळी. नव्याची नवलाई ह्यांत आम्ही सहा महिने मोठ्या मजेंत काढले. तात्यासाहेब कोल्हटकरांना खूप आनंद झाला. गांवांत खांबेटे पुन्हां जवळ झाले. त्यांचा स्नेह व प्रेम वाढूं लागलें. पुण्याहून ताई व तात्या मुलांसुद्धां दिवाळीला आलीं. घर पाहिलं. त्यावेळेस गांवांत येणारे पुष्कळ लोक कारणा-कारणानें माझ्याकडे यायचे. हेतु हा कीं खरंच बाई लेखक आहे का पुरुष लिहून देतात याचा शोध घ्यायचा. मनोहर जाणता झाला. नाटकाची नवलाई, घराची नवलाई संपली. नंतर मी 'वरपरीक्षा' नाटक लिहायला घेतलें. तऱ्हेतऱ्हेचे कपडे मुलांना शिवणें, विणणें हे कारभार मधुन मधुन सुरू होतेच. पण स्वस्थतेचा वेळ लिहिण्यांत जाई. 'वरपरीक्षा' नाटक पुरें करून आम्ही दोघं खामगांवला गेलों. तेथें चिंतामणराव कोल्हटकर आलेच होते. त्यांनींच तें नाटक तात्यासाहेब कोल्हटकरांना वाचून दाखवलें. त्यांना तें आवडलें व तसा त्यांनीं 'पुरुषाच्या बंडा'च्या प्रस्तावनेंत उल्लेखहि केला आहे. पण पुढें आमची बदली सोलापूरला झाली.

आम्ही सोलापूरला जायला निघालों. भाऊ, शांता, बाबा, तान्हा मनोहर, आतेबाई व आम्ही दोघं इतकीं होतों. तेव्हां असं ठरलं कीं घर मांडायच्या आधीं असंच विजापूरला जावं, गोल घुमट पहावा व मग सोलापूरला यावें. म्हणून तशीच पुढें गेलों. रस्त्यांत होटगीला गाडी बदलते तेथें गाडींत साठे व जोशी हें डेप्युटी कलेक्टरद्वय भेटलें. आमचे जोशांकडेच उतरायचें ठरलें होतें. धुळ्यास खांबेटच्यांच्या मुलीच्या वेळेस त्यांच्याकडेच उतरलें होतें. त्याच्यावर आतां गांठी पडल्या. त्यांनीं प्रेमानें आमचें स्वागत केलें. तेथें गेल्यावर सौ. द्वारकाताई साठे, साठे डे. क. च्या पत्नी माधवराव जोगळेकरांची मुलगी यांची चिठी आली कीं, 'मी तुमच्या आईची मैत्रीण आहे. गाडी पाठवली आहे तरी यावें.' मला कांहीं ह्या साठे कोण तें लक्षांत येईना. मी गेलें. पहातें तर द्वारका मावशी. तिचं सासरचं आडनांव मला ठाऊक नव्हतं. पायानं पंगु झालेली पण प्रेम आणि अगत्य ह्याची मूर्तीच. ह्या जुन्या माणसांचं प्रेम

आठवलं कीं वाटतं, ' देवा ह्यांच्याजवळ हा एवढा मोठा प्रेमाचा साठा तूं कुठून दिला होतास ? अन् आतांच कां कंजुष झालास ? ' तिनें मला आपल्याजवळ गादीवर बसवून घेतलं अन् म्हणाली, ' योगायोग म्हणून भेटलीस नाहींतर कळलें नसतें.' साठे गाडींत भेटले होते त्यांच्या कानांवर मी कोणाचीं कोण हें होतं. त्यांनीं घरीं आल्यावर बायकोला सांगितलं, ' तूं म्हणत होतीस ती तुझी भाची आली आहे. केळकर आज येथें आले आहेत. ' तेव्हां तिला कळलं. मग तिनें गाडी पाठवली. हें सांगून पुन्हा पुन्हा आईच्या व तिच्या जुन्या आठवणी सांगत होती. ' अग तेव्हां बिस्किटं करून पहायची, पाव करून पहायचे हें नवें होतें. तर ताईनीं ( माझी आजी ) पाव केला म्हणजे निरोप येई, द्वारकीला म्हणावें येऊन जा. म्हणजे मुंबईस लांब लांब घरं होतं; तरी जायचं. काय ते दिवस! ' असं खूप बोलली. बोटं वांकडी झालीं होतीं तरी तिन फुलांची वेणी केली होती ती माझ्या केसांत घातलीन्. मग आम्हीं सोलापूरला होतों तोंपर्यंत खाऊ व तिळगूळ न चुकतां यायचा. एकदां दोनदां साठे आले होते त्यांच्याबरोबर खाऊ आला. एकदां ती स्वत: आली होती.

मग विजापूर पाहून दुसरे दिवशीं सोलापूरला आलों. सोलापुरास आम्ही पहिला स्वामींचा बंगला–आतां किर्लोस्करांचा–घेतला होता. भाऊ शांताबाईला शाळेंत घातलं. माई सासरींच होती. बाबा लहान पण निजून उठल्यावर ' काडू पाणी ' मिळालें कीं चालला खेळायला माळ्याच्या पोरांत. वन्सं आपल्या उशाशीं लाडवाची वाटी व पाण्याचें भांडे घेऊनच दुपारच्या पडायच्या. बाबा उठला रे उठला कीं, ' काडू पाणी ' मागायचा म्हणून. तेथें मी किरकोळ लेख पुष्कळ लिहिले. पण फेअर कॉपी करायची कल्पना नव्हती. वेळहि नव्हता. मी गृहिणी होतें. मुलं लहान होती. तरी त्यावेळेस नवयुग, लोकमित्र, अरविंद, वनिता समाज का कायसें एकाचें नांव होतें, ह्या सर्व अंकांना लेखाची मागणी असे. कारण त्यावेळेस माझ्याशिवाय कोणीच स्त्री लेखिका नव्हती. रमाबाई-साहेब रानड्यांनीं 'आठवणी'शिवाय फारसं लिखाण केलंच नाहीं. काशीबाई कानिटकरांनीं आरंभीं बरंच लिहिलं पण पुढें बंदच केलं होतं.

हेर्लेकरांनीं थोडंसंच लिहून बंद केलं. तेव्हां मी लिही पण अंक आला कीं कोणी तरी वाचायला नेई. म्हणून माझ्याजवळ शिल्लक कांहींच नाहीं. प्रपंच चालूच होता. माईची मंगळागौर झाली. तात्या गोखले बायकोसह येऊन ४–८ दिवस राहून गेला. कोणी कोणी पाहुणे मंडळी येत होतीच. सासूबाई आल्या त्या कांहीं महिने होत्या. मग यशोदाबाई भट आल्या त्या थोडे दिवस होत्या. मग त्या पंढरपूरला मुन्सफांकडे जायल्या निघाल्या. आम्ही दोघंहि गेलों. एक दिवस पंढरपूर करून दुसरे दिवशीं परत निघालों. त्या पुढें गेल्या. आम्ही मोडलिब स्टेशनावर उतरलों. ती ह्यांची जन्मभूमि. तो मिरजकरांचा तालुका. तेथें मामंजी मामलेदार होते. ही मंडळी ज्या घरांत रहात होती ते घरमालकच स्टेशनावर न्यायला आले होते. संध्याकाळपर्यन्त राहून संध्याकाळीं निघालों. रात्रीं सोलापुरास परत आलों.

सोलापुरांत थोडीशी बायकी चळवळ होती. बोलावणें आलें तर अध्यक्ष म्हणून केव्हां केव्हां जात असे. मग आम्ही पुण्यास आलों. तों तेथें प्रांतिक महिला परिषदेची तयारी चालली. रमाबाईसाहेबांनीं श्रीमती कृष्णाबाई ठाकुर यांना माझ्याकडे पाठवलें व एका ठरावावर बोलायला सांगितलें. पुण्यास व त्यांतून एवढ्या मोठ्या बायकांच्या सभेंत मी प्रथमच बोललें. रमाबाईसाहेबांना खूप आनंद झाला. कोणी ह्या कोण म्हणून विचारलें कीं त्यांनीं म्हणावें, 'आमच्या केळकरीणबाई.' तेथून सोलापुरास परत आलों. तेथें कुसुमचा जन्म ज्येष्ठांत ता. २१-६–१९१५ ला झाला. माई आली होती. तेथून आमची बदली पुन्हां जळगांवास झाली. पंधरा दिवसांची कुसुम घेऊन आम्ही जळगांवास आलों.

आम्हीं परत आल्यावर सर्वांना फार आनंद झाला. मग येथें माईची डोहाळ जेवणें वगैरे झालीं व ती प्रसूत होऊन मुलगा झाला. आम्हाला नातू झाला. सासूबाईनासुद्धां आनंद झाला. बारसें थाटांत झालें. तीन महिने बाळंतपण होऊन तिच्या सासुबाई येऊन बाळंतविडा करून तिला घेऊन गेल्या. जेवण सोडवायला आम्हाला बोलावलें. पुढें आम्ही जाऊन चार दिवस राहून आलों. अशा कोणच्याही समारंभांत खांबेटे वहिनी आमच्यांत



२४३/० ५/१५

असायच्या. त्यांच्याशिवाय आम्हाला चैन पडत नसे. तात्या-ताई आलीं कीं ताई तिकडे रहायला जात. त्यांची मुलें त्यांना मामा मामी म्हणत तसंच आमचीहि मुलं म्हणत-नोकरहि म्हणत. तात्या-ताई, परत जात पण आमचें जाणें येणें चालूंच असे. त्यामुळें लोक त्यांना माझे भाऊ म्हणूं लागले. सोलापूरला असतांनाच लढाई सुरू होऊन विणकामांना सुरुवात झाली होती. जळगांवला आल्यावर कलेक्टरच्या बायकोकडून निरोप आला कीं सैन्यांतील शिपायांसाठीं शिवणं विणणं ह्याला मदत करा. मी पुष्कळ गळपट्टे करून व करवून दिले.

आम्ही नवा बंगला बांधला तेव्हां प्रथम ह्यांनीं एक गोष्ट केली. ती म्हणजे कागदोपत्री विभक्तीकरण. कारण त्यावेळेस राजकारण पुन्हा सुरू झालं होतं. वांटणी करावयास होतें काय? वडिलार्जित थोड्या कर्जाशिवाय कांहीं शिल्लक नव्हतें. तें नोकरीच्या सुरुवातीसच फेडलें. मग पुण्यास एक घर घेतलें होतें. तें तात्यांच्या नांवानें केलें. तोंपर्यंत आमच्या येथें अशी चाल होती कीं, कोणचीहि गोष्ट एक करायची नाहीं. पितळेच्या वाटी-पासून तों मोठ्या गोष्टीपर्यंत. पांघरायचा शेला घ्या कीं पांढरें जरीचें पातळ घ्या. सारखं असायचं. कारण ह्यांचे भाऊ म्हणून जितकें प्रेम तात्यांच्यावर होतें तितकेंच दुर्गावर होतें. ते दुर्गा म्हणत. पुढें ताई म्हणूं लागले. सुरुवातीला तात्यांना केसरीचा पगार फारच थोडा होता. प्रपंचा-साठीं त्यांना वर्षाकांठीं एखादें पुस्तक लिहावें लागे. पुढें त्यांचा पगारहि वाढला. लिखाण पुष्कळ झालं आणि सरस्वतीबरोबर लक्ष्मीनंहि घरांत वास्तव्य केलं.

राजकारणाकरितां आम्ही विभक्त झालों तें राजकारण पुढें पुढें फारच रंगलं. आमच्या येथें कार्याला तात्या यायचे म्हणजे सरकारांत आधीं कळवावें लागे. तरीसुद्धां आमच्या बंगल्याभोंवतीं गुप्त पोलीस असतच. ते हंसून म्हणायचें, 'वहिनी, मी असेपर्यंत चोरीची भीति नाहीं. आपलं आयतं काम होतं!' याच कारणामुळें आम्ही असू त्या भागांत त्यांचें व्याख्यान वगैरे होत नसे. किंवा कोणी त्यांना बोलावलं तर ते जात नसत. आम्ही धुळ्याला गेल्यावर मग जळगांवला त्यांचीं व्याख्यानें व्हायला लागलीं.

आतां मी येथें बऱ्याच बायका जमवायचा उद्योग सुरू केला. दादांना (खांबेटयांना) तो आवडला. पण ते म्हणत, 'येथें कांहीं व्हायचें नाहीं.' एकदां त्यांनीं आणि डॉक्टर मर्चंटनीं एक सभा बोलावली होती. बायकां-करतां काय करतां येईल ह्याचा विचार करायकरतां. पण दोघंच एक तास बसून गेलें. पण त्यांनीं मला मदत करावयाचें कबूल केलें. कारण दादा–वहिनींचें माझ्यावर तसेंच प्रेम होतें. वहिनी आमच्या घरीं आल्या कीं इतक्या रमायच्या कीं ' वहिनी, संध्याकाळ झाली ' असं म्हणून परत पाठवावं लागे. दादांचा लोभ तर विचारूंच नका मोसमच्या पहिल्या शेंगा ताईला, तशीच मळयांतल्या संत्र्या–मोसंब्यापासून भोपळा–कोहाळयापर्यंत सर्व वानगी ताईला यायची. दिवाळीच्या पाडव्याला आम्ही सर्व त्यांच्याकडे जेवायला जायचीं व भाऊबीजेला तीं यायचीं. शिवाय कांहीं मित्र ओवाळून घ्यायला नेमानें येत. त्यांना मग हे जेवायलाच बोलवू लागले. भाऊबीजेचा सण आमच्या येथें मोठया प्रमाणांत होई. रात्रीं घरच्या भाऊ बहिणींची ओवाळणी. एकंदरींत त्यावेळची दिवाळीच मोठया थाटाची होई. त्यावेळच्या दिवाळीची आठवण झाली म्हणजे अजूनहि मन भूतकाळांतल्या आनंदांत रमतें. दिवाळी आली म्हटलं कीं, मुलं 'दिवाळी घरीं कधीं येणार' असं विचारायला सुरुवात करीत. मग कोपऱ्यावर आली, सडकेवर आली, फाटकाजवळ आली असें सांगत रहायचें. मग एकदांची दिवाळी यायची मग ती फटाक्यांची खरेदी, वांटण्या, पहांटे उठणीं, त्या पणत्या, त्या लावायची नोकरांची धांवपळ, मुलींची रांगोळयांची गर्दी, ते पहांटेचे फटाके, फराळाची ती पंगत. मग माझ्या मैत्रिणी समवेत माझा फराळ. एक नी दोन. फटाक्यांच्या वेळेस लक्ष ठेवायला मी मुलांच्याजवळ बसत असे. स्वत: म्हणायचे मुलांपेक्षां तुलाच फटाके आवडतात असें दिसतें. तरी मी बसायची कां तर हातबीत भाजतील ही भीति वाटे.

एकदां रमाबाईसाहेब रानडे मला गमतीनें म्हणाल्या होत्या, ' तुम्ही येथें पुण्यांत रहा. आम्हाला उपयोग होईल व तुमची कामाची हौस होईल

व खूप कीर्ति मिळेल.' मी म्हटलें, 'तुम्हाला शहरांत पुष्कळ विद्वान् बायका मिळतील पण माझ्या खेड्यांतल्या बायकांना नवें जग कोण दाखवील ?'

कारण त्यावेळेस जळगांवची परिस्थिति अशीच होती. नुकताच जिल्हा झाला होता. स्थायिक मोठीं अशीं घराणीं म्हणण्याजोगीं नव्हतीं. चार दोन बायका असल्या तरी त्यांची छाती पुढें होण्याची नव्हती. पुरुषसुद्धां पुढारलेले नव्हते. मग बायकांची काय कथा. माझें 'पुरुषांचें बंड' येथेंच स्टेजवर आलें. तेव्हां पुरुषांना तरी कुठें बरं वाटलं ? पुढें लगेच गणपती-उत्सव होता. या वर्षी प्रथमच उत्सवमंडळानें बायकांकरितां हळदीकुंकू व कथा ठेवली होती. कथेकरी बोवांनीं विदुलेचें आख्यान लावून मातेचीं कर्तव्यें सांगतांना सांगितलें,'आतांच्या बायकासारख्या नाटकं लिहून मुलांना नाटकी होण्याचा धडा घालून देणाऱ्या आया तेव्हां नव्हत्या बरं !' तें ऐकून बायकांना इतका आनंद झाला कीं त्या एकमेकीकडे बघून हंसत होत्या. असा तो काळ होता.

प्रथम मी दर गांवाप्रमाणें शुक्रवारच्या हळदी कुंकवाला बायका बोलवूं लागलें. मी रोज कोणा कोणाकडे बसायला जायची. नवा अधिकारी आला कीं त्यांच्या मंडळींची ओळख करून घ्यायला बायका घेऊन जायचें.मग हळूंच त्यांना शुक्रवारीं बोलवायचें. सगळ्यांकडे वरचेवर जाण्यायेण्यानें स्नेह वाढलाएकदां शंकराचार्य डॉ. कुर्तकोटींचें व्याख्यान होतें. बायका यायला कोणी तयार होईनात. मग पांच सहा बायका गोळा केल्या आणि वर गॅलरींत जाऊन बसून व्याख्यान ऐकून आलों. पण पुरुषांच्या सभेंत खालीं नव्हे डोहाळ जेवणें, बारसं वगैरे प्रसंगीं बायका बोलवायच्या. अशानें संघटन वाढलें. मग नुसत्या गप्पा, फुटाणें ह्याच्या जोडीला वर्तमानपत्रांतल्या गप्पा, मासिकांतले चुटके सुरू केले. मग हळुंच कोणी आला गेला कीं त्याचें व्याख्यान. मात्र तो मोठा उद्योग झाला होता. बायका जमायच्या दिवशीं, सकाळीं आपण पुष्कळसें काम करून ठेवायचें. मग दुपार ह्या खटाटोपांत. पुढें हळुंच लायब्ररी काढली व घरांत व्याप वाढला. सासूबाई कांहीं वेळां रागवायच्या. एकदां म्हणाल्या, "ह्या उठाठेवीपेक्षां शाळेंत जातीस तर बी.ए. का काय तें झाली असतीस !" पण शहरी सुधारणा न आणतां खेडेगांवांच्या

राहणीला पोषक, जुन्यांतला चांगलेपणा ठेऊन, प्रमाणबद्ध नवें घेणारी स्त्रीसंस्था असावी ही महत्त्वाकांक्षा असल्यामुळें हें श्रम झालें. बायकांची संख्या वाढली. हॉलला सभागृहाचें स्वरूप येऊं लागले. वरचेवर सामान काढून हॉल रिकामा करावयाचा. सभा असली कीं स्वत: कचेरींतून आल्यावर खालीं बसायचें असें चाले. मात्र वर्गणी नव्हती. सर्व मीच करी. एखादी कथा करणारी बाई आली कीं कथा कर, वक्त्याला टांगा पाठवून आण, जो कोणी पोचवायचें काम करील त्याला चहापाणी करणें, गप्पा गोष्टी करणें अशा गमती चालत. लहान मुलं रडलीं कीं कोणाला पेपरमीठ दे, दूध दे हें काम वन्सं करीत. पण लायब्ररीमुळें पसारा वाढला. पहिली स्त्रियांची लायब्ररी आमची. सेवासदनांत नंतर निघाली. पण त्यानें दिवसभर वर्दळ वाढली. घरांतलं काम नीट सुचेना. सासूबाई रागावल्या व म्हणाल्या, 'एवढी धडपड करतेस, उद्यां तुला ह्या बायका मुळंच विचारायच्या नाहींत.' व त्यांचे तें भविष्य अक्षरश: खरं झालं. असो.

पुढें पसारा झाला व भाड्याची प्रशस्त खोली अगर हॉल मिळेना. तेव्हां स्वत: म्हणाले, 'तुझा पसारा आतां टिकाऊ आहे ना ? मग मी तुला एक हॉल बांधून देतो. म्हणजे घरांतली गर्दी कमी होईल.' मग जागा घेऊन इमारत बांधली. त्यांत जळगांवांतले १०० रु. खांबेटे ह्यांचे बक्षिसाचे आहेत. कारण ते म्हणाले होते, 'जळगांवांत कांहीं होणार नाहीं.' मी म्हटलें, 'मी करून दाखविलें तर मग बक्षिस हवें !' तें होतें ते. १०० रुपये अंजारिया त्यावेळचे मीलएजट यांचे. त्यांची बायको माझी मैत्रीण. त्या येत असत. व २५ रु. प्रागतिक जोशी यांचे. बाकी रक्कम आम्ही घातली. त्यांत कांहीं आमच्या परगांवच्या मित्रांनीं दिलेली आहे. पण जळगांवांतली एकहि दिडकी नसून आज जळगांवच्या बायका इमारत आमची आहे म्हणतात. त्याचीहि गंमतच वाटते. असो. इमारतीचें सर्व श्रम, उद्‌घाटनाची खटपट सर्व स्वत: केली. मात्र त्यावेळचे हुजुर डेप्युटी कलेक्टर गाडगीळ ह्यांनीं बांधकामावर देखरेख केली श्री. अंजारिया ह्यांच्याबरोबरच नेहमीं हजर असत. मग श्री. सौ. कमळाबाईसाहेब किबे ह्यांच्या हस्तें १९१९

सालीं उद्घाटन होऊन 'भगिनीमंडळ' हें नामकरण झालें. खानदेशांतील स्त्रियांची ही पहिली संस्था आहे. त्यावेळेस आमच्या येथें मित्र मैत्रिणींची एवढी गर्दी झाली होती कीं एका लग्नाचेंच स्वरूप त्याला आलें होतें. ह्यांचे एक स्नेही मला म्हणाले, 'वहिनी, तुम्ही आमच्या भावाला एका गरिबाच्या लग्नखर्चांत टाकलेत!' जळगांवांत मोठ्या मांडवांत स्त्री-पुरुष एकत्र असे प्रथम बसले व व्यासपीठावर स्त्रीहि प्रथमच बसली. परगांवच्या आलेल्या स्त्री-पुरुषांनीं जातांना माझें भरपूर कौतुक केलें व तेव्हांच मजजवळ, 'तुमच्या मंडळाला ही लहानशी भेट' म्हणून प्रत्येकानें जें दिलें तीच वर्गणी व तेव्हांपासून संस्था 'संस्था' म्हणून सुरू झाली. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, वर्गणी हें सर्व सुरू झालें. येथें आमच्या शेजारीं बाबासाहेब देशमुख रहात असत. त्यांची बायको इंदिराबाई ह्या सेक्रेटरी झाल्या व तें काम त्यांनीं जळगांव सोडेपर्यंत केलें. त्या वेळचा उदो उदो व गिरिजाबाईंच्या नांवाचा बोलबाला शत्रूनिर्मितीलाहि कारण झाला.

शिमग्यांत समारंभ केल्यानंतर माझ्या डोक्यांत आलें कीं, आतां बायकांना कांहीं सामुदायिक गोष्टींची गोडी लावावी. म्हणून चैत्राचें हळदीकुंकू मंडळाचें म्हणून करावें, प्रत्येक बाईनें एक आणा वर्गणी द्यावी व वरचा खर्च मंडळानें घालावा असें ठरविलें तर प्रथम परगांवच्या एक सुधारक भगिनी आल्या होत्या, त्यांनीं विचारलें कीं मंडळानें हळदी कुंकू चैत्रांतच कां करावें? आषाढांत कां नाहीं? पण तें बाकीच्या बायकांना पटलं नाहीं. हळदीकुंकू ठरलें. अर्थात् आरंभापासून शेवटापर्यंत कुठलीहि गोष्ट करावयाची म्हणजे मीच करावयाची असे. त्याप्रमाणें माझ्या मुली, नोकर घेऊन मी जाऊन तेथें जरा साफ सफाई केली. सरस्वतीचें मंदिर म्हणून देवी न ठेवतां सरस्वतीचीच तसबीर लहानशी होती तीच ठेवली. व गड्याला बसवून घरीं आलें. चहा पिऊन कपडे करून गेलों. गांवांत वर्गणीदार नसलेल्यांनासुद्धां बोलावणें केलें होतें. अर्थात् मी जाई तोंच बायका यायला सुरुवात झाली होती, पण मी जेव्हां घरीं आलें तेव्हां वाऱ्यानें तेथला एक फोटो पडला.

तो फोटो राजाराणीचा होता. त्याच्यावर टिकल्या बसवल्या होत्या. ओप-नींगच्या वेळेस आम्ही एक लहानसें प्रदर्शन भरवलें होतें. त्यांत तो एका बाईनीं ठेवला होता. व पुढें त्यांनीं तो मंडळाला दिला. तो पडल्यावर पुन्हा वर लावायला हात पोंचेना म्हणून त्या पोरानें तो गौरींत ठेवला. मी गेल्यापासून गौरीकडे बघितलेंच नाहीं खूप बायका आल्या व खूष होऊन गेल्या. आम्ही आनंदांत घरीं आलों. दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं स्थानिक पेपरमध्यें मजकूर आला,' सरकारी अधिकाऱ्यांच्या बायकांनीं जर इतर बायकांना सुधारणेचा आव आणला तर त्या त्यांना प्रथम राजकर्त्यांचा उदो उदो शिकवणार. असल्या शिक्षणापेक्षां आमच्या बायका अडाणी राहिलेल्या बऱ्या.' लगेच 'संदेश'मध्यें गोपिकाबाईचें हळदीकुंकू म्हणून लेख प्रसिद्ध झाला. त्यांत हेंच लिहिलें होतें कीं, 'आमचा हा धार्मिक उत्सव. तेथें गौरीच्या बदली राजाराणीची तसबीर कशाला? सरकारी अधिकाऱ्यांच्या बायकांनीं वाटलें तर आपल्या घरीं राजनिष्ठा दाखविण्यासाठीं त्या तसबिरीची पूजा करावी. वगैरे वगैरे.' तेव्हां कोठें आम्ही पाहिलें.असो वातावरण बरेंच खळवळलें. मी औरंगाबादेस अध्यक्ष म्हणून गेलें होतें. तेथें लोकांनीं वर्तमानपत्र दाखवलें. तसेंच एकदां मी नागपूरला गेलें होतें. तेथें रमाबाईसाहेब तांबे प्रिन्सिपॉल होत्या व त्यांनीं होस्टेलमध्यें थोड्या मुलींपुढें चार शब्द सांगायला मला बोलावलें होते. तेव्हां बोलण्याच्या ओघांत मी म्हटलें कीं, 'मुलींनी जसं 'अगबाई पुरुष' करून भिऊं नये, धीट व्हावं हें खरं, तसेंच त्यांनीं आणखी एक पथ्य पाळावें. ज़र मुलांच्या शाळेंत सहशिक्षण घ्यायचें असेल तर अगदीं साधा पोषाख, साधी रहाणी त्यांनीं स्वीकारली पाहिजे.' माझं तें मत अद्यापहि कायम आहे. तरुण वयांत नटण्यामुरडण्याची आवड साहजिकच असते हें खरं पण अर्थात् शाळेंत पोरं पोरंच असतात म्हणून मुलींनीं हें पथ्य पाळलं पाहिजे. कारण जगांत रोज नवी फॅशन निघते, मुली ती भराभर उचलतात. ह्याचा अर्थ मुलींनीं नेहमीं साधं रहावं असं नाहीं. त्यावर सौ. कुसुमावतीबाई देशपांड्यांची टीका एका पत्रामध्यें आली होती कीं, 'आपण इंदुरी लुगडी नेसून मुलींना साधेपणाचा उपदेश करतात.' पण एक तर मी विद्यार्थिनी नाहीं, माझं वय झालेलं. मला बारा

तास पुरुषांत बसून काढायचे नाहींत. कामापुरती केव्हां तरी मी पुरुषांच्या सभेंत जाणार. पण मनुष्य स्वभावाप्रमाणें ह्या गमती होतातच. हा लेखहि एका गांवाला अध्यक्ष म्हणून गेलें असतांना लोकांनीं दाखवला.

भगिनी मंडळाच्या उद्घाटनाच्या वेळेस सगळयाच लोकांना बोलावलें होतें. त्यांत कलेक्टरनाहि आमंत्रण होतें. ते फिरतीवर होते. त्यांचें पत्र आलें 'आतां हजर राहतां येत नाहीं. पण मी तेथें आलो कीं जरूर मंदीर पाहीन.' त्याप्रमाणें एक दिवस सकाळी निरोप आला, 'मी ८ वाजतां येतो' लगेच मनुष्य केर काढायला पाठवला. शेजारचे नूलकर, अंजारिया, बापूसाहेब गाडगीळ ह्यांना बोलावणें पाठवलें. मी तयार झालें. इतक्यांत कलेक्टर आले. आम्ही उभयतांनीं स्वागत केलें. त्यांनीं बिल्डिंग पाहिली व परत गेले. आमच्या भगिनी मंडळाच्या बायका जमल्या. एका लहान मुलीला प्रश्न विचारायला उभी केली. 'खासगी संस्थेंत गोरे कशाला ?' मग मी त्या मुलीला म्हटलं, 'कोणीही सभ्य मनुष्य संस्थेला भेट द्यायला आला कीं, त्याचें स्वागत करायचें हा अधिकार अध्यक्षाला कायमचाच आहे. त्याकरितां सभा बोलावून परवानगी घ्यावी लागत नाहीं.' अशा तऱ्हेनें दु:स्वासाचा पाया घातला गेला. असो.

इंदूर येथें साहित्य संमेलन झालें. कुसुम लहान होती. तिला घेऊन मी गेलें होतें. जळगांवच्या स्टेशनवर श्री. तात्यासाहेब केळकरांच्या डब्यांत स्वत: मला बसवलं. त्यांच्याबरोबर मी इंदूरला गेले. त्यावेळच्या राजकारणाप्रमाणें स्टेशनवर पोलिसांनीं तात्यासाहेबांना अडवलं. ते मला म्हणाले, 'तूं स्वयं-सेवकांबरोबर उतरण्याच्या जागेकडे जा. मी जाऊन येतों' मी तेथें गेलें तो एका खोलीवर आमची दोघांची नांवं होतीं. तेव्हां लोकांची चूक माझ्या नजरेस आली. मग मी लोकांशीं बोलतांना 'भाऊजी, भाऊजी' म्हणण्याचा सपाटा लावला माझ्या नोकरांशीं बोलतांना 'तें भाऊजींचं सामान असेल' वगैरे बडबडलें. तेव्हां मग त्यांनीं आपण होऊन त्या खोलीच्या शेजारची खोली मला दिली. काशीताई कानिटकर व रावसाहेब कानिटकर आले होते. इतर अनेक लोक होते. पण खेड्यांत राहणारी बाई मी, माझ्या ओळखी कुठून असणार ? गांवांतील कांहीं बायकांनीं येऊन ओळखी करून घेतल्या.

चौकशी केली. त्यांत कमळाबाईसाहेब किबे, सौ. हुदलीकर ह्या होत्या. सौ. ताई भडभडे म्हणजे ताई मावशी फार दिवसांनीं मला भेटली. सभेंत मला बोलायला सांगितलें. मी पांच मिनिटें बोललें. लोकांना तें आवडलें. लगेच अनेक जणांनीं म्हटलें, 'मध्ये आमच्या गांवाला उतरा, बोला आणि जा.' मला भीति वाटली कीं हें लोक मला विद्वान, समजून बोलवता आहेत, स्तुति करीत आहेत. ती ऐकून मला मी विद्वान आहे असा मोह नाहीं का पडणार ? कारण माझी कुवत मला ठाऊक होती.तेथें जरी मी बोललें तरी वाटेल तेथें उभी राहून बडबडण्याइतकी मी विद्वान नव्हतें. असो भाषणाला म्हणून मुद्दाम ताई मावशी व नानासाहेब भडभडे आले होते. मग त्यांनीं त्यांच्या खेड्यावर मला व काशीताई कानिटकरांना जेवायला बोलावलें. तेथें संपतराव गायकवाडांची नी माझी ओळख झाली. नानासाहेब मला म्हणाले, ' इतकी आली आहेस ती महेश्वर पाहिल्याशिवाय जाऊं नकोस. '

मी म्हटलं, 'मी कांहीं येथें अधिकाऱ्याची बायको नाहीं वाहन मिळायला. तेव्हां संपतराव म्हणाले, 'तुम्हाला जायचें असलें तर मी चंद्रावती राणीसाहेबांकडून मोटार देववतों.'

मी ' हो ' म्हटलं. इंदूरला आल्यावर कमळाबाईसाहेबांकडे जेवण, हुदलीकरांकडे चहा वगैरे झाला. अकोल्याची तोंडओळख, आतांचं संघटन, असा किबे मंडळीचा स्नेह वाढत गेला. तो अजून टिकला आहे. स्वत: ह्यांना सुद्धां भैय्यासाहेब किबे व सौ. कमलाबाईसाहेब किबे ह्यांच्याबद्दल अतिशय आदर वाटे. मग मी महेश्वरची गाडीची गोष्ट तात्यासाहेबांना सांगितली. ते म्हणाले 'बरं तर चला.' मग काशीताई म्हणाल्या, ' आम्ही येणार ! ' दुसरे दिवशीं सकाळीं मोटार आली. कानिटकर पतिपत्नी व आम्ही निघालों. तों मोटार बढवाईलाच बंद पडली. ती खरी पडली का तात्यासाहेब असल्यामुळें इंजिन बंद पडलें देव जाणें. स्टेशनांत इंदूरची गाडी होती. तात्यांनीं मला व माझा नोकर आणि कुसुम ह्यांना गाडींत बसवलं आणि ते मग नावेतून महेश्वरला जाऊन तें पाहून आले. मी गाडींत पहातें तों बसल्यावर जातांना जी मंडळी गाडींत होती तीच

आतांहि होती. ते लोक म्हणूं लागले, 'वहिनी आम्हांला टाकून गेलांत म्हणून महेश्वर बुडालं बरं का !'

पुन्हां लिहिणं, घर, शिवण, भगिनी मंडळ हे उद्योग सुरू झाले. वयाच्या मानानें नव्या नव्या गोष्टी करून पहावयाची हौस होती. समवयस्क वन्सं व मी नवें लोणचें, नवें पक्वान्न करून पहा, घरांतल्या रचनेंत बदल कर वगैरे आमचे उद्योग चालत. अजूनहि मला थोडचा फार प्रमाणांत तो नाद आहे. नव्या तऱ्हेचे कपडे मुलांसाठीं शिवणें वगैरे गोष्टींत वेळ जाई. मग बाळासाहेब उर्फ आनंद याचा जन्म २९-१०-१९१७ ला झाला. त्यावेळेस मी खूप आजारी होते. मी'गेलें' म्हणून सुद्धां बातमी उठली होती. पण त्यांतून मी बरी झालें. मग बाबाची मुंज थाटांत झाली. तात्यासाहेब विलायतेस जायला निघाले होते. ते आले आणि येथूनच मुंबईस जाऊन विलायतेला गेले. खूप मंडळी आली होती. माझ्या मैत्रिणींपैकीं नंदुरबारच्या वहिनी व सगळीं फडके मंडळी, कोल्हटकर वहिनी, माई जोशी,यशोदाबाई भट वगैरे वगैरे. नात्याचीं तर होतींच होतीं. मला कोणीच नुसता खण देईना. प्रत्येकीनें ही चोळी घातलीच पाहिजे म्हणून चोळी शिवली. चोळचांचा ढीग पडला !

हीं सात वर्षे अत्यंत सुखाचीं गेलीं. प्रांत होते म्हणून स्वतःला हिंडावेंच लागे व बंगल्यांत मुक्काम असला तर मीहि फिरतीवर बरोबर जात असे. तीन वर्षं उत्तर भाग प्रांत आणि तीन वर्षं दक्षिण भाग प्रांत असें होते. त्याच फिरतींत चोपडचाचें मगनशेट व प्रतापशेटचें कुटुंब यांच्या ओळखी झाल्या व त्याचे पुढें स्नेहांत रूपांतर झालें. प्रतापशेठ जळगांवास आले म्हणजे आमच्याचकडे उतरत असत. जामद्याच्या बंगल्यांत मुलं नेली होती. त्यांना तो खूप आवडला. नदीचा तो प्रवाह, ती वनश्री, तें मोकळें वातावरण सगळं मोठं प्रसन्न होतं. भोंवतीं कामाला येणाऱ्या माणसांची वर्दळ. मी तेथें नदीच्या बंधाऱ्यावर बसून आयेषा नाटक लिहिलें. भद्राबाई माडगांवकर यांना लहानपणीं राजकोटला पाहिलें होतें. तें आतां जज्जांच्या पत्नी म्हणून पाहिलें. त्यावेळेस अनेक स्त्री पुरुष मला भेटायला येत. अर्थात् त्यांत पुष्कळांचा उद्देश मी खरी लेखिका आहे का नामधारी आहे हें पाहण्याचा असे. आलेल्या मंडळींना स्वतः घरीं असल्यास माडीवर

हॉलमध्यें भेटून चहा अन् सत्कार करीत असे. पण स्वत: नसल्यास खाल.च भेटत असे. येणारे बंधू मोठे सुशील व सज्जन असत. त्यांना स्त्रीलेखिका म्हणून आदर असे व ते साह्य करण्यास तयार असत. अशा सज्जन साहित्यिकांच्या संगतींत दिवस आनंदांत जात होते. सोलापूरहून आल्यानतर ज्या नव्या ओळखी येथें झाल्या त्यांत केशवराव सोनाळकरांच्या ओळखीचें रूपांतर बंधुप्रेमांत झालें तें शेवटपर्यंत कायम होतें. मध्यमवर्गीयांना मिळायचें तेवढें वैभव, पवित्र अन् पुण्यवान् अशा सासूबाई, बहिणीप्रमाणें प्रेम करणारी देवतेसमान नणंद व ज्याचें मोल करतां येणार नाहीं अशी आयुष्याची जोड, गोजिरवाणी, आज्ञाधारक पण बुद्धिमान् मुलं व खरा प्रेम करणारा बंधुवर्ग व मैत्रिणी ह्यांत काळ भराभर जात होता. उठल्यापासून निजेपर्यंत जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसत होता. आई, वहिनी, ताई, आईसाहेब असे ध्वनी कानांवर आदळून मन गर्वानं फुलत असे.

१९२० मध्यें शांताबाई ऊर्फ आक्का हिचें लग्न अवचित ठरलें. त्याची गंमत अशी झाली. स्वत:चे लहानपणचें एक स्नेही देवासचे गंधे हे मुलीला स्थळ पहायला हिंडत होते. तें लग्न येथें जुळलें व तें लग्न आमच्याच ओळखीनें शेजारच्या बंगल्यांत उतरले. त्या लग्नाला काथवटे आले होते. ते ह्यांचे स्नेही. ते तेथें गर्दी म्हणून आमच्याकडे तोंडधुणें वगैरे करायला यायचे. तेव्हां त्यांच्याबरोबर देवासचे आणखी एक गृहस्थ येत. एक दिवस ब्राह्मण नव्हता म्हणून शांता चहा घेऊन गेली. तेव्हां त्यांनीं विचारलें, ' ही तुमची मुलगी कां ? शिकते कां ? ' नि ती मॅट्रिकमध्यें आहे असें ऐकल्यावर पुढें म्हणाले ' वा, वा, हुशार आहे. त्याला अशीच बायको हवी. करतां कां लग्न ? ' स्वत: म्हणाले, 'आम्ही अजून लग्नाचा विचार केला नाहीं. परीक्षा झाल्यावर पहाणार आहों. ' तर म्हणाले, ' अहो असं स्थळ मिळायचें नाहीं. परीक्षा काय होईल. आमचे डॉ. ओक आहेत त्यांचा भाऊ डबल एम्. ए. आहे. हल्लीं अमळनेरला ' फिलॉसफी 'त आहे. दोन तीन महिन्यांनीं नोकरीवर जाईल.' अशी माहिती त्यांनीं सांगितली व अमळनेरला जाऊन तेथें ओकांना मुलीची माहिती दिली. योगायोग असा कीं, ओक

आमच्या स्नेह्यांबरोबर येथें आले होते. त्यांनीं मुलगी पाहिली व त्यांच्या बंधूंचें पत्र आलें. 'माझ्या भावाला मुलगी पसंत आहे असें कळतें. तरी आपला विचार असल्यास ताबडतोब कळवावे. म्हणजे दुसरीकडचा विचार करणार नाहीं.' ध्यानीं मनीं नसतां हें लग्न उभं राहिलेलं पाहून मी गडबडलें. मीं म्हटलं, 'जाऊं दे, नशिबांत असेल तसं दुसरं मिळेल. पण परीक्षा होऊं दे.' पण ह्यांचे स्नेही माझ्याविरुद्ध. स्वतः अर्धे माझ्याकडे. अर्धे त्यांच्या बाजूचे. अखेर त्यांचें म्हणणें स्वतःला पटून लग्न ठरलें. तें लग्न येथें झालें. चांगलें थाटांत झालें. खूप पाहुणे आले होते. मग पुढे आषाढांत उषःकालीं १९२० सालीं उषाचा जन्म झाला.

पुढें लो. टिळक गेले. तेव्हां सगळ्या जगावरच दुःखाचा डोंगर कोसळला. भगिनी मंडळानें दुखवटयाची सभा घेतली. तेव्हां अध्यक्ष मी होते. लगेच सरकारांतून विचारणा आली कीं, अध्यक्ष सरकारी नोकराची बायको असतांना ही सभा कशी झाली? पण तें प्रकरण तेथेंच विझलें. पुढें एकदां अशी गंमत झाली कीं, गव्हर्नरचा मुक्काम येथें आला. त्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी जे साहेब होते ते, स्वतः मामलेदार असतांना असिस्टंट कलेक्टर होते. त्यांची ह्यांच्यावर उत्तम काम म्हणून मर्जी असे. ते ह्यांना म्हणाले, 'तुम्हीं मागें पडला होतात पण शेवटीं तुम्हांला न्याय मिळाला हें पाहून आनंद वाटतो. जर कधीं जरूर लागली तर मला कळवा.'

स्वतः म्हणाले, 'सध्या सर्व ठीक आहे. पण अशी इच्छा आहे कीं सर्व्हिसची दोनच वर्षं आहेत. तीं आतां येथेंच जावीं पुन्हां कोठें जा–ये नको. मी येथें घर बांधलें आहे. मुलं शाळेंत आहेत. तेव्हां येथेंच रहावें असें वाटतें.'

तो म्हणाला, 'बरं, जर झालीच बदली तर मला कळव.'

पुढें अशी गंमत झाली कीं, ह्यांच्यापुढें एक खुनाचा खटला आला. त्यांतला आरोपी पुरावा नाहीं म्हणून ह्यांनीं सोडला. खटला सेशन कमिट करावा असं ह्यांना वाटलं नाहीं. त्यामुळें पोलीसखातें रागावले व आमची बदली हुजूर डेप्युटी म्हणून धुळयास झाली. तेव्हां नुकत्याच झालेल्या बोलण्याचा कांहीं उपयोग आहे का हे पाहण्यासाठीं त्यांनीं त्या साहेबांना

कळवलं नि आमची बदली रहित होऊन आम्हीं येथेंच हुजुर डेप्युटी कलेक्टर झालों. त्यावेळेस मनोहर टॉयफॉइडनें खूप आजारी पडला. दुखणं असाध्य वाटत होतं. आमचे बाबुराव व वामनराव नूलकर हे दोघे डॉक्टर जिवापाड खटपट करीत होते. दुसरेहि डॉक्टर आणीत होते. तेव्हां आमचे एक स्नेही होते. त्यांचा मनोहरवर फार जीव होता. ह्याचं लक्षण बरं नाहीं असं वाटलं म्हणून त्यांना कळवलं होतं. ते आले. रेल्वेंत त्यांना कांहीं पोलिस अधिकारी भेटले. मुलगा आजारी म्हणून भेटायला जातो आहे असें ते म्हणाले. त्यावर ते म्हणाले, 'देव लांब नाहीं. खुनाच्या केसमध्यें पैसे खाऊन आरोपी सोडला. त्याचं हें फळ.'

स्नेही म्हणाले, 'खरं वाटत नाहीं.' मग घरीं आल्यावर त्यांनीं स्वतःला विचारले, तेव्हां स्वतः म्हणाले, 'मला कांहींच कल्पना नाहीं.' मग त्या दृष्टीनं चौकशी करतां कळलं कीं, गांवांत ही बातमी पसरली होती. माझ्याकडे समाचाराला येणाऱ्या एका बाईला दुसऱ्या एक बाई म्हणाल्या, 'सोनं घेतांना बरं वाटलं आतां सोनं जातांना कां रडावं!' मला अर्थ कळेना. पण स्वतः मला ही हकीकत सांगितली. त्यांत बदली रद्द झाली त्याचेबद्दल उठविले कीं धुळ्याचे कलेक्टर नको म्हणाले. पण सत्याचा वाली परमेश्वर. मनोहरचं एक दिवस जास्त झालं. सारखा ओरडे. डॉक्टर येऊन गेले. मग माझ्या डोक्यांत आलं कीं ह्याला लघवी बऱ्याच वेळांत झालेली नाहीं. मग मी बारा क्षारांतील औषध दिलें. लघवी झाली व तो शांत झाला. एक दिवस रात्रीं नवाच्या सुमारास त्याचा ताप कमी कमी होतो असें वाटायला लागलें. डॉक्टर आले. औषधोपचार करून परत गेले. तेव्हां ताप १०१ होता. ते घरीं पोचतात तोंच ताप चढू लागला. डॉक्टर पुन्हा आले. ताप १०५ पर्यंत गेलेला. गार पाणी नाहीं. जळगांवांत बर्फ नाहीं. ते म्हणाले, 'बर्फ असता तर त्याला वांचवला असता.' तोंच दरवाज्यांत एक पोलिस येऊन, 'क्या केळकर साहब का बंगला यही है ?' असं विचारूं लागला. शिपायानं हो म्हणेपर्यंत तो ओटयावर आला व 'जोशी साबने बरफ भेजा है' असें त्यानें म्हटलें मात्र, बाबूराव नूलकरांनीं ताबडतोब उठून 'गॉडसेन्ट' म्हणत त्याच्या हातांतून

त्यांनीं गाठोडं घेतलं व जवळ पडलेल्या विळीनं दोर कापून खिशांतल्या रुमालांत भुश्यासकट बर्फ घालून मनोहरच्या डोक्यावर ठेवला. मग मी आईस बॅग तयार केली. संकट टळलें. मग मी माझीं औषधं जीं त्यावेळेस डॉक्टरना पटत नव्हतीं–तीं चोरून देऊं लागलें. त्यामुळें ताप बरोबर २१ व्या दिवशीं उतरला. पण त्याला वेडा मधुरा झाला होता. डॉक्टर वैद्य म्हणत, शक्ति आली कीं शुद्धीवर येईल. पण शक्ति यायची कशी? तोंडांत कांहीं घातलं कीं थुंके. डॉक्टर म्हणत त्याला ताकद येणं हेंच एक औषध. स्वत: मग म्हणाले, 'मी त्याला नाशिक अगर मुंबईस नेतो. रात्रीं जायचें; तयारी करा.' मी म्हटलें, 'त्याला न्यायचें कसें?' किंचाळचा मारी, ओरडे; उठून बसतां येत नसे. पण निजल्या निजल्या लोळे. नेणार कसा? ते म्हणत, 'मग, असा वेडा का राहूं द्यायचा. नेऊन पाहूं; असेल दैवांत तसं होईल!' मी म्हटलें, 'माझें औषध देऊत पहातें,' तर खूप चिडले अन् म्हणाले, 'आतां जर कांहीं कमीं जास्त झालं तर जग काय म्हणेल!' मी म्हटलं, 'मूर्खपणानें बाईनें मुलगा मारला म्हणतील. दुष्टपणानें मारला म्हणणार नाहींत. कारण मी सख्खी आई आहे.' शेवटीं किती दिवस वाट पहायची या बोलीवर बोलणं आलं. ईश्वरानें माझ्या तोंडून तीन दिवस वदवले. तीन दिवसांत थोडा जरी गुण वाटला तरी पुन्हां थोडे दिवस थांबायचें नाहींतर तावडतोब मी त्यांच्याबरोबर मनोहरला घेऊन मुंबईस जायचें. स्वत: त्यावेळेपासून तास मोजायला सुरुवात केली. मी औषध सुरू केलं. एक औषध कमी पडत होतें. तें मुंबईस ह्यांचे स्नेही दुसरे दिवशीं यायचे होते त्यांना तार करून मागवलें. सकाळीं तें मिळालें. मी सारखी घड्याळ लावून औषध घालीत होतें. त्याचा ओरडाआरडा चालूच होता. सकाळीं मी प्रातर्विधीला जातांना स्वत:ना बोलावून म्हटलं, 'आपण जरा बसा. मी आलेच!' ते बसले आणि सहज मनोहरला म्हणाले, 'मनु, तुझी जीभ दाखव.' त्याला ऐकायला येत नाहीं हें त्यांच्या लक्षांत राहिलं नाहीं. तेव्हां तो जीभ काढायसाठीं तोंड हलवायचा प्रयत्न करूं लागला. मग म्हणाले 'डोळे पाहूं?' तेहि उघडायसाठीं ताणूं लागला. मी आल्यावर मला तें सांगितलं. मी देवाचं नांव घेऊन पुन्हां औषध देत बसलें.

रात्रंदिवस औषध. त्याला झोंप नव्हतीच. दुसरा दिवस चालला. पोटांत घडघड होती. पुन्हां तिसरे दिवशीं उजाडतां स्वतः जवळ बसून त्याला पुन्हां तसें विचारलें तर डोळे उघडून दाखवून मिटलेन्. जीभ बाहेर काढलीन्. म्हणजे ऐकायला यायला लागले व काय विचारीत आहेत याचें ज्ञान आलें. आतां आजचा दिवस माझ्या प्रयोगासाठीं उरला. देवाचे नांव घ्यावें व औषध द्यावें. दुपारीं शेजारच्या पाटसकर काकू आल्या. त्या म्हणाल्या, 'ओरडतोस का ? काय हवं ?' तर 'खाऊ' असा सूक्ष्म ध्वनि आला. त्या म्हणाल्या, 'बोलला हो!' बारीक आवाज वाटला. रात्रीपर्यंत औषध चालू होतें. रात्रीं नऊ वाजतां त्याला गाढ झोंप लागली. जागरणाला येणारे बापूसाहेब सहजे म्हणून एक वृद्ध गृहस्थ होते ते जवळ जाऊन नाडी पहात. अगदीं शांत पडला होता म्हणून सगळ्यांना त्याचीहि एक प्रकारची भीति वाटूं लागली. सकाळीं आमची मुदत संपावयाची तों पहांटे पांच वाजतांच 'नांव' घेऊन हांक मारलीन्! बापूसाहेब धांवत गेले. 'मनु बोलावतो' म्हणाले जिन्याच्या तोंडाशीं येऊन 'काय' म्हणून विचारून जिनाच उतरले. त्याच्याजवळ बसले. त्यानें बोलायला सुरुवात केली. त्यांनीं आनंदानें माझ्याकडे पाहिलें. सासूबाई व माई तो आजारी म्हणून आल्याच होत्या. त्यांना आनंद झाला. बापूसाहेब सहजे, काका पिंपळखरे घारू वन्सं हीं सगळीं जागणारीं मंडळी. सर्वांना आनंद वाटला. मला पैज जिंकल्याचें समाधान वाटलें. मी मनांत सारखें देवाचें नांव घेत होतें. मला लोकांना ओरडून सांगावेंसें वाटे, 'पहा सोनं घेतलं नाहीं म्हणून सोनं राहिलं !'

आमच्या देशमुखीणबाई गेल्यावर हायस्कूलचे फर्स्ट असिस्टंट निळकंठराव ओक यांच्या पत्नींना आम्ही सेक्रेटरी नेमलें होतें. त्या व मामा भागवत हेडमास्तर यांची पत्नी--माझी बाल मैत्रीण-वगैरे अनेक बायका येऊन गेल्या. भाऊ, शांताबाई मॅट्रिक झालीं. शांता सासरीं गेली. भाऊ कॉलेजांत गेला. शांताबाईची मंगळागौर झाली. पुढें कुमुदचा जन्म १९२२ मध्यें झाला. मग आमची बदली नाशकास झाली. हे म्हणाले, "चला एकदां जाऊन येऊं. मग १। महिन्याची कुंदा घेऊन आम्हीं नाशकास

आलों व ज्या केसमुळें सोनं घेतल्याच्या कंड्या उठल्या होत्या, त्यांतल्या आरोपीची नातलग माणसें तेथें भेटलीं. ती केस पोलिसांनीं पुन्हा चालविली व तेथें त्या माणसाला फांशीची शिक्षा झाली. त्यानें अपील केलें. त्यांत ती जन्मठेप झाली. त्याच्या माणसांना ह्यांनीं विचारलें, 'माझ्या नांवानें तुम्ही कोणाला कांहीं दिलें नाहींत ना?' ते म्हणाले, 'नाहीं. पण आमचा वकील म्हणाला, तुमच्या निकालाचाच आम्हाला हायकोर्टांत उपयोग झाला.'

नाशकास बाबा इंग्रजी शाळेंत, मनु व कुसुम मराठींत, बाळ घरांत, उषा आजारी व कुन्दा तान्ही असा थाट होता. पहिल्यांदा गांवांत होतों. पण मग बाहेर बंगला मिळाला. आतेबाई होत्या. आक्का आली, मंगळागौर झाली. थोरली आक्का आली होती. पुढें त्या दोघी गेल्या. भोंवतीं चांगलीं माणसें होतीं. जगुमामा, आजोबा, आजी नाशकास आलीं होतीं. सर्व चांगले पण उषा आजारी असे. एकदां किबे दंपती तिथें आली होती. त्यांना जेवायला बोलावलें होतें. उषाला पाहून कमळाबाईसाहेब म्हणाल्या, 'ही मुलगी आजारी आहे कां?'

मी म्हटलें 'हो तिला मुख्य आजार शौच्याला न होणें हा. रोज दोन वेळां सिरींज द्यावी लागते. पुष्कळ डॉक्टरना दाखवलं. कुठलंहि औषध फक्त एकदोन दिवसच लागू पडतं.' तेव्हां मला त्या म्हणाल्या, 'माधवनाथ महाराज म्हणून एक ब्रह्मचारी योगी आहेत. त्यांना तुम्ही दाखवा. दुखणें शारीरिक असलें तर तसें औषध द्यायला सांगतील किंवा आपणहि देतील. कांहीं दैवी असलें तर तसें सांगतील.' असें म्हणून त्यांचा पुण्याचा पत्ता त्यांनीं दिला. मी कंटाळलेंच होतें. मला त्यांना केव्हां भेटेन असें झालें. शेवटीं कार्तिकांत आम्ही पुण्यास गेलों. पण तेथें गेल्यावर स्वतः म्हणाले, 'कोठें शोध करीत जायचें? आपली ओळख नाहीं.' मी गप्प बसले. पण मनांत मात्र सारखे वाटे केव्हां भेट होते. संत भेटतील, मुलीला बरं वाटेल. पण त्यांच्याशीं मात्र वाद घातला नाहीं. परत आलों पण रात्रंदिवस ध्यास होता. तोंच दोन महिन्यानंतर एक दिवस सकाळीं समोरचे एक वकील आले व ह्यांना सहज म्हटल्यासारखं म्हणाले, 'माधवनाथ येथें आले आहेत.

अमक्या अमक्या ठिकाणीं उतरले आहेत. ' मला हे म्हणाले, ' अग, आज ते येथें आल्याची बातमी आली आहे. ' मी आनंदलें, म्हटलें, ' जाऊं या का ?' तेव्हां म्हणाले, ' मी आज जाऊन आधीं भेटून येतो. मग पाहूं ' स्वत: आंघोळ करून गेले. बरोबर आमचे जांवई फाटक तेथें आले होते, तेहि गेले. परत आल्यावर स्वत: म्हणाले, ' संत नि:संशय आहेत.' त्यांचे गुरु गोंदवलेकर महाराज ह्यांच्या सहवासानें त्यांना अशा माणसाची पारख होती. ' आपण जाऊं केव्हां तरी. सध्या ते येथेंच रहावयाचे आहेत.' मी गप्प बसलें. पण मन सारखे ओढ घेई मुलीसाठीं व संत भेटावे म्हणून! तर गंमत काय झाली. संध्याकाळीं एका लग्नाला आम्हाला जायचें होतें. तेथें गेलों तर मंडळी नुकताच नवरा मुलगा आणायला गेलीं होतीं.आमच्या ओळखीचे कोणीच नव्हतें. तेव्हां स्वत: म्हणाले, ' ते पहा त्या समोरच्या घरांत महाराज उतरले आहेत. ही मंडळीं येईपर्यंत आपण दर्शन घेऊनयेऊं' मला आनंद झाला. आम्ही गेलों. तेथें चार पांच मंडळी दर्शनार्थ बसलीं होतीं. स्वत: पुरुषांच्या बाजूस बसले व मी गादीच्या समोर बसलें. दोन चार मिनिटांत महाराज समोरून येतांना दिसले. उंच, तेजस्वी मूर्ति, गोड हास्य; जणूं किती जुनी ओळख. सर्व उठून उभीं राहिलीं. नमस्कार करून बसलीं. मी नमस्कार केला. तशी म्हणतात, 'कां बाई आज ताप आहे ना? फार नसेल दोनपर्यंतच असेल. उद्यां तीर्थाला पाठवा. बारा वाजतां माझी पूजा आटपेल. तेव्हां तीर्थ देईन. चहाचा चमचा चमचा दिवसांतून दोनदां द्या. बरी होईल.' आनंदी मनानें उठलों. नंतर लग्नघरची पान-सुपारीं घेऊन घरीं आलों. दुसरे दिवशीं एक बाटली घेऊन भाऊ जाऊन तीर्थ घेऊन आला. तिला तें दिलं व त्या दिवसापासून आज तागायत तिची प्रकृति चांगली आहे. गुरुकृपा हेंच खरं !

तेव्हांपासून गुरुदेवांची नि आमची जी ओळख झाली ती वाढतच गेली. स्वत:ची संतांवर श्रद्धा होतीच व माझी तर होतीच होती. त्यांनीं मला आवड असणाऱ्या पारमार्थिक मार्गाची ओळख जास्त करून दिली. माझ्या ऐहिक सुखाची काळजी स्वत:च्या पोरीसारखी घेतली व पारमार्थिक गोडी वाढवली.

नाशकांत ओळखी वाढल्या. चांदवडकर ताईसाहेबांची जुनी ओळख वाढली. ओक, केतकर, भिडे, ताईसाहेब विंचूरकर, वहिनीसाहेब विंचूरकर, आक्कासाहेब सांगलीकर ऊर्फ मेहेंदळे ह्यांच्या नव्या ओळखी झाल्या. विंचूर पाहिले. गांवांत सभा व्याख्यानें होतींच. एकदां व्याख्यान, एकदां अध्यक्ष असें सर्व झालें. व्याख्यान आवडल्याबद्दल श्रोत्यांची पत्रेंहि आलीं. प्रतापशेठनीं सप्तशृंगीवरच्या चांदवडकरांच्या धर्मशाळेचा जीर्णोद्धारहि केला. तें काम आम्ही नाशकास असल्यामुळें ह्यांनीं करवलें. आम्ही रहात होतों त्या पारनेरकरांच्या बंगल्यांतलीं माणसंहि चांगलीं होतीं. पाटणकरांचा ह्यांचा स्नेह होता. पण आतां माझी ओळख झाली. जगुमामा साठे रजा घेऊन तेथें आलें होते. त्यांच्या मुलांच्या मुंजी व मामा पटवर्धनांच्या येथील मुंज तेव्हांच झाली. उन्हाळ्यांत आमचे जांवई फाटक यांनीं तेथें बिऱ्हाड केलें होतें. त्यामुळें माई यायची जायची. मग आक्का आली. तिची जाऊ पंधरा दिवस राहून गेली. दिवस मजेंत जात होते. नोकरीची मुदत संपली. चार महिन्यांची फर्लो घेतली व आंतां निघावयाचें म्हणून महाराजांच्या दर्शनाला गेलों. तेव्हां ते म्हणाले, 'आतां कोठें जाणार?.' तशी यांनीं सांगितलें, ' मी जळगांवास घर बांधलें आहे तेथें राहणार. ' तशी महाराज म्हणाले, ' जा, पण फार दिवस राहणार नाहीं! ' तेव्हां यांनीं सांगितलें, ' मला कांहीं दुसरा चान्स दिसत नाहीं. कारण पेन्शनरांना फार तर संस्थानांत चान्स असायचा. पण मी केळकरांचा भाऊ असल्यामुळें तोहि मला मिळणार नाहीं. ' तेव्हां महाराज यांना म्हणाले, ' तुमचा अधिकार योग संपला असला तरी माझ्या पोरीचा शिल्लक आहे. म्हणून तुम्हाला उष्ण प्रदेशांत पण कांहीं वर्षं काम करावं लागेल. जळगांवास तुम्ही सहा महिने किंवा फार फार तर दीड वर्ष राहाल ! '

◆◆◆◆

# पेन्शन्नंतर : ६

आम्ही नाशिक सोडून जळगांवाला आलों. आम्ही नाशकास जातानाच रहायला आलेले बाळ मुन्सफ शेजारच्या घरांत होतेच. मिस्टर व मिसेस अंजारिया, खांबेटे, नानासाहेब लिमये, डॉ. नूलकर, सोनाळकर, ह्या मंडळींना खूप आनंद झाला. आम्हालाहि घरीं आल्यासारखा आनंद झाला. आमचीं जाणीं येणीं सुरू झाल . फर्लोचे चार महिने संपले. ‘ करता कां आणखी नोकरी ? वय आहे ’ असें सरकारनें विचारलें. पण ‘ सर्व्हिसचीं तीस वर्षे झालीं आतां पुरे.’ म्हणून यांनीं सांगितलें. मग ह्यांच्या मनानें घेतलें कीं, आपण कांहीं तरी लोकसेवा करावी. म्हणून कौन्सिलला उभे राहिले. मी म्हटलें, ‘ तुम्ही केळकरांचे बंधु म्हणून जितकें सरकार तुम्हाला भितें तितकेंच तुम्ही सरकारी नोकर म्हणून तुमची मंडळी तुम्हाला भितील. याचें उदाहरण हळदी-कुंकवांतला राजाराणीचा फोटो. जरी स्वत: सरकारी नोकर असले तरी एक तर मी नोकर नव्हतें दुसरे, नोकरी करतांना अन्नदात्याला चार नमस्कार करूं. पण धार्मिक बाबतींत जेथें देव म्हणून आम्ही समारंभ करतों तेथें प्रदर्शन कशाला करूं ? सरकारी नोकरी केली म्हणजे मन नाहींसें होतें कां ? ज्या ज्या काळांत जे जे राजकर्ते असतात त्यांची नोकरी कांहीं माणसें करतातच. म्हणजे ते आपली सदसद्विवेकबुद्धि विकतात असें नव्हें. पण आमच्यांतील सुशिक्षित म्हणविणारीं माणसें हा विचार कधींच करत नाहींत. पण त्यांना न पटून त्यांनीं डिपॉझिटचे पैसे भरले. त्यांना आपण होऊन मदत करावयास येण्याचे सोंग ज्या माणसांनीं केलें त्यांनीं आमचे पैसे घेऊन दुसऱ्याचें काम केलें. शिवाय त्यावेळेस स्वराज्यपार्टी निघाली होती. तिनें तात्यासाहेब केळकरांना आणलें. तेव्हां साहजिकच

लोकांना वाटलें कीं त्यांचे भाऊच विरुद्ध तेव्हां सरकारी नोकराला मतें देऊं नयेत. त्यामुळें निवडूनहि आले नाहींत. पण भरलेले पैसे मिळाले.

आम्ही येथें आलों नी पंधरा दिवसांनीं एक दिवस प्रतापशेठ धुळ्यास मिल काढण्याचें ठरल्याच्या पत्रिका घेऊन आले. पण स्वत: घरीं नव्हतें. कारण नाशकाहून आम्ही निघायच्या आधीं बापूमामा नाशकास आले होते. व 'येथून आवरून जातांना सामान पुढें पाठवून तुम्ही धुळ्यास या' असें आमंत्रण देऊन गेले होते. पण आम्ही आधी जळगांवास जाऊन सामान टाकून सगळीं मुलं बाळं तेथें ठेऊन धाकट्या कुंदाला घेऊन दोन तीन दिवस धुळ्यास राहून आलों. तेव्हां दोनच दिवसापूर्वीं मामाचें दुसरें लग्न होऊन नवी मामी आली होती. तेथें आजी, जगूमामी वगैरे सर्वच भेटलीं. मग मी परत आलें व स्वत: चाळिसगांवाहून मुंबईस गेले. आणि सकाळीं शेठजी आले. मग स्वत: आल्यावर पुन्हा ते आले व यांना आपल्याबरोबर शेअर गोळा करायला घेऊन गेले.

आम्ही नाशकास असतांना नानबा गोखले येऊन माझें राजकुंवर नाटक वाचून गेले होते व तें घेण्याबद्दल बोलणें झालें होतें. पण पुढें ते वारले. त्यांची कंपनी येथें आली व नाटक मागितलें. सोनाळकर वगैरेंनी 'द्यावें' असें म्हटलें. त्याचा प्रयोग येथेंच म्हणजे जळगांवच्या रंगभूमीवर झाला.

कै. केशवराव सोनाळवर हे नाटककार, कवि, लेखक होते. ते माझ्या-वर मनापासून भगिनीप्रेम करीत. इतकेंच नव्हे तर आमच्या कुटुंबावरहि ते फार प्रेम करीत. माझीं मुलें 'मामा, मामा,' म्हणून धांवत. त्याची मंडळीहि मान देत व मुलं अजून 'आतेबाई' म्हणतात. त्यांना नाटक स्टेजवर आल्याचा फार आनंद झाला. तसेंच नूलकरांकडे मी 'आत्याबाई'च आहे. त्यांच्या मागल्या दोन पिढ्या तर प्रेम करीतच. पण चालू पिढीहि करी. वामनराव बहिण म्हणत व कमलाबाई अजून वडिल नणंदेसारखा मान देतात. त्यांची मला पुन्हां आल्यानंतर खूप मदत होत असे. त्यांचे बंधू टेंबे व टेंबे मामी किती उपयोगी पडत ! मी म्हणायची, 'मामी, तूं नणंदेची नणंद म्हणून कां माझंच जास्त करतेस ?' पण हा केवळ ऋणानुबंध.

जळगांवास आल्यापासून पुन्हा खांबेटयांकडे माझें माहेर सुरू झालें. वहिनींचें येणें, जाणें, दादांचें येणें, माझें जाणें. माझ्या लेखांचें, गोष्टीचें कौतुक करणें सर्व चाले.नाटक पाहून त्यांना खूप आनंद झाला. आत्याबाई, सासूबाई, यांचा आनंद तर काय विचारूंच नका.

कौन्सिल नाहीं असें ठरल्यावर, मग शेटजी म्हणाले, 'आतां धुळयास चला!' पण मी नको म्हटलें. मुलं लहान होतीं व बरींच वर्षें तात्यांचे भाऊ म्हणून वगळल्यामुळें पगार फार वाढला नव्हता व त्या मानानेंच पेन्शन बसलें. पण तो स्वस्ताईचा काळ होता. किती तरी लोक तीनशें रुपये पगारांत रहात होते. "आपण तेवढया पेन्शनींत राहू. मुलं एकेक मोकळीं होतील. भाऊ कॉलेजांत गेला होता. चार पांच वर्षांत तो मोकळा होईल. त्याच्याकडे एखादा मुलगा जाईल. मग खालचे वर येतील. आपण श्रीमंत नाहीं म्हटलं म्हणजे मुलं आस्थेनें शिकतील. नोकर थोडे कमी करूं आणि सुखांत राहूं." असें मी म्हटलें. त्यावर नानासाहेब लिमये म्हणाले, 'वहिनी, तुमच्या आजपर्यंतच्या संवयी बघा.' मी म्हटलें, 'अहो, आपण ब्राह्मण आहों.डझन केळयात संसार होतो. तशी दोन केळयांतहि शिकरण होते.' सारांश नोकरी नको हें त्यांनाहि पटलं व आम्ही नाहीं म्हटलं.

शांताबाई आली. रीतीप्रमाणें डोहाळ जेवण वगैरे होऊन बाळंत झाली. त्यावेळेस माझी बहिण ताराबाई बाळंतीण उठून मुलाला घेऊन आली होती. पहिली मुलगी म्हणून थाटाचें बारसें झालें. त्यावेळेस 'घुंगुरवाळयानें सांपडली' ही गोष्ट मी लिहिली होती. ती वाचून आगगाडींत एकानें 'खरं कां हो असं घडलं?' म्हणून स्वतःला विचारलं. पुढे तिच्या सासूबाई येऊन बारसें करून तिला घेऊन गेल्या. तेव्हां सासूबाई व वन्सं आल्या होत्या. मी बाळंतीण होऊन ता. १-५-२२ ला कमलचा जन्म झाला. पण तिला दुसरें दिवसापासूनच फिट्स यायला लागल्या. त्या पुढें तीन चार महिने राहिल्या. नंतर फिट्स थांबल्या, पण त्यांत ती वेडी झाली. तिचें ज्ञान नाहींसें झालें. त्याचवेळेस दत्तुकाकांचे—दत्तात्रेय केशव केळकर; हे प्रथम पांचगणीस हिंदु हायस्कूलमध्यें मास्तर व नंतर मुंबईच्या रुइय्या कॉलेज-मधें प्रोफेसर होते—लग्न झालें. पण मी बाळंतीण म्हणून सासुबाई व वन्सं

गेल्या नव्हत्या. त्या मंगळागौरीला गेल्या. मनूला सासूबाईंचा फार लळा. त्या जायला निघाल्या कीं पायाला विळखा घालून रडायचा. त्या मोठ्या कष्टानें त्याला सोडवून जायच्या.

पुढें जळगांवास पाण्याचा दुष्काळ झाला. तेव्हां घरीं मोठे नळ घालावें असें ठरलें. मी म्हटलं, 'थांबा, आपल्याला येथें येऊन दीड वर्ष होऊं द्या. मग करा काय तें. महाराजांचा शब्द आहे; वाट पाहूं.' 'शेटजींनीं विचारलें, आपण नाहीं म्हटलें. कोणाच्या हाताखालीं बारीक सारीक उद्योग करायचा नाहीं असें ठरलें आहे ना? मग नळ आत्तांच बदलूं या' असें हे म्हणाले. मी म्हटलं, 'नोकरीची इच्छा नाहीं. पण महाराजांचे शब्द कसें खरे होतील कोण जाणे. फुकट खर्च नको.' कारण सबंध नळ घालण्याचा खर्च होता. स्वत: म्हणाले, 'आतां कोण बोलावतो आहे नोकरीला आणि आपलं नोकरी करायची नाहीं असं ठरलंच आहे.' झालं. नोकरी करूं नये हें माझें मत कायम होतें. पण वाटे, सत्पुरुषाची वाणी काय करील कोणी सांगावें. कारण माझी श्रीनाथचरणीं निष्ठा माझी होती.

कमा लहान; तिला लहान फुलासारखं संभाळायचं. मी थकलें. मग ह्यांनीं पुण्यास ताईंना लिहिलें. त्या आल्या. पंधरा दिवस होत्या. मला जरा विसावा मिळाला. माझा सगळा वेळ मुलांत जाई. कमा आजारी, बाकीची लहान. मोठ्यांना शाळा, त्यांचीं लवकर जेवणं. मधलीचं खाणं वगैरे चाले. पण ह्यांचा वेळ जात नसे. मी चारचार दिवसांत माडी चढत नसे. ह्यांना खालीं बसायचा कंटाळा, बागचा, पोथी पुराणाचा असा कसलाच नाद त्यांना नव्हता. पेपर किती वेळ वाचायला पुरणार? अगदीं कंटाळायचे. माझा प्रपंच होताच. भगिनीमंडळ होतें. त्याच संधीला मला व्हर्न-क्युलर परीक्षेची परीक्षक म्हणून नेमलें. बुक कमेटींत माझें नांव आलें. सुटी संपवून भाऊ जायला निघाला. मला पोळचा सुचेनात. माझा डावा डोळा व डावें कपाळ फडफड लवत होतें. मी म्हटलें, 'भाऊ, माझे नशीब कांहींतरी उदयास येणार?' तो म्हणाला, 'नक्की दिवस सांग!' मी म्हटलं, 'आठ' तेव्हां तो म्हणाला, 'मला पत्र घाल,' तो गेला नि दुसरें दिवशीं प्रतापशेट कांहीं सरकारी कामाकरितां

जळगांवांस आले. नेहमीप्रमाणें आमच्याकडे उतरले. पण त्यांच्या कारकुनानें बातमी आणली कीं तारीख पुढें ढकलली आहे. त्यामुळें मग सावकाश बारा वाजतां दोघं जेवले अन् चौकांत हात धुवून शेटजी माडी-वर गेले. स्वत: आंचवायला लागले. तेव्हां मी म्हटलें, 'आपण वर जातांना कमाला वर न्या. म्हणजे गडी उष्टी काढील.' शेटजी जिन्यांतच होते. ते म्हणाले, 'काय हो बाईसाहेब ? एवढ्याकरितांच कां नोकरी करायची नाहीं ?' मी म्हटलें 'तसें नाहीं. तिच्या बाईला आज शिवायचें नाहीं. व तिला फिट्स येत होत्या म्हणून एकटीं ठेवायची नाहीं.' ते म्हणाले, 'अहो म्हणूनच म्हणतो कीं धुळ्यास चला. एक बाई नसली तर दुसरी कामावरून आणतां येते.' असं म्हणून ते दोघे वर गेले. मी ती थट्टा समजून विसरले व जेऊन माझ्या खोलींत जाऊन पडलें, तोंच स्वत: कमाला घेऊन खालीं आले. कमाला पलंगावर ठेऊन मला म्हणाले, 'शेटजी म्हणताहेत, ही थट्टा नव्हे, अजून येत असलात तर चला, मला विश्वासू माणसाची जरूर आहे. माझ्यानें रोज धुळे-अंमळनेर होत नाहीं. आपण नोकर म्हणून नव्हे तर माझे वडील भाऊ म्हणून चला. असा' ते आग्रह करीत आहेत, असं म्हणून स्वत: वर गेले. संध्याकाळीं जातांना शेटजी म्हणाले, 'बाईसाहेब पहा विचार करून आपण मुला बाळासुद्धां तिथेंच चला असाच बंगला आहे. लवकर येण्याची तयारी करा!' असे म्हणून ते गेले. स्वत: मग म्हणाले, 'मी यंदा बेळगांवच्या कॉंग्रेसला जाणार आहे मग विचार करूं.' नागपुराहून माईला बोलावून माझ्या सोबतीला ठेवून आपण पुण्यास गेले. आमचे दिवस माईमुळें मजेंत गेले. मी तिला शेटजींच्या बोलण्याची गोष्ट मजा म्हणून सांगितली. भाऊचे व माझें बोलणें झालें त्याच्या दुसऱ्याच दिवशीं शेटजी आले अन् त्यांनीं मला विचारलें, हा योगायोग असं मी माईला म्हटलें. ती म्हणाली, 'ते प्रेमानें बोलावीत असले तर जावं. मुलं लहान आहेत. शिक्षणं व्हायचीं आहेत. तूं वैभवांत राहिली आहेस. काटकसर म्हटलीं, कीं कष्ट आलेच. तुझ्यानं ते कितपत होतील?' मी मनांत कष्टाच्या दृष्टीनें विचार करीतच नव्हतें. ते पडतील तितके करावयाचे: मुलांचें शिक्षण करावयाचें,

28310

उलट पेन्शनमध्यें आहों ही जाणीव असली म्हणजे मुलं चांगलीं निघतील. आम्हाला पुष्कळ वर्षं सरकारनें डेप्युटीची जागा द्यायची वगळल्यामुळें पेन्शन बसावं तितकं बसलं नव्हतं. भाऊ शिकून तयार झाला कीं एक मुलगा त्याच्याकडे जाईल. धाकटीं आमच्याजवळ राहतील. मुलींच्या लग्नांचा प्रश्नच नव्हता. प्रॉव्हिडंट फंड आल्यावरोबर तिघींच्या नांवानें ठेवला होता पण प्रश्न पडे, ह्यांच्या वेळाचा! तो कसा जाईल? पान सुपारीचें ताट घेऊन चार माणसं गोळा करावी हा त्यांचा स्वभाव नाहीं. ह्यांना इकडल्या तिकडल्या गप्पा मारतां यायच्या नाहींत. हे अबोल. मी थोडं फार बोलीन तर प्रपंचांत वर मान करायला मला वेळ नाहीं. तेव्हां मला ह्यांची कींव येई. स्वत: सारखं एकट बसून वाचून किती कंटाळत असतील असं वाटे; म्हणून एक मन म्हणे धुळ्याला जावं; त्यांचा वेळ जाईल. पण दुसरें मन म्हणे, नको. खाजगी नोकरी नको. स्नेह्यांतलीं तर मुळींच नको असें द्वंद्व चाले. स्वत: पुण्यास गेले नी बेळगांवास काँग्रेसला जायचं ठरवलें होते. जायच्या आधीं महाराजांकडे गेले तेव्हां त्यांनीं 'धुळ्याला कधीं जातां?' असा प्रश्न केला. 'पहातो, विचार करतो.' म्हणाले. तेव्हां महाराज म्हणाले, 'नाहीं, नाहीं, विचार करूं नका. तुम्ही जाच.बांधकाम तुमच्या हातून व्हावें अशी ईश्वरी योजनाच आहे. एक दोन दिवस येथें राहून जा. बेळगांवालाहि जाऊं नका. यंदा काँग्रेसमधें कांहीं होणार नाहीं आणि तुमचेंहि जाणें होणार नाहीं. तुम्ही परत जाऊन पोरीला (ते मला पोर म्हणत) घर आवरायला सांगून पुढें जा.' हे उठले, घरीं आले. येतांना बेळगांवचं तिकीट काढून आले होते. पण मग जुलाब व्हायला लागले. तिकीट परत केलें. औषधं वगैरे घेऊन बरें वाटलें नि परत यायचें म्हणून नाथांकडे गेले. ते हसले व एक नारळ देऊन म्हणाले, 'हा माझ्या पोरीजवळ द्या. अमक्या तारखेला सकाळीं फोड असें सांगा.' (ती तारीख व धुळ्याला जायची तारीख एकच निघाली.) नारळ फोडून प्रसाद घेऊन गेले. तेथून ते जळगांवला आले.

एक दिवस सासूबाई पुण्यास जायला निघाल्या व जातें म्हणून सांगायला खांबेट्यांकडे गेल्या तेव्हां ते म्हणाले, 'काय आजी, एकदम जायचें

कां ठरलें ? माझी बहीण भांडली कीं काय ?' तेव्हां त्या म्हणाल्या 'नाहीं, तसं कांहीं नाहीं. हें पहा, माझ्या सुनेचा हा गुण घ्यावा. ती कधीं उलटून बोलायची नाहीं. कोठें कुलूप नाहीं. हा जिन्नस काय झाला ? कोणाला दिला का ? कां दिला ? असं विचारायची नाहीं.' दुसरे दिवशीं दादा आले, 'आजी गेल्या का ?' विचारलें. मग म्हणाले, 'अग, तुला सांगायला आलों आहे तूं जिंकलीस.' मला आश्चर्य वाटलें. तेव्हां ते म्हणाले, 'आजी असं म्हणाल्या. संसारांत सासूकडून असं म्हणवून घेणं म्हणजे जिंकणं.' घरांत माझ्या मैत्रिणी येत म्हणून त्यांना कधीं कंटाळा आला नाहीं. उलट 'अग, त्यांना चहा दिलास का ? त्या जेवायच्या होत्या का ?' अशी आगत्यपूर्वक चौकशी व्हायची. सगळ्याच नातवंडांवर त्यांचें प्रेम होतें, सर्वांनाच त्या गोष्टी सांगत. पण मनोहरवर—त्यांचें फार प्रेम होतें. कुसुमच्या वेळेस मी बाळंतीण असतांना तो फार आजारी होता तर त्यांच्या जवळ असे. त्यामुळें त्या दोघांना एकमेकांचा फार ओढा. तेव्हांच त्यांनीं त्याचा कोल्हापूरचा नवस केला होता. आम्ही पुण्यास गेलों तेव्हां त्यांनीं आम्हाला त्याला घेऊन कोल्हापूरला पाठवलें होतें. त्या असल्या कीं तो त्यांच्या मागें असे. त्या निघाल्या कीं डोकें फोडी. आम्ही धुळ्यास गेल्या-वर तो पुण्यास गेला होता. तेव्हां तेथून येतांना असंच झालं त्यानें त्यांच्या कमरेला मिठी घातली व तो आणि त्या दोघं रडलीं. तें पाहून तात्यांच्या-सुद्धां डोळ्याला पाणी आलं, पण पुन्हा त्याची गांठ पडलीच नाहीं. आम्ही धुळ्यास जातांना त्या गेल्या हुषार व सात्विक. आपला मान राखून, जुनें संभाळून असत. पण पुन्हा त्याचा ओरडा, आरडा, डांगोरा नाहीं परोपकारी पण त्याचा गाजावाजा नाहीं. सगळ्यांशी गोड. समाधानी वृत्ति. अशा सासूबाई मिळायला पूर्व जन्मींची पुण्याई लागते. लहान वयांत मुलांच्या शिक्षणासाठीं त्यांनीं फार कष्ट केले. ही जाणीव त्यांच्या मुलांना होती. त्यांच्या पुण्याईनेंच आम्ही वर चढलों. त्यांची मुलं सात्विक थोर व पवित्र निघालीं. तात्या निवडून आले तेव्हां अनेकांनीं हार घातले. जिकडे तिकडे पानं फुलं पडलीं होतीं. तीं केरसुणी घेऊन त्या गोळा करूं लागल्या; तेव्हां कोणीसं म्हणालं, 'आई, तुम्ही कां गोळा करतां ?' तशी म्हणाल्या,

' अहो विठोबा, आज अंगणांत आला, त्याला घातलेलीं फुलं कुणाच्या पायदळीं पडूं नयेत म्हणून मी गोळा करते आहे.' माझं लग्न झाल्यावर मला म्हणाल्या, आपल्या घरांत डोक्यावर पदर घ्यायची चाल आहे. प्रथम मी तसा घेई. मग दारांतून बाहेर पडतांना घ्यायचा, जरा पुढे गेलें कीं काढायचा. मग अजीबात सोडला कारण त्या इरकलीं लुगडीं घेत. ती अरुंद असतात. तीं पुरत नसत एकदां त्या शांताबाईशीं बोलतांना म्हणाल्या, ' तुझी आई सगळीं चांगली पण थोडी हट्टी आहे. डोक्यावर पदर घेतला तर सभांना जाते ती भारदस्त नाहीं दिसणार ? पण नाहीं म्हणजे नाहीं.' तेव्हां शांताबाई म्हणाली, ' आई, आजी असं म्हणतात.' तेव्हां मी मोठ्यांदा त्यांना ऐकूं जावं म्हणून म्हटलं, 'अग लांब रुंद, लुगडं असलं तरच उंच माणसाला पुरतं. मला आडवहि लुगड हवं अन् उभहि हवं मग घेईन डोक्यावर पदर ! ' पुढें दोन चार दिवसांनीं ह्यांचा पगार वाढला तेव्हां सांगितलं, ' आई, पगार वाढला १०० रु.' तर म्हणाल्या, ' वाढलेले मला दे ' तेव्हा ह्यांनीं सांगितले, ' सगळे घे ना ! ' पगार आला. पैसे पुढे ठेवले. ते परत हातांत देत म्हणाल्या, ' जी चांगलीं लांब रुंद लुगडीं असतील तीं दोन हिच्याकरितां आणव.' तर लगेच लुगडीं आलीं घडी मोडून नेसलें व नमस्कार केला. तेव्हांपासून मी पुन्हा डोक्यावर पदर घ्यायला लागलें. माझीं नाटकं व्याख्यानं ऐकलीं कीं, म्हणायच्या. ' तिकडे तात्या इकडे ही ! ' मी लहान असल्यामुळें त्या पुष्कळशा इकडेच असत. घरांतली देखरेख त्या करीत. मला कांहीं बघावं लागत नसे. शिवाय माझ्यांत व्यवहारदृष्ट्या किती तरी अज्ञान होतें. तें त्यांच्या शिकवण्यानें गेलें. त्या न शिकलेल्या असूनहि इतक्या हुषारीनें कांहीं वेळां वागत कां वाटे हें आपल्याला जमलं नसतं त्या आपला बोज ठेवीत. बाकी त्यांना मुळींच दुखवायचं नाहीं, वाद घालायचा नाहीं ही ह्यांचीहि वृत्ति होती. त्या जळगांवाहून पुण्यास गेल्या. पुढें आम्ही धुळ्यास गेलों तेव्हां तेथें येईन म्हणाल्या. पण त्यांचं येणं मात्र झालं नाहीं.

स्वतः पुण्याहून आले. नारळ माझ्याजवळ दिला. तोंच बाबासाहेब जोशांचें पत्र 'आपण धुळ्यास सेक्रेटरी म्हणून नव्हे तर लोकल एजंट

म्हणून जा.' असें प्रेमाच्या आग्रहाचें आलें व शेटजींचेंहि पत्र येऊन पडलेंच होतें. तेव्हां ह्यांचे तीन मित्र खांबेटे, अंजारिया व लिमये हेहि आले. माझ्याशिवाय सर्वांचा कौल जावं असा पडला. मग स्वत: धुळ्यास गेले. पितृतुल्य अशा ह्या गुरुदेवांची गांठ सौ. कमलाबाईसाहेब किबे ह्यांच्यामुळें पडली. त्यांचे हे उपकार मी कधींच विसरण्याजोगे नाहींत. त्यांची माझी ओळख झाल्यापासून आमचें प्रेम वृद्धिंगतच झालें. कांहीं वेळां हितशत्रूंनीं मी त्यांना नांवें ठेवतें, त्यांची निंदा करतें अशा खोट्या कंड्या उठवल्या. पण त्या थोर मनाच्या स्त्रीनें त्या मनावर न घेतां माझ्यावरचें प्रेम मुळींच कमी केलें नाहीं. माझा नाना उर्फ मनोहर दोन वर्षें इंदूर कॉलेजांत होता. तो जरी बोर्डिंगांत होता तरी किबेसाहेबांनीं त्याला सुटींत घरीं बोलवायचे. पहिल्यांदाच घरापासून लांब राहिल्यामुळें तोहि तेथें जायचा. मावशींनीं व भय्यासाहेबांनीं त्याला खूप प्रेमानें वागवायचें. त्याला अजून त्या आठवणी येतात. भैय्यासाहेब व कमलाबाई किबे हें पवित्र व थोर आदर्शभूत दांपत्य आहे.

स्वत: धुळ्यास गेले पण मुलांच्या परीक्षा व्हायच्या होत्या म्हणून मी जळगांवासच राहिले. मी हळूहळूं सामान आवरलें. आमची कल्पना दोन अडीच वर्षें फार तर तेथें राहूं अशी होती, म्हणून कांहीं सामान मागें ठेवलें. कांहीं बरोबर घ्यायचें म्हणून तयार केलें. परीक्षा झाल्या. स्वत: आले. सामानाची वॅगन रवाना करून आम्ही दोघं लहान कमाला घेऊन नागपुरास माईच्या पहिल्या वहिल्या मुलाच्या मुंजीसाठीं गेलों. घरीं आत्याबाई आल्या होत्या. त्यांच्याजवळ मुलं होतीं. तेथें रीतीप्रमाणें आहेर, भिक्षावळ सर्व झालें. पण केव्हां घरीं जातो असें झालें, कारण कमाला एक व्यथा होती—ती रड रड रडे नी मग तिची बेंबी मोठ्या लिंबाएवढी फुगे व ती टिळटिळीत भाजलेल्या फोडासारखी दिसे. तेथें मुंजीला माझी मावस नणंद आली होती. त्यांनीं मला आपल्या घरीं चहाला नेलं व वाड्यांतल्या एका आजीबाईंना बोलावून कमाला दाखवलं. त्यांनीं मान हलवून एक तांब्याचा ओबड-धोबड ताईत आणून तिच्या गळ्यांत बांधला व म्हणाल्या, 'जर बेंबीचें फुगणें थांबलें तर गुण येणार

असं समजा व त्यांत जो कागद व मुळी आहे ती सोन्याचा ताईत करून त्यांत घालून तिच्या गळ्यांत घाला. चांगली बरी होईल. तेथून आम्ही जळगांवास आलों. आतां गांव सोडून जायचें, केव्हां येतो कोण जाणें म्हणून ह्यांनीं भगिनीमंडळाचा ट्रस्ट केला. हे म्हणाले, समजा आपलं तेथेंच कांहीं झालं तर मुलं बिल्डिंगवर हक्क सांगायचीं. कारण त्या बिल्डिंगमध्यें जळगांवचें २२५ रु. आहेत. टस्ट्रींत पहिल्यानें माझें नांव होतें व कायम अध्यक्ष गिरिजाबाई असें होतें. त्या ट्रस्टींनींच हें सुचविलें होतें. पण बाबूराव नूलकर म्हणाले, 'ट्रस्टींत एका घरचीं दोन नांवें येण्यापेक्षां चवथा ट्रस्टी अध्यक्ष करा. कारण अध्यक्ष गिरिजाबाईच राहतील. ज्यांनीं प्रेमानें, कष्टानें व पैशानें संस्था काढली, ज्या गांवांत कांहीं होईलसें वाटत नव्हतें तेथें श्रमानें एका इमारतीची उभारणी करून संस्थेला स्थैर्य दिलें, त्यांच्या हयातींत दुसरें कोण कसें अध्यक्ष होईल? म्हणजे तुमचे दोन्ही साधेल. गिरिजाबाई अध्यक्ष म्हणून ट्रस्टीहि होतील.' पण भविष्यवाणी त्यांना काय ठाऊक कीं यत्किंचितहि श्रम वा पैसा खर्च न करतां पुढली पिढी 'संस्थाच आमची' म्हणेल. आम्ही जायच्या वेळेस शिर्के ए. ओ. म्हणून येथें बदलून आले. त्यांची गांठ पडली. श्री. शिर्केसाहेब व सौ. आनंदीबाई शिर्के यांची जी ओळख तेव्हां झाली ती वाढत्या स्नेहांत रूपांतरित होऊन अजून कायम आहे. पुण्यास गेलें कीं त्या मोठ्या प्रेमानें भेटायला येतात.

आम्ही येथें दीड वर्ष होतों. पण तेवढ्यांत बाळांचा नि आमचा खूप स्नेह झाला. त्यांची आई एक प्रेमळ माऊली होती. त्यांनीं म्हणायचें, 'ताई व्याख्यानाला नाहीं म्हणूं नका. कमा माझ्याजवळ ठेवा' त्यांच्या जिवावर मी बाहेर जावें. एरवींसुद्धां सारखं जाणं येणं. त्यामुळं मलाहि जळगांवांत त्यांना मागें ठेवून जातांना खूप वाईट वाटलें. मलाहि या मंडळींचा स्नेह व घराचें प्रेम ह्यामुळें वाईट वाटलें. आम्ही जळगांव सोडलं व अमळनेरला उतरून संध्याकाळीं धुळ्याला आलों. नागपूर सोडल्यापासून कमा रडली नाहीं व तिची बेंबी फुगली नाहीं. धुळ्यास आल्यावर तिसरे दिवशीं मामा साठे आम्हाला भेटायला आले. ते तेथें सिव्हिल सर्जन होते. साहजिकच धाकटी मुलगी आजारी असते असं बोलणं निघालं, तेव्हां 'पाहूं या बरं'

म्हणून ते आंतल्या खोलींत पाळण्याकडे गेले. मी आंत चहाकडे गेले. त्यांनीं तिला पहायला झबलं वर केलं व म्हणाले, 'ताईचा अजून असल्या गोष्टींवर विश्वास आहे.' इतक्यांत त्यांना तिचे अंग कोमट वाटलें. ते म्हणाले, "ह्या ताईताच्या वजनानें सुद्धां त्या अशक्त मुलीला ताप येईल !' असं म्हणून त्यांनीं तो कापून खिडकींतून फेकून दिला. मी परत येईतोंपर्यंत सर्व बाहेर आले होते. चहा पिऊन मामा गेले. मग ताईत नसल्याचें माझ्या लक्षांत आलें. खूप शोधला. तेव्हां बाबा म्हणतो, ' मामांनीं कशी केली आईची ?' पण ताईत गेला तो सांपडला नाहीं. त्या बाईचाहि शोध लागला नाहीं. मात्र पुन्हां कधीं बेबी फुगली नाहीं. पण कमा पूर्ण बरी व्हायचा योग आला नव्हता एवढं खरं.

धुळयास आलों. नवें घर थाटलें. बंगल्याचें बांधकाम सुरू होतें. आमच्या सोबतीला करमरकर म्हणून एक सिव्हिल इंजिनियर व ४-६ कारकून मंडळी एवढीच सुरुवातीला होती. तेथून पुण्यास अण्णा-विठ्ठलांच्या लग्नाला गेलों.. परत येतांना आतेबाई तेथें राहिल्या. पुन्हां मी बुक कमेटीकरितां पुण्यास गेलें तेव्हां श्री. कृष्णराव जोशी डायरेक्टर होते. प्रो. सबनीस, साठे, नवलकर वगैरे मंडळी कमेटींत होती. सर्वांनीं मला छान वागवलें. तेथें जातांना मला डांगेसाहेबांची सोबत मिळे. पुढें गणपती आला. हायस्कुलांत मला बोलायला बोलावलें. आणखी कांहीं मंडळी मुद्दाम आली होती. कारण बायका अजूनहि फारशा बोलत नसत. माझें भाषण सर्वांनाच फार आवडलें. डांगे साहेबांनीं स्तुतिपर समारोप केला. मग अनेक ठिकाणीं बोलावणीं येऊं लागलीं. जेलमध्यें व्हिजिटर झालें. सहकारी बँकेंत सरकारतर्फे मेंबर म्हणून नेमणूक झाली. हॉस्पिटलची व्हिजिटर होतेच. भैय्यासाहेब गरुडांनीं लोकल बोर्डांत घेतलें. त्यामुळें बाहेर जाण्या-येण्यांत, घरकाम व मुलं ह्यांत वेळ पुरत नसे. एकदां मी पुण्यास गेलें असतांना सासूबाईंना ' धुळयास चला ' म्हटलें. त्याहि 'हो' म्हणाल्या. ' हो बरेच दिवस झाले. यायचं हं !' म्हणाल्या, पण माझी चुलत नणंद लाडुताई या आजारी होत्या. तेव्हां 'मग येईन' म्हणाल्या. पुढें त्या गेल्या आणि सासुबाई यायच्या तर एकदम आजारी पडून गेल्याच.

आजाराची तार आली, स्वत: गेले. पण घरांत कोणीच नसल्यामुळें सगळीं लहान मुलें व कमा कोणाजवळ ठेवून मी जाणार? लगेच त्या गेल्याच. सगळ्या कुटुंबाची काळजी वहाणारी, कुटुंबाकरितां कष्ट करणारी, सुनांवर आईसारखें प्रेम करणारी पवित्र सात्विक अशी देवता गेली. मुलं रडलीं. नानानं तर हंबरडा फोडला. तो उन्हाळ्याच्या सुटींत नुकताच पुण्यास राहून आला होता आणि येतांना आजी पुन्हा भेटणार नाहीं असें आंतून वाटल्यामुळेंच कीं काय खूप रडला होता. सगळ्या नातवंडांत तो आजीचा फार लाडका होता. आणि त्याचीहि त्यांच्यावर भक्ति होती. सगळ्यांनाच दु:ख झालें. पण ह्या मर्त्यभूमींत कुणालाहि देव तरी किती काळ ठेवणार! त्या गेल्या तेव्हां त्यांचे वय ८२ वर्षांचें होतें.

कमा खूप आजारी झाली होती ती शर्थीनें वांचली. स्वप्नावर विश्वास ठेवावा न ठेवावा. पण मला एक स्वप्न पडलें. त्याचं असं झालं: एक दिवस कमाचं जरा जास्त झालं; संध्याकाळपर्यन्त डॉक्टर वैद्य आणले पण कोणी विशेषसें औषध दिलें नाहीं. ती बेशुद्ध होती, जीभ काळी पडली होती. स्वत: सासूबाईंच्या क्रियेकरितां पुण्यास गेले होते. दुसरें दिवशीं सुतक फिटायचें होते. रात्रीं सर्व मुलं झोंपी गेलीं. एक गडी, तोहि गाढ झाला. घड्याळांत साडेनऊ वाजलेले. मी उठलें. दोन झाऱ्या घेतल्या. एकांत दूध व एकांत बाराक्षाराचें पाणी. तिला कांहींच गिळत नव्हतें म्हणून तीनचार टॉवेल गळ्याभोवतीं घालायला घेऊन बसलें. एका झारींतलें दूध चार थेंब घालायचें; पांच मिनिटांनीं पाणी चार पांच थेंब. अशी जागत बसलें होतें. गळ्याभोंवतालचा टॉवेल भिजला कीं, दुसरा घालायचा असें करतां करतां चार वाजले. झोंप खूप लोटली. तेव्हां उठून मी माझी गादी गोळा केली व त्याला टेकून बसलें. म्हणजे झोंप येऊं नये. पण माझा डोळा केव्हां लागला कोण जाणें! मला स्वप्न पडलें. मी पुण्यास आहे आणि ताई, तात्या आणि आम्ही दोघं जेवायला बसणार आहोंत. इतक्यांत कोणी बाहेर आल्यानें पुरुष बाहेर गेले, मी दाराशीं गेलें तों स्वत: येऊन सांगितलें, 'भाऊ सांपडला आहे. शाबीत झालें तर फांशी. कसली बुद्धि पोराला झाली कोण जाणें!' मी म्हटलं, 'भाऊ कधीं वाममार्गानें जायचा नाहीं!' आणि मी मोठा गळा

काढून उंबऱ्यांतच बसले. स्वतः बाहेर गेले तोंच एक लुंगी, कोट व खांद्यावर पडशी घेतलेला बोवा आला. मी म्हटलें, 'मी माझ्या दुःखांत नी हा पाहुणा कशाला ? ' मी त्याला म्हटलं 'पुरुष तिकडे असतील बघा !' तो गेला व दोघं परत आले. स्वतः म्हणाले, 'आपलं स्वागत केव्हांहि आमच्या मंडळींनीं केलं असतं. पण आज एक वाईट बातमी आल्यामुळें दुःखांत आहेत. मला म्हटलें, 'या नमस्कार करा. साईबाबांना नाहीं कां ओळखलंत ?' मी नमस्कार केला. तेव्हां म्हणाले, 'संकट गेले. थोडे शरीर क्लेश आहेत.' मी एकदम जागी झालें तर खिडकीच्यावरच्या कांचेंतून सूर्याचा तांबडा प्रकाश कमाच्या तोंडावर पडला होता व ती हंसत होती. मला काय आनंद झाला. मग मला कळलं कीं साईबाबा नांवाचे एक साधु आहेत.

पुढें एक वर्षानें १ ऑगस्ट १९२७ ला बाबूचा जन्म झाला. उषा, कुंदांना मराठी शाळेंत घातल्या. पुढें शिमग्यांत भाऊचें लग्न व बाळची मुंज झाली. ह्या लग्नांत मुलगी देवधरांची खरी पण सरदारगृहाचें बाबुराव साळवेकर व वहिनी हींच व्याही-विहीण होतीं. आमची आप्त स्नेहीमंडळी सर्व जमलीं होतीं. कार्य छान झालें. नवी सून; ह्या घरची पहिली सून इंदिरा या नांवानें वावरूं लागली. मुलांना नव्या वहिनीचा आनंद काय विचारावा ? बाबा मॅट्रिक होऊन डेक्कन कॉलेजांत गेला. बाळ इंग्रेजींत गेला होता. मला मुंबईच्या नाट्य संम्मेलनाचें अध्यक्ष म्हणून बोलावणें आलें. मी गेलें. पण तेथें गेल्यावर आपसांतल्या किती तरी हितचिंतकांनीं सांगितलें, हें अध्यक्ष होणें वेडेपणा आहे. इतकें वर्ष संमेलनं होत आहेत पण नाट्यकलेचा काय उद्धार झाला ? तुमच्या सारख्यांनीं हे उद्योग करूं नयेत. लिहितां तितकें पुरे!' पण सम्मेलन छान झालें. मेजवान्या खाल्या. जयकरांच्या मातोश्रींनीं बोलावलं होतं, तेथें गेलें. पुढील वर्षी मुंबई ग्रंथसंग्रहालयाचें अध्यक्षपद स्वीकारलें. तेंहि चांगलें पार पडलें. धुळ्यास आल्यानें साठे मामांचे संघटन वाढलें. मामी, आजी, मावशी सर्व तेथेंच होतीं आजीनें माझें व्याख्यान आहे कळलं कीं यायचें. 'कसं ग बोलतेस ? सुचत तरी कसं ? असें कौतुक करायचें. पुन्हां म्हणायचें, 'नको, माझी दृष्ट पडेल !' ह्यांना म्हणायचें, 'माझी नात काल लक्ष्मीसारखी दिसत होती.' म्हाताऱ्या माणसांचें तें प्रेम.

धुळ्याचें एक वैशिष्टच असें आहे कीं पक्षोपपक्ष असले तरी कार्याच्या वेळीं सर्व एक होतात. आम्ही असतांना तरी गांवांतील लोकांचें व सरकारी अधिकाऱ्यांचें चांगलें दळणवळण असें. बोलावणें असलें तर गव्हर्नरच्या पार्टीपासून तर सर्व सार्वजनिक पाटर्यांना मी जात असे. पण कधींच चहाहि घेत नसे किंवा कांहीं खात नसे. टेबलाशीं उभें रहावें. बदाम, काजू, पेढा असला तर तोंडांत टाकावा. जरा ह्याच्याशीं बोल, त्याच्याशीं बोल करावें, झालं ! कधीं कोणाला बाहेर खात नाहीं हें कळलेंहि नाहीं. पण मला पुढें एक प्रतिस्पर्धी भेटला. माझं हें सोवळं भांडारकरबाईंच्या लक्षांत आलं. तेथील एक्झीक्युटिव्ह इंजिनियरच्या त्या पत्नी होत्या. सुशिक्षित होत्या. सार्वजनिक कामांत हौसेनें भाग घेत. त्या आल्यावर मला बरं वाटल. गांवांत कांहीं असलं कीं मी एकुलती एक होतें. तर दुसरी ज़ोड मिळाली. प्रथम मुलींची इंग्रजी शाळा काढायची ठरली तर लोकांनीं मला अध्यक्ष बोलावलें होतें. तर मी त्यांना समजावून सांगितलें कीं मी आहेच पण ह्या नव्या विद्वान् बाई आल्या आहेत ह्यांच्याकडे जा. त्यांना अध्यक्ष करा. तुमचा फायदा होईल. त्यांची गांवांत ओळख वाढेल. त्याप्रमाणेंच झालं. पण माझ्याबद्दल मात्र त्यांचें मन शुद्ध नसे. कोठें पार्टी असली कीं त्यांना व्यवस्थेला बोलवीत. तें त्यांच्या अंगांत होतं. इंग्लिश, मिश्र हिंदु रीतीरिवाज कसे जमवायचे हें त्यांना कळे. तेव्हां मी पार्टीला असलें तरीं आजपर्यंत मी सगळ्यांबरोबर टेबलावर नुसती बसत असे. पोलिस ग्राउंडवरच्या पार्टीला गेलें तरी बटलर लोक ड्रिंकचे ट्रे घेऊन येत. पण ते अडाणी लोकसुद्धां माझ्यापुढें नुसती मान लववून पुढें जात. कधींहि ट्रे पुढें करीत नसत. त्यांना ठाऊक झालं होतं. पण ह्या बाई मग अशी गंमत करायच्या. टेबलापासून लांब दाराशीं एक खुर्ची व पुढें टी पॉय माझ्यापुढें ठेवीत. त्याच्यावर बशींत बदाम, काजू असे कोरडे जिन्नस ठेवीत. सगळ्या बायका टेबलाभोंवतीं गप्पा मारीत. मी एकटी राही पण मी न रागावतां बसें. एकदां पोलीस ग्राउंडवर पार्टी होती. मीं मुद्दामच इकडे तिकडे हिंडत होतें. तर कलेक्टरची बायको मिसेस् वुइलीस हिनें मला बोलावलें. ती म्हणाली, ‘ तूं आईसक्रीम घेतलंस कां ?’ तर भांडारकर म्हणाल्या ‘त्यांना

चालत नाहीं.' ती म्हणाली, 'कां ?' मी म्हटलं, 'त्यांत एग्ज असली तर नाहीं चालत.' त्यावर भांडारकर म्हणाल्या, 'तें नसलें तरी पण तें गड्यानें केलें आहे.' मी म्हटलं, माझ्या म्हशीचं दूध गडीच काढतो. तो जातीचा मराठा आहे!' मग तें बोलणें तितकेंच राहिलें. मग वुइलिस मला म्हणाली, 'काठीच्या राणीला बोलवायचें आहे. तुला बोलावली तर येशील कां ?' 'हो जरूर', 'पण काय खाशील'. 'दूध, फळं, प्युअर आईस्क्रीम हे सर्व चालतं!' 'ओ हो हो. मग पुष्कळच जिन्नस खातेस कीं! माझ्या बशांत चालेल?' मीं तेथें गेलें. पांच सहा बायका होतों त्यांत ह्याहि होत्या. बटलर आला त्याबरोबर ह्या एक टेबल बाजूला करणार होत्या. पण मिसेस वुइलीस म्हणाली, 'नो नो. मी तिला विचारलें आहे' मग टेबलावर बाकी जिन्नस आले व वुइलिसनीं माझ्यासाठीं आईस्क्रीम आणलं. मला म्हणाली, 'मी स्वतः हात धुवून लहान मशिनमध्यें प्युअर दुधाचं केलं आहे.' आणि आम्ही सर्वांनीं मजेंत खाल्लं. बायकांचे गैरसमज पुरुषांपर्यंत जातात. त्या अशा तऱ्हेनें नेहमीं माझ्याशीं वागत. जरूर असेल तेथें व नसेल तेथें माझें सोवळें निघे. त्यांनीं कन्याशाळेचें काम मनावर घेऊन ती बांधून दिली. त्याकरितां एक नाटक घेतलं होतं. तिकिट विक्रीकरितां भांडारकरसाहेब असिस्टंट इंजिनियरला घेऊन आले. मी स्वतःला म्हटलं, 'आपण जा. घ्यायचंच असलं तर एखादं वरचं घ्या!' पण त्यांनीं अगदीं प्रेमाचा आग्रह केला. 'आम्ही बोहणीलाच तुमच्याकडे आलों आहों. पुढल्या ओळीचीं दोन तिकिटं घेतलींच पाहिजेत.' यांनीं तिकिटं घेतलीं. मी जात नव्हतें. कां कोण जाणें पण मला वाटत होतं आपला अपमान होणार. पण स्वतः म्हणाले, 'एवीं तेवीं तिकिटं घेतलीं आहेत तर चल, तेथें काय वाकडं आहे!' आम्ही तिकिटं आहेत म्हणून वेळेवर गेलों तर आमच्या खुर्च्या दिसेनात. ह्यांनीं भांडारकरांना विचारलें तर पांचवी ओळ दाखवली. (शिवाय ह्यांनीं बजावलें होतें कीं मंडळींना आणा म्हणतां पण तारेच्या खुर्चीवर त्यांना बसतां येणार नाहीं. तर म्हणाले होते पुढच्या ओळींत चांगल्या खुर्च्या असतात.) तेव्हां स्वतः म्हणाले, 'तुम्ही पुढल्या ओळीची तिकिटं दिलीत ना ?' 'पण आयत्यावेळीं दर वाढवले.

आम्हांला विचारायचं किंवा अधिक पैसे आम्ही देऊंच असं समजून दोन खुर्च्या ठेवायच्या. गर्दी होऊं नये म्हणून आम्ही पांच मिनिटं टेकलों तर पुढच्या ओळींतले आपटे, कीर्तने वगैरे मला म्हणायला लागले, 'तुम्ही पुढें या आम्ही मागें बसतो.' कारण नेहमीं पहिल्या ओळींत बसणारीं आम्ही आज पांचव्या ओळींत कां असं त्यांनाहि वाटलं. पण आम्ही पांच मिनिटांनीं उठून घरीं आलों. आणखी एक प्रचार असा झाला कीं नव्या मुलींची मी टिंगल करते. त्या मुली माझ्याशीं मिसळून वागत नसत. वास्तविक पाहतां मी कोणाचीहि टिंगल कां करीन? खेळ खेळायची मला जन्माची संवय नाहीं. आतां शिकावेसें वाटत नसे. बॅडमिंटन शिकून खेळायइतका वेळ मला होतांच कुठें? तसेंच खाणें पिणें माझें माझ्यापुरतं. दुसऱ्याबद्दल मला रागलोभ ठेवायचं कारण काय? मला वाटे मी वयानें मोठी असल्यानें मुली दूरदूर राहतात. पण मग ही गंमत पुढें कळली.

जळगांवच्या म्हाळस वकिलांचे बंधु इंदूरला डॉक्टर होते. ते पुढें वारले पण त्यांच्या पत्नीनं नुसतं दुःखी आयुष्य काय घालवायचं म्हणून प्रौढ स्त्रियांना शिकवायचं काम हातांत घेतलं. त्याला यश येऊन तें वाढलं. गोड स्वभाव, गोड वागणूक, खऱ्या मनानं काम करण्याची इच्छा असल्यावर कां नाहीं असं होणार? त्यांचा क्लास मोठा झाला. तेव्हां त्याला कांहीं तरी नांव द्यावें म्हणून त्यांनीं मला बोलावलें. तेथल्या सहानुभूतीनें मदत करणाऱ्या ज्या बायका होत्या त्यांत कमलाबाईसाहेब किबे एक होत्या. त्यांना मी यायची कळल्यावर त्या म्हणाल्या, 'त्या आमच्याकडेच उतरतील!' व त्याप्रमाणें त्या मला घरीं घेऊन गेल्या. चार दिवस मजेंत गेले. तेथें व्याख्यान झालेंच. पण पुरुषांच्या सभेंतहि एक व्याख्यान झालें. पुन्हा दुसऱ्यांदा अहिल्याबाईंच्या उत्सवाकरितां बोलावलें तेव्हांहि मी गेलें होतें. उत्सवांतील व्याख्यान झाल्यावर म्हाळशीणबाईच्या शाळेचा वाढदिवस साजरा व्हायचा होता. आतां शाळेनें मोठें स्वरूप घेतलें होतें. समारंभाला दोन्ही महाराण्या आल्या होत्या. तेथें माझेंच व्याख्यान होतें. सौ. इंदिरा मासाहेबांना तें फार आवडलें. मग त्या आपल्याबरोबर मला

त्यांच्या बंगल्यावर घेऊन गेल्या. तेथें खूप गप्पा झाल्या व तेव्हांपासून त्यांची माझी ओळख झाली. पुढें जेव्हां जेव्हां मी इंदूरला गेलें तेव्हां तेव्हां त्या तेथें असल्या तर मी भेटायला जाई. त्या प्रेमानें बोलावीत. त्या हुषार, बुद्धिमान् असून धार्मिक वाचन पुष्कळ झालेलें व त्याच्यावर खूप मनन झालेलें अशा आहेत. धुळ्यास त्या दोनदां आल्या असतांना तेथें गांठ पडली. शिवाय माझी मुलगी कुन्दा हिला मी मॅट्रिक झाल्यावर कॉलेजांत घातलें नव्हतें. तर त्यावेळचे श्री. पाठकशास्त्री–आतांचे स्वामी शिवानंद भारती–यांच्याजवळ संस्कृत शिकवलें. तिला संस्कृत परीक्षेकरतां इंदूरला न्यावी लागे. अशी मी १९४२ पर्यंत चार वेळां गेलें. इंदूरला यायची ठरलें म्हणजे कमलाबाईसाहेबांना बातमी असे. कारण मी तेथेंच उतरायची. तेव्हां त्यांच्याबरोबर पण मासाहेबांकडे जात असे. निरनिराळ्या धार्मिक व सामाजिक विषयांवर मोठी गोड चर्चा चाले. पण पुढें माझें इंदूर बंद झालें. तशी त्यांची गांठहि पडली नाहीं. मी यायची कमळाबाईसाहेबांकडून कळलं म्हणजे त्याच संधीला असलेल्या एखाद्या समारंभाची मला अध्यक्ष करून घेत. मी नेहमीं किब्यांच्याकडेच उतरायची पण मग माझ्या चुलत बहिणीच्या मुलांनीं तक्रार केली, 'मावशी, तेथें लांब उतरतेस त्यामुळें भेटतां येत नाहीं.' मग दोनदां तेथें उतरलें व आसपासच्या माणसांना भेटलें. असो. कुन्दाच्या परीक्षा संपल्या व इंदूर बंद झालें.

धुळ्यास मावळणकरांची प्रथम ओळख झाली. मग ती वाढली. ते स्पीकर झाल्यावर पतिपत्नी दोघेजण धुळ्यास आलीं तेव्हां लोकांनीं त्यांचा सत्कार केला. वाग्देवतामंदिराचे अध्यक्ष म्हणून किंवा अशा निरनिराळ्या कारणांनीं तीं दोघं यायचीं. दोन चार दिवस कामाप्रमाणें आमचेकडे राहचचीं. त्यामुळें मुलांबाळांपासून स्नेह वाढला.

केशवराव सोनाळकर आले म्हणजे आम्हां सर्वांनाच आनंद व्हायचा. मुलं 'मामा मामा' म्हणून नाचायचीं. 'हीच मुलीची आई' ह्या माझ्या नाटकाकरितां ते व अंजारिया आले होते. नाटक पाहून आल्यावर म्हणाले, 'ताई, आतां तुम्ही प्रत्येक गोष्टीवर नाटक लिहा.' ते जायला लागले कीं,

आम्हांला विचारायचं किंवा अधिक पैसे आम्ही देऊंच असं समजून दोन खुर्च्या ठेवायच्या. गर्दी होऊं नये म्हणून आम्ही पांच मिनिटं टेकलों तर पुढच्या ओळींतले आपटे, कीर्तने वगैरे मला म्हणायला लागले, 'तुम्ही पुढें या आम्ही मागें बसतो.' कारण नेहमीं पहिल्या ओळींत बसणारीं आम्ही आज पांचव्या ओळींत कां असं त्यांनाहि वाटलं. पण आम्ही पांच मिनिटांनीं उठून घरीं आलों. आणखी एक प्रचार असा झाला कीं नव्या मुलींची मी टिंगल करते. त्या मुली माझ्याशीं मिसळून वागत नसत. वास्तविक पाहतां मी कोणाचीहि टिंगल कां करीन ? खेळ खेळायची मला जन्माची संवय नाहीं. आतां शिकावेसें वाटत नसे. बॅडमिंटन शिकून खेळायइतका वेळ मला होतांच कुठें ? तसेंच खाणें पिणें माझें माझ्यापुरतं.दुसऱ्याबद्दल मला रागलोभ ठेवायचं कारण काय ? मला वाटे मी वयानें मोठी असल्यानें मुली दूरदूर राहतात. पण मग ही गंमत पुढें कळली.

जळगांवच्या म्हाळस वकिलांचे बंधु इंदूरला डॉक्टर होते. ते पुढें वारले पण त्यांच्या पत्नीनं नुसतं दुःखी आयुष्य काय घालवायचं म्हणून प्रौढ स्त्रियाना शिकवायचं काम हातांत घेतलं. त्याला यश येऊन तें वाढलं. गोड स्वभाव, गोड वागणूक, खऱ्या मनानं काम करण्याची इच्छा असल्यावर कां नाहीं असं होणार ? त्यांचा क्लास मोठा झाला. तेव्हां त्याला कांहीं तरी नांव द्यावें म्हणून त्यांनीं मला बोलावलें. तेथल्या सहानुभूतीनें मदत करणाऱ्या ज्या बायका होत्या त्यांत कमलाबाईसाहेब किबे एक होत्या. त्यांना मी यायची कळल्यावर त्या म्हणाल्या, 'त्या आमच्याकडेच उतरतील !' व त्याप्रमाणें त्या मला घरीं घेऊन गेल्या. चार दिवस मजेंत गेले. तेथें व्याख्यान झालेंच. पण पुरुषांच्या सभेंतहि एक व्याख्यान झालें. पुन्हा दुसऱ्यांदा अहिल्याबाईंच्या उत्सवाकरितां बोलावलें तेव्हांहि मी गेलें होतें. उत्सवांतील व्याख्यान झाल्यावर म्हाळशीणबाईंच्या शाळेचा वाढदिवस साजरा व्हायचा होता. आतां शाळेनें मोठें स्वरूप घेतलें होतें. समारंभाला दोन्ही महाराण्या आल्या होत्या. तेथें माझेंच व्याख्यान होतें. सौ. इंदिरा मासाहेबांना तें फार आवडलें. मग त्या आपल्याबरोबर मला

त्यांच्या बंगल्यावर घेऊन गेल्या. तेथें खूप गप्पा झाल्या व तेव्हांपासून त्यांची माझी ओळख झाली. पुढें जेव्हां जेव्हां मी इंदूरला गेलें तेव्हां तेव्हां त्या तेथें असल्या तर मी भेटायला जाई. त्या प्रेमानें बोलावीत. त्या हुषार, बुद्धिमान् असून धार्मिक वाचन पुष्कळ झालेलें व त्याच्यावर खूप मनन झालेलें अशा आहेत. धुळ्यास त्या दोनदां आल्या असतांना तेथें गांठ पडली. शिवाय माझी मुलगी कुन्दा हिला मी मॅट्रिक झाल्यावर कॉलेजांत घातलें नव्हतें. तर त्यावेळचे श्री. पाठकशास्त्री–आतांचे स्वामी शिवानंद भारती–यांच्याजवळ संस्कृत शिकवलें. तिला संस्कृत परीक्षेकरतां इंदूरला न्यावी लागे. अशी मी १९४२ पर्यंत चार वेळां गेलें. इंदूरला यायची ठरलें म्हणजे कमलाबाईसाहेबांना बातमी असे. कारण मी तेथेंच उतरायची. तेव्हां त्यांच्याबरोबर पण मासाहेबांकडे जात असे. निरनिराळ्या धार्मिक व सामाजिक विषयांवर मोठी गोड चर्चा चाले. पण पुढें माझें इंदूर बंद झालें. तशी त्यांची गांठहि पडली नाहीं. मी यायची कमळाबाईसाहेबांकडून कळलं म्हणजे त्याच संधीला असलेल्या एखाद्या समारंभाची मला अध्यक्ष करून घेत. मी नेहमीं किब्यांच्याकडेच उतरायची पण मग माझ्या चुलत बहिणीच्या मुलांनीं तक्रार केली, ' मावशी, तेथें लांब उतरतेस त्यामुळें भेटतां येत नाहीं.' मग दोनदां तेथें उतरलें व आसपासच्या माणसांना भेटलें. असो. कुन्दाच्या परीक्षा संपल्या व इंदूर बंद झालें.

धुळ्यास मावळणकरांची प्रथम ओळख झाली. मग ती वाढली. ते स्पीकर झाल्यावर पतिपत्नी दोघेजण धुळ्यास आलीं तेव्हां लोकांनीं त्यांचा सत्कार केला. वाग्देवतामंदिराचे अध्यक्ष म्हणून किंवा अशा निरनिराळ्या कारणांनीं तीं दोघं यायचीं. दोन चार दिवस कामाप्रमाणें आमचेकडे राहयचीं. त्यामुळें मुलांबाळांपासून स्नेह वाढला.

केशवराव सोनाळकर आले म्हणजे आम्हां सर्वांनाच आनंद व्हायचा. मुलं ' मामा मामा ' म्हणून नाचायचीं. ' हीच मुलीची आई ' ह्या माझ्या नाटकाकरितां ते व अंजारिया आले होते. नाटक पाहून आल्यावर म्हणाले, ' ताई, आतां तुम्ही प्रत्येक गोष्टीवर नाटक लिहा.' ते जायला लागले कीं,

' ताई येतों म्हणत. ' तें म्हणतांना त्यांच्या डोळ्याला पाणी येई, माझ्याहि येई. स्वतः फक्त हंसत.

अंजारिया शेठ नाटकाला आले तसे कुसुमच्या लग्नाला पत्नीसह आले होते. जळगांवाच्या मुळजी जेठा मिलचे अंजारिया एजंट. तेव्हांचा स्नेह पण तो अद्याप आहे. एकदां रामेश्वराकडे जातांना मुलांबाळासुद्धां मोठ्या मोटारीनें येऊन उतरून गेले. आमचीं मुलं व त्यांचीं मुलं अगदीं प्रेमानें एकत्र खेळतांना पाहून त्यांना फार आनंद झाला. अजून मुंबईस बचुबेन अंजारिया भेटतात.

ह्या आनंदाच्या वातावरणांतच बाबा पहिली परीक्षा उतरून इंटरसायन्सला जायचा ठरलें. तेव्हां त्याला इंजिनियरिंगची आवड लहानपणीं दिसे म्हणून तिकडे घालावयाचें तर कराचीच्या कॉलेजांतच पाठवावें असें ठरलें. तिथें इंटरसायन्स झाला तर तिथल्या इंजीनिअरिंग कॉलेजांत चटकन् प्रवेश मिळेल असें वाटलें. शिवाय आमचा तात्या गोखले तिथल्या इंजिनियरिंग कॉलेजचाच प्रिन्सिपॉल होता. तेव्हां त्याला तेथें ठेवावा असें ह्यांचें मत होतें तर मी म्हणत होतें, 'पुण्यांतच राहूं दे. बुद्धि व योग असला तर तेथेंच वर येईल!' पण ह्यांना तें पटलं नाहीं. तो कराचीला गेला व तेथें त्याला एक देशभक्त मित्र भेटला. त्याच्या संगतींत त्यानें साम्यवाद वाचण्यांत वेळ घालवला व नापास झाला. पुन्हा दुसऱ्या वर्षी बसला. पण लक्ष इतर वाचनांत असल्यामुळें पास क्लासमध्यें आला व इंजिनिअरिंग-मध्यें प्रवेश मिळाला नाहीं. मग कराची सोडून आला. माझी प्रकृति बरीच बिघडली होती. म्हणून आम्हीं लोणावळ्यास बंगला घेतला होता. सर्वच गेलों होतों. नातू, तात्या, जोशी, चांदोरकर हीं माणसें सहकुटुंब राहून गेलीं. नुसता आला गेला होताच. तेथेंच भाऊ जाऊन आईला घेऊन आला. ती दोन दिवस होती. मग सगळीं धुळ्याला गेलीं. आम्ही दोघं मोटारनं गेलों. रस्त्यांत नाशकास महाराजांचा मुक्काम होता. तेथें दर्शन घेतलें व धुळ्यास आलों. बाबा नागपूरला एल्. एम्. पी. कडे जातों म्हणाला. मी म्हटलें, ' तूं एल्. सी. पी. एस्. कडे जा! ' तर त्यानें उलटें सुलटें बोलून ह्यांना पटवलें. भाऊ एम्. ए. झाला होता. पण तो

'मलां मास्तर व्हायचें' म्हणून बसला होता. शांताबाई बाळंतपणाला आली होती. तिला मुलगी झाली. नांव नलिनी ठेवलें. हल्लीं ती धनबादला डॉक्टरीण आहे. ती पुण्याची एम्. बी. बी. एस्. आहे.

शांता बाळंतीण असतांना घरांत आतेबाईंना सोबत होती म्हणून मी नागपुरास माईचें नवें घर पाहायला गेलें. बरोबर भाऊ होता. घर छान झालं होतं. ती सत्तेच्या घरांत रहायला आली त्यामुळें आनंदांत होती. तेथें रावसाहेब गोपाळराव मोहनी, सुशीलाबाई मोहनी वगैरे, भेटलीं. त्यांची एक बहीण थेरगांवकरांकडे दिलेली होती. ती मला बहीण मानी म्हणून गोपाळरावहि वहिण म्हणतात. तसेंच प्रो. बेहेरे बहिण मानीत. त्यांनीं त्यांच्या पटवर्धन हायस्कूलमध्यें माझें व्याख्यान केलें. मी त्या दोघांना म्हटलें, ' कोठें मास्तरची जागा झाली तर आमच्या भाऊला बघा.' मग मी परत आलें. योगायोग असा कीं थोडयाच दिवसांत पटवर्धन हायस्कुलांतच जागा मिळून भाऊ नागपुरास गेला. बाबा एल्. एम्. पी. करतां नागपुरास गेला. अक्का जयपुरास गेली व एक दिवस बाबा कॉलेज सोडून सत्याग्रहांत गेल्याचें फाटकांचें पत्र आलें. ह्यांना वाईट वाटलें. बाबा हट्टी आहे ऐकणार नाहीं हें ठाऊक होतें. पण सगळें म्हणाले कीं एकदां भेटून बघा,आपण प्रयत्न केला नाहीं असें होऊं नये. म्हणून स्वतः त्याला नगरला जाऊन भेटून आले एवढेंच.आतां आम्ही भाऊच्या बिऱ्हाडाचा विचार करीत होतों. भाऊ नागपुरास नोकरीला लागला म्हणून माईला फार आनंद झाला होता. तिला वाटे एक भाऊ तरी जवळ आला. ही त्याला घर बघायच्या विचारांत होती. तोंच त्याच्या डोक्यांत सत्याग्रह शिरला व तोहि नोकरी सोडून आला नि बाबाबरोबर नगर भागांत सत्याग्रहाला गेला. दोन्ही मुलगे सत्याग्रहाला गेलेले पाहून ह्यांच्या मनाला धक्का बसला. वय झालेलं, खालची मुलं लहान. बरं महिना २००–३०० उत्पन्न येईल एवढी इस्टेटहि जवळ नाहीं. हीं मुलं स्वतंत्र होतील व आपला भार हलका करतील असें ह्यांना वाटे. त्याचा परिणाम त्यांना ताप येऊं लागला. ते घाबरले. त्यांनीं तात्यासाहेब केळकर, गोखले तात्या, खांबेटे ह्यांना तारा केल्या. वुइल केलें. दादा खांबेटे आले होते ते मला म्हणाले,

' वुइल वाचलेंस का ?' मी म्हटलें. 'माझा संसार जेव्हां संपेल तेव्हां वुइलला काय करायचें? पुरुष असेपर्यंत आमचा संसार असतो. तोंपर्यंत हावरटासारखें सगळें लागतें. हौस मौज व्यवहार देणीं घेणीं सर्व असतें. तोंवरच लोक बरं वाईट म्हणतात. मग काय कोण हंसतो व हंसल्याची किंमत काय ? साडेतीन हात देहाला अन्न, वस्त्र, कोणीही देतो !'

पण मग ह्यांना उतार पडला. तात्या आले व चार दिवस राहून गेले. गांधीजींनीं तह केला. मुलं परत आलीं. जळगांवास खादी प्रदर्शन झालें तेथें काम करायला भाऊ गेला. एम्. ए, कारकून मिळाल्यावर व त्यांतले त्यांत आस्थेने करणारा, मग काय सर्व लोक खुष. मग त्यांनीं भाऊला 'खादी दुकान काढतों आहोंत येतां कां ?' असें विचारलें. त्यावेळचें तें वेड होतें. तो 'हो' म्हणाला. पण पंधरा रुपये पगार म्हटल्यावर मुकाट्यानें परत आला. मग नागपुरला त्यानें देशी मालाचें दुकान घातलें व सहा महिन्यानें परत सर्व आवरून आला. दुकानाच्या वेळेस स्वत म्हणत होते, 'ह्याला तें कसं जमणार ?' मी म्हटलें, 'विद्येला दिलेत तसे आणखी थोडे पैसे द्या. नाहींतर जन्मभर वाटत राहील मी दुकान काढून देशाचा उद्धार करून देशभक्त झालों असतों !' त्याला ह्यांनीं माझ्यासाठीं पैसे दिले. मुंबईस बाबाची व सदुकाकांची गांठ पडली. बोलतां बोलतां ते म्हणाले, 'एखादा प्रामाणिक मनुष्य मिळाला तर मला हवा आहे !' पण बाबाच्या डोक्यांत पुन्हा इंटर होऊन आतां मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत जायचें होतें. तो त्याप्रमाणें फर्ग्युसनला गेला व मुंबईची नोकरी भाऊनें धरावी असें ठरलें. सुरुवात ६० रु. ची होती. मुंबईच्या राहणींत तेवढ्यांत कसें भासणार? मी म्हटलं घरभाडं मी देईन. कारण नुसतें रिकामें बसून देश-भक्तीच्या नव्या नव्या योजना आंखण्यापेक्षां उद्योग बरा व स्वत: यांच्या मनाला शांति मिळेल. बाबाचे हे उद्योग चालले असतांना मिरजेच्या हायस्कूलचा ५० वर्षांचा वाढदिवस झाला. त्याला आम्ही दोघं गेलों. स्वत: तेथें मामंजींच्या नांवानें लहानशी स्कॉलरशिप ठेवली. माझें एक व्याख्यान झालें व कोल्हापूरला गेलों. पूर्वीं सासूबाईंनीं मनूचा नवस केला होता तेव्हां त्याला घेऊन घाईघाईनें येऊन गेलों होतों. आतां जरा

स्वस्थतेनें गेलों. डॉ.बाळकृष्ण यांच्या पत्नी दयाबाई यांनीं आम्हांला पुष्कळ हिंडवलं. पुढें कोल्हापूरला साहित्य संमेलन भरलं. मी जायची ठरलें होतें. त्याप्रमाणें पटवर्धन इंजिनियरांना पत्रहि गेलें होतें. पण किबे, पति-पत्नी मोटारनंच येथें उतरून पुढें जायचीं होतीं म्हणून मी थांबलें होतें. त्यांनीं विचारलें,'तुम्ही नाहीं कां जाणार?' मी म्हटलें, 'सकाळच्या गाडीनें जाईन!' मग म्हणाले,'आमच्या बरोबरच चला.' त्यांच्याबरोबर नाशिक करून पुण्यास गेलों.रस्त्यांत देव महाराज आमच्याबरोबर पुण्यापर्यंत आले.तेथे महाराजांचे दर्शन घेऊन पुढें गेलों. पटवर्धन मंटळी स्टेशनवर येऊन गेलीं. मी आले नाहीं असें समजून घरीं गेलीं. मी ह्यांच्याबरोबरच उतरले.तेथें इचलकरंजी-करांच्या बंगल्यांत मुक्काम होता. तेथें असतांना अंबाबाईचें दर्शन घेतलें. जमखिंडीच्या राणीसाहेब व विशाळगडकर यांच्याकडे जेवावयास गेलों. मी पटवर्धनांकडे जाऊन आले. मग इचलकरंजीला गेलों. तेथें एक दिवस होतों. कुरुंदवाड व नरसोबाची वाडी करून आलों. मी धुळ्यास उतरलें. किबे पतिपत्नी पुढें गेलीं.

पुढें कुसुमचें लग्न ठरलें व तें चांगल्या प्रकारें थाटांत पार पडलें. पुष्कळ आप्त इष्ट स्नेही सोबती जमले होते. पुढें बाबा मुंबईस मेडिकल-कडे गेला. नंतर त्यानें तेंहि सोडून दिलें व कामगारांकरतां प्रत्यक्ष काम करायचें ठरवलें. बाळ मॅट्रिक पास झाला व मुंबईस सेंट झेवि-यरला गेला. भाऊचें बिऱ्हाड होतेंच. शेजारींच खोली घेतली. इकडे मी घरांत संसार करतच होतें. कमा आजारी, बाबू लहान होता. गांवांत मी जेलची व्हिजिटर, बँकेची मेंबर, लोकलबोर्डांत मेंबर, हॉस्पिटलची व्हिजिटर होतेंच. उषा कुन्दा शिकत होत्या. त्याच अदमासांत भिडे कलेक्टरसाहेबांची बदली होऊन ते धुळ्याचे कलेक्टर झाले. सहकारी बँकेचे स्वतः पुष्कळ वर्षं चेअरमन होते, भिडेसाहेब त्या खात्याचे अधि-कारी होते. म्हणून ओळख होती. ती आतां वाढली. मिसेस् भिडयांची व माझी दाट मैत्री झाली. मुलींची येणीं जाणीं, बाळ व कुसुम यांचा एकत्र अभ्यास. मावशी सकाळीं रोज फिरायला जात. तेथून आल्या म्हणजे आमच्या येथें त्यांचा ताज्या दुधाचा चहा व्हायचा. गप्पा करून जायच्या.

कोठेंहि सभा, हळदीकुंकू वगैरे असलें तरी एकट्या जात नसत. आम्ही मिळून जायच्या. त्या तरी माझ्याकडे येत किंवा मी तरी त्यांच्याकडे जाई. कुसुमच्या लग्नाला त्या होत्याच. पुढें त्यांच्या कुसुमचें लग्न ठरलें व तें पुण्यास झालें. आम्ही दोघं गेलों होतों. आतांचे पोलिस कमिशनर कानिटकर ह्यांना ती दिली. ते नुकतेच परीक्षा पास होऊन असिस्टंट डी. एस्. पी. झाले होते. त्यांची आमची नंतर दोन ठिकाणीं एकत्र गांठ पडली. एकदां धुळ्याला ते डी. एस्. पी होऊन आले तेव्हां व पुन्हा जळगांवास आल्यावर ते बदली होऊन तेथें आले तेव्हां. ती वर्षे आनंदाचीं गेलीं. कुसुमताई 'मावशी, मावशी,' करून यायची. विसुभाऊसुद्धां जसे दिसायला उमदे आहेत तसेंच मनानेंहि आहेत. ह्यांनासुद्धां त्या उभयतांबद्दल कौतुक होतें.

बाबा मेडिकल कॉलेज सोडून नागपुरास 'भाईंच्या' कामांत मदत करायला गेला. तेथें मजुरांत त्यानें खूप काम केलें. लोकांना तो प्रिय होऊं लागला तेंव्हां स्थानिक भाईंना तें खपेना. जगाचा उद्धार करायला निघालेल्या भाईला म्हणा, देशभक्ताला म्हणा, दुसऱ्याचा बोलबाला झालेला पटत नाहीं. अपवाद सोडायचे. मग तेथें तो आजारी पडला अन् पांचगणीला गेला व तेथून तात्या गोखल्यांबरोबर-मोटारीनें बंगलोरपर्यंतचा प्रवास करून आला व पुन्हा मुंबईस येऊन ह्यांना म्हणाला, 'मी कॉलेजांत इंटर सायन्स बी ग्रुपला जातो.' बाबा पहिल्यापासून हुशार. त्याला दोन स्कॉलरशिपा लहानपणीं मिळाल्या होत्या. गणित चांगले तेव्हां माझी इच्छा होती कीं त्यानें इंटर अगर बी.ए. होऊन आय्. सी.एम्. ला जावें. पण तेव्हां इंजिनियरिंगचा नाद घेतला व जी गाडी रुळावरून घसरली ती घसरलीच. पण रागावून काय फायदा ? कांहीं तरी पोटाचें साधन हवें ना ? हे म्हणाले, 'पैसे मला मिळताहेत तोंपर्यन्त घ्या.' बाळ दोन वर्षे झेविअरला व पुढें पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजांत गेला. मनोहर इंदूरचीं दोन वर्षें करून पुण्यास आला नि तात्यासाहेबांच्या घरीं राहून कॉलेजांत गेला. भाऊ नोकरींत होता. मी नागपुरास मॉरिस कॉलेजला अध्यक्ष म्हणून गेलें, कन्याशाळेचीं अध्यक्ष म्हणून गेलें, वर्ध्याला ऑल इंडियाच्या प्रांतिक परिषदेची अध्यक्ष म्हणून गेले. पुण्यास अखिल भारतीय महिला परिषदेला गेलें, तेव्हां प्रथम

बोलावणें, स्वागताध्यक्ष म्हणून होतें. स्वत:हि यायचे होते म्हणून आम्ही मोटारनं गेलों. जातांना महाराजांच्या दर्शनाला गेलों. तशी मला पाहून म्हणतात, 'या अध्यक्ष, या!' मी नमस्कार करून म्हटलें,' नाहीं, महाराज, मी स्वागताध्यक्ष आहे !' 'बरं, बरं !' म्हणाले. पुढें सभा झाली. उमाबाई सहस्रबुद्धयांची इच्छा एखादी राणी अध्यक्ष असावी अशी होती ती मिळेना. बायका चिडल्या कारण सकाळीं सभा पण अध्यक्षाचा पत्ता नाहीं. त्यांनीं मला उचलून अध्यक्षाच्या खुर्चीत घातलें. टाळया वाजवल्या. सभेला खूप गर्दी होती. डॉ. कुर्तकोटी, मालवीयजी वगैरे हिंदुमहासभेच्या अधिवेशनासाठीं आलेले सगळे लोक व बायका हजर होत्या. मीं माझें भाषण वाचलें. आमच्या येथल्या तर सगळयाच होत्या. ताई व अक्काच्या (कमलाबाई देशपांडे ) सासुबाई काकी ह्यांना जो आनंद झाला तो विचारूच नका. काकी घरीं येऊन ताईंना म्हणाल्या 'आज वहिनींची दृष्ट काढा.' मला त्या वेळेस एक जुना प्रसंग आठवला. खामगांवास बायकांचें व्याख्यान गणपति उत्सवांत करावयाचें प्रथमच ठरलें. पुढारी बायकांत तात्यासाहेब कोल्हटकर यांचें कुटुंब म्हणजे वहिनी होत्या. त्यांनीं जळगांवास मनुष्य पाठवून मला एक दिवस या म्हणून बोलावलें. माई फडके सुद्धां तेथें होत्या मी सकाळीं निघून दुपारीं तेथें पोचलें. मग त्यांनीं अक्षतीसारखी बोलावणीं केलीं. जेवल्यावर मला म्हणतात, 'वन्सबाई, आज आमच्या गावांत व्याख्यान द्यायचें बरं कां ?' 'काय?' 'खरंच, त्याकरितां आणलं तुम्हांला !' आणि मग रात्रीं घरीं आल्यावर त्या माईंना म्हणतात, 'वन्सं वहिणीची दृष्ट काढली पाहिजे.' आणि खरंच मी सहज झोंपाळयावर बसलें होतें तेथें येऊन काढली कीं. जगाविरहित का गोष्ट केली ? पण भाबडें प्रेम माणसाला वेडें करतें नाहीं का ?

सभा आटोपली. पुण्याचा मुक्काम हलवायचा ठरला. उद्यां निघायचें म्हणून मी आज महाराजांना भेटायला गेलें. नमस्कार करून बसलें. जाणार वगैरे म्हटलें. मग गादीखालचें वर्तमानपत्र काढून माझ्यापुढें केलें. 'एवढें वाचून दाखव बरं.' मी हातांत घेतलें तों तो केसरी होता. व त्यांनीं काढून दिलेलें पान बघतें तर माझा फोटो व खालीं अध्यक्षीय

भाषण असं लिहून सुरुवात होती. तें पाहून मीं पत्र ठेवलें. तशी म्हणाले, 'तू स्वागताध्यक्ष होतीस ना ?' मी लाजलें. मी प्रथम आलें तेव्हां त्यांनीं मला 'या अध्यक्ष' म्हटलें होतें तें आठवलें.

१९३३ सालीं स्वत:च्या उजव्या डोळ्यांत एकाएकी भयंकर वेदना होऊं लागून शेवटीं मुंबईस जाऊन ऑपरेशन करून घ्यावें लागलें. त्याच सुमारास मुंबईसच माझे वडील निधन पावले.

पुढें थोडे दिवसांनीं आईला बदल म्हणून धुळ्यास आणलें. वडील गेल्यानंतर ती आपल्या बहिणीकडे गेली होती ती मुंबईस परत जातांना माझ्याकडे उतरली. ती बरेच दिवस माझ्याकडेच होती. मग तिच्याजवळ बाबू, कमा ठेवून आम्ही दोघं कराचीला गेलों. उषा, कुन्दा व नोकर घरांत होतेच. आम्ही धुळ्याहून नरडाण्याला आलों व अमळनेर गाडींत बसलों. नंदुरबारला मोडक वकिलांची मुलगी, आमची अनुताई स्टेशनावर चहा घेऊन हजर होती. तेथें वेटिंगरूममध्यें चहा फराळ केला. पुढें संध्याकाळीं सुरतला आलों. तेथें तात्या गोखल्यांचे मित्र इंजिनियर पारेख हे शिपाई घेऊनं हजर. आमचे सामान काढून शिपायाच्या ताब्यांत देऊन आम्हाला मोटारींतून घेऊन गेले व समुद्रकांठानें मोटार नेऊन बंगल्यावर गेलों. तेथें जेवून रात्रीं त्यांनीं आणून पुन्हा अमदाबादच्या गाडींत बसवलें. तिकिटें थेट कराचीपर्यंतचीं सेकंडचीं काढलेलीं होतीं. सकाळीं तेथें त्यांचे दुसरे इंजिनियर मित्र भट्टाचार्य आले बंगल्यावर घेऊन गेले. तेथें त्या नवरा बायकोनीं खूप अगत्यपूर्वक चौकशी करून चहापाणी आंघोळी सर्व केलें. तेथें तात्या मुंबईहून येऊन भेटला तेथून आम्ही मिळून कराचीला गेलों. हैद्राबाद स्टेशनावर एक इंजिनियर साहेब दोन तीन पट्टेवाले चहा फराळाचे ट्रे हातांत घेतलेले घेऊन आले. तात्या थट्टेनें मला म्हणाला, 'आईसाहेब, सोवळ्याचा चहा तयार आहे बरं का ?' मग कराची आली दोन तीन मोटारी होत्या. घरीं आलों तों सूनबाई चहाची तयारी करून दारांत उभी. काय करील बिचारी ! तिला ठाऊक कीं खुळचा सासूबाई कोठेंहि चहा प्यायल्या नसतील. चार दिवस तेथें मजेंत गेले. सून, नातवंडं सर्व तैनातीला. रोज नवीं नवीं ठिकाणें दाखवलीं. बाजार पाहिले. मग तेथें

मिश्र समाजापुढें माझें व्याख्यान झालें, आणि तेथून परतलों. येतांना द्वारकेकडून यावें असें वाटत होतें. पण नोकर बरोबर नव्हता. तेव्हां ह्यांना त्रास होईल म्हणून मी नाकारलें. तात्यानें मला बोटीची भीति वाटले अशी थट्टाहि केली. पण आम्ही गेल्या रस्त्यानें आलों. परत आल्यावर मग आई मुंबईस परत गेली.

## गेले ते दिवस ! : ७

दिवस जातच होते. माई, आक्का वरचेवर माघारपणाला येतच होत्या. इंदिरा व भाऊ मधून मधून यायची. कमा थोडी थोडी सुधारत होती. उषा कुंदा मोठ्या झाल्या होत्या.संसारांतल्या माझ्या गोष्टी होतच होत्या. कारण त्याची जरूरहि होती व मला आवडतहि. स्वतः सुद्धां सुधारकी मताचे मुळींच नव्हतें. त्यामुळें श्राद्ध,पक्ष,देवधर्म चालत. त्यांतहि बराच वेळ जाई. आला गेला, पैपाहुणा असे. प्रो. बेहेरे एकदां येऊन चार दिवस राहून गेले. वेळ मजेंत गेला. दामुअण्णा ओक हे वाग्देवता मंदिरांत कामाला येत ते मग कामाप्रमाणें चार सहा दिवस रहात त्यामुळें ते मग मुलांचें मामा झाले. धाकटी कमा त्यांना 'माझें मामा' म्हणायची. मग उषाताई नागपुरास कॉलेजांत होती. तेव्हां जरी आमचे फाटकांचें घर तेथें होतें तरी त्यांनींहि तिचे सख्या मामासारखें कौतुक केले.

पापड, पापड्या, कुरडया, शेवया ह्यांत मी जशी रंगे, तशीच मुलींची भातुकली, कांदेनवमी, मुलांचा गणपति ह्यांतहि रंगत असें. संक्रांत, हलवा चैत्रगौर ह्यांचे हळदीकुंकू वगैरे थाटांत होत असें. दसरा व संक्रांतीचा रात्रीचा पुरुषांचा सोनं व हलवा देण्याचा समारंभहि छान होई. गांवांत सरस्वती-माला निघाली तिची धामधूम महिनाभर चाले. एखादा वक्ता आमच्याकडे उतरे. अशी गाडी चालली असतांना ३६ सालीं बाळ आजारी पडून आला. त्याचा ताप थांबेना. पुण्यास इंजेक्शन्स वगैरे झालीं. मग येथें औषध सुरू केलें. मधें मी पालघरला जाऊन आले दोन दिवस. मग त्याला नाशकास नेले व तेथले त्यावेळचे नामांकित वैद्य देवधरशास्त्री यांना दाखवला. त्यांच्या औषधानें बरीच सुधारणा झाली पण ताप थांबेना. केसकर महा-राज तेथें होतें त्यांना भेटलों. त्यांची आमची ओळख धुळ्यालाच झाली

होतीं. पाटणकर व पटवर्धन ह्यांची मदत होत होती. दाणींच्या बंगल्यांत होतों. तीं माणसें चांगलीं होतीं. तेथेंच नागपूरचे लॉ रिपोर्टरचे चितळे येऊन भेटून दोन दिवस राहून गेलें. आम्ही नाशकास आलों तेव्हां येतांना एक औषध मी आणलं होतं. तें घेतोस कां म्हटलें तर बाळ म्हणाला, 'आलों आहों तर वैद्याचं घेऊं.' म्हणून तसंच ठेवलं होतं. शास्त्रीबोवा म्हणाले, जर ताप थांबत नाहीं तर तुम्ही दुसऱ्या कोणाला दाखवा. तेव्हां पुण्यास भडकमकरांना दाखवावें नाहींतर पुढें मुंबईस जावें असें ठरलें. आम्ही दोघं पुण्यास निघालों. डॉ. भडकमकर भेटले तर त्यांना विचारून 'आणा' म्हणाले तर न्यायचा, नाहींतर मुंबई. जातांना मी म्हटलं, 'त्या मी आणलेल्या गोळ्या दोन दिवस घे. आतां वैद्यांचे औषध नाहींतर ह्या घे!' म्हणून सकाळीं गोळ्या देऊन निघालें. दुपारीं मुलं खेळत बसलीं. बाराला गोळ्या दिल्या. ते दिवशीं ताप आला नाहीं. संध्याकाळीं घेतल्या. आम्हीं दोन दिवसांनीं निघालों. तेव्हांच भिडयांच्या कुसुमताईंचें लग्न झालें. प्रो. आळतेकर लग्नाला आले. तेहि आमच्याबरोबर नाशकास आले. घरीं येतों तों बातमी, ताप आला नाहीं. मग चार दिवस वाट पाहिली. औषध सुरू होतें व ताप आला नाहीं. भंडारदरा पाहिला, गांवांत विंचुरकर, चांदवड-कर यांच्याकडे गेलों. एक दोन व्याख्यानें झालीं व आम्ही धुळ्यास परत यश घेऊन आलों. बाळ पुन्हां कॉलेजांत गेला. इंदूर साहित्यसंमेलनाच्या वेळेस राहिलेले महेश्वर-माडवगड आम्ही दोघं आणि प्रतापशेठ व शेठाणी असे मिळून केलें. दोन मोटारी घेऊन आम्ही गेलों होतों. महेश्वरचें अहि-ल्याबाईचें देव देवतांचे वैभव व नर्मदा पाहिली. मांडवगडचा जहाजमहाल पाहिला. एका इमारतीसमोर सडकेवर उभं राहून आपण जें बोलावें तेंच ऐकूं येतें तें पाहिलें व अशा तऱ्हेनें हा प्रवास संपला.

मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर म्हसकर हे आमचे जुने स्नेही. ते आणि त्यांचे बंधु यांचा तात्या गोखल्यांशीहि स्नेह फार. त्यांच्या बोलवण्यावरून ब्राह्मण सभेंत चार दिवस जो समारंभ व्हायचा होता त्याची अध्यक्ष म्हणून गेलें. तेव्हां त्यांच्याकडेच उतरले होते. सर्वांनींच माझी व्यवस्था उत्तम ठेवली. डॉक्टरांची भावजय विठाबाई तर सुनेच्या वरताण वागल्या. चार दिव-



२४३८०

सांत एका प्रदर्शनाचें उद्घाटन, एक मुलांच्या औषधालयाचें उद्घाटन, तेथें नर्सची परीक्षा पास झालेल्यांना सर्टिफिकिटें देणें असे कार्यक्रम झाले. एकदां अवंतिकाबाईंच्या हिंद माहिलासमाजाची अध्यक्ष म्हणून गेलें. पाठारे प्रभु समाजांत व्याख्यान झालें. पुन्हां एकदां हिंद महिला समाजांत व्याख्यान झालें.

पुण्याच्या नातवंडांच्या मुंजीला गेलों होतों. मुंजी छान झाल्या. पुढें बाबूची मुंज धुळयास झाली. त्याच्या आधींच भिडे मावशी बदली होऊन गेल्या होत्या. पण ते असतांनाच भांडारकरांची बदली होऊन करंदीकर आले होते. व त्यांचा आमचा इतका घरोबा 'वाढला कीं भिडे मावशी गेली तोंपर्यंत ही नवी मावशी तयार झाली. भिडे मावशी असतांना तीन वर्षं खूप मजा होती. त्यांनीं प्रांतिक महिला परिषद भरवली त्याच्या अध्यक्ष म्हणून इंदूरच्या चंद्रावती महाराणी आल्या होत्या. बरोबर कमळाबाईसाहेब किबे होत्या. त्यांचा मुक्काम भिडे साहेबांकडे होता. भिडे साहेबांना माणसाची फार आवड आहे. आला गेला बडा पाहुणा जेवायला वगैरे त्यांच्याकडे असे. राजवाडे मंडळाच्या उद्घाटनाला इंदूरच्या इंदिरा मासाहेब आल्या होत्या तेव्हां गांठ पडून खूप गप्पा झाल्या. एकदां वाग्देवतामंदिराच्या समारंभालाहि त्या आल्या होत्या. भिडे मावशींनीं तेथें वनिता समाज स्थापन करून बिल्डिंग बांधली. त्या बदली होऊन गेल्यानें आम्हां सर्वांनाच वाईट वाटलें. कारण बाबूच्या मुंजीला त्या नसणार. पण करंदीकर मावशी मुंजीला होत्या. ताई, तात्या, आलेच होते. मुंज छान झाली. शांताआक्का आतां जयपूर सोडून अमळनेरला रहायला आली होती. कारण भय्यासाहेब ओक अंमळनेरच्या फिलॉसफीकल इन्स्टीटयूट मध्यें आले होते. म्हणजे आक्का आतां जवळ आली. पुण्यास तात्यासाहेबांच्या वाढदिवसाला आम्ही पुण्यास गेलों होतों. तेथें तात्यासाहेबांच्या लोकप्रियतेचें प्रतिबिंब पहावयास मिळालें तें योग्यच होतें. ते तसेच अष्टपैलु विद्वान् होते. त्यांना काय येत नव्हतें ? तो समारंभ पाहून स्वत:ला धन्य धन्य झालें. ताईचें माहेर व केळकरांचे घर पूर्वी मिरजेस एका पडवीत होतें. म्हणून स्वत: ताईंना खेळवलेलं. तात्या तर धाकटा भाऊ. त्यांच्याबद्दल

१०३९२



वाटेच वाटे. सार्वजनिक समारंभाच्या वेळेस हार घालणें व काढणें ही कसरतच होती. जवळ जवळ गाडीभर हार आले. शिवाय घर तर हार फुलें यांनीं भरलें होतें. कुठल्याहि खुंटीकडे बघा हार आहे. खिडकी कोनाडे, नारळांनीं भरलेले. दक्षिणेतले अनेक संस्थानिक, मोठे शेठ, सावकार आणि पुढारी घरीं येऊन भेटून भेट देऊन गेले. घर जसें आनंदानें फुलले होते. बाहेर राजकारणी साहित्यिक मित्र भरले होते. तसे घरीं सगळे नातेवाईक असा हा अपूर्व समारंभ पाहून कोणच्या आप्ताला आदर व आनंदाचें भरतें येणार नाहीं ?

पुढें मला पालघरला जावें लागलें. तेव्हां आई तारापुरास होती. व शिवाय सर्व चुलत भावांना भेटून पुन्हां जुन्या काळांत मनानं तरी जावं असा विचार केला. सर्वांना पत्र लिहिलीं. दादा ऊर्फ डॉ. रघुनाथ बर्वे स्टेशनावर येऊन उतरवून घेऊन गेला. प्रथम आईकडे गेले. दुसरे दिवशीं सकाळीं बापूसाहेब बर्वे, नाना बर्वे ह्यांच्याकडे गेले माझ्या सखू वहिनीनें बापूसाहेबांच्या पत्नीनें–माझें व्याख्यान केलें. मग पालघरला गेलें व तेथून मुंबईस जाऊन धुळ्यास परत गेलें.

मी नागपुरास गेलें कीं माझ्या माईला जो आनंद होई तो विचारूं नका. तिच्या किती तरी मैत्रिणी गोळा होत. त्या आपल्या घरनं बोलावत. नातवंडं नाचत. जांवई तर खूपच आदर सत्कार करीत. चार पांच दिवस कुठें जात तें कळतच नसे. डॉ. मुंज्यांची तार आल्यामुळें अखिल भारतीय महिला परिषदेची अध्यक्ष म्हणून गेलें होतें. त्यावेळेस हिंदुमहासभेचे अधिवेशन होतें. त्याचे अध्यक्ष स्वा. सावरकर होते, तरुण मंडळाची सभा होती त्याचे अध्यक्ष कोल्हापूरचे क्षात्रजगद्‌गुरु होते व गोरक्षणाच्या अधिवेशनाला सारडा होते. असे सर्व अध्यक्ष आम्ही एकदम स्टेशनांवर उतरलों. स्वयंसेवकांच्या बदोबस्तांत मला सत्कारस्थानीं नेले. तेथें सर्वांच्या गांठीं पडल्या. विमानांतून पुष्पवृष्टि झाली. इतर अध्यक्ष मिरवणुकीला गेले. मी मोटारनें माईकडे आले. तेथें पुण्याच्या सुना आल्याच होत्या. चार दिवस माईकडे मोठे मजेंत गेले. तिला खूप आनंद झाला. अनेक ठिकाणीं चहापाणी झाले व मग आम्ही धुळ्यास आलों. माई नागपुरास असल्यामुळें

बोलावणें आलें कीं मोह पडे. तेथें वरचेवर जाण्यानें तेथल्या कांहीं व्यक्तींशीं विशेष आपुलकीचे संबंध जडले. जसें–सरलाताई भावे (म्हणजे केळकर), तिची बहीण ताई केळकर. ही हैद्राबादला प्रोफेसर आहे. ह्या मुली मला विशेष वाटतात.

पुढें बाबाचें लग्न संगमनेरच्या पिंगळे वकिलांची बहीण लीला हिच्याशीं मुंबईंत झालें. ती बी. ए. आहे. त्या लग्नांला आम्ही सर्व गेलों होतोंच. लग्न मुंबई पद्धतिप्रमाणें एका हॉलमध्यें झालं. तेथून आम्ही धुळ्यास सूनबाईसुद्धां आलों. थोडे दिवस राहून ती माहेरीं गेली. मग बाळ विलायतेला जायचा ठरला. कारण स्वतः म्हणाले कीं, फर्स्ट क्लास आलास तर पाठवीन. तर तो पेपर घेऊन नाचतच आला. आधीं तारेंत भाऊ क्लास घालायला विसरला होता. मग ह्यांनीं परवानगी दिली. कोठें जायचें काय वगैरे सर्व माहिती त्यानें आधींच गुपचूप आणून ठेवली होती. ती त्यानें ह्यांच्यापुढें केली. व मग सगळी चौकशी होऊन त्याला अमेरिकेला पाठवायचें ठरलें. त्याला पोंचवायला आम्ही दोघें मुंबईला गेलों होतों. ताई, आक्का आल्या होत्या. भाऊकडेच सगळीं होतों. तेथून बोटीवर गेलों. फडके, माई, वन्स वगैरे तेरा तिकिटें काढलीं होतीं. बोट पाहिली पण मन जाग्यावर नव्हतें. आणि जेव्हां खालीं उतरलें तेव्हां ब्रह्मांड आठवलें. मला खालीं बसवेना. कशी तरी घरीं आलें पण रात्रीं सेकंडच्या बर्थवर पडूनसुद्धां सुख होईना. झोंप तर नाहींच पण वाटे कुणी धरून ठेवावें. पोटांत कालवायला लागलें. काय होतें तें कळेना ! तें वर्णन करणें अशक्य. तो तेथें पोंचला व प्रो. गोखले यांच्या पत्नी सौ. उमाबाई गोखले–ह्या माझ्या बाळपणच्या मैत्रीण आहेत–यांची तार आम्हाला बाळ पोंचल्याची आली. मग जीव भांड्यांत पडला.

बाबू इंग्रजी शाळेंत जात होता, गांवांत बायकांनीं महिला समाज स्थापन केला होता. त्याची मला अध्यक्ष निवडले.

त्यावेळेस शिमग्यांत रंग उडविण्याची चाल फार होती. मिलची रंगाची गाडी गांवांत जाई. तेव्हां मी विचार केला कीं मोठ्या माणसांना सांगण्यांत अर्थ नाहीं. पण लहान मुलांना ह्या वयांत पटलं तर उपयोग होईल.

म्हणून मी एक युक्ति काढली. बाबूकडे येणारे सगळे खेळगडी गोळा केले व त्यांना सांगितलं कीं पंचमीपर्यंत जो कोणी रंग खेळणार नाहीं त्याला बक्षीस देईन. ती मग गंमतच झाली. संध्याकाळीं प्रत्येक मुलगा येऊन सांगे, 'आई मी रंग खेळलों नाहीं.' मग षष्ठीला मिसेस् मेहेर-जज्जाची बायको–यांना बोलावलें. मिलमधल्या बायका गोळा केल्या, व त्या मुलांना कबुलीप्रमाणें बक्षिसें दिलीं. तिसरें वर्षी मिलच्या आवारांतल्या रस्त्यावरून गाणीं म्हणत मुलांनीं प्रभातफेरी काढली व कांहीं संवाद करून मिलचीच मंडळी गोळा करून त्यांच्यांपुढे करवले व मग मुलांना बक्षिसें दिलीं. तसाच मिलमधल्या ५–७ बंगल्यांतल्या बायकांचाच समाज केला होता. एक आणा वर्गणी, वाचन, हिशेब, शिवण करत असूं. एकदां आक्का-साहेब पंत आल्या होत्या. त्यांच्या अध्यक्षतेखालीं आम्ही उत्सव करून घेतला. त्यांनीं म्हटलें, नवीन तऱ्हेचे थाट नेहमांच पहायला मिळतात पण शेले, शालजोडया लावून तयार केलेल्या स्टेजवर अगदीं संवाद रोजच्याच पोपाखांतील स्त्रियांनीं करून दाखवून खरें नावीन्य आणलें.

तसेंच गांवांतील स्त्रिया पुष्कळ ठिकाणीं सभा संमेलनाला जात पण मिलच्या बायकांना कांहीं मिळत नसे. म्हणून मी वटपौर्णिमेचीं तीन व्याख्यानें करावयाची पद्धत पाडली. वाग्देवतामंदिरांत जेष्ठ शुद्ध त्रयो-दशीपासून तीन दिवस उत्सव असे. त्याकरितां निरनिराळे विद्वान् येत. त्याना आमंत्रण देऊन तीन दिवस व्याख्यान करीत असे.

भिडेसाहेबांची बदली कलेक्टर म्हणून धुळयाहून अहमदाबादला झाल्या-वर आम्ही दोघं एकदां त्यांच्याकडे गेलों. जातांना स्वतः मावळणकरांना अहमदाबादेस येतो म्हणून पत्र घातलें होतें. सकाळीं पोचलों. दुपारीं खूप झोंप येत होती पण मावशी बोलत बसल्या म्हणून तशीच मी गप्पा मारीत बसलें. पण संध्याकाळीं दादासाहेब मावळणकर आले व म्हणाले, मी आतां घाईनें भेटायला आलोंच आहे पण एक काम घेऊन आलों आहे. येथल्या वनिता समाजानें वार्षिक उत्सवाकरितां अन्यांना बोलावलें होतें, पण दुपारीं त्यांची तार 'येतां येत नाहीं' अशी आली. त्यामुळें सगळ्या बायका नाखूप झाल्या आहेत. त्यांना मी तुम्हांला एक अध्यक्ष देतो असें

सांगून आलों आहे. तरीं आतां गिरिजाबाईनीं हें आमंत्रण स्वीकारून रात्रीं यावें. त्यांनीं भिडयांनाहि आमंत्रण दिलें. मी रात्रीं गेलें. तेथें लाईट नव्हता. कंदील होते. आधींच दुपारची झोंप मोडलेली. त्यांतून मंद उजेड. मला झोपेनें अितकें घेरलें कीं भाषण काय करते आहे तें उमजेना. माझ्या आठवणींत असं वाईट भाषण आठवत नाहीं. मग दुसरें दिवशीं महाराष्ट्र क्लबातर्फे भाषण झालें तें चांगलें झालें. मग दुसरें दिवशीं दादासाहेब आले व त्यांनीं आपल्या मोटारीनें सगळं गांव हिंडून दाखवून आपल्या घरीं जेवायला गेलें. हा प्रेमाचा ऋणानुबंध आजपर्यंत टिकला आहे.

भाऊला मुलगा झाला. इंदिराबाई बाळंतपणाला माहेरी गेली होती. तेथें आम्ही उभयतां गेलों. बारसें करून नांव ठेवलें व पुढें औंधकरांच्या राज्यारोहणाच्या सुवर्णमहोत्सवसमारंभाला गेलों. येतांना किर्लोस्करवाडी पाहून परत आलों. साठे मामांची बदली रत्नागिरीला झाली तेव्हां आम्ही मोटारनें, कमा, कुंदू, ब्राह्मण व मोलकरीण घेऊन रत्नागिरीला गेलों. चार दिवस मजेंत काढून महाबळेश्वरला प्रतापशेठ होते त्यांना भेटून पुण्याहून धुळ्यास आलों. असें प्रवास मधून मधून होतच होतें.

मी माहेरीं फारशी गेलें नाहीं व एक दिवसाच्यावर राहिलें नाहीं. माझ्या लग्नानंतरचीच भावंडं होतीं. दोन भाऊ व एक वहीण. पुढें एक भाऊ गेला. त्याची बायकोहि गेली. वडील गेले. वहीण कांहीं दिवस होती. व येत जात असे. रूपानें सुंदर, गुणानें गोड, पण तीहि गेली. मी प्रथम एकत्र कुटुंबांत जावांच्या प्रेमांत होते. पुढें वडील माणसांच्या छायेंत आयुष्य काढलें. धुळ्यास आल्यावर एकटी झाले, काळ बदलत होता. मी माझ्या कल्पनेप्रमाणें सर्वांची मर्जी संभाळून माझ्या घराला जुनें ठेऊन थोडें नवें वळण देत होते. मुलं झालीं; मोठीं झालीं; मी त्यांच्यावर धाक ठेवला. वरकरणी कठोर वागलें पण मी माझ्या प्रेमाचा वर्षाव त्यांच्यावर केला. माझें कर्तृत्व, कष्ट व पैसा त्यांच्याकरितां खर्च केला. मुलगे व मुली ह्यांना अल्पवयांत स्वच्छंदीपणाची चटक लागूं नये, वाईट संगत जडूं नये, त्यांनीं सद्‌गुणी, पवित्र व पापभीरु व्हावें, नम्र व सौजन्यशील असावें, स्वाभिमानी असावें पण अहंमन्य होऊं नये म्हणून जपलें. अनुकूलता असून

त्यांच्या खाण्यापिण्याची आबाळ होऊं नये म्हणून कांहीं वर्षें बाई ब्राह्मण न ठेवतां स्वत: अन्नपूर्णा झाले. मी अनेक संस्थांत काम करीत होते. शिवाय गांवांत केव्हां केव्हां कांहीं असलं म्हणजे जावं लागे. नोकर असला म्हणजे आपण नसलों तर तो नीट करीत नाहीं. मी सकाळीं स्वयंपाक करी. एका वेळीं खाण्याच्या पांच डब्या भरावयाच्या असत. शिवाय सोवळं ओवळं होतं. मी सतत पांचाला उठे व चहाच्या वेळेपर्यंत माझा देवधर्म उरकत असे. मग चहा, मुलांचें कांहीं तरी पेय. ८॥ ला त्यांच्या हातावर खाऊ, १०॥ला जेवण. स्वत:चे मग सावकाश. मुलं मोटारीं-तून जाईपर्यंत मी दारांत उभी राही. मला भय वाटे. एकमेकांशीं भांडतांना दारांत वोटबीट सांपडेल. संध्याकाळीं सभेला अध्यक्ष वगैरे जायचें असलें म्हणजे यायला उशीर व्हायचा. म्हणून कधीं पुऱ्या सायसाखर, कधीं पुऱ्या आंब्याचा रस, असे कांहीं ना कांहीं खायचें करून वाटण्या करून ठेवायच्या. आल्यावर मग नुसता भात. दिवसभराच्या मोलकरणी असत. त्या मग उष्टींविष्टीं काढीत.

मुलांच्यासाठीं पापड, पापड्या, कुरडया, सांडगे, शेवया, गव्हले सर्व मी करी. कारण मोठेपणीं कधींहि मुलांनीं असें म्हणूं नये कीं, आमची आई लेखिका होती पण मग आमचें खाणें पिणें असेंच होतें. किंवा स्वत:लाहि असें वाटूं नये कीं वायको लिहिणार, व्याख्यानें देणार तेव्हां घ्या भागवून झालें. त्यांचें मित्र, पार्टर्या, आला गेला यांचें स्वागत त्यांच्या अपेक्षेपेक्षां मी जास्त करी. माझ्या प्रेमाची पाखर मी माझ्या मुलांवर घातली. पुढें सुना आल्या. लोकांचीं लेंकरें माझ्या घरीं आलीं म्हणून मी माझ्या मुलींपेक्षांहि त्यांना जास्त प्रेमानें वागवलें. स्वत: एखाद वेळेस म्हणत, तुझ्या वरं सगळ्यांचे वाढदिवस, आवडी नावडी लक्षांत राहतात. पण त्यांत काय नवल ? कोण-चाहि पदार्थ केला व तो ज्याच्या आवडीचा असेल तो जवळ नसला कीं त्याची आठवण यायचीच. मी आई होतें ना ? संध्याकाळीं सगळीं मुलं माझ्या-भोवतीं गोळा होऊन बसत. मग स्वत: क्लबांतून आले कीं तेहि तेथें बसत. तें दृश्य पहाणारीं म्हणत, 'आईसाहेब भाग्यवान् आहेत.' वाद होत, चर्चा होत. रागवारागवी, रुसवारुसवी होई. पण प्रेमाचें मूळ कधीं सुटलें नाहीं.

माझें मुलांवर प्रेम होतें व ह्यांचें नव्हतें असें थोडेंच होतें ! पण आम्हां बायकांचा स्वभाव भडभड्या असतो. अर्थात् थोडी भांडीं वाजायचीच !

माझ्या मुलांचा नी माझा खटका उडाला म्हणजे एखाद वेळेस म्हणायचें, 'हें पहा, वेळ आली तर तुमचें नी मुलांचें पटायचें नाहीं.' मी म्हणे,'चुकतां आहांत. देवानें वेळ आणू नये. पण आलीच तर मुळींच भांडण व्हायचं नाहीं. बायकांना स्वत:चा ससार असला म्हणजे मीपणा असतो. तो संसार पुरुप असेपर्यंत ! संसार असला म्हणजे बरें वाईट बोलावें लागतें. तो संपला कीं सगळं संपलं. मग भांडायचें कशाकरितां ?"

देवधर्म करणं हा जुन्या बायकांचा आणखी एक स्वभाव-धर्मच आहे. कोणी हंसा, कोणी टिंगल करा पण देवघरांत देवाच्या सान्निध्यांत कांहीं क्षण तरी घालवल्याशिवाय आम्हांला विश्रांति मिळाली असें वाटत नाहीं. सर्व दिवस अविश्रांत श्रम करून माझा संसार मी करीत होतें. माझ्या मैत्रिणी, त्यांच्याकडे जाणें, त्यांना बोलावणें वगैरे सर्व चालत असे. पण ज्या 'देवा'च्या जिवावर मीं हे सर्व खेळ खेळत होते त्यांनीं मला कधीं विरोध केला नाहीं, कधीं अविश्वास दाखवला नाहीं.

माझा देवधर्म, माझें पोथीवाचन ह्यांत ते कधीं आड आले नाहींत. मुलांना म्हणत, 'खालीं आल कीं तिची शिस्त पाळा' धोतर नेसल्याशिवाय मी मुलांना वाढत नसें. मीं म्हणे, ' मी हिंदु आहे. ब्राह्मण आहे. चोळणें एरवीं नेसा. पण जेवायला धोतर नेसा. बूट जोडे ओटच्यावर ठेवा.' पण मुलांनीं माझी अवज्ञा कधीं केली नाहीं. मुलीहि लग्न होईपर्यंत कधीं गोल नेसल्या नाहींत देवाच्याकृपेनें मी केलेल्या प्रेमाचा व स्वत:च्या अबोल प्रेमाचा भरपूर मोबदला आम्हांला मिळाला. सुना या लोकांच्या मुली, पण वडिलांची पुण्याई अशी कीं त्याहि मुलींसारख्याच निघाल्या.

ह्यांचा एकसष्टावा वाढदिवस करावा असें ना. बा. केळकर म्हणत होते. पण मुलं लहानच होतीं. मी कमाच्या दुखण्यानें कंटाळलें होतें. तेव्हां ती गोष्ट बोलण्यांतच गेली. पण मग मुलांना सारखं वाईट वाटे. पुढें त्यानीं ७१ वा वाढदिवस करावयाचा ठरविलें. आप्तांना बोलावलें. मुलांनीं मिळून त्यांना सोन्याचें घड्याळ दिलें. ताईनीं मला सौभाग्यवाण दिलें. सद्-

काकांनीं टी सेट दिला. बाबूराव भावे यांनीं हीटर दिला. समारंभ सुंदर झाला. तात्या, प्रताप शेट, भैय्यासाहेब ओक वगैरे मंडळी व घरच्या सर्व मुली, मुलं जमलीं होतीं. फक्त अमेरिकेस गेलेल्या बाळासाहेबाची उणीव होती. तात्या गोखल्यांनीं प्रयागची गंगा घागरभर आणली होती व मधें स्नान असतें तेव्हां नवरा-बायकोनीं आम्हांला गंगेचं स्नान घातलं. केवढं भाग्य ! पाठकशास्त्री आशीर्वाद द्यायला आले होते.

मिलमध्यें ५-६ अधिकारी होते. पण आमची अशी गंमत होती कीं, कोणाकडेहि कार्य निघो तीन चार दिवस सर्वांनीं एकत्र जमून जेवणखाण वगैरे असे. त्यामुळें लग्न मुंजी ह्या कार्यांना मजा येई.

साठे मामा बदलून गेले व मग मोने व ओक आले. त्यांनीं देखील साठ्यांचेंच मामाचे नातें कायम ठेवलें होतें.

गांवांत सरस्वती व्याख्यानमाला निघाली त्यानिमित्त निरनिराळे लोक अध्यक्ष म्हणून यायचे. त्यांच्यापैकीं कांहींची उतरायची व्यवस्था ते आमच्या-कडे करीत. त्यामुळें पुष्कळ नव्या नव्या ओळखी होत. सर मोरोपंत जोशी, जनरल शिंदे, सातवळेकर, नेहरू कमिशनचे चौदा लोक, सावरकर वगैरे अनेक माणसांच्या ओळखी झाल्या. मदन, लाड जोशी, भद्रपूर वगैरे अनेक सरकारी अधिकारीहि येऊन गेले. फैजपूरची कॉंग्रेस तेव्हांच झाली. आम्ही धांवती चक्कर मारली होती. माझी **'हीच मुलीची आई'** नाटिका मनोहर संगीत मंडळीनें तेव्हांच स्टेजवर आणली. अंजारिया व सोनाळकर आले होते. त्यांना फार आनंद झाला. अशा तऱ्हेनें लोकांचे येणें-जाणें असे. त्यामुळें घरांत निरनिराळ्या प्रकारचें सामान लागे. मला पहिल्यापासून चांगल्या राहणीची व चांगल्या कपड्यालत्त्याची संवय. त्यांतून सरकारी अधिकारी म्हणून पूर्वी आम्ही वावरलेले. काटकसर करून पैसे शिल्लक टाकतांना दिसत नव्हतों. त्यामुळें आमच्याजवळ तीन चार लाख रुपये तरी आहेत अशीहि अफवा उठली होती. शिवाय मिलमध्यें नोकरी. पण जग असेंच आहे. कोणाचेंहि बरें दिसलें कीं त्याला कांहीं तरी जोड देण्यांतच जगाला समाधान वाटतें !

येथें माझीं दुसरीं पुस्तकें छापलीं गेलीं. **गृहिणी भूषण, स्त्रियांचा स्वर्ग, व समाजचित्रें, पुरुषांचें बंड, राजकुंवर** हीं झालीं होतीं. **पुढें आयेषा, समाज चित्रें भाग २, केवळ विश्रांतिसाठीं, गृहिणीभूषण भाग २, हीच मुलीची आई अध्यक्षीय भाषणें** ही छापलीं. **सावित्री नाटक** देशबंधू कंपनीनें बसावयाला घेतलें. **संसार सोपान** लिहिलें व तें नानाच्या **मनोहर ग्रंथमालेनें** प्रसिद्ध केलें. किरकोळ लिखाण सुरूच होतें.

बाळासाहेबाचें शिक्षण आटोपून तो यायचा ठरला. त्याला आणावयास उपा, कुन्दा, बाबू हे गेले होते. आम्ही धुळ्याच्या स्टेशनावर गेलों होतों. आनंदीआनंद झाला. नानानें **वाङ्मय-शोभा** मासिक काढलें व त्याचें लग्न ठरलें. चाळीसगांव मिलचे त्यावेळचे मॅनेजर दीक्षित यांची मुलगी त्याला केली. तें लग्नहि थाटांत झालें. त्याचे खूप मित्र आले होते. आमची नातलग मंडळीहि आली होती. दीक्षित मंडळीहि हौशी होती.

मधला एक दुःखद प्रसंग सांगायला हवा. आम्ही कलकत्त्याला गेलों. जातांना नागपुराहून गेलों. स्टेशनवर माई व फाटक आले होते. परत जातांना उत्तर म्हणून चारचारदां बजावलंन् पण योग ! कलकत्त्याहून आम्ही बनारसला तात्यासाहेब गोखल्यांकडे गेलों. त्यावेळीं तें तेथें थिऑसॉफिकल सोसायटींत होते. विश्वेश्वराचें दर्शन घेऊन दोन दिवसांनीं निघालों. परत येतांना इटारसीला गाडी बदलून नागपूरला जायला हवं होतं व कांहीं तासांपेक्षा जास्त राहतां आलं नसतं कारण जनरल शिंद्यांची उतरण्याची व्यवस्था मंडळींनीं आमच्याकडे केली होती. तेव्हां त्याच्या आधीं आम्हांला पोचायला हवं होतं. पण मी म्हणत होतें, 'तरी आपण जाऊं; तेवढेंच उतरूं.' स्वतः म्हणाले, 'आईचं प्रेम वेडं हेंच खरं. आतां जातांना माई भेटलीच. दोन तास इटारसीच्या स्टेशनांत काढून ४–५ तासांकरितां नागपुरास जायचें मला पटत नाहीं. असें म्हटल्यावर माझें काय चालतें ? आम्ही सरळ धुळ्यास आलों. शिंदे येऊन गेले. पण देवाला आमचा सुखाचा संसार पहावेना. त्याला गालबोट लागलें. आमची थोरली मुलगी माई जास्त आजारी असल्याची तार आली. आम्ही गेलों. पण सर्व आटोपलें होतें. हा दुःखाचा घाला

केवढा मोठा होता. मुलांना भावंडाच्या निधनाचें दु:ख ठाऊक नव्हतें. आमच्या घरांत सख्खं सावत्र शब्दच कोणाला ठाऊक नव्हता. उषा, कुन्दा शाळेंत गेल्या तेव्हां त्यांना कोणी विचारलें 'तुमची सावत्र वहीण गेली नां ?' त्या घरीं येऊन लीलाला म्हणाल्या, 'वहिनी, लोक असं कां हो विचारतात ?' मग लीला म्हणाली, 'लोक वाटेल तें बोलतात आपण लक्ष देऊं नये !' माझा थोरला नातू एका बाईंना मारायला उठला होता. कां तर ती म्हणाली, 'तुमची आजी सावत्र आहे ना ?' माई आली व तिनें त्याला आवरलें. आणि ती म्हणाली, 'ज्या गोष्टी मुलांना ठाऊक नाहींत त्या मुद्दाम का शिकवायच्या ?' ती गरीब, हुशार, प्रेमळ असून अबोल होती. आम्हां उभयतांवर भक्ति व प्रेम होतेंच. पण भावंडांवर प्रेम करणारी, सासरीं सगळ्यांचं करणारी. यजमान तापट होते पण अगदीं त्यांच्या मर्जीनें घेणारी. कोणाचेंहि करावयाची तयारी. माझ्यावर अतिशय विश्वास. तिला कोणी म्हटलं असतं कीं, 'आई तुला शिव्या देत होती' तर म्हणाली असती, 'नाहीं हो, तिला मुलं त्रास देतात म्हणून कांहीं तरी बोलली असेल!' माई कधींच रागवायची नाहीं. संसारांत कर्तृत्व तरी किती! पण दैवाला आवडलें नाहीं. लहान लहान मुलें टाकून गेली बिचारी. योगायोग असा कीं ती गेल्यावर तिच्या मुलांची लग्नें झालीं. मुलीच्या लग्नाला मी एकटी गेले होतें. पण तिच्या मुलाच्या लग्नाला आम्ही दोघं गेलों होतों.

बाबानें बिऱ्हाड केलें. उषा व कुंदाला घेऊन मोटारनें सोहनींच्या येथल्या लग्नाला मुंबईस गेलों होतों. एकदां मुली व बाबू यांना तारापूर दाखवून आणलें. उषा, कुंदा व लता यांना घरीं ठेवून आम्ही रामेश्वर करून आलों. इंदिराचें दुसरें बाळंतपण होऊन मुलगा झाला. उषा मॅट्रिक नापास झाली. पण ती पुन्हां शाळेंत जाईना. मग कुंदाला मी म्हटलें, ' मला वाटतें कॉलेजांत जाऊन सर्वांनीं बी. ए. होण्यापेक्षां दुसरें कांहीं शिकावें. म. म. पाठक शास्त्री (आतां ते शिवानंद भारती झाले आहेत. ते विठूरला असतात. ते तेथें होते.) यांची वेदशाळा आहे. तूं संस्कृत शीक. उषाला गाण्याची आवड आहे. तिनें गाणें शिकावें.' त्यांनीं तें कबूल केलें. घरांत मंगळागौरी वगैरे

धामधूम नेहमीं चाले. लग्न मुंजी दिवाळी वगैरे वगैरे निमित्तानें सर्व एकत्र जमायचीं. मग चहाचे वेळीं गप्पा गमती चालत. मुलांचा गणपति, मुलींच्या भातुकल्या नेहमीं सुरूच होत्या. नंतर सर्व मोठीं झालीं. तर दुसऱ्या गोष्टी चालत. बाळासाहेबाला साताऱ्यास कूपर कंपनींत नोकरी लागली. त्याचें लग्न ठरलें. भावे–ठाण्याचें रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज यांच्या मुलीशीं त्याचें लग्न झालें. कार्य धुळ्यास थाटांत झालें.

बाळच्या लग्नानंतर मग मी मुंबईस जागा घेऊन महिनाभर कामाकरितां राहिलें. पण तें राहणें अंगीं लागलें नाहीं. धुळ्यास जे आम्ही अधिकारी होतों त्यांत कोल्हटकर, करंदीकर, ठोंबरे,रानडे, सोहनी होते. ह्या सगळ्या लोकांच्या गांठी पडल्यावर अजूनहि आपलेपणा आहे. कारण आम्ही एकत्र बरींच वर्षे काढलीं. आमच्या सोहनींच्या काकू तर जिवाभावाच्या. जरा कांहीं झालं कीं, काकूंना बोलवायचें. त्याहि तशाच अर्ध्या रात्रीं येत. अजूनहि त्यांच्याशीं व त्यांच्या मुलांशीं तें आपुलकीचें नातें कायम आहे. मी मुंबईंत नसलें व कार्य निघालें म्हणजे बाबा काकूंना नमस्काराला आणीत असे.

१९४२ सालीं लीला बाळंतपणाला आली. तिला मुलगी झाली ती सारखी आजारी असे. मग आम्ही धुळ्याचें काम सोडलें. सतरा वर्षांच्या वास्तव्यांत डॉ. कीर्तने यांचा फार घरोबा झाला होता. तसेंच महिला मंडळांतल्या बायका, डॉ. देशपांडे पतिपत्नी, पाठकशास्त्री, गाण्याचे मास्तर नाईक, दीक्षित मास्तर, डॉ केळकर, वकिलांपैकीं भट, भाटे, टिळक यांच्यासारख्यांची आठवण व आपुलकी कशी विसरतां येईल? पण सर्वांच्या आठवणी बाजूला ठेवून बेचाळीसच्या मार्चमध्यें जळगांवास आमच्या वास्तूंत आम्हीं आलों. आम्ही येथें यायच्या पूर्वींच आमचे व्याही दीक्षित येथें गेंदालाल मिलमध्यें आले होते. जणुं आमची व्यवस्था लावण्याकरितांच देवानें त्यांना पाठवलें !

बंगला घाण झालेला. वस्तू पुष्कळशा नाहींशा झाल्या होत्या. बंगला स्वच्छ केला. लीला आजारीच होती. ती मग माहेरी गेली. पण पुन्हां दिवाळींत आक्कापासून सर्व माणसें म्हणजे सुमारें चाळीस मनुष्य जमलें

होतें. गांवांत आतां जुन्या ओळखीची थोडीच मंडळी होती. त्यांचा आमचा जुना ऋणानुबंध वाढूं लागला. मुलांनीं दिवाळींत एक वक्षीससमारंभ केला. खांबेटे आले होते. त्यांना तें सर्व पाहून फार आनंद झाला. त्यांनीं थोडें भाषण केलें. कुसुमताई कानिटकर होती. कारण आमच्या पाठोपाठ विसुभाऊ कानिटकर डी. एस्. पी. म्हणून आले होते. इंदिराबाई बाळंतपणाला आली होती ती दिवाळी झाल्यावर गेली. कुंदूची संस्कृतची शेवटची परीक्षा झाली. मी येथें पुन्हां परत आले. तेव्हां मला पुन्हां अध्यक्ष म्हणून नेमून माझ्या हातून भगिनी मंडळाची रौप्यजुबिली करावी असं जुन्या बायकांना वाटत होतं. पण नव्या मुलींना चूल, मूल, नवरा करणारी अध्यक्ष नको असल्यामुळें त्यांनीं सूचना मताला टाकायची असें ठरविलें. तोंपर्यंत मतदान, निवडणूक हें नव्हतें. कार्यकारी मंडळानें ठरवायचें व तें व्हायचें असें चालें. मी मताला उभी न राहतां घरीं आलें. ज्या भगिनी-मंडळाकरतां वडील माणसांच्या शिव्या खाल्ल्या, माझा महत्वाचा सगळा वेळ घालवला, स्वतः पैसा घातला, बिल्डिंग बांधायचे श्रम घेतले तें सर्व सोडून मी एका क्षणांत घरीं आलें. प्रथम प्रथम वाटे, आपलें काय ध्येय होतें, आपण काय काय गोष्टी करणार होतों व काय झालें ?' पण आतां मला कधीं त्याचा त्रास होत नाहीं.

आम्ही यायच्या आधींच सोनाळकर व वामनराव नूलकर गेलेच होते. तरीपण मी आल्यानें त्यांच्या कुटुंबांचा आमचा जुना ऋणानुबंध पुन्हा वाढला. खांबेटे दादांना व वहिनींना खूप आनंद झाला. भगिनी मंडळाच्या घटनेमुळें खांबेटे दादांना फार वाईट वाटलें. त्यांचें माझ्यावर अितकें प्रेम होतें कीं ते बारीक सारीक गोष्टींतसुद्धां लक्ष घालीत. एकदां माझें हातांतलें घड्याळ चोरीला गेलें. पुन्हां माझ्या हातांत घड्याळ दिसल्यावर 'सांपडलं कां ?' म्हणाले. मी म्हटलें ' नाहीं ! पण कसं सुरेख घड्याळ होतं, कसं गेलं कोण जाणें! ' असें मला ४–५ वेळां कोणाकोणाजवळ तरी म्हणतांना स्वतः ऐकलं तेव्हां म्हणाले, ' मनुष्य गेलेलं मिळत नाहीं, घड्याळासाठीं हें काय म्हणावं ?' व लगेच दुसरे घड्याळ आलें. ही हकीकत कळली तेव्हां दादा म्हणाले, ' ताई तुझ्यावर अप्पासाहेबांचें किती प्रेम आहे. मग तूं

म्हणशील ती गोष्ट ते ऐकत असतील नाहीं का ? ' मी म्हटलं, ' घरगुती गोष्ट ऐकतील पण त्यांच्या कामांत ढवळाढवळ करायची म्हटलं तर नाहीं चालणार ! ' मग ते मनापासून हंसले.

आम्ही नोकरींत असतांना पुष्कळदां असे घडे. कोणीतरीं माणसें माझ्याकडे येत व कधीं मुलांना खाऊं द्यायचा आहे म्हणत. मी म्हणे, ' आम्ही गरीब माणसं, बाजारी खायची संवय मुलांना लावून चालणार नाहीं. मी घरींच खाऊं करते ! ' मग त्यांनीं हळूंच म्हणायचें ' आमच्या अमक्या कामाकरितां साहेबांना सांगा ना ! ' तेव्हां मी त्यांना म्हणे ' न्यायासनावर बसतात तेथें त्यांना योग्य वाटेल तें खास करतील. ते कोणाकडून कांहीं घेतात असं तुम्हाला म्हणायचं आहे कां ? जर तसं नसेल, तर मुद्दाम कोणाचेंच वांकडें करणार नाहींत. मग एकदां एका माणसानें मागून हे भेटल्यावर सांगितलें कीं 'आम्ही बाईसाहेबांकडे गेलों होतों.' मग स्वत: म्हणाले ' बरं झालं, शिव्या खाऊन आलांत ना ? '

एकदां धुळयास असा प्रसग आला होता. मी म्हटलें, ' मी त्यांना सांगणार तर नाहींच. पण ते असं कांहीं करताहेत असें कळलें तर मीच त्यांना येथून जायला लावीन.

खांबेटे वहिनींची तर माझ्यावर अमाप श्रद्धा. दादांनीं वुइल करून वहिनींना वाचून दाखवायला लागले. त्या म्हणाल्या, ' आतेबाईंना बोलवा मग वाचा. ' मग त्यांनीं मला बोलावून वाचून दाखविलें.

दिवाळीचा समारंभ झाला. पुढें संक्रांत आली. मोठ्या गमतीनें तो सण उषा कुंदांनीं साजरा केला. मग शिमग्यांत कुन्दाचें लग्न जमलें. त्या वेळेस कराचीस पी. डब्ल्यू. डी. मध्यें असणारे आबासाहेब लेले यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकरपंत हे खोपोलीला इंजिनियर म्हणून होते व नेव्हींत कमिशनकरितां त्यांनीं अर्ज केला होता. त्यांच्याशीं कुन्दाचें लग्न ठरलें तें लग्न मुंबईस झालें. आम्ही कुसुमताईकडे होतों व लेले मंडळींना सदुकाकाचा बंगला दिला होता.

सदुकाका हे माझे सख्खे चुलत दीर. हरिकाकांचे चिरंजीव. हे बी. एस्. सी. पर्यंत शिकले. पुढें त्यांनीं त्यांचे मेहुणे वझे यांचा एक लहानसा

कारखाना होता तो हातांत घेऊन हळूंहळूं मोठ्या प्रमाणावर वाढवला. मग त्यांनीं आपला धाकटा भाऊ दामुकाका याला आपल्या हाताखालीं घेतला व व्याप वाढत चालला. त्यांनीं दादरला बंगला बांधला आहे. आंत बंगला व खालीं मेनरोडला दुकानें व तीं भाड्यानें दिलेलीं; स्वतः जेव्हां त्यांचा बंगला पाहून आले तेव्हां त्यांना इतका आनंद व गहिंवर आला कीं, विचारूं नका. ' पहा सदूनें नशीव काढलें. काकी पाहुचला आहे. मात्र हरिकाका नाहीं ! ' असं म्हणून डोळे पुसले. त्या बंगल्यांत लेले मंडळी उतरली होती लग्न छान झालें. मी पुण्यास आईला भेटायला जाऊन लगेच परत आले. व येतांना कुन्दु, उषा, लता, अशी आम्ही जळगावास आलों. लता माहेरी गेली. हळदीकुंकू करून कुन्दा पुन्हा सासरी गेली.

आमच्याबरोबर आलेली लता माहेरीं गेली होती, ती प्रसूत होऊन मुलगा झाला. मुंबईस निर्मलाला मुलगा झाला. मी बारशासाठीं मुंबईस गेलें. व तेथून येऊन लताच्या मुलाचें बारसें केलें. पुढें जेष्ठांत कुंदा येऊन गेली. मग श्रावणांत आली. लता, निर्मला, जमल्या होत्या. कुंदा पुढें कराचीला गेली. दोन नवे नातू पाहून साहजिकच ह्यांना आनंद झाला. थोडे दिवस राहून दोघी आपआपल्या घरीं गेल्या. मग उषाताईच्या मनांत पुन्हां मॅट्रिक होण्याचें आलें. व तिनें क्लासमध्यें नांव घालून बाहेरनं परीक्षेला बसायचें ठरवलें. लेल्यांना कमिशन मिळून ते नेव्हींत गेले व वरसोव्यास त्यांची नेमणूक झाली. कुंदू स्मृतितीर्थ झाली. बाबू उषा मॅट्रिकला बसलीं. वैशाख लागतां कुंदू बाळंतपणाला आली. डोहाळ जेवणें वगैरे झालीं व मिलिंदाचा जन्म झाला. बारशाला लेले मंडळी आली होती. परीक्षेंत बाबू व उषाताई पास झाली. बाबू पुण्यास वाडियाला गेला. उषाताई नागपूरला जाते म्हणाली. लेले—आम्ही त्यांना पंत म्हणतो—आले होते ते पोचवायला गेले. ती जाते म्हणाल्यावर स्वत: परवानगी दिली. मला ' हो ' म्हणणें भागच होतें. पण ती जायला निघाली तेव्हां मला जें काय वाईट वाटलें तें लिहितां येत नाहीं. दोन दिवस पाणी थांबेना., पुढें मुलगा घेऊन कुंदा गेली. तिची जुनी बाई बरोबर गेली होती. बाबू पोचवायला गेला. आतां आम्ही घरांत

मोजकीं माणसें झालों. मी पाकशास्त्र लिहिलें. नव्या ओळखी झाल्या. मग मी दुपारची पोथी वाची. ७–८ बायका येत असत. मजा वाटे. एकदां शतसांवत्सरिक नाटयोत्सव झाला. वरेरकर अध्यक्ष होते. मी स्वागताध्यक्ष होतें. समारंभ चांगला झाला. गांवांत सभा वगैरे होत असत. क्वचित जात असे. मग आमच्या भाऊच्या थोरल्या मुलाची मुंज (राजाची) झाली तीहि अगदीं थाटांत झाली. मग येथील मंडळींनीं नाट्य संम्मेलन करायचें ठरवलें. येथें एक रामभाऊ देशमुख म्हणून हौशी गृहस्थ होते. तेच नेहमी अशा गोष्टी घडवून आणीत. त्याचें अध्यक्षस्थान नाटककार जोशी यांना दिलें होतें व बाळ गंधर्वांना स्वागताध्यक्ष म्हणून बोलावलें होतें. मी कार्याध्यक्ष होते. तें सम्मेलन स्थानिक भांडणतंटयांनीं बरेंच गाजलें. पण त्यांत आपल्या समाजाच्या प्रवृत्तींची एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत आली. ती अशी कीं, कोणाहि जवळच्या माणसाचा फार गाजावाजा समाजाला नको असतो. त्याच्यानंतर आई फार आजारी पडल्याची तार आल्यामुळें आम्ही पुण्यास गेलों. आईला भेटलों. पण कमा येथें असल्यामुळें व पहिल्यासारख्या उपा, कुन्दू नसल्यामुळें दोनच दिवसांत परत आलों. येतांना नाना आम्हाला मुंबईस घेऊन गेला व तेथें त्यानें आमची दोघांची रेकॉर्ड घेतली. वडिलांचे आशीर्वाद व वाणी केव्हांहि ऐकायला मिळावी ही कल्पना. तेथून परत जळगांवला आलों. पुढें लगेच आई गेली. काळाप्रमाणें जरी ती गोष्ट योग्यच होती तरी दुःख हें जाणवतेंच. मातृदेवोभव म्हणतात तें खरंच आहे. अगदीं श्रीमंतींत वाढून मध्यंतरीं तिला फार कष्टाचे दिवस गेले. पण देवावर विश्वास, समाधानी अन् आनंदी वृत्ति तिची कधींच मावळली नाहीं.तिला सगळ्यांचा लळा होता. त्या काळच्या मानानें ती पुष्कळ शिकलेली होती. मराठी. मोडी लिहितां वाचतां येईच. पण थोडे इंग्रजीसुद्धां येई. त्या काळांत ती चांगलें शिवण शिवी. ती मुंबईस माहेरीं असे तेव्हां भोंवतालच्या बायका तिच्याजवळ शिवण शिकायला व कशिदा शिकायला यायच्या. जीगचें काम ती फार सुरेख करी. त्या काळांत तीच प्रथा होती. माझे लहान मामा जीगच्या टोप्या घालीत. चोळयांचे कांठावर जीगचे काम असे. स्वयंपाकहि छान करी. पुष्कळ मुलं झालीं पण पहिली मी व शेवटला दिनकर एवढींच उरलों आहों. लहानपणीं

अनेक कष्ट सोसून नाना तऱ्हेचे लाड करून तिनें मला वाढवलें. गोड बोलून, रागावून तिनें मला वळण लावलें. ईश्वरभक्ति शिकवली. हात मोठा, मन मोठं. माझ्याबद्दल फार अभिमान. माझ्याबद्दलची एखादी गोष्ट कानावर गेली कीं अभिमानानें फुले. माझें कौतुक करी. जांवयांबद्दल फार मोठा अभिमान होता. त्यांना ती देवमाणूस म्हणे. स्वत:हि तिला फार मानीत. माझे वडील कधीं कधीं तिला चिडवीत. वर्तमानपत्रांत माझा फोटो पाहिला कीं तो फोटो तिला दाखवायचा, लेख वाचून दाखवायचा नि मग म्हणायचं, ' बघ माझी मुलगी. किती केलं तरी बव्यांची मुलगी आहे! ' तिला नातवंडांचें फार कौतुक होतें. नाना लता पुण्यास असल्यामुळें त्यांना तिचें व तिला त्यांचे फार वाटे. अशा थोर, कर्तबगार, पुण्यवान्, ईश्वरनिष्ठ मातेच्या पोटीं जन्म घेतल्यानेंच मी अितकें सुख भोगलें.

पुढें मला एकसष्टावें वर्ष लागणार तर समारंभ करावा असं माझ्या मुलांना वाटलं व त्यांनीं आपसांत सर्व तयारी केली. व मला पत्र घातलें कीं आम्ही सर्व येणार आहों तर तयारी ठेव. तोंपर्यंत बायकांची एकसष्टी झाली नव्हती. तेव्हां धार्मिक काय करायचें म्हणून स्वामी शिवानंद ऊर्फ पाठक शास्त्री यांना विचारलें. त्यांचा आमचा धुळ्यापासूनच आपुलकीचा स्नेह झाला होता. त्यांची पाठशाळा, ती ऋषि आश्रमासारखी राहणी! त्यांनीं सांगितलेली उपनिषदें आम्ही दोघं ऐकायला जात असूं. मला कांहीं शंका आली कीं विचारायला मी जायची. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें आमच्या उपाध्यायांनीं सर्व केलें.

आमचे उपाध्ये कै. विष्णुभटजी जोशी हे १९१३ सालापासूनचे आमचे उपाध्ये म्हणून त्यांना आमच्या घराबद्दल आपुलकीचे प्रेम वाटे. ते उत्तम शास्त्री असून चांगल्यांतले ज्योतिषी होते. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई ह्यासुद्धां आम्हाला म्हणजे मुलांना सुद्धां घरच्या वाटतात. त्यांनीं आमच्या येथलीं सगळीं लग्नकार्यें, धार्मिक कृत्यें छान केलीं. त्यांचा एकुलता एक मुलगा मुंबईस पोलिसखात्यांत हुद्देदार आहे.

त्यांनीं आम्हां उभयतांकडून पुण्याहवाचन ठेवून सर्व धार्मिक विधि करवला. पाहुणे खूपच जमले होते. माझा भाऊ दिनकर,हरिभाऊ पाटसकर,

मगनशेठ, व्याही, जांवई, नात जांवई, मुलं, सुना, लेकी, नातवंडं जवळ जवळ शंभर मनुष्य होतं. फडके माई होत्या. आमच्या वन्सं माझ्याच वयाच्या आहेत. त्यांचीहि मुलांनीं तेव्हांच एकसष्टी केली. मला सर्व मुलांनीं मिळून चांदीची समई दिली. खांबेटे दादा होते. बाकीच्यांनीं कांहीं कांहीं गमती दिल्या. जळगांवकरांनीं दुपारीं टाऊन हॉलमध्यें समारंभ करून मानपत्र दिलें. मुलांनीं दोन दिवस अनेक कार्यक्रम केले. अनेकांचीं अभिनंदनपर पत्रें आलीं त्यांत माझा पुतण्या अण्णा, जनरल शिंदे, दादासाहेब मावळंकर ह्यांचीं पत्रें सुंदर होतीं. फक्त उणीव एकच होती. बाळासाहेब नव्हता. तीं दोघं पति पत्नी त्यावेळेस अमेरिकेंत होती.

काळ जात होता. बाबू व उषा शिकत होती. माझी पोथी चालली होती. वाढदिवस झाल्यावर मी बेळगांवास भिडयांकडे विमलच्या लग्नाला गेले. तेथून सांगलीस जगूमामा साठे यांच्याकडे दोन दिवस राहिले. सांगलीकर राणीसाहेबांना भेटून आलें. मग मिरजेला गेलें. श्रीमंत तात्यासाहेब व राणीसाहेब दोघांचा पाहुणचार घेतला व मग परत येऊन करंदीकर मावशींचा पाहुणचार घेऊन चार दिवस पुण्यास होते. आमच्या घरीं गेलें. नानाकडे होते. तोंच पंत लेले विलायतेस जायचें ठरलें. त्यांना तेथल्या स्टेशनावर पोंचवलं व मग दोन दिवसांनीं मी मुंबईस गेलें. पण तेथें न राहतां थेट जळगांवास आलें. पुण्याच्या घरांतून निघतांना कां कोण जाणें मला खूप रडायला यायला लागलें. तात्या मोटारपर्यन्त पोंचवायला आले. मला म्हणाले. ' थोडी राहिलीस. चार दिवस राह्यच्या सवडीनें यावें! ' पण डोळ्यांचें पाणी खळेना. मोटार सुरू झाली.

मी जळगांवास आले. उषा दोन वर्षं नागपुरास होती. पण जरी माई नव्हती तरी अप्पासाहेब फाटकांनीं तिची फार काळजी घेतली. आणि दुसरे मनुष्य म्हणजे माझे मानलेले बंधु कमाताईचे ओक मामा. ह्यांनीं सख्ख्या मामापेक्षां जास्त तिचें केलें. पण दैवयोग असा कीं ती तेथें असतांनाच ते वारले. त्याच सुमारास खांबेटे वहिनी एकाएकीं भाजी चिरतां चिरतां हार्टफेलनें गेल्या. पुढे दादाहि आजारी झाले. जास्त वाटल्यावर आम्हाला दोघांना बोलावून दोन हातांत आमचे दोघांचें हात

धरून हंसले व बेशुद्ध झाले. तेहि गेले. माझा एक खरा भाऊ गला. गांवांतलें माहेर गेले. त्यांचा मित्र गेला. त्या आठवणींनीं कांहीं दिसत नाहींसें होतें.

उषाताई इंटरनंतर बी. ए. ला पुण्यास आली. व परशुरामभाऊ कॉलेजांत तिचें नांव दाखल केलें. बाबू तेथें फर्ग्यूसनला होता. तोंच आमच्या कुटुंबावर एक मोठा-दु:खाचा घाला आला. नव्या पंचांगाची दिवाळी होती. स्वत: जेवून वर गेले व रेडिओ लावतात तों तात्यासाहेब गेल्याची बातमी. तसेच खालीं आले. मी जेवायचीच होते. मला म्हणाले, 'रेडियोवर चमत्कारिक बातमी संपतां संपतां ऐकली. शोध कोठें घ्यावा?' तोंच गणू पिंपळखरे विचारत आला. 'आत्याबाई, काय बातमी?' इतक्यांत बँकेच्या लोकांचे कार्ड चार सह्या घालून. झालं बातमी खरी! त्यांना केवढा धक्का बसला. त्यांच्या स्वभावा-प्रमाणें एक शब्द बोलले नाहींत. पण चमत्कारिक मुद्रा करून खुर्चीत बसले. संध्याकाळीं अमळनेरनं आक्का आली. आमच्याजवळ कोणी नाहीं म्हणून. पुण्यास ते दिवशीं सहज म्हणून जिमखान्यावर गेलेली उषा 'राहा आतां संध्याकाळची कोठें जातेस' म्हणाले म्हणून तेथेंच होती. ती ही सगळी घटना पाहून घाबरून सकाळीं नानाकडे आली. मग नानानें रेडियोवर कळविण्याची व्यवस्था केली. आणि आम्ही दोघांनीं पुण्यास जायचें म्हणजे येथें कमाजवळ कोणी हवें म्हणून उषा, कुंदा व आम्हांला परत नेण्याकरितां म्हणून दिनूमामा लगेच निघाले. ते रात्रीं आले. दुसरे दिवशीं आम्ही निघून रात्रीं घरीं पोंचलों आमचीं मुलं आदले दिवशींच तेथें पोंचली होतीं. काय तो प्रसंग! स्वत: ताईच्याजवळ बसून सांत्वन केलें. तिसरे दिवशीं मी निघाले. स्वत: चौदावे दिवशीं आले. ह्यांची वृत्ति तेव्हांपासून उदासच झाली.

मधुकरपंत विलायतेहून येऊन भेटून गेले. आतां ते मुंबईस आले होते. बाळ विलायतेहून परत आला तो येथें येऊन भेटला. मग त्याला वालचंद शेठच्या मोटार कारखान्यांत नोकरी लागली. कांहीं वर्षें तो तेथें होता. स्वत: मुंबईस एप्रिलमध्यें जात. त्याचप्रमाणें गेले. आतां खटाव बिल्डिंग-

मध्यें बाबाचें बिऱ्हाड होतें. आम्हां सर्वांना ती उतरायची जागा होती. आला गेला सगळे बाबाकडे असत. खोल्या दोनच पण त्याला माणसांचा लोळ आहे व लीलालाहि मनुष्य हवें आहे म्हणून छान जमे. त्या खेपेला हे पुण्यास गेले. तात्यांच्या नं ८.रचें जाणें. थोडे तेथें राहिले. थोडे नानाकडे राहून मुंबईस आलें. निर्मला आली तिला बोटीवर आणायला गेले होते. मग परत आले. भाद्रपद आला. ह्यांना ८१ वे वर्ष लागणार म्हणून मुलांनीं वाढदिवसाचा बेत केला. त्यांना पसंत नव्हतें. 'तात्या गेले आणि तुम्ही कसला वाढदिवस करतां?' मुलं म्हणालीं, 'तें दुःख आम्हांलाहि आहे पण आम्हाला तुम्हीहि हवे आहांत. म्हणून आम्ही वाढदिवस करणार!' आणि त्यांनीं वाढदिवसाची तयारी केली.

ह्यांनीं स्वतःचें एकहि मनुष्य बोलाविलें नाहीं. गांवांत कोणाला कळलें नाहीं. मुलं मुलंच नाचली. फोटो काढले. फिल्म घेतली. गंमत गंमत करत होती. ते अलिप्त होते. पुढें अवीच्या मुंजीची तयारी केली. म.गांधी गेले तेव्हां बेत रहित केला. बाळनें नोकरी सोडून एस. टी. मध्ये नोकरी धरली. उषाताई बी. ए. झाली व तिनें मॉंटेसरी कोर्सघेतला. बाबू बी. एस., सी. सेकंड क्लास पास झाला. तो मुबईस नोकरी पाहात होता. त्याला सेक्रेटरीएटमध्यें नोकरी लागली. मुली सांगून येतच होत्या. नागपूरच्या पटवर्धनांची मुलगी त्याला पटली. लग्न ठरलें व तें आणि अवीची मुंज येथेंच झाली. नेहमीप्रमाणें सर्वच जमलीं होतीं. फक्त ताई नव्हत्या. तें मात्र सारखे जाणवे. त्याचे मित्रहि पुष्कळ आले होतें. दोन्ही कार्यें थाटांत झाली. सुनेचें नांव शैला ठेवले. पंत बोटीवर गेले होते. म्हणून सोबत म्हणून बाबू कुंदाकडे होता. तेथेंच ती राहावयास गेली. श्रावणांत मंगळागौरीला कुंदूनें वाण केलें. स्वतः आले नाहींत, पण कमा व आत्याबाईजवळ आक्काची मुलगी शाली, हिला ठेऊन मी गेलें. आम्हीं जळगांवला आल्यापासून कोठेंहि जायचें असलें कीं शालीला पकडायची हें ठरल्यासारखेंच होते. असे पांच सहा दिवस मुबईस होतें. बाळचा चेंबूरचा बंगला पाहिला. मंगळागौर, वाण, सर्वच थाटांत झालें. पण आतेबाई आजारी म्हणून जास्त न राहतां ताबडतोब परत आले. नेहमी मुंबईस गेले म्हणजे कुसुमताईकडे एखादा

दिवस तरी राह्यची. ह्या खेपेला राह्यला जमले नाहीं तेव्हां बाबुराव भावे मला म्हणाले, 'ताई ह्या खेपेला आमच्याकडे मुळींच राहिला नाहींत.' मी म्हटलं ' खरंच तसं झालं! पुन्हा आलें कीं आधीं तुमच्याकडे येईन.'

पण योग कांहीं निराळाच होता. श्रावणाच्या चवथ्या शुक्रवारी धुळ्यास हार्ट फेलनं बाबुराव गेले. स्वत: लगेच तेथें गेलें. मुंबईहून मुलं, कुसुमताई सर्व गेलीं व मग जळगांवला आलीं. तो आघात मोठाच होता. दहावे दिवशीं कुसुम मुंबईस गेली. मग मी यांच्या मागे लागले, 'मुंबईस जा म्हणून!' ते म्हणत 'तूं जा!' पण माझ्यापेक्षां वडिल माणसांचा पोरावर दरारा बसेल व उपयोग होईल असें मला वाटलें. तें माझे ज्योतिष खरें झालें. स्वत: गेले. कुंदाच्याकडे बंगल्यांत उतरलें. व मग सगळ्या कारभारांत पाहातां, कुसुम म्हणाली 'बाबू कारखान्याला द्याल तर बरें होईल!' त्यांनी बाबूला नोकरी सोडायला लावली व कारखान्यांत दिला. आज तो मॉडर्न केमिकल वर्क्स छान चालवतो आहे. मग स्वत: परत आले. पण त्यांच्या प्रकृतीची कुरकूर सुरू झाली. अन्न पचत नाहीं; शौचास होत नाहीं. असा आरंभ झाला. शैला आली, तिची डोहाळ जेवणें केलीं. सजलेल्या शैलानें नमस्कार केला. मग थोड्यावेळानें मला बोलावून म्हणाले, ' कशी पोर छान दिसत होती. तिला आई नाहीं म्हणून तूं तिचें इतके कौतुक केलेंस ना ? तुला कसं सगळ्यांचं कौतुक करायचं जमतें !' असं म्हणून खुलास हंसले. पुढें शैलाला मुलगा झाला. दिवाळी आनंदाची गेली. पण त्यांची प्रकृति खंगत होती. एक दिवस सगळ्यांना पत्र लिहून भेटून जायला लिहीलें. मला कल्पना नाहीं. ताई, आक्का, आलीं. सगळीं मुलं आलीं. मग आपण मुंबईस गेले. मी चार दिवस ग्वाल्हेर करून आले. व मग मुंबईस जाऊन भेटून आले. शैला मुलगा घेऊन गेली. उन्हाळा संपल्यावर स्वत: परत आले. पण असंच ताक पी, दूध घे, थोड जेवलं जेवलं नाहीं तर नाहीं, असं करतां करतां दिवाळी येऊन गेली. उषा दिल्लीस होती ती क्लास संपवून आली नी अवचित् तिचें लग्न ठरलें. यांची प्रकृति खालावलेलीच होती. पण तें लग्न शक्य तितकें थाटांत घरींच रजिस्टर करून केलें. आप्त व तिच्या मैत्रिणी जमल्या होत्या. पण यांना उत्साह नव्हता. नेहेमी म्हणायचे, ' खरंच

वादविवाद करतां करतां आतां आपल्या लग्नाला पन्नास वर्षं होतील. नाहीं का?' मग आपण ज्युबिली करूं हं! अनायासे सर्व जमलीं होतीं म्हणून मी लग्नाच्या पन्नास वर्षांचा वाढदिवस करायचा ठरवून उपाच्या लग्नाच्या दुसरे दिवशीं तो केला. पण हे जितके आनंदानें तो करूं म्हणत त्या प्रमाणांत एक शब्दहि बोलले नाहींत. मीच घाट घातला, हंसतमुखानें पार पाडला पण सर्व वातावरण उदास होतें.

पुढें लगेच स्वत: मुंबईस गेले.तेव्हां दिवसा बाबाकडे शारदाश्रमांत राह्यचें. रात्रीं बाळासाहेबाच्या चेंबूरच्या बंगल्यांत जायचे. मुलांनीं उपचार करण्यांत मुळींच कसूर केली नाहीं. डॉक्टर तर घरचाच माझा भाचा–बाबुराव फडके होता. तो सर्व तऱ्हेनें पहात होता. मी जाऊन आठ दिवस राहून आलें. ते तेथें मी येथें. जगालासुद्धां विचित्र दिसणारी ही घटना होती. पण कमा १–१॥ महिना मुंबईच्या लहान जागेंत रहाणें शक्य नव्हतें. त्यांना त्रास झाला असता. ते परत आले पण थकले होते. क्लबहि सोडला. चालवेना. पण घरांत माडीवर असत. जेवायला व चहापुरते खालीं येत. निजणें वर असे. लीला येथें होती. एक दिवस पोट दुखतं म्हणाले, आंग दुखतं म्हणाले. तेव्हां रात्रीं खालीं निजा म्हटलें, व ते त्यांनीं ऐकलें. सकाळीं चहाच्यावेळेस थोडं एरंडेल दिलं. मग वाटलं डॉक्टरना दाखवावं. म्हणून डॉक्टर वेंडाळचांना बोलावलें. ते येऊन पाहून गेलें. ११–११॥ झालें होतें. चार आठ दिवस जेवण बंद केलं होत. म्हणाले, 'ताक पिऊन वर जातो! रेडियो लावतो!' तो फार आवडे. तो वर असे. ताक पितांना म्हणाले, 'मी थोडें फ्रुटसॉल्ट घेतों.' मी नको म्हटलें, 'एरंडेल घेतलं आहांत होईल केव्हां तरी लागू.' पण पटलं नाहीं. दोन्ही घेऊन वर गेलें. मी जेवलें व बाहेर येऊन पडलें. पेपर हातांत घेतला तों कण्हल्याचा आवाज वाटला. मी म्हटलें, 'लीला, कोणी कण्हलें कां ग?' 'छे भास झाला!' ती म्हणाली म्हणून मी भिंतीकडे तोंड केलें. पण तिला तो आवाज पुन्हा ऐकलासा वाटला; व तिनें उठून बघितलें अन् मला हांक मारली. वरून खालीं येऊन खालच्या चौकटींत भिंतीला टेकून बसले होते. बेसावध होते. मी

घरांत जाऊन सकाळीं कुटलेल्या आल्याचा चोथा होता तो हातांत कुसकरला व फेकून देऊन ती बोटं बाहेर येऊन डोळ्यावर फिरवलीं तेव्हां सावध झाले. दोघींनीं धरूत उठवून आंत आणलं तर मोठी उलटी झाली. पुढें शौचाला झालं. धरून पलंगावर निजविलें. ते जे त्या दिवशीं खालीं आले ते पुन्हा माडीवर गेले नाहींत. बाळ आला त्यानें रेडिओ खालीं आणला. सुना, मुली, मुलं, सारखी येत जात होतीं. त्यांनीं मुंबई–जळगांव आंगण ओसरी केलं होतं. अन्न बंदच होतें. पण अंथरुणावर बसून वाचत बिचत, चहा पीत असें चाललें होतें.

एक दिवस रात्रीं मोरीत परसाकडेला बसले, म्हणाले, 'एनिम्यांत पाणी घाल; होत नाहीं.' मी म्हटलें 'सकाळीं झालें आहे. पोटांतच कांही नाहीं तर काय होणार ?' तर म्हणे 'मला त्रास होतो. एनिम्याच्या भांड्यांत पाणी घाल. तुझं म्हणणं नको सांगू.' मी गप्प बसलें. मी जवळच उभी नी एकदम तोल गेला. 'लीला, म्हणून ओरडलें. ती आली. बेशुद्ध झाले होते. दोघींनीं खुर्चीत बसविलें नि चाकाची खुर्ची पलंगाशीं आणली व वर ठेवलें. शुद्धीवर आले पण पुन्हां कांहीं आपल्या आपण उठून बसले नाहींत. ताई, आक्का, आत्याबाई, आल्या. ताई आक्का, गेल्या. आतेबाई राहिल्या. कुंदा आली. इंदिरा आली नि लीला गेली. तेव्हां तिला वाईट वाटलें. त्यांनाहि फार वाटलें. सुनांवर पोरींसारखें प्रेम. जास्त झालें तेव्हां तार केली. भाऊ आला. पंत आले होते. त्यांच्याशीं बोलले नि मग शुद्ध गेली. दोन दिवस तसेच गेले. अनेक देव आळवलें पण आयुष्याची दोरीच संपली तिथें काय करणार ? चंद्राताई देसाई, लागू, बेंडाळे सर्व आले. शांता आक्का होतीच. पण सर्वांना चुकवून मला ह्या जगांत एकटी टाकून तो पुण्यवान् प्राणी स्वर्गलोकीं गेला. ता. २९–१२–५२ चा सूर्योदय मी कसा पाहिला ? आमच्या घरांतला सूर्य पहांटेच अस्ताला गेला होता. माझा सौभाग्यसूर्य मावळला. त्रेपन वर्षांचा सहवास संपला. बोलायला शब्द नाहींत. लिहायला हात धजत नाहींत. काय लिहायचें ? सर्वच संपलें !

◆◆◆◆

## पुढली पिढी : ८

मुलांत मोठी माई. ती माझ्या लग्नांत अडीच वर्षांची होती. पांच सहा वर्षांची होईपर्यंत ती सासुबाईंच्याजवळ असे. म्हणजे त्या आमच्या जवळच असत. पण ती त्यांच्या मागें मागें असे. मग ती माझ्याजवळ राहूं लागली. त्या पुण्याला किंवा यात्रेला गेल्या तरी ती माझ्याजवळ राहूं लागली. मग मी तिला आई आहे हें पटूं लागलें. जात्या ती गरीब व शहाणी. गोरी पण सुंदर नव्हती. अबोल पण सर्व भावंडांवर प्रेम फार. वडिलांचें तिच्यावर साहजिकच प्रेम जास्त होतें.पण माझ्यावर ती इतकें प्रेम करी कीं आमच्या दोघींतलें सावत्रपणाचें नातें पुसलें गेलें. मी तिला माझ्या मुलांच्याइतकीच रागावत असे. बोलत असे. पण हें नातें इतकें पुसलें गेलें कीं माझ्या मुलांना ती सावत्र वहिण हें ठाऊक नव्हतें व तिच्या मुलांना मी सावत्र आजी हें ठाऊक नव्हतें. तिचें लग्न झालें व ती नागपुरास गेली. तेव्हां एकदां तिच्या सासूबाई कोणाजवळ तरी बोलतांना म्हणाल्या कीं तिला सावत्र आई आहे तर तिनें हळूंच नणंदेला सांगितलें कीं, तुम्ही बाकी कांहीं बोला. पण माझ्या आईला सावत्र म्हणूं नका. तिचें लग्न प्रोफेसर भिकाजी-पंत फाटकांशी झालें होतें. ते नागपूरच्या शेतकी कॉलेजांत होते. पुढें तें व्हाइस प्रिन्सिपॉल झाले व तेथेंच त्यांनीं पेन्शन घेतलें. तिला तीन मुलगे व पांच मुली झाल्या. शेवटल्या मुलीच्या बेळेसच्या बाळंतपणांत ती मधल्या वयांत अर्धवट संसार टाकून गेली. मुलीच्या लग्नाची खूप खटपट करीत होती. पण ती गेल्यावरच सर्व कार्यें झालीं. संसाराची तर हौस फार पण दर वेळेला म्हणायचें कीं मला वहिनीनं शिकवलं ( पुण्याची सर्व मुलं तात्यासाहेबांमुळं मला वहिनी म्हणतात. तें पाहून ती लहानपणीं वहिनी म्हणूं लागली व तेंच कायम झालें. ) मी नागपूरला जायची

म्हणजे कोण आनंद सगळ्या गल्लीला. नातींनीं सांगून यायचें, 'आमची धुळ्याची आई यायची आहे.' कीं मी जेऊन आडवी झाले कीं तिच्या मैत्रिणी यायच्या. कारण ती स्वभावानें गोंड. सगळ्यांच्या उपयोगी पडणारी. एकदां ओळख झाली कीं तें मनुष्य विसरत नसे. धरम पेठेंत नवी कॉलनी झाली तेव्हां फाटक व त्यांच्या खात्यांतले कांहीं स्नेही अशा सगळ्यांनीं जवळ जवळ प्लॉट घेतल्यानें त्यांचे स्नेह वाढले. मग चार दिवस तेव्हांच जात. मग म्हणायचीं 'माशांसारखी माणसं गोळा होतात. आणि तुझी जायची सदा घाई.' पण काय करणार? माझीं घरीं मुलं लहान असायचीं. मी अखिल भारतीय महिला परिषदेची अध्यक्ष म्हणून गेलें तर तिला केवढा आनंद! केव्हांहि मी सभेच्या निमित्तानें जावो, हिला आनंद व वहिनीला काय करूं काय नको व्हायचं. प्रथम प्रथम सासरीं कोणी विचारीत, 'हें माहेरचं वडिलांनीं दिलं असेल!' म्हणजे तिला राग येई, ती म्हणे, 'अहो, वहिनीच सगळं देते; त्यांना ठाऊकसुद्धां नसतं!' खरंच नसे. ते कधीं चौकशी करत नसत. मी केव्हां केव्हां म्हणे, 'तुम्ही एखादवेळेससुद्धां तिला कसं विचारीत नाहीं?' तर म्हणायचे, 'तूं कमी करशील असा संशय आला म्हणजे विचारीन.' तिचा तर प्रश्नच नसे. कारण तिच्या वहिनीसारखी बाई कुठें जगांत मिळायची नाहीं. इंदिरा, लीला या सुना आल्यावर ती एकदां मला म्हणाली, 'वहिनी, तूं सुनांकडूनहि जिकलंस हां!' पण दैवयोग! ती आम्हाला दुःखांत लोटून अकालीं गेली. पुढें ह्यांच्यानंतर सहा महिन्यांनीं फाटकहि गेले तिच्या चार मुलींची लग्नें झालीं. पण त्यांतली एक दुर्दैवानें गेली. तिन्ही मुलगे मिळवते आहेत व त्यांचें माझ्यावर त्यांच्या आईसारखेंच प्रेम आहे. ते मुलगे आणि मुली मला आईच म्हणतात. मामा मामीहि त्यांचे सर्वांचे कौतुक करतात.

माझा थोरला मुलगा भाऊ. ह्याला तीन मुलगे व एक मुलगी आहे. तो मुंबईस एस. एच. केळकर आणि कंपनींत डायरेक्टर-मॅनेजर असा आहे. तो एम. ए. आहे. त्याची बायको इंदिरा रूपासारखीच गुणानें सुंदर आहे. तिचं घर सुंदर आरशासारखं स्वच्छ असतं. करणं सवरणं सर्व सुरेख आहे. फार शिकलेली नाहीं. माझ्या जोडीला पुढल्या पिढींत तीच

अडाणी•आहे. पण तिचा संसार, वागणं, करणं, पहाल तर तसं वाटणार नाहीं. आपल्या वडीलकीच्या नात्याला स्मरून धाकटया जावांचं, नणंदांचं सर्वांचं करायला तयार असते. माझ्यावर तर अत्यंत प्रेम करते. तिचा थोरला मुलगा लंडनला विमानाचं शिक्षण घेतो आहे. धाकटे दोघे व मुलगी शिकताहेत. माझ्या भाऊच्या गुणाबद्दल तर बोलायलाच नको. बोलणं, कर्तव्य न चुकणं, सगळ्यांशीं गोड वर्तणूक, पुन्हां आनंदी, समाधानी, सर्व भावंडांना व मेहुण्यांना हवा हवासा असा माझा भाऊ आहे.

भाऊच्यानंतर शांताबाई ऊर्फ आक्का. तीं दोघं एकत्रच वाढलीं, एकाच बाटलीनें दूध पिऊन एकाच पाळण्यांत निजून. आक्का गरीव, भित्री, कष्टाळू आणि बुद्धिमान आहे. ती इंटरपर्यंत शिकली आहे. पण तिला पाहिली तर कोणाला खरं सुद्धां वाटायचं नाहीं असा तिचा वेप व राहणी असते. सगळ्या जगाला मदत करावी ही बुद्धि. पण भोळी. मात्र भोळी म्हटलेलं तिला पटायचं नाहीं. सदा सार्वजनिक काम करीत असेल. सारखं कांहीं तरी करत असल्याशिवाय तिला चैन पडायचेंच नाहीं. तिचें तत्वज्ञान निराळें. तें दुसऱ्याशीं जमेलच असं नाहीं. पण प्रेमळ. सगळ्यांशीं प्रेमानें वागेल. मन उदार. आपल्याकडून सार्वजनिक असें काहींना कांहीं उद्योग करीत असेल. तिचे माझ्यावर प्रेम आहेच. वडिलांच्यावर तर होतंच होतं. पण तिच्या मुलीसुद्धां माझ्यावर आई आई म्हणून प्रेम करतात. आई–वडील बुद्धिमान असल्यामुळें मुलं सगळीं बुद्धिमान निघालीं आहेत. तिच्या सात मुलींपैकीं पांचाची लग्न झालीं असून सगळें जांवई छान आहेत. एक मुलगी डॉक्टर असून धनवादला सरकारी नोकरी आहे. धाकटी शिकते आहे. मुलगाहि गोड, प्रेमळ व हुशार आहे बुद्धीबद्दल प्रश्नच नाहीं. वडिलांची प्रतिमा आहे. आक्काचे यजमान म्हणजे माझे जांवई माधव रामचंद्र ओक यांना भैय्यासाहेब म्हणतात. मूळ ही मंडळी दक्षिणेंतल्या संस्थानांतली. पण वडिलांपासून देवासला राहणें. भैय्यासाहेब जयपूर कॉलेजला प्रिन्सिपॉल होते. पण लवकरच तेथले पेन्शन घेऊन अमळनेरच्या तत्त्वज्ञान मंदिरांत आले. ते तेथेंच व्हाईस प्रिन्सिपॉल म्हणून आहेत.

त्यानंत वसंत ऊर्फ बाबा हा दोन्ही इंटर सायन्स होऊन मग कमर्शियल आर्टकडे गेला. मुंबईस पुष्कळ वर्षे त्याचा स्टुडियो होता.व तो शारदाश्रमांत राहात असे. एकाकाळीं त्याचे तेथें चांगले चालत असें, पण पुढें नीट जमेना म्हणून त्यानें मुंबई सोडली व तो सध्या जळगांवांत माझ्याजवळ घरींच आहे. त्याची बायको लीलाबाई जी. ए. आहे. त्याला दोन मुली आहेत. वडिलांच्यांसारख्याच हुशार आहेत. दोघी हायस्कुलांत शिकतात. लीला अशक्त आहे पण स्वभावानें गोड, प्रेमळ, कष्टाळू अशी आहे. कुटुंबाबद्दल आस्था व प्रेम. माणसं हवीत; नीट नेटका संसार कराची आवड.सगळ्यांना धरून राहयची प्रवृत्ति; माणसांचा कंटाळा नाहीं. जागा केवढीहि असो बाबाकडे जेवायला व झोंपायला माणसें सामावतात. त्याला माणसांचा व येणाऱ्या जाणाऱ्यांचा एवढा लोळ आहे कीं जर त्याला चांगला पैसा मिळता तर त्यानें दुसरें धुळें उठविलें असतें. कारण आमच्याकडे हेंच चाले. आणि बायकोला शक्ति नसली तरी माणसं हवीत. ह्यांच्या दुखण्यांत सुनांनीं ह्यांची मुलींसारखी सर्व प्रकारची शुश्रूषा केली बाबाचेंसुद्धां आईवर फार प्रेम आहे. लीलाहि मुलीसारखीच वागते. आत्याबाईवर त्यांची फार भक्ति आहे. बाजारहाट करण्याची खूप आवड आहे. त्यांत त्याचें डोकेंहि छान चालतें. सुंदर कापड, सुंदर भांडं, सुंदर वस्तु दिसली कीं घ्यावीशी वाटते. आई यायची म्हटली कीं, आईसाठीं काय आणून ठेवूं काय नको असे त्याला होई. वडील शेवटीं ३–४ वर्षे आजारांत उन्हाळ्यांत त्याच्याकडेच असत. दोघं नवराबायको व बाबू शैला तेव्हां तेथेंच असत. त्यांची खूप काळजी घेत. असा आहे माझा बाबा.

मनोहर ऊर्फ नाना संपादक **वाङमय–शोभा,** ह्याला लहानपणींच टायफॉईड झाला. त्यामुळें प्रकृतीनें अशक्त. एका पायावरहि परिणाम झालेला असा आहे. अशक्त म्हणून आजीचा लाडका. स्वत: कधीं हात लावायचें नाहींत. लहानपणीं स्वभावाचा तापट पण हळवा आणि प्रेमळ. बुद्धिमान पण बाबा वगैरे मेहेनती तसा हा मेहेनती नाहीं. ह्याचा वेळ इतर वाचनांत जाणारा. विचार, चर्चा ह्यांत गोडी. पहिली जशी भाऊ आक्काची जोडी तशी ही नाना कुसुमची शाळेंतली जोडी; मॅट्रिकपर्यंतची. अर्थात्

फिरतीवर गेली तर जोडी बरोबर जाई. खेळायला भांडायला सगळ्याला जोडी. आजींच्यामुळें तो सुट्टींत एक दोनदां पुण्यास गेला. त्यामुळें त्याला पुण्याची गोडी लागली व तो दर सुटींत पुण्यास जाऊं लागला. पुढें दोघे मॅट्रिक झालीं. मग जोडी फुटली. नाना इंदूर कॉलेजला दोन वर्षें होता. तेथें त्याचें किब्यांकडे जाणें येणें असे. तेथून तो पुण्यास गेला व घरीं तात्यासाहेबांकडे राह्यला व तेथेंच बी. ए. झाला. मग स्वतंत्र राहून प्रकाशन व्यवसाय सुरू केला व नंतर त्यानें मासिक काढलें. त्याची बायको स्नेहलता. पण आम्ही तिला लता म्हणतो. ही दीक्षितांची मुलगी. वडिलांचें गाव सांगणें शक्य नाहीं. कारण गिरणीच्या नोकरीमुळें ग्वाल्हेरपासून त्रिचूरपर्यन्त हिंडलेले. लग्नाच्या वेळेस ते चाळिसगांव मिलमध्यें मॅनेजर होते. लतासुद्धां हुशार, गोड, प्रेमळ, अशी आहे. ती जरी मॅट्रिकच झालेली आहे तरी नवऱ्याचा संपादकीय संसार सर्व संभाळते व शिवाय घरहि संभाळते. नानाचा नुसता संपादकीय संसारच आहे असं नाहीं. त्याचा घर-संसार तर फार मोठा आहे. उत्पन्नाच्या मानानें त्याला येणाऱ्या माणसांचा इतका अगत्याचा लोभ आहे कीं त्या बायकोला तो आवरतां आवरतां पुरेवाट होते. एकदां स्वतः म्हणाले होते, "ह्या नानाच्या इथलें चहा, सरबत, कॉफी करतां करतां ती पोर थकून जाते. पण दोन माणसं तशीं कां नाहीं जाऊं देत?" पण तो त्याचा स्वभाव नाहीं. बाबासारखेंच त्याच्याकडे माणसांनीं घर भरलेलं असतं. त्याला सगळ्या नात्यांचं, स्नेह्यांचं कौतुक आहे. बायकोहि तितक्याच अगत्यानें सर्वांचें करते. दीर, जावा, नणंदा, भाचे, भाच्या, सगळ्यांना विचारायचें. मेहुण्यांचं प्रेमानें स्वागत करायचें. अशी सगळी हौस तिला आहे. नानाला दोन मुलगे व एक मुलगी आहे. थोरला अविनाश खूप हुशार आहे. त्यांना सर्वांना मी जायची म्हणजे कोण आनंद, काय आनंद! व आईकरितां काय करूं आणि काय नाहीं असें नानाला होतें. धाकटा श्रीकर म्हणतो, "आई आली म्हणजे पुढें पाट, मागें पाट, चांदीचं ताट ठेवावें तरी काय चुकतं कोण जाणें? ती रहातच नाहीं!" शुभदा आणि श्रीकर मोठी गोड पोरं.

कमा आत्याला तर उचलून धरतात. नाना करतोच करतो पण लताच्या माहेरची मंडळीसुद्धां तसेंच प्रेम करतात.

कुसुमताईला एक मुलगी आहे.कुसुम जी. ए.आहे. एकाकाळीं ती आपल्या धंद्याचें काम पहात असे. अशी हुशार आहे. संसार छान करते. टापटीप स्वच्छता ह्याचें फार वेड आहे. एकटं राह्यला नको. माणसं हवीं, ह्याचें कारण तिच्या लहानपणीं आमच्या घरांत भरपूर माणसं असत. ती कांहीं वेळां मुंबईस असते तर कांहीं वेळां बदलापूरला,तिच्या यजमानाचा-नाना-साहेब काळे यांचा कारखाना व घर आहे तेथें असते. सगळ्या भावंडा-वर तिचें प्रेम आहे व सर्व भावंडें तिच्यावर प्रेम करतात. ती वडिलांची फार लाडकी होती. व धुळ्यास पुष्कळ राहणें पडे. त्यामुळें तिचें जाणें येणें माहेरीं पुष्कळ असें. त्यांच्या दुखण्यांत ती एक महिना येऊन राहिली होती. आतांच तिचें येणें होत नाहीं. कारण येथें माणसेंच नसतात—तरी तिला माझ्याबद्दल व कमाबद्दल फार वाटते. मी मुंबईस असलें कीं ती पुष्कळ वेळ मी असेन तेथें येऊन माझ्याजवळ काढील. आजारी असलें तर सर्व कष्ट करायला तयार अशी गोड, प्रेमळ, हुशार पण भोळी मुलगी आहे. जांवई नानासाहेब काळे यांना मुंबईत एका कंपनीत कन्सल्टेशनची नोकरी असून शिवाय बदलापूरला त्यांचा रंगाचा कारखाना आहे.

चवथा मुलगा आनंद उर्फ बाळासाहेब. ह्याला लहानपणापासून जोड मोडीचा नाद, मोटारीचा नाद. त्यांतलं थोडं फार कळायचं. एकदा कुठशीं ट्रीप गेली. परत येतांना त्यांची गाडी बिघडली. ड्रायव्हर खुडबुड करीत बसला होता. हा पहात होता. ह्याच्या लक्षांत कांहीं आलं. तो म्हणाला, 'मी बघूं कां हो ?' ड्रायव्हर 'हो' म्हणाला. ह्यानें खालीं पोत्यावर पडून ती दुरुस्त केली. गाडी चालू झाली.धुळ्यांत गाडी उशीरा आली.मग म्हणाला, 'आतां मला मिलमध्यें पोंचवा.' रात्रीं मिलमध्यें आला. अशा नादामुळें स्वत: म्हणाले, 'जर तूं इंजिनिअरिंगच्या पहिल्या परीक्षेंत फर्स्ट क्लास आलास तर फॉरीनला पाठवीन. मॅट्रिक झाल्यावर मुबईच्या कॉलेजांत होता. तेथून पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजांत गेला. व तेथें फर्स्ट क्लास आल्यामुळें अमेरिकेला पाठवला. तेथून परत आल्यावर वालचंद शेठजींच्या

निरनिराळ्या कारखान्यांत होता. मग पुन्हा तो अमेरिकेला १९४४ साला-अखेर गेला. परत आल्यावर प्रिमिअर मोटार कारखान्यांत होता. तेथून एस्. टी. मध्यें होता. आतां एअर इंडियांत आहे. त्याची बायको—ठाण्याचे एकेकाळचे डिस्ट्रिक्ट जज्ज कै. भावे यांची मुलगी. ती इकडची बी. ए. असून नवऱ्यावरोबर अमेरिकेला जाऊन एम्. ए. झाली आहे. मुंबईस सोशल वर्क खात्यांत नोकरी आहे. ती परदेशांत राहून आली आहे त्यामुळें साहजिकच तिला तें वातावरण आवडतें. त्यामुळें आपल्या ह्या जुन्या वळणाच्या राहणींत तिचें मन रमूं शकत नाहीं. पण हुशार आहे. शांत, गरीब व प्रेमळ आहे. तिच्या राहणीप्रमाणें तिचा संसार ती छान ठेवते. एकच मुलगा आहे तो ग्वाल्हेरच्या सिंदिया स्कूलमध्यें शिकतो. बाळचा सायन रोडला बंगला आहे. तो जरी दैवानें मोठा झाला आहे तरी स्वभा-वानें आहे तसा आहे. सगळ्या भावंडांत मिसळेल, हंसेल, बोलेल. कोणच्याहि कार्यक्रमाला हजर राहील. थट्टा मस्करी करील, माझ्यावर तर प्रेम करतोच करतो. तो मला म्हणतो, तूं प्रथम रहात होतीस तशीच रहा. कांहीं कमी करूं नको. आनंदी, उत्साही, प्रेमळ व लाघवी असा माझा बाळ आहे. तसाच कष्टाळू, उत्साही, स्वकर्तबगारीवर दैव काढ-ण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या स्वभावांत आहे. मग तेथें काय कमी !

उपाताई बी. ए. बी. टी., मॉंटेसरी कोर्स झालेली. तिनें चाळिसगांवास एक बालक मंदिर काढून दाखवलं. आतां तें चांगलं चालतं आहे. तिचें लग्न डॉक्टर आगरकर यांच्याशीं झालें आहे. थोड्या पैशांत गरीब विद्यार्थ्यांचें लॉजिंग व बोर्डिंगसह शिक्षण व्हावें अशी त्यांची महत्वाकांक्षा आहे. त्यांनीं त्याप्रमाणें पुण्याजवळ कान्हाटीस एक शाळा काढली आहे. तेथें ती हेड-मिस्ट्रेसचं व बोर्डींग सुपरिंटेंडेन्टचं काम करते. स्वभावानें प्रेमळ, कष्टाळू उत्तम गृहिणी. पडेल त्या कष्टाला तयार; भावंडावर अलोट प्रेम. आई-बद्दल व धाकट्या कमाबद्दल तर विचारूंच नका. कलावान्, बुद्धिमत्ता ज्यांत घालाल त्यांत बसेल अशी तिच्याजवळ आहे.

कुमुदिनी ही मॅट्रिक व स्मृतितीर्थ आहे. गरीब पण पाणीदार व हुशार. वाचन तर इतकें कीं लोक बी. ए. समजतात. नवे जुने दोन्ही तऱ्हेचे संसार

उत्तम करील. आला गेला नात्या गोत्याची माणसं सगळ्यांचें काय करायचे कसें करायचें हें तिला छान येतें. विणकाम, भरतकाम, शिवण ह्यांत उत्तम गति. सार्वजनिक कार्यांतहि होईल तेवढा भाग घेईल. दोन मुलं, एक मुलगा व एक मुलगी आहे. कॉन्व्हेन्ट स्कूलमध्यें आहेत. त्यांचे शिक्षण बघेल. सासरच्या माणसांची तव्यत संभाळण्यांत तत्पर. तशीच वहीण भावांनाहि विचारील. तिचे यजमान मधुकरपंत लेले हे सुद्धां हुशार इंजिनियर आहेत. ते नेव्हीमध्यें कॅप्टन आहेत. नेहेमीं त्यांच्या बदल्या होतात. सध्या ती दिल्लीस आहे. अर्थात् तिचे माझ्यावर प्रेम आहे हें निराळें सांगावयास नको. आतां मुली लग्नाला मोठ्या होतात त्यामुळें त्यांना आईचा सहवास जास्त घडतो. कमावद्दल तर तिला वाटतेंच वाटतें. पंतसुद्धां माझ्यावर प्रेम करतातच. पण कमाबद्दल त्यांना फार वाटतें.

सगळ्यांत धाकटी मुलगी कमल. हिला जन्मापासून फिट्स् आल्या. त्यांत अर्धांगाचा झटका केव्हां आला तो डॉक्टरांच्याहि लक्षांत आला नाहीं त्यामुळें ती वेडी झाली. बारा वर्षांनंतर ती जरा माणसांत आली. आतां ती चांगली सुधारली आहे. चालते, बोलते, लिहिते, वाचते. पण अजून तीं अपंग आहे. तिची बुद्धि चांगली आहे. पण शरीर खुटखुटीत नाहीं. त्यामुळें एक काळजी आहे. तिच्या वडिलांना तिची फार काळजी वाटे. त्यांचा तिच्यावर 'फार जीव. सर्व भावंडें, भावजया, तिच्यावर आत्यंतिक, स्वतःच्या मुलांदेक्षां जास्त प्रेम करतात. ही ईश्वरी लीला आहे असें मी मानते.

आतां सगळ्यांत धाकटा बाबू ऊर्फ चिंतामणि. त्याचे प्रचलित नांव बाबूरावच आहे. बी. एस्. सी. आहे. मुंबईत मॉडर्न केमिकल वर्क्स चालवतो. त्याच्या उद्योगांत तो वाकबगार आहे. तो सगळ्यांत लहान. लहानपणीं आजारी आजारी असल्यामुळें आईवेडा होता. अर्थात् त्याला माझी ओढ जास्त वाटते. व तो लहान आहे ही जाणीव तो मोठा झाला तरी भाऊ, भावजय, बहिणी, विसरत नाहींत. व तोहि सर्वांवर प्रेम करतो. त्याची बायको शैला नागपूरच्या पटवर्धनांची मुलगी पण आतां ते नाहींत. तिला एक भाऊ आहे. ती मॅट्रिक झालेली असून कांदीवलीचा तिचा शारी·

रिक शिक्षणाचा कोर्स झाला आहे. तिनें थोडे दिवस हौस म्हणून नोकरी केली. संसार छान करणं, मुलांचं करणं, त्यांना सुरेख ठेवणं अशी हौस आहे. तितकंच कमावन्संचंहि करते. मी गेलें कीं तिला अतिशय आनंद होतो. माझं करण्यांत दोघांची चढाओढ असते. ती येथें आली म्हणजेसुद्धां माझ्या सर्व मैत्रिणींना आवडते. तिला तीन सुंदर गोड मुलगे आहेत. माझ्या बऱ्याच मैत्रिणींना बाबू जास्त माहीत आहे. कारण तो लहान तेव्हां माझ्याबरोबर जास्त असे. त्यामुळें आतांहि तो बऱ्याच मावशांकडे जातो. त्याला मित्र फार आवडतात. त्याचा मित्रपरिवार फार मोठा आहे. तोंडानें तो लोळ घोळ नको म्हणतो पण कृतींत तेंच चालतं. अर्थात् प्रत्येक मनुष्य आपल्या आवडत्याच चौकटींत फिरतो.

अशीं माझीं मुलं आहेत. देवानें हीं सुंदर रत्नं दिल्यामुळें मी आनंदी, समाधानी व सुखी आहे व मनांत देवाचे सारखे आभार मानीत असते. ह्या रत्नांच्या भरीला एक माणिकहि देवानें दिलें आहे. तें म्हणजे आमच्या वन्सं येसूताई ऊर्फ आत्याबाई. त्या १९०८ मध्यें आमच्याकडे आल्या. तेव्हांपासून त्यांचें आयुष्य ह्या घराशीं निगडित झालें. स्वत: म्हणायचें, 'आत्याबाई आहे तोंपर्यंत मी उपाशी राहायची भीति नाहीं,' असें स्वत: म्हणायचें, मुलाबाळांच्यावर माझ्यापेक्षां जास्त प्रेम करणाऱ्या आतेबाई मला बहिण म्हणा किंवा प्रेमळ मैत्रिण म्हणा अशा आहेत. आला गेला सर्वांची काळजी, कामाचा कंटाळा नाहीं. सदा आनंदी, बुद्धिमान्, पण देवधर्मांचं संभाळणाऱ्या अशा आतेबाई आहेत. मुलं मुलीं सगळीं आतेबाईच्या मागें असायचीं. माझे पुष्कळसे प्रवास आतेबाईंच्या जिवावर झाले. आतां मुलं मोठी झालीं. संसार मांडले तरी सगळीजण आतेबाईंना आपलें घरीं नेण्यांत, त्यांचे कौतुक करण्यांत चढाओढ करतात. त्याहि तितक्याच आनंदानें नातवंडांचें कौतुक करीत असतात. अशा आमच्या ह्या आत्याबाई म्हणजे घरांतील एक देवता आहे. ज्यांचें भाग्य असेल त्यांनाच अशी नणंद मिळेल.

आतां झालं चरित्र संपलंच म्हणायचं. कारण सर्व आयुष्याचें चित्रण करतांना अनेकांबरोबर आम्ही दोघं आलोंच आहों. पण चित्र पुरे झालेसं वाटलं तरी वरून एक कुंचला फिरवावासा वाटतो तसेंच हें आहे. एकंदर

ओघांत त्यांचा स्वभाव आलाच आहे. तरीपण त्यांच्या स्वभावाची थोडी जास्त ओळख दाखवतां येतें का पहावें.

केळकरांचें कुटुंब गरिबींतून वर आल्यामुळें यांना गरिबीची जाणीव होती. खरं म्हणजे अगदीं लहानपणची गरिबी सोडल्यास पुढील पासष्ट वर्षें चढत्या कमानीनें वैभव भोगण्यांत गेलीं होतीं. पण स्वतःच्या डोळ्यावर वैभवाची धुंदी कधीं चढली नाहीं, कऱ्हाडला असतांनाच गोंदवलेकर महाराजांची गांठ पडल्यामुळें यांनीं त्यांना तरुण वयांत गुरु केलें होतें. सुरवातीला कांहीं वर्षं पूजा अर्चा पोथी वाचन करीत. पण पुढें ते सुटले. फक्त संध्या करीत. तरीपण त्यांची ह्या गोष्टींवर श्रद्धा होती. आला गेला ब्राम्हण आमच्या येथून विन्मुख जात नसे. एकेकाळीं जेवायलाहि ब्राम्हण असत. पण पुढें अनेक कारणामुळें तें बंद केलं. श्राद्ध, पक्ष, दास-नवमी, सगळं व्यवस्थित व्हायचं. स्वभाव शांत होता पण क्वचित रागावले म्हणजे फार रागावत. बोलणं थोडं व मोजकं माणसं, आली गेली आवडा-यची, कोणी बोलका भेटला तर बोलत पण आपण होऊन फार थोडं. त्यांना स्वच्छता आवडे पण फॅशनच्या दिखाऊ स्वच्छतेचा कंटाळा असे. पेन्शन घेतल्यापासून त्यांनीं पाटलोण घातली नाहीं. धोतर, कोट, रुमाल हा त्यांचा पोषाख असे. ते सहसा कधीं हुकुम करीत नसत. पण मी त्यांच्या आवडी-प्रमाणें चालावें अशी त्यांची इच्छा असे. ते केळकर कुटुंबावर फार प्रेम करीत. पण तें सुद्धां कोणाला दिसणार नाहीं असं असे. कोणचंही सत्कृत्य उजव्या हातानं केलेलं डाव्या हाताला कळायचं नाहीं हा स्वभाव होता. नेहमीं कुठल्या तरी अधिकारावर असल्यामुळें कामाकरितां मंडळी येत. कोणाचें कांहीं काम होण्यासारखं असल्यास करीत पण कधींहि ' हो करीन ' म्हणत नसत. पण ' बरं पाहीन ' म्हणत व केल्यावरहि ' मी तुमचें काम केलें,' म्हणून म्हणत नसत. कांहींना ह्यांनीं केलेलें कळे. कांहींना कळत नसे. पुष्कळशा त्यांनीं दिलेल्या देणग्या मलाहि ठाऊक नसत. पत्रव्यवहार वेळच्यावेळीं व बिनचूक. हिशेब बिनचूक. पुष्कळ पत्राच्या डुप्लीकेट कॉपी असत. मुलांशीं फारशा गप्पा गोष्टी करीत नसत. पण मुलांना त्यांच्याबद्दल अत्यंत आदर व धाक वाटे. सरकारी नोकरीमध्यें

सुद्धां हाताखालचे लोक व संबंधीं माणसें त्यांच्यावर खुप असत. रेव्हेन्यू खात्यांत असूनसुद्धां कधीं अपशब्द, शिवी, त्यांच्या तोंडांत आली नाहीं. फार तर 'मूर्ख' म्हणत. खूपच कधीं रागावले तर 'गाढव' म्हणत. पण तें क्वचितच. कोणाशीं कधीं हेवादावा नाहीं. कोणाकडून कांहीं मिळायची अपेक्षा नाहीं. तरी पण एखाद्याच्या बाजूचें काम झालें म्हणजे त्यानें दिलें होतें असें उठवायचें हा रिकाम्या माणसांचा उद्योगच असतो. त्यांना मंडळी चहापाण्याला कारणांनींच बोलवायची आवड असे. 'चार मंडळी व मी पांचवा' असें सांगत. पण वेळेपर्यंत आठ दहा माणसं यायची हे ठरलेलं असे. असें त्यांचें संभाळले म्हणजे मग मी कितीं बायका बोलावते, कोणाला खण देते, देणग्या देते याची ते विचारपूस करीत नसत. माईपासून ते कुठल्याही माणसापर्यन्त कोणाला काय दिलं ह्याची चौकशी ते करीत नसत. मी शंभराचा शालू नेसले कीं पांचाचे पातळ नेसलें ह्याचीहि चौकशी नसे. माझ्या देवधर्माआड ते कधीं आले नाहींत. माझ्या सोवळ्या ओवळ्याच्या विचारावर त्यांनीं टीका केली नाहीं. व आपलीं मतं माझ्यावर लादली नाहींत. संसारांतली आपलीं कामें बरोबर करीत. लग्न कार्यासारख्या बाबतींत जें पुरुषांनीं करावें लागतें तें सर्व करीत. मुलींचीं लग्न सुद्धां हुंडा वगैरे देऊन उत्तम स्थळं पाहून थाटांत केली. सुना, मुली, जांवई ह्यांच्या सणावारानिमित्त करावयाच्या कौतुकांत त्यांनीं कधीं अडवलं नाहीं. त्यांच्या कारभारांत त्यांनीं कधीं माझा सल्ला घेतला नाहीं व माझ्या कारभारांत हात घातला नाहीं. अगदीं शेवटीं आजारी पडल्यावर एकदां एक बँकेचा कागद होता तो मी बापूसाहेब देशपांडयांना दाखवून अर्थ विचारला. तेव्हां ते सहज म्हणाले, 'ताई, तुम्ही इतकं केलत मग इंग्रजी कां नाहीं शिकलांत ?' तेव्हां हे म्हणाले, 'बापूसाहेब ती चूक माझी आहे.' त्यावेळेस त्यांनीं हे म्हणावें याचें मला वाईट वाटलें. मी हंसून म्हटलं, 'नाहीं हो; मलाच प्रपचांत वेळ नसे. मग कंटाळा येई.' फार न बोलतां, मुलांशीं फार वादावादी न करतां, मुलांवर त्यांनीं अलोट प्रेम केलं. सुनांच्यावरहि फार माया. मुली त्या मुलीच. सर्व आयुष्यभर प्रेमाची सावली करून आदरानें वागवून मला त्या देवानें जन्माचें ऋणी करून ठेवलें आहे.

सर्व चरित्र माझें मीच लिहिलें, त्यांत मींहि आलेंच आहे. पण व्यक्ति म्हणून मी स्वतःकडे पहाते. कारण माझा स्वभाव कसा आहे हे लोक सांगणार? पण माझ्या आवडी निवडी वगैरे मला सांगतां येतील. चांगलं जेवण तर सर्वांनाच आवडतं तसं मलाहि आवडत असे. पण एकंदरींत जेवणांत खाण्यांत खोड नव्हती. सर्व चाले. पण माझी आवड म्हणजे रोज एका जातीचा ठराविक ठशाचा स्वयंपाक नको असे. एका जातीची ठराविक ठशाची जेवणाची व्यवस्था सुद्धां नको वाटे. मी स्वतंत्र होईपर्यंत कोठल्याही प्रकारची कुरकूर न करतां सगळ्यांच्यासारखी वागले. पण थोडथोडी स्वतंत्रता मिळाली तशी थोडा थोडा बदल करीत गेलें. जुनी परंपरा न सोडतां करतां येतील तेवढ्या नव्या गोष्टी करीत गेलें. मी जन्मापासून श्रीमंतींत वाढलें. माझे आजोबा पेन्शनर दिवाण होते. आमच्या बव्यांकडे तर त्यावेळेस आनुवंशिक मोठेपणाचें बंड होतें. वडील श्रीमंत नव्हते. पण श्रीमंती थाटांत वाढलें होतें व आम्ही सरदार घराण्यांतले म्हणून ऐट होती. संसार मोठा नव्हता. त्यामुळें सुखी राहणी होती. लिंबडी, धांगध्रा वगैरे देशी संस्थानामधून राहिल्यानें व वरच्या थरांतच वावर असल्यानें तेंच पाहिलें. राजकोटला आल्यावर बॅरिस्टर पंडित, शुक्ल वकील, भडभडे व माझे आजोबा साठे हेच भोंवतीं लोक होते. त्यामुळें जसें पाटरांगोळ्यांचें श्रीमंती वैभव पाहिलें तसेंच आधुनिक टेबल खुर्च्यांचेंहि पाहिलें होतें. ह्या पांच दहा वर्षांत घरोघर जेवणांना टेबलं झालीं आहेत. पण तेव्हां चहालासुद्धां नव्हती. तेव्हांहि मला ती माहीत होतीं पण माझा ओढा पाटरांगोळीकडेच आहे व सोईच्या दृष्टीनें तेंच मला आवडतं पण चहाला वगैरे मी टेबलच वापरतें. पण जुन्या तऱ्हेतला बेफिकीरपणा व आळशीपणा आणि केवळ पोट भरण हेंच जेवणाचें महत्त्व हें मला पटत नाहीं. जेवायची जागा, भोंवतालचें वातावरण डोळ्यांना आनंददायक व आकर्षक असावें असं वाटतं. त्यांत विविधता आवडते. म्हणून मी ती माझ्या घरांत आणीत असे. नानाप्रकारचीं लोणचीं, नानाप्रकारचे सांडगे, पापड पापड्या वगैरे नेहेमीं करी. मोरंबे व खाण्याचे निरनिराळे प्रकार करी. स्वतःला सर्व आवडे. मात्र


28310 दि:

त्यामुळें माझा सर्व वेळ सारखा घर घर करण्यांत जाई. माझी आवड लहानपणापासूनच चांगल्या कपड्यालत्त्याची होती. झकपक दिखाऊ नको, भडक नको, पण चांगल्या पोताचा उंची कपडालत्ता मला आवडतो. मी श्रीमंत नाहीं त्यामुळें अर्थात् मला श्रीमंतीची घमेंड नाहीं. पण समतेच्या नांवाखालीं सरसकट सर्वांशीं उगीच बरोबरीनें वागायलाहि आवडत नाहीं. मला बोलायला, प्रेम करायला, उपयोगी पडायला गरीब श्रीमंत सर्व चालतात, जात गोत आडवी येत नाहीं. पण मी स्वत: जुनी आहे. आणि एकत्र जेवणाखाणांतच समता सांठवली आहें असें मला वाटत नाहीं. मी इतर जातींच्या घरीं कोठेंहि चहा पीत नाहीं, जेवत नाहीं तरी पण माझ्यावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या पारशी, मराठा व इतर जातीच्या कितीतरी भगिनी आहेत व माझ्या ब्राह्मण मैत्रिणीइतकेंच त्या माझ्यावर व मी त्यांच्यावर प्रेम करते. जेवणांतच प्रेम असतें तर सख्खे भाऊ एकमेकांच्या उरावर कां बसते ? मला देवाधर्माचा नाद आहे. पण मी कोठेंहि देवाला उठून जाणार नाहीं. पोथीला पण जाणार नाहीं. मला हा नाद लहानपणीं आईजवळ त्यावेळच्या मुलींना वळण लावण्याच्या पद्धतीमुळें लागला. त्यांत पुढें भरच पडली. त्याच्यापुढें नाथमहाराजांच्या सहवासानें आपले बरोबर आहे हें पटत गेलें, वाढत गेलें. धुळचास पाठक शास्त्र्यांच्या मुखानें उपनिषदे ऐकायला मिळालीं. लहानपणापासून धार्मिक ग्रंथ वाचीत होतें. पण ते सोपे. हरिविजय रामविजय असे. पुढें अवघड ग्रंथहि वाचायची गोडी लागली.

इंग्रजी शिकावें असें पुष्कळ दिवस वाटत होतें. पण व्याप वाढल्यावर तें वेड डोक्यांतून गेले, कारण फुरसदच कोठें होती ? तसें कांहीं काळ मासिक काढावें हेंहि वेड होतें. तेंहि पुढें गेलें. संसार, मुलंबाळं, आला गेला, कुटुंबांतलीं माणसं व भरीला माझें लिहिणें वाचणें ह्यांतच वेळ पुरत नसे.

मी व्याख्यानानिमित्त हिंडले ती मराठी प्रांतांत. पण शिवाय आम्ही दोघांनीं मिळूनहि प्रवास केलाच. भाऊला घेऊन कुटुंबयात्रा केली. ती सोडली तरी एकदां दिल्ली, आग्रा, कानपूर पाहिलें. एकदां कलकत्ता, काशी अलाहाबाद पाहिलें. कराचीला गेलों. पंढरपूर, गाणगापूर, तुळजापूर विजापूर केलें. रामेश्वरापर्यंन जाऊन आलों.

आयुष्याच्या ह्या दीर्घ प्रवासांत पुष्कळ चांगलीं माणसें भेटलीं. त्यांत कांहीं चांगल्या मैत्रिणीहि झाल्या आहेत. पुण्यास गेलें म्हणजे भिडेमावशी, माई, बाळ यांच्यासारख्या मैत्रिणी आणि बहिणी याच्या सहवासात दिवस पुरत नाहींत. तसेंच पुण्यास माझी मुलं म्हणजे मोठी आक्का, पुतणे व त्यांच्या बायका, माझे दीर सदूकाका ह्या सर्वांच्या प्रेमांत मी गुरफटतें. पण एक गोष्ट सारखी खटकते. आमच्या ताई ह्यांच्या नंतर चारच महिन्यांनीं जाव्या कां? त्या असतांना तेथें जाण्यांत विसावा होता. वाटतं त्यांच्याजवळ बसलें असतें, बोललें असतें. तें समाधान निराळें होतें. त्यांची ती सात्विक, प्रेमळ मूर्ति डोळ्यापुढें आली म्हणजे पोटांत खळबळतें. डोळ्याला धारा लागतात. भाग्यवानांनाच अशा जावेच्या रूपानें बहिण मिळेल. पण माझ्या नशिबांत आतां त्यांच्यापासून विसावा मिळायचं नाहीं !

पुण्यांत माझे साठे मामा तिघेहि आहेत. माझ्यावर सतत भगिनीप्रेम करणारा माझा बापूमामा व मामी आहे. तात्या गोखले, तोहि एक प्रेमाचा तंतू आहे. तसेंच माहेरच्या कुटुंबांतील उरलेला एकच तंतू म्हणजे माझा भाऊ दिनकर पुण्यासच आहे. त्याची बायको सालस, सात्विक अशी आहे. मुलं आहेत. एकच आत्याबाई असल्यामुळें ती पण खूप प्रेम करतात. ना. बा. ऊर्फ भय्यासाहेब केळकरांना विसरून माझं कसं चालेल ! तसं पाहिलं तर पुष्कळ गांवांतून आमचा स्नेहीपरिवार आहे. धुळ्याचे डॉ. कीर्तने तर चोपड्याचे मगन शेट, व आमचे परमस्नेही प्रतापशेट ही मंडळी अजून मला ओळखतात. चाळीसगांवचा हरिभाऊ पाटसकर हा तर माझा एक मुलगाच आहे. सौ. चारुताईसुद्धा सुनेसारखी वागते. असा हा मोठा परिवार आहे. आत्यंतिक आपुलकी व मानसिक विश्रांतीचीं हीं ठिकाणेंच !

तरीपण पूर्वीच्या संसारांतील गोड स्मृति मधून मधून उचल खातातच. मी हलवा करते आहे. बाळ, नाना माझ्या भोंवती बसून उडालेला दाणा खाताहेत. पाकाच्या भांड्यांत लिंबाची फोड पिळून ते सरबत पिण्यांत त्यांना किती आनंद वाटे धुळ्यास अंथरुणांची कधीं रांग तर कधीं कांहीं उशाशीं तर कधीं पायथ्याशीं अशा तऱ्हेनें खोली भरलेली असे. मुलांची जेवणं झालीं कीं, सर्व माझ्याभोंवतीं बसायचीं व मग स्वतः मोटारीं-

तून क्लबांतून येऊन आमच्यांत बसत व विचारीत 'कोरम भरला का?' काय तें गोड वातावरण! मतभेद नव्हते, वाद नव्हते, नुसता आनंद. त्या वेळेस लोक म्हणत 'खरंच आईसाहेब भाग्यवान, आहेत.' खरंच होते. त्या दिवाळच्या, आधींपासून आठ आठ दिवस मुलं नाचायची; विचारायची, 'आज दिवाळी कोठें असेल?' व मग मी रोज दोन दोन हात तिला पुढें आणायची. मग ते फटाके, त्यांच्या वाटण्या, ती कोजागिरी. ते सर्व आठवतं. आतां मी देवधर्म करते. धार्मिक ग्रंथ वाचते पण येळकोट जाईना ह्या म्हणीप्रमाणें अशा आठवणी केव्हां केव्हां उचंबळून येतात. मुलं माझ्यावर आजहि प्रेम करतात. मला कांहीं कांहीं कमी पडूं नये असे त्यांना वाटतें. तीं माझी भरपूर काळजी घेतात. शिवाय माझे तिघे दीर सदुकाका, दामूकाका व दत्तुकाका हे नात्यानें दीर असले तरी मुलांसारखेच आहेत. स्वतः तर 'पोरं' म्हणायचे. तेहि माझी विचारपूस करतात. स्वतः बांधलेल्या त्यांच्या ह्या आवडत्या वास्तूंत मी कमासाठीं कमाला घेऊन राहते. समाधानी व आनंदी वातावरण हें या वास्तूचें वैशिष्ट्य आहे. येथें माझ्यावर प्रेमाची पाखर घालणाऱ्या शेजारच्या सावदेकर बाईसाहेब, ताई, माई, काकू, आक्का, मावशी अशा माझ्या अनेक मैत्रिणी, जणू प्रेमाच्या मूर्तीच अशा आहेत. त्यांच्या घरची पुरुष मंडळी व गांवांतली इतर मंडळी माझ्या उपयोगी पडायला तयार अशी आहेत. सारांश अधून मधून येणारीं मुलं, मुली, नातवंडं, मैत्रिणी यांच्या घोळक्यांत मी या मनोहर भुवनांत कमासह बसलेली आहे. मग मी एकटी कशी? हें सारें मला समजतें–पण त्रेपन वर्षें ज्या देवाच्या सहवासांत गेली तो देव गेल्यानें देव्हारा आज सुना पडला आहे. म्हणून आनंदांतसुद्धां उदासीनता येते. असो. माझ्या लग्नानंतरचा अठ्ठावन वर्षांचा हा प्रवास झाला. आतां मी स्वस्थपणें हरिचिंतन करीन म्हणते. पण व्यसनी मनुष्य जसा व्यसनाकडे झुकतोच तसेंच केव्हां केव्हां लिहावेंसे वाटतें इतकेंच!

समाप्त

२८३८० ८६० ३१/१/५८

90392
REFBK-0010312